# क्रांती आणि प्रतिक्रांती



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# क्रांती आणि प्रतिक्रांती

लेखक

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

M.A., PH.D., D.sc., LL.D., D.LITI., BARRISTER-AT-LAW

प्रकाशक

प्रबुद्धभारत पुस्तकालय

आणि

प्रकाशन व्यवसाय

नागपूर

# अनुक्रमणिका


१. प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश ..........................५

२. प्राचीन शासन प्रणाली : आर्यांची शासन प्रणाली ....................७

३. निकृष्टतेच्या थराला पोहोचलेला ब्राह्मणवाद ..................... १०

४. बुद्ध आणि त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन ......................... १४

५. बौद्ध धम्माची अवनति आणि ऱ्हास .............................. २०

६. ब्राह्मणवादी साहित्य ................................................. २९

७. राजहत्या किंवा प्रतिक्रांतीचा जन्म ब्राम्हणवादाचा विजय .......... ४२

८. हिन्दू समाजाचे आचार विचार.......................................... ९९

९. भगवतगीतेवर निबंध-प्रतिक्रांतीचे धार्मिक समर्थन
"कृष्ण आणि त्याची गीता" ................................ १०८

१०. ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय.......................................... ११६

११. शूद्र आणि प्रतिक्रांती ........................................... ११८

१२. स्त्री आणि प्रतिक्रांती ............................................ १२४

# प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश

प्राचीन भारताच्या बहुतेक इतिहास हा मूळातच इतिहास नाही. असे मुळीच नाही की प्राचीन भारताला इतिहास नाही. खरे पाहता प्राचीन भारताला बराचसा असा इतिहास आहे. परंतु प्राचीन भारताच्या इतिहासाचे खरे स्वरुप नष्ट झालेले आहे. स्त्रिया आणि लहान मुलांच्या मनोरंजनाकरीता याला पौराणिक आख्यान बनविण्यात आले आहे. यावरुन हे दिसते की, ब्राह्मणवादी लेखकांनी हे कृत्य जाणून बुजून केले आहे.

'देव' हा शब्द पहा. याचा अर्थ काय? सामान्य माणसातील 'विशेष व्यक्ती' असा 'देव' या शब्दाचा अर्थ होतो अर्थात ''महामानव'' या अर्थाने देव या शब्दाचा उपयोग होतो. परंतु देव या शब्दाचा खरा अर्थ नष्ट झालेला आहे. अशाप्रकारे इतिहासाचा खरा अर्थ लपविण्यात आला आहे.

देव शब्दासोबतच ठिकठिकाणी यक्ष, गण, गंधर्व, किन्नर इत्यादी नावांचा पण उल्लेख आढळतो. हे कोण लोक होते? **महाभारत व रामायण वाचल्यानंतर हे लक्षात येते की हे काल्पनिक मानव होत ज्याचा वास्तविकतेशी जराही संबंध नव्हता.** ''असूर'' या नावाकडे बघा. रामायण व महाभारतात ज्याप्रकारे असूरांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यावरुन हे सिद्ध होते की, असूर हे मानवरहित दुनियेतील राक्षस असावेत. हे असूर लोक दहा बैलगाडया भरुन जेवण करीत. ते महाकाय आकाराचे राक्षस असत. ते सहा महिने झोपत. त्यांना दहा मुंडके होते. हे ''राक्षस लोक'' कोण आहेत? यांना अमानवीय ''दैत्यांप्रमाणे'' दर्शविण्यात आले आहे. आकारात, भोजन करण्याच्या प्रकारात व जगण्याच्या सवयी पाहता असून लोक हे राक्षसांसमान होते असे यांचे वर्णन केले गेले आहे.

**प्राचीन भारताच्या इतिहासात नागांचा उल्लेख वारंवार आढळतो. परंतु हे 'नाग' लोक कोण होते? या नागांना 'साप' या अर्थातने दर्शविण्यात आले आहे. काय हे खरे आहे? हे खरे असो वा खोटे परंतु लोकांची धारणाच अशी बनलेली आहे. हिंदुचा यावर पूर्ण विश्वास आहे. प्राचीन भारताच्या इतिहासावरुन काल्पनिकतेचे आवरण दूर करणे अत्यावश्यक आहे. ब्राह्मणवादी लेखकांनी वेडसरपणाने लिहिलेल्या प्राचीन भारताच्या इतिहासावरुन काल्पनिकतेचे हे आवरण दूर केल्याशिवाय भारताच्या इतिहासाचे वास्तविकत दर्शन आपणास होऊ शकत नाही.**

परंतु या ब्राह्मणवादी मलब्याखाली दबलेल्या इतिहासावरील आवरण बौद्ध साहित्याच्या मदतीने दूर करता येणे शक्य आहे. बौद्ध साहित्याच्या मदतीनेच

ब्राह्मणवादी मलबा दूर केल्यावरच प्राचीन भारताचे वास्तविक स्वरुप आपणांस स्पष्टपणे दिसू लागते. बौद्ध साहित्यावरुन देव हे मानव समूहातील सदस्य होते, हे स्पष्ट होते. बरेचसे देव लोक बुद्धांकडे आपल्या शंकाचे निरसन करण्यासाठी यायचे. याशिवाय बौद्ध धर्माचे प्रामाणिक साहित्य या नागासंबंधित जटिल प्रश्नावर प्रकाश टाकते.

'अंड्यातून' निघालेले साप व 'गर्भातून' जन्मलेले नाग यातील फरक हे साहित्य आपणांस सांगते. अशाप्रकारे 'नाग' या शब्दांचे दोन अर्थ होतात. यावरुन 'नाग' हा शब्द विशिष्ट मानव समुदायाला उद्देशून करण्यात आला आहे हे स्पष्ट होते.

याशिवाय असूर हे राक्षस नव्हते. ते सुद्धा जनविशेष मानव होते. शतपथ ब्राह्मण ग्रंथानुसार असूर हे सृष्टीचे निर्माते प्रजापतिचे वंशज होते. अचानक ते नरकदूत कसे बनले? पृथ्वीवर वर्चस्व स्थापित करण्यासाठी देव व असूर लोकांत तुंबळ युद्धे झालीत. यावरुन हे सिद्ध होते की असूर हे राक्षस (दैत्य) नसून मानव समुहातील लोक होत. बौद्धसाहित्याच्या मदतीनेच ब्राह्मणी साहित्याचे भारताच्या इतिहासावरील आवरण दूर केल्यावरच भारतीय इतिहासाचे वास्तविक दर्शन आपणांस होऊ शकते.

◆◆◆

# प्राचीन शासन प्रणाली : आर्यांची शासन प्रणाली

बौद्ध धर्म ही एक क्रांती होती. फ्रान्सच्या क्रांतीएवढीच ती महान क्रांती होती. जरी ही धार्मिक क्रांति असली तरी ती धार्मिक क्रांतीपेक्षाही मोठी होती. ही क्रांती पुढे सामाजिक व राजनीतिक क्रांतीत परिवर्तीत झाली. या महान सामाजिक क्रांतीचे चरित्र समजण्याचा पूर्वी तत्कालीन समाजाची अवस्था कशी होती हे समजणे आवश्यक आहे. फ्रान्सच्या क्रांतीच्या भाषेत म्हणायचे झाल्यास भारताच्या प्राचीन सामाजिक अवस्थेचे चित्रण करणे आवश्यक आहे.

बुद्धाच्या शिकवणीतून झालेल्या महान सामाजिक क्रांतीला जाणण्यापूर्वी हे आवश्यक आहे की तत्कालीन आर्य समाजाची विकृत परिस्थिती कशी होती? बुद्धपूर्व काळचा आर्य समाज सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या निकृष्टतेचा अगदी खालच्या थराला पोहोचलेला होता. आर्यात व्यापक प्रमाणात प्रचलित असलेल्या काही वाईट सामाजिक चालीरिती प्रचलित होत्या. याचा उल्लेख या ठिकाणी करणे आवश्यक आहे.

१. त्या काळच्या आर्य समाजात मद्यपान व जुगार खेळण्याचे सरार्स प्रचलन होते प्रत्येक राजाकडे जुगार खेळणार विशेषज्ञ नोकरीला असायचा. हा जुगार खेळण्यासाठी राजाच्या महालाशेजारीच एक मंडप बनविलेला असे.

सम्राट विराटकडे 'कंक' नावाचा जुगार विशेषज्ञ होता. हे राजे लोक जुगार केवळ मनोरंजनाकरीता खेळत नसून त्यावर मोठमोठे डाव लावीत असत. या डावात राज्य, आश्रित, नातेवाईक, गुलाम इत्यादी लावले जात असत. राजा 'नल' हा पुष्कर सोबत खेळतांना जुगारात सर्व काही गमावून बसला केवळ पत्नीसोडून नल राजाने जुगारात सर्व काही गमावले. यामुळे नल राजाला जंगलात जाऊन अक्षरशः भिकाऱ्याचे जीवन जगणे भाग पडले. नल राजाच्याही पुढेही जाणारे काही राजे आपणांस पाहावयास मिळतात. महाभारतावरून आपणांस कळते की पांडवाचा मोठा भाऊ धर्मराज युधिष्ठिर हा जुगारात राजपाट, लहान भावासह पत्नीदेखील गमावून बसला. जुगार खेळणे हे प्रतिष्ठतेकरीता आव्हान समजले जायचे आणि जुगाराचे आमंत्रण मिळणे सन्मान व प्रतिष्ठतेकरीता आव्हान समजले जात असे. जुगार खेळण्याअगोदर जुगाराच्या दुष्टपरिणामाबद्दल युधिष्ठिर याला चेतावणी देण्यात आली. परंतु जुगार खेळणे ही आपल्याकरिता प्रतिष्ठेची बाब आहे असे युधिष्ठिराने सांगितले.

जुगाराचे व्यसन केवळ राजे व श्रीमंतांनाच नव्हते तर सामान्य लोकही मोठ्या प्रमाणात जुगार खेळत असत. ऋग्वेदात जुगार खेळून कंगाल झालेल्यांची

अनेक वर्णने पहावयास मिळतात. कौटिल्याचा काळात जुगार खेळणे इतकी साधारण गोष्ट होऊन बसली की जुगार खेळण्यासाठी परवाना-पत्र सुद्धा प्राप्त होत असे व यातून राजाला मोठे उत्पन्न प्राप्त होत असे. दारू-पिणे हे दुसरे एक सामाजिक व्यसन आर्यांना जडलेले होते. आर्य समाजात दोन प्रकारचे मद्य पिण्यात येत असे. एक सोम व दुसरी सुरा. सोम यज्ञात पीत असत. प्रारंभी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यांनाच सोम पिण्याची परवानगी होती. नंतर ब्राह्मण, व क्षत्रियाव्यतिरिक्त वैश्य आणि शूद्रांना सोम पिण्यापासून प्रतिबंध करण्यात आला. सोम बनविण्याची प्रक्रिया ही एक गुप्त गोष्ट होती. जी केवळ ब्राह्मणांनाच माहिती होती. सुरापानाची अनुमती मात्र सर्वांनाच होती. ब्राह्मण देखील सुरापान करीत असत. असुरांचे पुरोहित शुक्राचार्याने इतके मद्यपान केले की नशेतच त्याने कचाला 'संजीवनी मंत्र' सांगून टाकला. या मंत्रांनी शुक्राचार्य देवांद्वारे युद्धात मारल्या गेलेल्या मृत असूरांना जीवंत करीत असे. 'कच' हा देवांचा पुरोहित बृहस्पतिचा पुत्र होता.

**महाभारतात वर्णन केले आहे की, एका प्रसंगी कृष्ण आणि अर्जुनाने अत्याधिक दारुचे सेवण केले.** यावरुन हे दिसून येते की, आर्य समाजातील उच्च वर्ग न केवळ मद्य पीत असे तर अत्याधिक मद्याच्या आहारी सुद्धा गेलेला होता. याहीपेक्षा शरमेची गोष्ट म्हणजे आर्य स्त्रियाही मद्याच्या आहारी गेलेल्या होत्या.

राजा विराटची पत्नी 'सुदेशना' ही अत्याधिक मद्य पीत असे. केवळ राण्याच मद्यपान करीत नसून समाजाच्या सर्व थरातील स्त्रिया देखिल मद्यपान करीत असत. ब्राह्मण स्त्रियांदेखील मद्यपान करीत.

कुमारिल भट याने ब्राह्मणांच्या मद्यपानाच्या व्यसनावर टिका केली आहे. आर्यांच्या यौन अनैतिकतेकडे लक्ष दिल्यास त्यांच्या आजच्या वंशजांना लाज वाटल्याशिवाय राहणार नाही.

आजच्या काळासारखे त्या काळात यौन संबंधाबाबत व विवाहाबाबत नियम नव्हते. पिता आपल्या मुलीशी लग्न करु शकत असे. भाऊ आपल्या बहिणीशी सहवास करु शकत असे. ब्रह्माचा पुत्र 'दक्ष' याने आपल्याच बहिणीशी विवाह केला. यम याने यमी सोबत सहवास केला. यम व यमी हे भाऊबहिण होते. वशिष्ठ याने आपल्या मुलीशी शतरुपासोबत विवाह केला. सोम याने स्वतःच्याच मुलीशी 'मरीशा' सोबत विवाह केला. आर्य लोक सर्रास मुक्तपणे यौनाचार करीत असत. ऋषि पराशर व ऋषि दीर्घपत यांनी याप्रकारे मुक्तपणे स्त्रियांसोबत सहवास केला होता. घराच्या बाहेर शारीरिक संबंध ठेवण्यात कुठलेही बंधन नव्हते. अशाप्रकारचा संबंध 'अयोनी' या शब्दांतून व्यक्त होतो. अयोनी म्हणजे घराबाहेर. सीता व द्रौपदी यांचा जन्म घराबाहेरच्या शारीरिक संबंधातूनच झाला होता. 'घराबाहेर

शीलाचार' ही गोष्ट सामान्यपणे प्रचलित होती. आर्यात पत्नी आणि मुलींना काही काळाकरीता भाड्याने देण्याची प्रथा सुद्धा अस्तित्वात होती.

राजा 'ययाति याने आपली मुलगी' 'माधवी' हिला गुरु गालव यांना भेट म्हणून दिले. परपुरुषांकडे पत्नीला संतानोत्पत्तिकरीता काही काळ ठेवण्याची प्रथाही आर्यात प्रचलित होती. वंशवृद्धीकरीता असे करणे आवश्यक समजले जात होते. आर्यात 'देव' नावाचा विशेष लोकांचा एक वर्ग होता, तो पराक्रम व पद प्रतिष्ठेने मोठा मानला जात असे. उत्तम संतानोत्पत्तिकरीता आर्य लोक अशा देवांकडे आपल्या स्त्रियांना ठेवीत असत. या प्रथेचे प्रचलन इतके सर्रास झाले की देव लोक कुठल्याही आर्य स्त्रीशी सहवास करण्याचा आपला अग्रहक्क मानू लागले. कुठलीही स्त्री तेव्हापर्यंत विवाह करु शकत नसे जेव्हापर्यंत ती देवांच्या 'पूर्वस्वादनाच्या' अधिकारांपासून मुक्त होत नसे. याला 'अवदान' म्हणत. 'लाज होम' नावाचा धार्मिक विधी प्रत्येक हिंदू विवाहात केला जातो. याचे वर्णन अश्वलायन गृह्य सुत्रात केले आहे. देवाद्वारे आर्य स्त्रीला विवाहाकरीता मुक्त करण्यासाठी चिन्ह म्हणून 'लाजहोम यज्ञ' केला जातो. 'सप्तपदी' नावाचा धार्मिक अनुष्ठान हिंदू समाजात केला जातो. सप्तपदी विधी केल्याशिवाय कुठल्याही विवाहाला हिंदू समाजात मान्यता मिळू शकत नाही. सप्तपदी याचा अर्थ वराचे वधुशी सात पावलं चालत जाणे. जर एखाद्या देव एखाद्या स्त्रीशी यौनसंबंधाबाबत असंतुष्ठ असल्यास त्या स्त्रीला सात पावलं चालण्याच्या अगोदर तो तिच्यावर पूर्वस्वादनाचा आपला हक्क सांगू शकत असे. सातफेऱ्यानंतर मात्र देवाचा हा अधिकार संपत असे. हे सात फेरे संपल्यानंतरच ती स्त्री विवाहबद्ध झाल्याचे समजण्यात येई. आर्यात कोणतीही मुलगी विवाहपूर्व कुठल्याही पुरुषाशी शारीरिक संबंध ठेवू शकत असे व संतानोत्पत्ति करु शकत असे. 'कन्या' या शब्दांचा अर्थच 'काम' असा होतो. 'कुंती' व 'मत्सगंधा' यांनी अशाप्रकारच्या विवाहसंबंध परपुरुषाशी ठेवला होता. एवढेच नव्हे तर पुत्रोत्पत्ति देखील केली. मत्सगंधा हिने भीष्माचा पिता शांतनुसोबत विवाह करण्यापूर्वी ऋषि पराशंरासोबत संभोग केला होता. इतकेच नव्हे तर पशुंशी सुद्धा यौनसंबंध ठेवण्याची पद्धत देखील आर्यात प्रचलित होती. ऋषि किंदम द्वारा हरिणांसोबत संबंध ठेवल्याची गोष्ट सर्वांना माहित आहे. सूर्याद्वारे एका घोडीशी संबंध ठेवण्याचे दुसरे उदाहरण देखील उपलब्ध आहे. यात सर्वात बिभत्स असा कुठला प्रकार असेल तर तो म्हणजे अश्वमेघ यज्ञात घोडयाशी स्त्रियांचा मैथुन करणे हा होय.

◆◆◆

# निकृष्टतेच्या थराला पोहोचलेला ब्राह्मणवाद

प्राचीन आर्य समाजात पौरोहित्याच्या व्यवसायावर ब्राह्मणांचा एकाधिकार होता. ब्राह्मणांशिवाय कुणीही पुरोहित बनू शकत नसे. धर्माचे रक्षक म्हणून ब्राह्मण नैतिक व आध्यात्मिक बाबीत समाजाचे मार्गदर्शक असत. ब्राह्मणांच्या कृत्याचे अनुसरण समाजाचा आधिनस्थ वर्ग करीत असे. परंतु आपणाकडे जे प्रमाण उपलब्ध आहे. त्यावरुन हे सिद्ध होते की ब्राह्मणांचा वर्ग हा नैतिकरित्या अधोगतीच्या अगदी खालच्या थराला पोहोचलेला होता. एखाद्या ब्राह्मणाला केवळ सात दिवस पुरेल इतकीच अन्न सामग्री संग्रहित करण्याचा अधिकार होता. परंतु हळूहळू त्यांनी हा नियम मोडला. प्रत्येक वस्तुंचा संग्रह करण्याची लालसाच जणू या ब्राह्मणवर्गाला जडली. अन्न, पेय, कपडे, शैय्या, सुगंधित द्रव्य इत्यादींच्या संग्रह ब्राह्मण लोक करु लागले.

या ब्राह्मण वर्गाला मनोरंजक तमाशे पहायचा जणू छंदच जडलेला होता. उदाहरणार्थ १) नर्तकीचे नृत्य, २) गीत गायन, ३) वाद्यांचे संगीत, ४) मेळ्यातील तमाशे, ५) गाणे म्हणणे, ६) हस्त संगीत, ७) भाटांचे गीत, ८) टमटम वाद्य, ९) सुंदर दृश्य, १०) चांडाळाद्वारा नाटय, ११) हत्ती, घोडे, हेले, बकरे, कोंबडे इत्यादी पशुपक्षांचा लढाया, १२) लाठीमार युद्ध, मल्लयुद्ध, बलपरिक्षण, १३) बनावट युद्ध, युद्धाभ्यास, समीक्षा इत्यादी.

याशिवाय विविध प्रकारचे खेळ आणि व्यसने या ब्राह्मणवर्गाला जडलेली होती. उदा. १. चौपड खेळणे, २. फासे फेकणे, ३. बहुरुप्याचे सोंग.

(याशिवाय व्यसन व खेळांची लांब लिस्टच बाबासाहेबांनी याठिकाणी दिलेली आहे.)

उंची आसने बाळगण्याचे व्यसनसुद्धा ब्राह्मणांना जडलेले होते. याशिवाय या ब्राह्मणांना स्वतःला श्रृंगारीत करण्याची पण सवय होती. चर्चेचे नानाप्रकार ब्राह्मणात अस्तित्वात होते. याशिवाय वादविवाद करणे सुद्धा ब्राह्मणवर्गाला आवडत असे. प्रत्येक गोष्ट ब्राह्मण वर्ग आपले स्वार्थ साधण्याच्या हेतूने करीत असे.

जीविका कमाविण्याकरीता ब्राह्मणवर्ग वाईट मार्गांचा अवलंब करीत. याकामी ब्राह्मण भविष्य सांगण्यासारख्या हलक्या कलेचा उपयोग करीत.

१. हस्तरेखा पाहणे, २. शकून-अपशकून, ३. वीज कडाडल्यास भविष्यवाणी करणे, ४. अग्नीला आहुति देणे, ५. चमच्याद्वारे आहूति देणे, ६. विविध प्रकारच्या खाद्यपदार्थाचे यज्ञात हवन करणे, ७. दृष्ट आत्मयांचे संतुष्टिकरण, ८. शारीरिक लक्षणांवरुन भविष्य सांगणे, ९. स्वप्नांबद्दल भविष्यवाणी,

१०. भूतांना पळविणे, ११. सापांचे मंत्र, १२. विष काढण्याची विद्या दाखविणे. विंचू, उंदीर, साप, कावळे पक्षी इत्यादींची तंत्रविद्या, १३. संकटांच्या वेळेस मंत्रविद्याप्रयोग, १४. रितीरिवाजांबद्दल नियम सांगणे, १५. देवतांना अपर्ण करण्याकरीता उजव्या पायातून रक्त काढणे, १६. केवळ हात पाहून भविष्यवाणी करणे की हा व्यक्ती भाग्यशाली आहे अथवा नाही, १७. ज्या ठिकाणी घर अथवा किंवा स्थल बनत आहे ती जागा शुभ आहे अथवा नाही, १८. दुष्ट आत्मांना दूर पळविणे, १९. भूतांना पळविणे, २०. मातीच्या घरात वास्तव्य करतांना तंत्र मंत्राचा प्रयोग करणे, २१. सापावर तंत्र मंत्र बोलणे, २२. जहारावर तंत्रमंत्र बोलणे, २३. विंचवाच्या दंशावर तंत्रमंत्र बोलणे, २४. एखादा मनुषय किती वर्ष जगेल याबद्दल भविष्यवाणी करणे, २५. संकटामधून बचावण्याकरीता तंत्रमंत्र दाखविणे.

खाली दर्शविलेल्या वस्तू आणि प्राण्यांच्या चांगल्या अथवा वाईट गुणांचे वर्णन तसेच त्यांची चिन्हे पाहून त्या वस्तुच्या स्थलकालाबद्दल शुभ किंवा अशुभ वर्तमान सांगणे.

रत्न, पोशाख, तलवार, बाण, धनुष्य, स्त्री-पुरुष, मुलगा-मुलगी, दास-दासी, हत्ती, घोडे, भौस, सांड, बैल, बकरे, कोंबडे, कासव आणि इतर प्राणी.

हलकी सलकी कारणे दाखवून ब्राह्मण स्वतःची जीविका कमवित असत आणि याकरिता वाइट मार्गाचा अवलंब करीत.

जसे-

मान्यवर निघण्याची वेळ झाली आहे.

गृह प्रमुख आक्रमण करतील आणि शत्रू मागे हटेल.

गृहप्रमुख विजयी होतील आणि आपले प्रमुख हरतील.

विदेशी प्रमुख या बाजूला विजयी होतील आणि आम्ही हरू.

याचप्रकारे हा पाक्ष विजयी होईल आणि तो पक्ष हरेल.

निष्ठावान व्यक्तींद्वार दान केलेल्या अन्नावर जगणारे ब्राह्मण हे जगण्याकरिता खालील बाबींच्या भविष्यवाणी सारखा वाइट मार्ग अवलंबित.

१) चंद्रग्रहण होईल.
२) सुर्य ग्रहण होईल.
३) नक्षत्रांचे ग्रहण होईल.
४) सुर्य आणि चंद्र निघून जातील.
५) सुर्य आणि चंद्र आपल्या पूर्वस्थानी येतील.
६) नक्षत्रे निघून जातील.

७) नक्षत्रे आपल्या पूर्वस्थानी येतील.

८) जंगलात वणवा पेटेल.

९) उल्कापात होईल.

१०) भूकंप होईल.

११. देवतेचा वज्रप्रहार होईल.

१२) सुर्य आणि चंद्राचा उय किंवा अस्त.

विविध प्रकारची भविष्यवाणी करून ब्राह्मणवर्ग उदरनिर्वाह करीत असे. उदा.

१) जोरदार पावसाची भविष्यवाणी.

२) कमी पावसाची भविष्यवाणी.

३) भरघोस पिकांची भविष्यवाणी.

४) अन्नधान्याच्या कमतरतेबद्दल भविष्यवाणी.

५) शांततेबद्दल भविष्यवाणी

६) अशांततेबद्दल भविष्यवाणी

७) रोगराईबद्दल भविष्यवाणी

८) चांगल्या ऋतुबद्दल भविष्यवाणी

९) शब्दांबाबत वादविवाद

१०) विविध प्रकारचे मंत्र व काव्य रचणे,

११) उलटसुलट चर्चा

ब्राह्मणावर विश्वास ठेवून लोक त्यांना भोजनदान देत असत. तरीही ब्राह्मण लोक हलक्या दर्जाच्या कला दाखवून आपली आजीविका कमावित असत.

१) विवाहाकरीता शुभ मुहूर्त काढणे,

२) शांतता कायम करावयाचा दिवस मुकरर करणे,

३) कर्ज घेण्यासाठी शुभदिवस ठरविणे,

४) धन खर्च करण्यासाठी शुभ दिवस ठरविणे.

५) इतरांचे नुकसान करण्याकरीता तंत्रमंत्राचा प्रयोग करणे,

६) गर्भपात करण्याकरीता मंत्रोच्चार करणे,

७) एखाद्या व्यक्तीला हरविण्याकरीता मंत्रोच्चार करणे,

८) सूर्यांची पूजा करणे,

९) तोंडाद्वारे आगीच्या ज्वाला काढणे,

१०) तोंड धुण्याकरीता अनुष्ठान करणे,

११) स्नान करण्याकरीता अनुष्ठान करणे,

१२) बळी देणे,

१३) लोकांना औषधी वनस्पती देणे,
१४) विविध प्रकारचे औषधी लोकांना देणे.
१५) मुकेपणा आणण्याकरिता जादूटोना करणे.
१६) बहिरेपणा आणण्याकरिता जादूटोना करणे.
१७) भूत बाधा झालेल्या मुलीद्वारे भविष्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे.
१८) जादूच्या आरश्यासमोर भविष्यवाणी दर्शविणे.
१९) भाग्य देवतेला आवाहन करणे.
२०) शक्तीशाली देवतेला आवाहन करणे.
२१) निश्चित लाभ प्राप्त होताच देवतेला भेट अर्पण करणे.
२२) एखाद्या मनुष्यात नपुंसकत्व उत्पन्न करणे.
२३) एखाद्या मनुष्यात पुंसकत्व उत्पन्न करणे.
२४) घराच्या जागेकरिता शुभस्थळ निश्चित करणे.
२५) स्थळांना पवित्र बनविणे.
२६) कानात तेल ओतणे.
२७) डोळ्यात औषधी घालणे.
२८) नेत्रवैद्याचे कार्य करणे.
२९) लहान मुलांच्या वैद्याचे कार्य करणे.
३०) वेळोवेळी औषधे देणे इत्यादी.

◆◆◆

# बुद्ध आणि त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन

हिंदू समाजाबद्दल बोलतांना सर टी माधवराव म्हणतात, ''हिंदू समाजाप्रमाणे जो कोणी आचरण करील, पाहिल व विचार करेल, त्याला एक गोष्ट गंभीरपणे लक्षात येईल की, हिंदू धर्माला सोडून पृथ्वीवरील कोणत्याही धर्मात त्यांच्या इतका सामाजिक वाईटपणा नसावा जो त्यांनी स्वतःच निर्माण केलेला आहे.''

वरील विचार खऱ्या अर्थाने आणि अतिशयोक्तिशिवाय हिंदू समाजात सुधारणेच्या गरजेचे प्रतिपादन करतो. समाजसुधारणेच्या बाबतीत प्रथम क्रांतीकारी समाजसुधारक व त्यातही श्रेष्ठ असे तथागत गौतम बुद्ध होत. समाज सुधारणेचा इतिहास हाच मुळी बुद्धापासून सुरु होतो. किंबहुना समाज सुधारणेचा इतिहास हा बुद्धाचा इतिहास सांगितल्याशिवाय अपूर्ण आहे.

इ.स. ५६३ मध्ये सिद्धार्थाचा जन्म नेपाळजवळील कपिलवस्तु येथे राजघराण्यात झाला. आर्यातील सामाजिक आणि धार्मिक वाईट चालीरीतींना कंटाळून बुद्धाने गृहत्याग केला. त्यावेळच्या दोन सुप्रसिद्ध ज्ञानी तत्त्ववेत्यांकडून बुद्धाने शिक्षा ग्रहण केली. वयाच्या ३५ व्या वर्षी बुद्धाला ज्ञान प्राप्त झाले. जीवनाच्या ४५ वर्षेपयंत बुद्धाने आपल्या धर्माचा प्रचार आणि प्रसार केला.

सुखी जीवनाकरीता जीवनाचा मापदंड म्हणून नैतिक आचरण आवश्यक आहे. अशी बुद्धाची शिकवण होती. समाजाच्या विकासाकरिता बंधुतेबरोबरच लोकतांत्रिक भावनांची वृद्धीसुद्धा आवश्यक आहे असा बुद्धाचा उपदेश होता.

बुद्धाचे वर्णन एक श्रेष्ठ ब्राह्मणने केले आहे. पुज्य गौतम दोन्हीही कुळांकडून श्रेष्ठ कुलीन, विशुद्ध वंशाचे, दिसायला सुंदर आणि आकर्षक, विश्वासपात्र, गौरवर्णीय, प्रभावशाली व्यक्तिमत्व असलेले, उत्तम सद्गुणांनी युक्त, मधुर व शांत व संयमीत वाणीचे, स्थिरचित असलेले, सर्वांशी उत्तम व्यवहार करणारे, अहंकाररहित, मनमिळावू आणि जसे बोलतील तसे वागणारे होते.

त्यांच्याबाबतीत सर्वांना आकर्षित करणारी जर कुठली गोष्ट असेल तर सर्व सुख संपन्नता, धन संपत्ती, ऐश्वर्य, राजपाट असतांना देखील तारुण्याच्या अवस्थेत या सर्व सुखांचा त्याग करून संसार त्याग केला व संन्यासाचे जीवन पत्करले. अशाप्रकारचे जीवन जगण्यासाठी फारच दृढनिश्चय आणि धैर्याची आवश्यकता असते.

बुद्धाच्या बाबतीत म्हटले जाते की, सर्व मानव, प्राणीमात्र, देवलोक इत्यादीच्या सुखाकरीता बुद्धाने जीवन समर्पित केले होते. बुद्धाच्या व्यतिक्तमत्वाची अमिट छाप तत्कालीन समाजावर कायमची पडली. ती इतकी की, आजतागायत भारतीय समाजावर कायम आहे.

बुद्धाचा धम्म लवकरच भारतात प्रसार पावला. थोड्याच काळात तो भारताचा राष्ट्रीय धर्म बनला. केवळ भारतापुरता मर्यादित न राहता जगाच्या सर्व भागात या धर्माचा प्रसार झाला. सर्व जाती व वंशाच्या लोकांनी याचा स्वीकार केला. एवढेच नव्हे तर अफगाणीस्तानच्या लोकांनी सुद्धा बौद्ध धम्म स्वीकारला. केवळ आशिया खंडापुरताच मर्यादित न राहता याबाबीचे प्रमाण मिळते की, बौद्ध धम्माचा प्रसार ब्रिटनपर्यंत झाला होता.

बुद्धांच्या धम्माचा इतका प्रसार होण्याची कारणे कोणती असेल तर ती म्हणजे बुद्धाचा धम्म हा मानवतावादी असून मैत्री, बंधुता, अहिंसा आणि नैतिक शीलाचरणावर आधारलेला होता.

तत्कालीन आर्य समाज सामाजिक, धार्मिक आणि व्यक्तिगत दुराचरणाच्या निकृष्ट थराला पोहोचलेला असल्यामुळे बुद्धाच्या शिकवणीने समाजात एक क्रांतीच घडून आली.

याप्रसंगी तत्कालीन आर्य समाजातील वाइट चालीरितींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

यज्ञात पशुंचा बळी हा ब्राह्मणांचा जीवकोपार्जनाचा मुख्य धंदा होता. या यज्ञाद्वारे ब्राह्मण देवांना प्रसन्न करीत.

अशा पारंपारिक यज्ञाची संख्या २१ होती. या २१ यज्ञांना सात सात याप्रमाणे तीन वर्गात विभागण्यात आलेले होते.

१. पहिल्या प्रकारच्या यज्ञात दूध, दही, धान्य व तूप इत्यादींची आहूती देण्यात येत असे.

२. दुसऱ्या प्रकारच्या यज्ञात सोमची (मद्य) आहूती देण्यात येत असे.

३. तिसऱ्या प्रकारच्या यज्ञात जीवांचा बळी देण्यात येत असे.

हे यज्ञ अल्पावधी किंवा दीर्घकाळ एक वर्षापर्यंत चालत. यज्ञ केल्याने यज्ञकर्त्यासोबत त्याच्या पितरांचा सुद्धा उद्धार होतो. त्याचबरोबर यज्ञकर्त्यास वैभवप्राप्ती सोबतच स्वर्गलाभ पण होतो असा तर्क लावून ब्राह्मण यज्ञाचे समर्थन करीत.

बहुतेक यज्ञ ब्राह्मणवर्ग हे पृथ्वीवरील उत्तम वस्तु प्राप्त करण्यासाठी करीत असत. लाभ प्राप्तीशिवाय ब्राह्मण लोक यज्ञ करीत नसत. यज्ञ करून आपण समाजाला मूर्ख बनवित आहोत हे या पुरोहित ब्राह्मण वर्गाला माहित होते. प्रत्येक यज्ञानंतर पुरोहितांना दक्षिणा म्हणून दान वाटण्यात येत असे. दक्षिणेसंबंधी ब्राह्मण पुरोहितांचे नियम स्पष्ट असत. दक्षिणा व दान घेण्याच्या हक्काचे ब्राह्मण पुरोहित निर्लज्जपणे समर्थन करीत. केवळ दक्षिणा उकळण्याच्या हेतूनेच ब्राह्मण यज्ञ करीत. या यज्ञात दान स्वरुपात ब्राह्मणांना मुल्यवान वस्त्र, गायी, घोडे आणि सोनं प्राप्त

होत असे. यज्ञकर्त्याने ब्राह्मनांना केव्हा काय दान द्यावयाचे आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला असे.

कर्मकांडाद्वारे दक्षिणा प्राप्त करण्याकरीता यज्ञाचे जाळेच संपूर्ण समाजावर ब्राह्मणांनी पसरविले होते. या जाळ्यात सामान्य जनता अलगद फसत असे. यज्ञ करणाऱ्यावर यज्ञाचा बोझा पडत असे, हे यावरुन लक्षात येते की, एका यज्ञात दानस्वरुपात  देण्यात येणारी दक्षिणा म्हणून एक हजार गायींचा उल्लेख एके ठिकाणी आलेला आहे. एवढ्या मोठ्या लाभाच्या लालचीने ब्राह्मण पुरोहित घोषणा करीत की, जो एक हजार गायी दान देईल, त्याला स्वर्ण लाभ होईल. याबाबतीत ब्राह्मण पुरोहितांच्या तर्क असे की देवदेवतांना प्रसन्न करतांना देवतासुद्धा पुरस्काराची मागणी करतात. तेव्हा हा पुरस्कार दानस्वरुपात घेण्याचा अधिकार ब्राह्मणांना आहे.

जीवांचे बळी देणाऱ्या यज्ञाला, यज्ञात प्रमुख स्थान प्राप्त होत असे. असे यज्ञ फार खर्चिक व हिंसक असत. या यज्ञात पाच प्रकारच्या जीवांचा बळी देण्यात येत असे. यात मनुष्यबळीला प्रमुख स्थान होते. परंतु नरबळी देणे ही फार खर्चिक बाब होती. नरबळी देण्याबाबत हा नियम होता की नरबळी हा ब्राह्मण किंवा शुद्र वर्गातील नसावा तर तो क्षत्रिय व वैश्य वर्गातील असावा. त्यावेळच्या किंमतीनुसार एका मुनष्यांचे मूल्य एक गायी इतके होते शिवाय नरबळी देणाऱ्यास बळीचा वध करून बळींचे मांस खाण्याा नियम देखील होता.

मनुष्यबळी नंतर दुसरे स्थान घोड्याचे होते. अश्वबळी देणे सुद्धा फार खार्चिक बाब होती. कारण की, आर्यांच्या सैन्य अभियानात घोड्याला महत्वपूर्ण वाहकाचे स्थान होते. घोड्याचा बळी देणे म्हणजे फार मोठे नुकसान करणे होय हे आर्यांना माहित होते. अश्वबळी देण्यात आणखी एक संकट होते ते म्हणजे घोडयाचा वध ही फार हिंसक बाब होती. सोबतच अश्वमेध यज्ञ करणाऱ्याच्या पत्नीला घोड्याशी मैथुन देखील करावा लागत असे.

सर्वसाधारणपणे कृषिकार्यात उपयोगी असणाऱ्या पशूंचाच यज्ञात बळी देण्याचे प्रचलन वाढले. त्यात गायी आणि बैल प्रामुख्याने असत.

**कौशलनरेश प्रसेनजित याने करावयाच्या एका यज्ञात बळी म्हणून पाचशे गायी, पाचशे बैल, पाचशे सांड व पाचशे बकरे आणि पाचशे मेंढ्या खांबांना बांधण्यात आल्या. या सर्व पशूंना बळी देण्याच्या कामी जे सेवक चाकरी बजावित होते, त्या सर्व सेवकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. हे बळीयज्ञ एक प्रकारे उत्सवासारखे साजरे करण्यात येई. ब्राह्मणांना भाजलेल्या मांसाव्यतिरिक्त मादक पेय सुद्धा भरपूर प्रमाणात उपलब्ध होत असे. सोम व सुरा ही दोन्ही प्रकारची मद्ये ब्राह्मणांना देण्यात येत.**

जवळपास सर्वच यज्ञात जुगार खेळण्यात येत असे व त्यातही असामान्य गोष्ट म्हणजे आसपासच्या परिसरात खुलेआम सर्रास संभोग चालायचे.

यज्ञ हे ब्राह्मणांच्या अय्याशिचे साधन बनले होते व त्यात कुठलीही नैतिकता आणि धर्म शिल्लक राहिलेला नव्हता. अर्थात तत्कालीन आर्य समाज हा सर्वात घृणित अशा सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक व्याभिचारामध्ये गुरफटून गेला होता.

समाजाची निकृष्टावस्था बघता तत्कालीन समाजात समाजसुधारणेची आवश्यकता भासत होती. याबाबतीत सर्वप्रथम समाज सुधारणेचा प्रयत्न केला तो तथागत गौतम बुद्धाने.

भारतात सामाजिक सुधारणेचा इतिहासाच मुळी गौतम बुद्धापासून सुरु होतो. किंबहूना कोणताही समाजसुधारणेचा इतिहास, बुद्धाचा इतिहास सांगितल्याशिवाय पूर्ण होवू शकत नाही.

व्यक्तीगत नैतिकतेचे आचरण हाच मनुष्याच्या जीवनाचा खरा मापदंड आहे अशी बुद्धाची शिकवण होती. तत्कालीन समाजाला बुद्धाचे विचार अभिनव व क्रांतीकारी वाटले.

पवित्र जीवनाचे उदाहरण प्रस्तुत करूनच बुद्ध थांबले नाही तर समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषाचे चारित्र्य निर्माण व्हावे असे बुद्धाला वाटत असे, तत्कालीन आर्य समाजाला माहित नसलेल्या दिक्षा विधीची सुरवात बुद्धाने केली ज्याद्वारे लोकांचे मार्गदर्शन होईल. दिक्षा घेणाऱ्यांना बुद्धाद्वारे देण्यात येणाऱ्या नैतिक तत्वांचे पालन करण्याची प्रतिज्ञा या दिक्षविधीमध्ये घ्यावी लागत असे.

**या अभिनव सिद्धांतांना पंचशिल म्हणतात. ते पंचशिल अशाप्रकारचे आहेत-**

**१) हत्या न करणे. २) चोरी न करणे. ३) खोटे न बोलणे.**
**४) व्याभिचार न करणे. ५) मादक पदार्थांचे सेवन न करणे.**

**हे पाच सिद्धांत सामान्य लोकांकरीता होते तर भिक्षू करीता खालील अधिक पाच सिद्धांत होते.**

**१) नियमबाह्य भोजन न करणे.**

**२) नृत्य, गायन, नाटय अथवा तमाशे न पाहणे किंवा त्यात सहभाग सुद्धा न घेणे.**

**३) फुलांच्या माळा, सुगंधीत द्रव्य आणि अलंकाराचा उपयोग न करणे.**

**४) उंच आसने किंवा शैय्येचा वापर न करणे.**

**५) धन संग्रह न करणे.**

हे जीवनाचे मापदंड सर्वांनाच लागू असावेत अशी बुद्धाची विचारसरणी होती.

या सर्वांमध्ये महत्वाचा सिद्धांत हा अहिंसेचा होता. केवळ जीव वाचविण्यासाठी या सिद्धांन्ताचा उपयोग करायचा नाही असे नव्हे तर सृष्टीतील प्रत्येक सजिवांप्रती मानवाने संवेदनशील सदभावनापूर्वकं आणि मैत्रीपूर्वक राहावयास पाहिजे.

बुद्धाने इतर सिद्धान्तांना देखील असाच व्यापक आणि सकारात्मक दृष्टीकोन प्रदान केला.

सुखी आणि संपन्न जीवना करिता दृढ संकल्प करून आणि सतत प्रयतन करणे आवश्यक आहे. बुद्धाचे उपदेश हे केवळ नकारात्मक नव्हते तर ते सकारात्मक आणि चरनात्मक ही होते. बुद्धाच्या सिद्धांताचे अनुसरण करणाऱ्यावर बुद्ध संतुष्ट नव्हते तर त्या व्यक्तीने इतरांना देखील प्रवृत्त करावे असा बुद्धाचा आग्रह होता.

अंगुत्तर निकायामध्ये बुद्धाने एक चांगला मनुष्य आणि श्रेष्ठ मनुष्य यामध्ये भेद केलेला आहे. जो मनुष्य हत्या, चोरी, खोटे बोलणे आणि मादक पदार्थांचे सेवन करित नाही त्याला चांगला मनुष्या म्हणावा परंतु श्रेष्ठ मनुष्य त्यालाच म्हणावे जो वरिल नियमांचे पालन स्वतः करतो आणि इतरांना पालन करावयास लावतो.

म्हणून म्हणतात की बौद्ध धम्माची दोन वैशिष्टे आहेत एक म्हणजे मैत्री आणि दुसरा विवेक हा होय.

मैत्रीपूर्ण व्यवहाराला जीवनात अत्यंत आवश्यकता आहे. हे बुद्धाला पूर्णपणे माहित होते. म्हणून बुद्ध म्हणतात ज्यांप्रमाणे एखाद्या लहान मुलाची आई आपल्या बाळाची काळजी करते, त्याचप्रकारे सर्व प्राणीमात्राबद्दल मनुष्याने व्यवहार केला पाहिजे.

कुणाबद्दलही मनात वैरभाव मनात बाळगू नका, सर्व प्राणीमात्रांबद्दल दयाभाव ठेवा. संपूर्ण विश्वाप्रती सदभावना ठेवा. मैत्रीपूर्ण आणि शत्रूताविहीत संबंधच जीवनाचा सर्वोत्तम आधार आहे हीच जीवनाची सर्वोत्तम जगण्याची पद्धती आहे. हाच खरा बुद्धाचा आदेश आहे.

सर्व प्राणीमात्राबद्दल व्यापक करुणाभाव संवेदना, आणि प्रत्येक प्राणि मात्राबद्दल मैत्री बुद्धाच्या शिकवणीची विशेषता होती आणि जगातील इतर धर्मसंस्थापकात बुद्धाची हिच विशेषता आहे.

बुद्धा आपल्या वैशिष्टयपूर्ण शिकवणीमुळे जगातील बहुतेक भागात आपल्या धर्माचा प्रसार करण्यात यशस्वी राहिले.

मैत्रीएवढे महत्व बुद्ध विवेकांना देत असत. बुद्धाचे ठाम मत होते की जीवनाची सुरवात ज्ञानाने होते आणि जीवनाची समाप्ती विवेकाने होते जगाचे

कल्याण करण्यासाठीच बुद्धाच्या जीवनाचे प्रयोजन होते. दुख:मुक्ती करण्यासाठीचा मार्ग म्हणजे अज्ञानाचा विनाश करणे होय.

जीवनात जर सुख प्राप्त करावयाचे असेल तर ज्ञान आवश्यक आहे आणि ज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करुनच मनुष्य सुखी होऊ शकते.

बुद्ध सर्व लोकांना अलैकित (दैवी) शक्तीद्वारे एकदम सुखी करतील हा दावा बुद्धाने कधीच केला नाही. ज्याने त्यांने स्वतःच स्वतःच्या प्रयत्नाद्वारे ज्ञानाचा मार्गावर चालून उद्धार करून घ्यावयाचा आहे. बुद्धाने नैनिकतेवर फारच जोर दिलेला आहे. कारण की बुद्धाच्या मते नैतिकते शिवाय ज्ञान हे व्यर्थ आहे.

**खालील तीन कुप्रथांविरुद्ध बुद्धाने महत्वाचे भर दिले आहे.**

**१) बुद्धाने वेदांच्या अधिकार श्रेष्ठतेला (अपौरुषेयतेला) नकार दिला.**

**२) धर्म म्हणून बळी प्रथेला बुद्धाने विरोध दर्शविला.**

**३) जातिप्रथेला (वर्णव्यवस्थेला) बुद्धाने प्रखर विरोध केला.**

आजच्या सारखी त्या काळी जातीप्रथा तितकीशी कठोर नव्हती. आंतरजातीय विवाहांवर प्रतिबंध नव्हता. व्यवहारात लवचिकता होती. आजच्या सारखी ती कठोर नव्हती. परंतु तत्कालीन समाजात जाती व्यवस्थेचा फैलाव झाला विषमता ही या जाती व्यवस्थेचा आधार होती. आणि याच जातीव्यवस्थे विरुद्ध बुद्धाचे मोहिम उघडली संपूर्ण समाजावर वर्चस्व गाजविण्यांचा ब्राह्मणांच्या अहंकाराचे भगवान बुद्ध फार मोठे कहर विरोधक होते.

या सर्व बाबींचा पुरावा आपणांस कुटदंत सुत्त, अंबट्ठ सुत्त, लोहित्त सुत्त आणि महाविगत राजाच्या गोष्टीवरुन बुद्धाच्या नैतिक शिकवणूकीची आपणास कल्पना येते.

◆◆◆

# बौद्ध धम्माची अवनति आणि ऱ्हास

भारतामधून बौद्ध धम्म नष्ट होण्याबद्दल सर्वांनाच अत्यंत आश्चर्य वाटते. ज्यांनी या विषयावर चिंतन केले आहे अशा अनेकांना दुःखही होते. बौद्ध धम्म भारतातूनच नाहीसा झालेला आहे. परंतु चीन, जपान, ब्रह्मदेश, इंडोनिशिया, व्हिएतनाम, श्रीलंका, मलाया, सुमात्रा इत्यादी देशात आजही अस्तित्वात आहे. केवळ भारतातूनच बौद्ध धम्म नाहीसा झालेला नाही तर बहुसंख्य हिंदुच्या डोक्यातूनही हिंदू धर्म नाहीसा झालेला आहे.

हे अचानक कसे काय घडले, हा एक महत्त्वपूर्ण प्रश्न आहे. या प्रश्नाचे कुठलेही समाधानकारक उत्तर मिळत नाही. परंतु कुणाही व्यक्तिने या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधण्याचा देखील प्रयत्न केला नाही. या विषयावर विचार करतांना लोक एक महत्त्वाची बाब विसरतात, ही बाब बौद्ध धम्माची अवनति आणि ऱ्हासाच्या अंतराशी संबंधित आहे. बौद्ध धम्माच्या अवनतिची कारणे तर स्पष्ट आहेत. परंतु नाशाची कारणे तितकीशी स्पष्ट नाही.

भारतात मुसलमानांच्या आक्रमणांमुळे बौद्ध धम्माचा नाश घडून आला यामध्ये कुठलीही शंका नाही.

**इस्लामचा मूर्तिभंजक या स्वरुपात भारतात प्रवेश झाला. 'बूत' या शब्दाचा अरबी भाषेत मूर्ती असा अर्थ होतो. तथापि, बहुतेक लोकांना 'बूत' या शब्दाचा खरा अर्थ माहित नाही. 'बूत' हा शब्द अरबी भाषेत 'बुद्ध' या शब्दाचा अपभ्रंश म्हणून वापरतात.** अशाप्रकारे मुसलमान विचारवंताच्या दृष्टीकोनातून या शब्दाच्या व्युत्पत्तीकडे पाहता मूर्तिपूजा आणि बौद्ध धर्म एक दुसऱ्याचे पर्यायवाचक शब्द आहेत. मुस्लिमांकरीता मूर्तिपूजा आणि बौद्ध धर्म एक दुसऱ्यांचे समानअर्थी शब्द आहेत. म्हणून मूतिविध्वंस करण्याचा उद्देश बौद्ध धम्म नष्ट करणे असा करण्यात आला. मुस्लिम धर्माने भारतातूनच केवळ बौद्ध धम्माला नष्ट केले नाही तर जिथे कुठे बौद्ध धम्म अस्तित्त्वात होता त्या सर्व ठिकाणी या धर्माला नष्ट करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मुस्लिम धर्माचा भारतात प्रवेश होण्यापूर्वी बौद्ध धम्म इराण, इराक, अफगाणिस्तान, गांधार, चीन आणि मध्य एशियाचा धर्म होता. एकप्रकारे बौद्ध धम्म हा आशियाचा धर्म होता. या सर्व देशात मुस्लिम धर्माने बौद्ध धम्माला नष्ट केले.

याबाबतीत विसेन्ट स्मिथ म्हणतात की, ''सनातनी ब्राह्मणांद्वारा केल्या गेलेल्या अत्याचारापेक्षाही मुस्लिम आक्रमकांनी जे भीषण हत्याकांड केले ते कित्येक पटींनी मोठे होते आणि भारताच्या बहुतेक प्रांतातून बौद्ध धम्म नष्ट होण्याला जबाबदार आहे.

या स्पष्टीकरणाने सर्वांचे समाधान होऊ शकत नाही. किंबहुना कुणाचेही असे समाधान होऊ शकत नाही. दोनही धर्मापैकी केवळ एकच धर्म कसा शिल्लक राहिला? असा प्रश्न विचारल्या जाऊ शकतो. हा प्रश्न तर्कसंगत आहे पण उपरोक्त सिद्धांताचे खंडन करु शकत नाही. ब्राह्मणवाद जीवंत राहील आणि त्यांचे अस्तित्त्व टिकून राहिले.

परंतु याचा अर्थ हा नाही की, मुस्लिमांमुळे बौद्ध धम्म नष्ट झाला नाही. माझा अभिप्राय हा आहे की, त्या काळात अशी काही परिस्थिती होती, जिच्यामुळे मुस्लिमांच्या आक्रमणापुढे ब्राह्मणवाद टिकून राहणे शक्य होते. परंतु बौद्ध धम्म टिकून राहणे शक्य नव्हते. जे लोक या विषयावर गंभीरपणे विचार करतील त्यांना तीन कारणे मुस्लिम आक्रमणांपुढे ब्राह्मणवादाला टिकून राहण्याचे व बौद्ध धम्म नष्ट होण्याची बद्दल आढळून येतील.

**१) पहिली गोष्ट ही की, मुस्लिम आक्रमणांच्या वेळी ब्राह्मणवादाला राजाश्रय प्राप्त होता. बौद्ध धम्माला मात्र राजाश्रय प्राप्त नव्हता. परंतु सर्वाधिक महत्त्वपूर्ण गोष्ट ही की, बौद्ध धम्म पूर्णपणे नष्ट होईपर्यत ब्राह्मणवादाला भारतात राजाश्रय प्राप्त होता.**

**२) दुसरी गोष्ट ही की इस्लामच्या तलवारीने बौद्ध भिक्षुंचे पूर्णपणे शिरकाण केले व बौद्ध भिक्षुपरंपरेला दुसऱ्यादा पुर्नजीवित करता आले नाही. याउलट ब्राह्मणवादी पौरोहित्याला कायमचे नष्ट करणे मुस्लिमांना शक्य झाले नाही.**

**३) तिसरी गोष्ट ही की, भारतातील ब्राह्मणवादी शासकांनी बौद्ध बहुसंख्य जनतेवर अत्याचार केले. त्यांच्या या अत्याचार व छळापासून बचाव करण्याकरीता भारतातील बहुसंख्याक बौद्ध जनतेने मोठ्या संख्येने इस्लाम धर्माचा स्वीकार केला आणि त्यांनी बौद्ध धम्माला कायमचे सोडून दिले.**

वरील तीनही बाबींचे इतिहास समर्थन करतो. मुस्लिम प्रभावाखाली येणारा भारतातील सर्वात प्रथम प्रांत सिंध होता. पूर्वी या प्रांतावर शुद्र राजा राज्य करीत होता. परंतु एका ब्राह्मणाने हे राज्य बळकावले. या वंशाचे शासन सिंधीवर ७१२ पर्यंत चालले. इसवी सन ७१२ मध्ये इब्न कासिम द्वारा सिंधवर आक्रमण झाले. तेव्हा एका ब्रहामण शासकाद्वारे ब्राह्मण धर्माला वाचविणे स्वाभाविक होते. सिंधचा शासक दाहिर होता. दाहिर हा ब्राह्मण वंशाचा होता.

स्वतः हुएनत्संगने आपल्या डाळयाने पाहिले होते की, **त्याच्या वेळी पंजाबमध्ये बौद्ध वंशाच्या राजाचे शासन होते. या वंशाने पंजाबवर ८८० पर्यंत शासन केले.** नंतर हे राज्य 'लल्लिय' नावाच्या ब्राह्मणाने बळकावले व

त्याने ब्राह्मणवादी धर्माला राजाश्रय दिला. **या वंशाने पंजाबवर ८८० ते १०२१ पर्यंत शासन केले.** यावरुन हे दिसून येते की ज्यावेळी सुबुक्तगीन आणि मोहम्मद कासिम ने पंजाबवर आक्रमण केले. त्यावेळी भारतातील बहुतेक शासक ब्राह्मण धर्मावलंबी होते. जयपाळ (९६०-९८०), आनंदपाल (९८०-१०००), व त्रिलोचनपाल (१०००-२१) हे सर्व ब्राह्मण धर्मावलंबी शासक होते. सुबुक्तगीन आणि मुहम्मद कासिमच्या यांच्या आक्रमणाबद्दल आपण सर्वांनी खुपच वाचलेले आहे. मुहम्मद गझनीच्या आक्रमणांनी सुरवात झालेले व शहाबुद्दीन घोरीच्या नेतृत्वात सुरु असलेले मध्य भारतावरील मुस्लिमांचे आक्रमण सतत सुर होते. त्यावेळी मध्य भारतात हिंदू राज्ये होती. मेवाड (आता उदयपूर) वर गहलौत यांचे शासन होते. सांभर (आता बुंदि, कोटा आणि सिरोही) वर चौहानाचे राज्य होते. कन्नौजवर प्रतिहारांचे, धारवर परमारांचे, बुंदेलखंडवर चंदेलांचे, अन्हिलवाडवर चावडांचे तर चेदिवर कलचुरिंचे शासन होते. या सर्व राज्याचे शासक हे राजपूत राजे होते व राजपूत हे काही कारणांमुळे ज्यांची मी नंतर चर्चा करणार आहे, ब्राह्मणवादी धर्माचे कट्टर समर्थक होते.

या आक्रमणांच्या वेळी बंगाल दोन राज्यात विभागलेला होता, पूर्व आणि पश्चिम. पश्चिम बंगालवर पाल वंशाच्या शासकाचे राज्य होते तर पूर्व बंगालवर सेन वंशाचे राज्य होते. पाल हे क्षत्रिय होते व ते बौद्ध धम्मवलंबी होते. सेन वंशाबद्दल मात्र मतभेद आहेत. अधिकांश विचारकांच्या मते, सेन हे प्रारंभी बौद्ध होते नंतर ते ब्राह्मणी धर्माचे कट्टर समर्थक बनले.

मुस्लिम आक्रमणाच्या वेळी नर्मदा नदीच्या दक्षिणेकडे चार राज्ये अस्तित्वात होती.

१) पश्चिमी चालुक्याचे दक्षिणी राज्य

२) चोलांचे दक्षिणी राज्य.

३) पश्चिम तटावरील कोकणात सिलहाडांचे राज्य आणि

४) पूर्व तटावरील त्रिकलिंगचे गंग राज्य.

१२ व्या शतकात ही राज्ये अधिक शक्ती संपन्न बनली. १३ व्या शतकात तर ही राज्ये स्वतंत्र झाली. ही स्वतंत्र बनलेली राज्ये अशी -

१) देवगीरींचे यादव २) वरंगलचे काकतीय ३) हैलबिडचे होयासल ४) मदुराचे पांडय तर ५) त्रावणकोरचे चेर राज्य.

ही सर्व राज्ये सनातीन ब्राह्मण धर्माची समर्थक होती. भारतावर मुस्लिम आक्रमणांना सन १००१ मध्ये सुरवात झाली. या आक्रमणाची झंझावती लाट दक्षिणेत सन १२९६ मध्ये दक्षिण भारताच्या देवगिरी राज्यावर आदळली. सन १२९६ पर्यंत संपूर्ण दक्षिण भारत मुस्लिमांच्या वर्चस्वाखाली आला. ३०० वर्षाच्या

मुस्लिम आक्रमणांच्या या काळात संपूर्ण भारतावर हिंदू किंवा ब्राह्मणवादी राजांची सत्ता होती. या वाताहतीच्या काळात ब्राह्मणी धर्माला या हिंदू राजाचे समर्थन प्राप्त होते. परंतु मुस्लिमांद्वारे पराजित व नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या बौद्ध धम्माला मात्र कुणाचेही आश्रय प्राप्त होऊ शकला नाही. अशा परिस्थितीत बौद्ध धम्म निरश्रित अवस्थेत होता. स्थानीय राज्यांची हेटाळणी व आश्रयाविना बौद्ध धम्म भारतात मृतप्राय झाला व मुस्लिम आक्रमकांच्या ज्वालांत जळून नष्ट झाला.

**मुस्लिम आक्रमणकारी लोकांनी ज्या बौद्ध विश्वविद्यालयांना लुटून नष्ट केले त्यामध्ये नालंदा, विक्रमशीला, जगदल, ओदान्तपूरी हे विश्वविद्यालय होते. देशातील या सर्व बौद्ध विहारांना मुस्लिम आक्रमकांनी नष्ट केले. जीव वाचविण्याकरीता हजारोंच्या संख्येने बौद्ध भिक्षू भारताबाहेर नेपाळ, तिबेट व इतर देशात पळून गेले. मुस्लिम आक्रमकांनी हजारोंच्या संख्येने बौद्ध भिक्षुंची कत्तल केली.**

या बौद्ध भिक्षुंची किती निघृणपणे मुस्लिम आक्रमकांद्वारे हत्या करण्यात आली. याचे वर्णन स्वतः मुस्लिम इतिहासकारांनी केलेले आहे.

११९७ मध्ये मुस्लिम सेनापतीने आक्रमणाच्या वेळी बिहारमध्ये कोणत्या व कशा प्रकारे हत्या केली गेली यांचे वर्णन विन्सेट स्मिथ यांना केले आहे.

"त्यांच्या मते, आक्रमणांकरीता प्रसिद्ध असलेल्या ज्या मुसलमान सेनापतीचे नांव प्रसिद्ध होते. त्याने एका झटक्यात येथील राजधानीवर ताबा मिळविला. त्याचा वेळेला आक्रमणकर्त्या दलातील एकाशी इतिहासकराची भेट झाली. त्या माणसाद्वारे इतिहासकाराला हे माहित झाले की, केवळ २०० घोडेस्वारांनी विहारातील एका किल्ल्यावर (विहारावर) बेधडक बिनविरोध मागील दारातून आक्रमण केले व तो संपूर्ण किल्लाच जिंकून घेतला. लुटित यांना प्रचंड प्रमाणात संपत्ती प्राप्त झाली. आक्रमणकर्त्यांनी मुंडन केलेल्या ब्राह्मणांची अथात बौद्ध भिक्षुंची इतक्या मोठ्या प्रमाणात हत्या केली की, त्या संपूर्ण विहारातील पुस्तक वाचण्याकरीता एक भिक्षु देखील आक्रमणकर्त्यांना उपलब्ध होऊ शकला नाही. नंतर आम्हाला कळले की, हे संपूर्ण विहार एक मोठे विश्वविद्यालय होते. हिंदी भाषेत महाविद्यालयाला 'विहार' म्हणतात."

अशा प्रकारे बौद्ध भिक्षुंचा मुस्लिम आक्रमणांद्वारे संहार करण्यात आला. या आक्रमकांनी मुळावरच घ्याव घातला. बौद्ध भिक्षुंचा संहार करून इस्लाम ने बौद्ध धम्माची हत्या केली. हे एक मोठे संकट होते. जे बौद्ध धम्माच्या विनाशाला कारणीभूत बनले. प्रचलित विचारधारेप्रमाणे धर्माचा प्रसार केवळ प्रचाराद्वारेच होतो. जर प्रचार असफल ठरला तर धर्म नष्ट होतो. इस्लामच्या तलवारीने बौद्ध भिक्षुंवरच मोठा आघात केला. यामुळे तो नष्ट झाला किंवा भारताबाहेर निघून

गेला. धर्माचा प्रकाश प्रज्ज्वलित करण्याकरीता कुणीही जिवंत राहिला नाही.

निश्चितच हीच बाब ब्राह्मणी पौरोहित्याला देखील लागू पडते. एवढ्या मोठ्या प्रमाणात नसेलही परंतु काही प्रमाणात मात्र निश्चितच लागू आहे. या दोघातील अंतर हे या धर्माच्या संघठनेशी संबंधित आहे. या अंतरातील फरकामुळेच ब्राह्मणी धर्म मुस्लिम आक्रमणांनंतरही टिकून राहिला. हे अंतर पुरोहित वर्गाशी संबंधित आहे. ब्राह्मणवादी पौरोहित्याचे एक व्यापक असे संगठन राहिलेले आहे.

रामकृष्ण भांडरकरांच्या मते, प्रत्येक ब्राह्मण कुठल्यांना कुठल्या वेदांच्या विशेष शाखेशी संबंधित असतो व त्याच्या घरातील संस्कार वेदातील सत्रानुसार होत असतात. त्याच्याकरीता वेदांच्या श्लोकांना कंठस्थ करणे अनिवार्य असते ही बाब मध्य काळात लागू होती. परंतु बनारससह संपूर्ण देशात कुठेना कुठे ब्राह्मणवर्गा द्वारे वेदपठन होत असे व ही बाब आजतागायत चालत आलेली आहे.

आपल्या व्यवसायानुसार प्रत्येक वेदांचे ब्राह्मण हे दोन वर्गात विभागलेले आहेत. गृहस्थ आणि पुरोहित गृहस्थ सांसरिक गृहकार्यात तर पुरोहित वेदांचे अध्ययन, पठन व अध्यापन कार्यात आणि धार्मिक कर्मकांडात मग्न असतो.

हे दोन्हीही वर्गातील लोक दररोज संध्यावंदन व सकाळ-संध्याकाळ पूजा-अर्चा करीत असतात. वेगवेगळ्या वेदानुसार पुजा-अर्चा देखील वेगवेगळ्या असतात. परंतु गायत्री मंत्र्यांचे पठन पाच वेळा नंतर अठ्ठावीस वेळा आणि शेवटी एकशे आठ वेळा आणि शेवटी आठ वेळा करणे ही सामान्य बाब असते. प्रत्येक धार्मिक पूजेच्या वेळी हे करणे आवश्यक ठरते.

याशिवाय प्रत्येक ब्राह्मण दररोज 'ब्रह्मयज्ञ' नावाचा धार्मिक अनुष्ठान करतात. यामध्ये अनेक संहिता, महाभारत, निरुक्त, खंड, ज्योतिष, शिक्षा, पाणीनी, याज्ञवल्क्य स्मृति व कणाद स्मृती, जमिनी, आणि बादरायणचे सुत्र इ. पठणात शामिल असतात.

ही गोष्ठ लक्षात ठेवण्यासारखी आहे की, धार्मिक पूजेसंबंधी ब्राह्मण पुरोहित व ब्राह्मण गृहस्थ यांच्यात जासत अंतर नसतो. गृहस्थ ब्राह्मण हा ब्राह्मण पुरोहितपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी मानण्यात येत नाही. केवळ धार्मिक मंत्र आणि अनुष्ठानाच्या बाबतीत गृहस्थाने विशेष योग्यता प्राप्त केली नसल्यामुळे किंवा तो दुसऱ्या व्यवसाय्राशी संबंधित असल्यामुळे ब्राह्मण गृहस्थ हा पौराहित्याची कामे करीत नसतो. अन्यथा बहिष्कृत नसलेला कुठलाही ब्राह्मण गृहस्थ, पुरोहित होण्यास योग्य मानला जातो. भिक्षुक हा वास्तविक पुरोहित असतो तर गृहस्थ हा संभावित पुरोहित असतो. अर्थात प्रत्येक ब्राह्मण हा पुरोहित बनू शकतो.

पुरोहित बनण्याकरीता ब्राह्मणाला कुठल्याही प्रशिक्षणाची अथवा दीक्षेची आवश्यकता नसते. केवळ पुरोहित बनण्याची इच्छाच त्याला पर्याप्त आहे.

अशाप्रकारे ब्राह्मणी धर्मात ब्राह्मणांकरीता पौरोहित्य कधीही न संपणारी बाब आहे. प्रत्येक ब्राह्मण हा पुरोहीत बनू शकतो आणि त्याला आवश्यकता पडल्यास पौरोहित्याच्या कामाकरीता प्रवृत्त केल्या जाऊ शकते. वाईटतील वाईट ब्राह्मण व्यक्तीला देखील या कामापासून परावृत्त करता येत नाही. परंतु बौद्ध धम्मात मात्र असे शक्य नाही. धार्मिक कार्य करण्याकरीता बौद्ध संस्कारित होण्याची अट आवश्यक ठरते. बौद्ध भिक्षुंच्या संहारानंतर धार्मिक संस्कार करणाऱ्या भिक्षुंचा संस्कार करणाऱ्या भिक्षुंचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे धार्मिक संस्कार करणे जवळपास नाहीसे झाले. गरज असतांना गृहस्थ बौद्धांनी संस्कारविधी करण्याचाा काही प्रमाणात प्रयत्न केला. परंतु हा वर्ग समाजावर आपला प्रभाव पाडू शकला नाही. विविध व्यवसायात गुंतल्यामुळे हा गृहस्थ बौद्धांचा वर्ग बौद्ध धम्माला ऱ्हासापासून वाचवू शकला नाही.

हरप्रसाद शास्त्री यांच्या मते, ''भिक्षुंच्या अभावामुळे बौद्ध त्पौरोहित्याच मोठा बदल घडून आला. ज्यांचे परिवार होते अशा विवाहित लोकांना भिक्षुंचे स्थान घेण्याचा प्रयत्न केला आणि भिक्षुंचा धार्मिक कार्य संपन्न करवयास सुरवात केली. काही वर्षेपर्यंत हि परंपरा चालत राहिली. धार्मिक कार्ये करिताना हि मंडळी मूर्तीकार, शिल्पकार, वाढई, गवंडी, इत्यादी जीविको पार्जनाचे धंदेदेखील करित. पुढे अशा कारागीर लोकांची संख्या खूपच वाढली. हेच लोक धार्मिक कार्ये करू लागली. व्यवसायामुळे गुंतून पडल्यामुळे या लोकांकडे स्वतःच्या ज्ञानार्जनाकरिता, गंभीर चिंतन, आणि विचारकरण्याकरिता तसेच ध्यानसाधनासाठी वेळच मुळी शिल्लक नसे. किंबहूना हे लोक धर्मआचारणात गंभीर नव्हते.

पतनाच्या अवस्थेकडे झूकलेल्या बौद्ध धम्माच्या वाढीची अपेक्षा मुळीच या लोकांकडून केली जाऊ शकत नव्हती. बौद्ध धम्मात काही सुधार करून त्याला श्रेष्ठ स्थान प्राप्त करून देण्याचे समर्थ या लोकांत नव्हते.

ही बाब स्पष्ट आहे की हे नवीन धर्माचरणी लोक मुळभिक्षूंच्या तुलनेत फारच हलक्या दर्जाचे असून ज्ञानवान तर मुळी नव्हतेच. बौद्ध धम्माचे कटर विरोधक ब्राह्मण पूरोहिताच्या तूलनेत हे नवीन लोक कमजोर होते. कारण की ब्राह्मणांचा वर्ग हा चतूर आणि धूर्त होता.

ब्राह्मणाच्या तुलनेत हा वर्ग कमजोर ठरला. अर्थात ब्राह्मणांचा वर्ग हा धूर्त लोकांचा वर्ग होता. ब्राह्मण धर्म विनाशापासून कसा बचावला आणि बौद्ध धम्म विनाश पावला? याला कारण हे नाही की ब्राह्मण धर्म बौद्ध धम्मापेक्षा श्रेष्ठ आहे तर याला जर काही कारण असेल तर दोन्ही धर्मातील पौरोहित्याचे विशिष्ट चरित्र आहे. बौद्ध धम्म जनसामान्यातून नष्ट झाला. याला कारण त्यातील बौद्ध पौरोहित्याचे जनसामान्यांना पुनर्जीवन करणे शक्य होऊ शकले नाही. परंतु ब्राह्मणी धर्म पराजित

झाल्यावरही तो पूर्णपणे नष्ट होऊ शकला नाही. प्रत्येक जीवित ब्राह्मण हा पुरोहित व पुजारी बनला आणि प्रत्येकाने ब्राह्मण पुरोहिताचे स्थान ग्रहण केले. बहुसख्यांक बौद्ध जनतेद्वारे इस्लाम धर्माचा स्वीकार हा सुद्धा बौद्ध धम्माच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरला, यामध्ये कुठलीही शंका नाही.

१९३८ साली इलाहाबाद येथे झालेल्या भारतीय इतिहास काँग्रेसच्या 'प्रारंभिक आणि मध्यकालीन राजपूतांचा अभ्यास' या विषयावर अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात प्रो. सुरेन्द्रनाथ सेन म्हणाले होते की, भारताच्या मध्यकालीन इतिहासासंबंधी दोन समस्या आहेत. ज्यांचे समाधानकारक उत्तर आतापर्यंत मिळू शकलेले नाही. त्यांनी ज्या दोन समस्यांच्या उल्लेख केला, त्यातील एक राजपूतांच्या उत्पत्तीशी संबंधित आहेत. तर दुसरी भारतात मुस्लिम जनसंख्येच्या विस्ताराशी संबंधित आहे. दुसऱ्या समस्येसंबंधी ते म्हणाले,

'मला एका प्रश्नावर बोलण्याची अनुमती मिळाली पाहिजे, ज्याचा संबंध पुरातत्वाच्या विषयाशी नाही. भारतातील मुस्लिम जनसंख्येच्या विस्ताराबद्दल स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सामान्यपणे असे म्हटले जाते की, मुस्लिमांच्या विजय अभियानाबरोबर मुस्लिम जनसंख्येच्या विस्तार होत गेला आणि ज्या लोकांना मुस्लिम धर्मात धर्मान्तरीत करण्यात आले. त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आली. जेव्हा आम्ही सीमांत प्रांतात आणि पंजाबातील मुस्लिमांची बहुसंख्य व मुस्लिम बलाधिक्य पाहतो, तेव्हा या विचारांना आधार मिळतो. परंतु या सिद्धांताच्या आधारावर पूर्व बंगालमधील मुसलमानांच्या भारी बहुसंख्याकतेचे गुढ मात्र लक्षात येत नाही. या गोष्टीची सहज संभावना आहे की, कुंषाणांच्या काळापासूनच उत्तर-पश्चिमी सीमांत प्रांतात तुर्क स्थायिक झालेत आणि त्यांनी मुस्लिम धर्माचा स्वीकार केला. नवविजेत्यांशी यांचा धर्म बांधव या नात्याने आलेल्या संबंधाचा हा आधार सांगितला जाऊ शकतो. परंतु पुर्व बंगालमधील मुसलमानांचा तुर्क व अफगानी लोकांशी निश्चितच संबंध नाही तर इतर दुसऱ्याच कारणाने या क्षेत्रातील हिंदुनी मुस्लिम धर्माचा स्वीकार केला. ही अन्य कारणे कोणती? प्रा. सेन यांनी मुस्लिम ग्रंथात मिळत असलेल्या या कारणांचा उल्लेख केलेला आहे. ते सिंधचे उदाहरण देतात. याबद्दल प्रत्यक्ष प्रमाण उपलब्ध आहेत. ते म्हणतात,

'चचनामा' नुसार ब्राह्मण शासनकांच्या आधीन सिंधमधील जनतेने अनेक प्रकारचा अपमान व संकटांना सहन केले. परंतु जेव्हा अरबांनी सिंधवर आक्रमण केले. तेव्हा त्यांनी अरबांना पूर्ण साह्यता दिली. दाहिरचा वध झाल्यानंतर तेथे मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यावर तेथील बौद्धांची फारच निराशा झाली. अरब लोक त्यांचे अधिकार, विशेषाधिकार तथा सुविधांबद्दल उदासीन होते. एवढेच नव्हे तर नवीन शासनसत्तेत हिंदुशी योग्य व्यवहार करण्यात आला. या संकटातून मुक्ती

प्राप्ती करण्याकरीता एकमात्र उपाय होता. तो म्हणजे मुस्लिम धर्माचा स्विकार. कारण की धर्मांतरीत लोकांना मुस्लिम लोकांचे सर्व अधिकार, विशेषाधिकार आणि सर्व सुखसुविधा सहजतेने उपलब्ध होऊ शकतात. म्हणून **सिंधच्या बहुसंख्याक बौद्ध लोकांनी मुस्लिम धर्माचा स्वीकार केला आणि ते मुस्लिम** बनते.''

यानंतर प्रा. सेन एक महत्वपूर्ण गोष्ट सांगतांना म्हणतात,

''**ही काही अचानक घडलेली गोष्ट नव्हे की, पंजाब, काश्मीर, बिहारच्या असपासच्या जवळील जिल्हे, उत्तर पूर्वजिल्हे जिथे, मुस्लिमांच्या सत्तेची स्थापना झाली. ते त्यापूर्वी ह्या भागातील शक्तीशाली बौद्ध केंद्रे होती.**''

येथील बौद्धांनी, हिंदुच्या तुलनेत राजनीतिक प्रलोभनांना बळी पडून सहजतेने धर्मपरिवर्तन राजनीतिक प्रतिष्ठा आणि स्थिती प्राप्त करण्याकरीता केला असेल. असे म्हणने देखील योग्य नाही.

ज्या कारणांमुळे बौद्धांनी बौद्ध धम्म त्यागून मुस्लिम धर्माचा त्याग केला त्या कारणांचा अद्याप शोध लागायचा आहे. ब्राह्मण राजाद्वारे बौद्धांचा छळ होणे एवढेच कारण याकरीता पुरेसे नाही. परंतु हे सुद्धा प्रमुख कारण असू शकते की ब्राह्मण राजाद्वारा बौद्धांचा छळ झाला असेल. आपल्याकडे बौद्धांचा छळ करणाऱ्या दोन राजांची उदाहरणे प्रमाणासह उपलब्ध आहेत.

त्यामध्ये पहिले नाव '**मिहिरकूल**' यांचे आहे. हा हूण होता. हूणांनी भारतावर ४५५ मध्ये आक्रमण करून उत्तर भारतात आपले राज्य स्थापन केले. पंजाबात हुणांनी साकल येथे (स्यालकोट) आपली राजधानी बनविली. मिहिरकुलाने जवळपास ५२८ पर्यंत शासन केले. विनसेंट स्मिथ म्हणतो की,

पूर्ण भारतीय इतिहासात मिहिरकूलचे वर्णन क्रुर, अत्याचारी व रक्तपिपासू असा केला गेला आहे. सर्वसाधारण क्रुर आणि कठोर प्रमाणात असलेल्या आक्रमणकर्त्यांपेक्षाही हूण हे अधिक क्रुर हिंसक होते. शांततापूर्ण बौद्ध धम्माच्या विरुद्ध मिहिरकुल याने शत्रुत्व अंगिकारले व बौद्ध स्तूप व विहारांना नष्ट करून तेथील संपत्ती लुटून टाकली.

दुसरा राजा पूर्व भारतातील शशांक होता. त्याने सातव्या शतकाच्या प्रथम दशकात राज्य केले. शशांक हा हर्षवर्धनबरोबर झालेल्या लढाईत पराजित झाला. **त्याच्याबाबत विन्सेंट स्मिथ म्हणतो,**

''शशांक हा हर्षवर्धनाच्या भावाचा खूनी होता. हा संभवतः गुप्त वंशाचा शासक होता. हा शिवाचा उपासक असून बौद्ध धम्माबद्दल घृणा बाळगीत असे. बौद्ध धम्माला नष्ट करण्याचा याने सर्वप्रकारचा प्रयत्न केला. एका आख्यायिकेनुसार

त्याने बुद्धगया येथील बोधीवृक्षाची मुळे खोदून काढली व त्यांना जाळून टाकले. या बोधीवृक्षावर अशोकाची फार श्रद्धा व भक्ती होती. शशांकने पाटलीपुत्र येथील बुद्धाचे पदचिन्ह असलेली शीला देखील फोडून टाकली. भिक्षुकांचा छळ केला. त्यामुळे भिक्षु घाबरुन इकडे तिकडे पळाले. भिक्षुंचा पाठलाग याने नेपाळ पर्यंत केला.

सातवे शतक हे भारतात धार्मिक अत्याचार आणि छळाचे शतक म्हणून गणले गेले आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा नाश झाला. हा अत्याचार आणि छळ मुसलमानांच्या आक्रमणांपर्यंत अव्याहत सुरु राहिला. या गोष्टींचे अनुमान या तर्कावरुन लावता येते की उत्तर भारतातील शासक राजे लोक हे ब्राह्मण व राजपूत होते. हे दोघेही बौद्ध धम्माचे शत्रु होते. जैनांचा देखील असाच छळ १२ व्या शतकात 'गुजरातचा शैव' शासक अजयदेव याने केला. या बाबतीत अनेक उदाहरणे इतिहासातील देता येतील.

अशाप्रकारे यामध्ये आता कुठलाही संशय राहत नाही की, बौद्ध धर्माच्या ऱ्हासाला कारण बौद्धांद्वारे इस्लामचा स्वीकार करणे हे आहे. या मार्गाचा स्वीकार त्यांनी ब्राह्मणवादाच्या अत्याचार व छळापासून बचावण्यासाठी केला.

**त्यावेळेला जर कोणते संकट असेल तर ते म्हणजे ब्राह्मणवाद हेच होय.**

◆◆◆

# ब्राह्मणवादी साहित्य

पुष्यमित्राच्या राजकीय विजयानंतर जे ब्राह्मणी साहित्य निर्माण झाले ते वस्तुस्थितीच्या कारणांवर प्रकाश टाकते.

अशा ब्राह्मणी साहित्याला सहा भागात विभागलेला आहे.

१. मनुस्मृती
२. भगवत्‌गीता
३. रामायण
४. महाभारत
५. वेदांत
६. पुराण

या साहित्याचे विवेचन करतांना मी फक्त अश्याच गोष्टींचा निर्देश करीन की ज्या बौद्ध धम्माच्या ऱ्हासाला कारणीभूत असल्याचे दिसून येईल.

**साहित्य हे जनतेच्या जीवनाचा आरसा असते असे मानले जाते. साहित्यात जनतेच्या जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते.**

एक मुद्दा स्पष्ट करणे मला आवश्यक वाटते हे साहित्य ज्या वेळी जन्माला आले त्याबाबतचा निर्मितीकालाबद्दल आहे. **पुष्यमित्राच्या प्रतिकांतीनंतरचे हे सर्व साहित्य जन्माला आले आहे.**

याबाबत सर्वांच मतैक्या होणार नाही. याउलट हिंदूलोक, ते सनातनी असोत वा नसोत, विद्वान असोत वा अल्पशिक्षित असोत, असे अगदी ठामपणे समजतात की आपले पवित्र साहित्य हे फार पुरातन काळातील आहे. त्यांचा हा विश्वास अपरिवर्तनीय आहे. किंबहुना तो त्यांच्या श्रद्धेचाच एक भाग आहे. प्रत्येक हिंदूची यावर असीम श्रद्धा असते. आपले पवित्र साहित्य फार पुरातन आणि प्राचीन आहे. यावर त्यांचा दृढ विश्वास आहे.

## १) मनुस्मृती

मनुच्या काळाच्या संदर्भात मी मनुस्मृती ही सुमती भार्गव याने ख्रिस्तपूर्व १८५ मध्ये म्हणजे **पुष्यमित्राच्या क्रांतीनंतर लिहिली असल्याचे संदर्भ दिले आहत.** या विषयावर मी अधिक काही सांगण्याची गरज नाही.

## २) भगवद्‌गीता

भगवद्‌गीतेच्या निर्मितीच्या काळाबाबत भिन्न मते आहेत.

१) श्री. तेलंग यांच्या मते भगवद्‌गीतेचा काळ हा ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापेक्षा

प्राचीन असावा. अर्थात त्याआधी किती काळ हे ते सांगू शकले नाहीत.

२) श्री. टिळकांच्या मते गीतेचा रचनाकाळ इ. पूर्व ५ वे शतक आहे.

३) प्रा. गार्बे यांच्या मते आज आपणास जी गीता उपलब्ध आहे त्यापेक्षा मुळ गीता वेगळी होती. अलिकडच्या काळात भगवद्‌गीता आपल्यापर्यंत तिच्या मुळ स्वरुपात पोहोचली नाही याबाबत भारताबाहेरील बऱ्याच प्राच्य विद्या अभ्यासकांत एकमत आहे. प्रा. गार्बे यांच्या मताप्रमाणे भगवद्‌गीतेतील १४६ श्लोक नवीन आहेत. हे श्लोक मुळ गीतेत नाहीत. गीतेच्या रचनेच्या काळाबाबत बोलताना प्रा. गार्बे म्हणतात, 'इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या पूर्वी भगवद्‌गीता लिहिली असल्याचे संभव नाही.'

**४) राजा बालादित्याच्या काळात भगवद्‌गीता लिहिली असावी असे प्रा. कोसंबी आग्रहपूर्वक प्रतिपादतात.** बालादित्य हा गुप्त घराण्यातील राजा होता. गुप्त घरण्याने आंध्र राजघराण्याची जागा घेतली. बालादित्य इ. स. ४६७ मध्ये राज्यावर आला. भगवद्‌गीतेची रचना इतक्या उशिरा झाली असे कोसंबी यांनी प्रतिपादण्याची दोन करणे आहेत. शंकराचार्यांनी भगवद्‌गीतेवर भाष्य करीपर्यंत भगवद्‌गीतेची माहिती कुणालाही नव्हती. शंकराचार्यांचा जन्म इ. स. ७८८ मध्ये व मृत्यू इ. स. ८२० मध्ये झाला. भगवद्‌गीतेचा उल्लेख शांतरक्षिताच्या तत्वसंग्रहात निश्चितपणे नव्हता. तत्त्वसंग्रह हा ग्रंथ शंकराचार्यांपूर्वी फक्त ५० वर्षे निर्माण झाला. दुसरे कारण असे की वसुबंधू हा विज्ञानवाद नावाच्या विचारधारेचा निर्माता होता. ब्रह्मसूत्र भाष्यात वसुबंधूच्या विज्ञानवादावर टिका आहे. गीतेमध्ये ब्रह्मसूत्र भाष्याचा संदर्भ आहे. त्यामुळे गीता ब्रह्मसूत्र भाष्याच्या व वसुबंधूच्या नंतर लिहिली गेली असावी असा निष्कर्ष कोसंबी यांनी काढला आहे. वसुबंधू ही गुप्त घराण्यातील राजा बालादित्याचा गुरु होता. या कारणामुळे गीता बालादित्याच्या काळात वा नंतर लिहिली असावी.

७. गीतेमध्ये एके ठिकाणी 'ब्रह्मसुत्राचा' उल्लेख सापडतो. या ब्रह्मसुत्रात विज्ञानवादी सांप्रदायाचा जनक वसुबंधु यांची टिका आपणांस वाचावयास सापडते. 'वसबंधु' हा गुप्तवंशीय नरेश बालादित्य यांचा गुरु होता. यावरुन हे सिद्ध होते की, गीतेची रचना बालादित्याच्या शासनकाळात इ. स. ४६७ च्या आसपास करण्यात आली.

८. काळाच्या प्रवाहात गीतेच्या अनेक आवृत्याची निर्मिती केली गेली याबद्दल विद्वानात मतभेद नाहीत. आज ज्या स्वरूपात गीतेची रचना आहे. तीत व मुळगीतेत बरेच भेद आहेत. याबद्दल सुद्धा विद्वानात एकमत आहे. वेगवेगळया संपादकांच्या हातून त्यांच्या क्षमतेनुसार गीतेच्या वेगवेगळ्या आवृत्यांची रचना निरनिराळ्या काळात करण्यात आली. खरे पाहता गीता ही प्रतिभावंत लेखकाने

लिहिलेला अशाप्रकारचा कुठलाही ग्रंथ नाही. केवळ काल्पनिक घटनाच यात ठिकठिकाणी दिसतात. यामध्ये अवडंबरपूर्ण व अर्थहीन शब्दाचा वापर करून एकच विचार पुन्हा पुन्हा सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

९. गीतेमध्ये अनेकदा साहित्यिक अलंकरण दोषपूर्ण आढळते. अनेक छंद उपनिषदांपासून जसेच्या तसे उचलून गीतेमध्ये घूसडून देण्यात आले आहेत. कवीने व लेखकाने टाळावयाच्या अनेक बाबी गीतेमध्ये सापडतात. केवळ पांडित्य प्रदर्शन करण्यासाठी सत्य, रज व तमस यांचे वर्णन करण्यात आले आहे.

१०. निःसंशय गीतेची रचना खऱ्या व सर्जनात्मक कवीची कृती नसून ती मुद्दाम रचन्यात आलेली कृती आहे.

११. वेगवेगळया लेखकांच्या हातून वेगवेगळया काळात गीतेच्या नवीन आवृत्यांची रचना करण्यात आली. याबद्दल विदवानांमध्ये एकमत आहे. वादाचा मुख्य मुद्दा हा आहे की, मुळ गीतेमध्ये नवीन कोणता भाग जोडण्यात आला? राजाराम शास्त्री भागवत यांच्या म्हणण्यानुसार मुळ गीतेत केवळ साठ श्लोक होते.

१२. हबोल्डस यांच्या विचारानुसार, मुळ गीतेमध्ये केवळ अकरा अध्याय होते. बारा ते अठरा अध्यायापर्यंतची साम्रगी नंतर जोडण्यात आली.

१३. हॉपकिन्स यांया म्हणण्यानुसार मुळ गीतेमध्ये प्रारंभिक चौदा अध्याय हेच होते.

१४. राजवाडे सुद्धा दहा व अकरा अध्याय गीतेमध्ये जोडण्यात आल्या बद्दल सहमत आहेत.

१५. प्रा. गोर्बे यांच्या म्हणण्यानुसार मुळ गीतेमध्ये नसलेले १४६ छंद नविन आहेत. यावरुन हा अर्थ निघतो की, गीतेचा जवळपास पाचवा भाग नवीन जोडलेला आहे.

१६. गीतेच्या लेखकाबद्दल कुठेही उल्लेख सापडत नाही. गीतेचा उपदेश कृष्णाने अर्जुनाला युद्धभूमीवर दिलेला आहे. या उपदेशाचे पुर्नकथन संजय याने कौरवांचा पिता धृतराष्ट्र यांच्यापुढे केलेला आहे. गीतेला आपण महाभारताचा एक भाग म्हणून स्वीकार करु शकतो. परंतु गीता महाभारताचा भाग नसून स्वतंत्र अशी रचना आहे. लेखकाचा उल्लेख मात्र गीतेमध्ये सापडत नाही. तरीपण आपण हे अनुमान काढू शकतो की, **'व्यास'** यानीच गीतेची रचना केली असावी.

### ३. रामायण

१. महाभारताप्रमाणेच रामायणाच्याही तीन वेगवेगळया आवृत्त्या निघाल्या असे दिसते.

२. महाभारतात रामायणाची दोन संदर्भ सापडतात. एके ठिकाणी रामायणाचा उल्लेख आहे. परंतु रामायणाच्या लेखकाचा उल्लेख नाही. दुसऱ्या संदर्भात मात्र 'वाल्मीकीचे रामायण' असा उल्लेख आहे.

३. परंतु आजचे रामायण हे वाल्मीकीचे रामायण नाही. सी.व्ही. वैद्य यांच्या मते सध्याचे रामायण हे जरी संशोधक आणि सर्वांच्या आदरास पात्र असलेल्या कटक नावाच्या समीक्षकांनी मान्य केलेले व स्वीकारलेले असले तरी ते वाल्मीकीने लिहिलेले मुळ रामायण नाही याबाबत अगदी सनातनी विचारवतांनाही संशय नाही.

४. अगदी वरवर रामायणाचे काव्य वाचणाऱ्यालाही (मग ती बंगाली आवृत्ती असो की मुंबईची) त्यातील विसंगती, संदर्भहीनता, जुन्या व नव्या घटनांचे मिश्रण पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. आणि वाल्मिकी रामायणाची पुढच्या काळात मोठ्या प्रमाणात पुनर्रचना करण्यात आली असावी याची खात्री होते.'

५. महाभारताप्रमाणेच रामायणाच्या तीन आवृत्यांत बरीच भर टाकण्यात आली.

६. सुरुवातीला रामायण पक्त रावणाने सीतेचे हरण केल्यामुळे झालेल्या राम व रावणाच्या युद्धापुरतेच मर्यादित होते.

७. दुसऱ्या आवृत्तीत या कथेत उपदेशांची भर घालण्यात आली. केवळ ऐतिहासीक कथेऐवजी त्यात तार्किक विचार ग्रंथित करण्यात आले व सामाजिक, नैतिक व धार्मिक कर्तव्याबाबत योग्य मार्ग कोणता ते शिकविण्याच्या उद्देशाने केलेला उपदेश त्यांत घुसडून देण्यात आला.

८. तिसऱ्या आवृत्तीत त्यात दंतकथा, शिक्षा, तत्वज्ञान कला व विज्ञान विषयक मजकुराची भर टाकण्यात आली.

९. रामायणाच्या काळाबाबत एक गोष्ट निश्चितपणे सिद्ध झालेली आहे. ती ही की रामाचा काळा हा पांडवाच्या काळापेक्षा खूप जुना आहे. परंतु महाभारताच्या पूर्नलेखनाबरोबरच रामायणाचेही पुर्नलेखन होत गेले ही गोष्ट शक्य आहे की, रामायणातील काही अंश महाभारताच्याही पूर्वी रचले गेले असावेत. परंतु रामायणाचा बराचसा भाग महाभारताचा बराचसा भाग लिहून झाल्यानंतरच रचला असावा हे निश्चित.

### ४. महाभारत

महाभारताची रचना कधी केली असावी याबद्दल निश्चित सांगणे अशक्य आहे. महाभारताच्या लेखनाच्या काळाचा फक्त अंदाज करता येण्यासारखा आहे.

**१. महाभारताच्या एकंदर तीन आवृत्त्या आहेत.**

२. आणि प्रत्येक संपादनाच्या वेळी शीर्षक व विषयात बदल केलेला आहे.

३. महाभारताच्या मुळस्वरुपात त्याला 'जय' असे नाव आहे. हे मुळचे नाव तिसऱ्या आवृत्तीत सुरुवातीला आणि शेवटी आलेले आहे.

४. मुळातील 'जय' या नावाच्या पहिल्या आवृत्तीचे लेखक व्यास हे होते.

५. दुसऱ्या आवृत्तीत त्याचे नाव 'भारत' असे होते.

६. या दुसऱ्या आवृत्तीचे संवादक वैशम्पायन होते. पण वैशम्पायनाने संपादित केलेली दुसरी आवृत्ती ही भारताची एकमेव दुसरी आवृत्ती नव्हती. व्यासाचे वैशंपायनाव्यतिरिक्त इतर अनेक शिष्य होते.

**७. सुमंतु, जैमिनी, पैल व शुक्र असे व्यासांचे आणखी चार शिष्य होते. त्यापैकी प्रत्येकाने आपापली संपादित आवृत्ती तयार केली.**

**८. याप्रमाणे भारताच्या आणखी चार आवृत्त्या तयार झाल्या. वैशंपायनाने या चारही आवृत्त्यांची पुनर्रचना करून आपली आवृत्ती तयार केली.**

**९. तिसऱ्या आवृत्तीचा संपादक सौती हा होता. त्याने वैशंपायन याच्या अवृत्तीची पुनर्रचना केली. सौतीच्या अंतिम आवृत्तीचे नाव 'महाभारत' असे होते. अशा तऱ्हेने हा ग्रंथ आकाराने व मजुकाराने बराच मोठा बनला.**

१०. 'जय' हा व्यासांचा मुळ ग्रंथ छोटा होता. त्यात फक्त ८८०० श्लोक होते.

११. वैशंपायनाच्या आवृत्तीत श्लोकांची संख्या ४४ हजार झाली आणि सौतीने त्यात भर टाकून हा ग्रंथ ९६ हजार ८३६ श्लोकांचा बनविला.

१२. मजकुराच्या दृष्टीने व्यासाने लिहिलेल्या ग्रंथात फक्त कौरव व पांडवांच्या युद्धाची कथा होती.

१३. वैशंपायनाच्या आवृत्तीत मूलतः दोन विषय होते. मुळकथेत एका उपदेशाची भर घालण्यात आली. ते एक नीतिमूल्ययुक्त साहित्य बनले.

१४. वैश्यम्यायनच्या आवृत्तीत काव्यविषय तीनपट करण्यात आला. मुळकथेच्या सोबत उपदेश अर्थात धार्मिक शिकवण सुद्धा जोडण्यात आली.

१५. त्यात सामाजिक, नैतिक व धार्मिक आदर्शयुक्त आचरसंहिता शिकविण्यात आली. शेवटचा संपादक सौती याने हा ग्रंथ दंतकथांचा सर्वसंग्राहक ग्रंथ बनविला.

१६) निरनिराळ्या दंतकथा, छोटया मोठया ऐतिहासिक कथा स्वतंत्रपणे

विखुरलेल्या होत्या. त्या सौतीने भारतात समाविष्ट केल्या. त्या नाहीशा होऊ नयेत वा एकत्रित वाचावयास मिळाव्यात हा यामागे सौतीचा उद्देश होता.

१७) भारत हे ज्ञानाचे व व्यासंगाचे भांडार बनावे ही सौतीची दुसरी महत्त्वाकांक्षा होती. म्हणून त्याने भारतात राजकारण, भूगोल, धनुर्विद्या आदी ज्ञानांच्या सर्व शाखांचा अंतर्भाव केला.

१८) पुनरुक्तीची सौती याला सवय असल्याने भारताचे 'महाभारत' बनले यात संशय नाही.

या ग्रंथाच्या प्रत्येक आवृत्तीचा काळ ठरविणे अतिशय कठीण आहे. याचा सर्वकष विचार करुन प्रा. हॉपकिन्स म्हणतात,१

१८) ''महाभारताचा सर्वसाधारणे काळ इ.स. २०० ते ४०० या दरम्यान असावा. परंतु नंतर या ग्रंथात जो जादा मजकूर पुढील आवृत्त्यात समाविष्ट करण्यात आला. त्याचा या कालनिश्चितीत विचार करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे या ग्रंथाचे पुनर्लेखन करतांना त्या नंतरच्या नक्कल करणाऱ्यांनी जे शाब्दिक फेरबदल केले असतील तेही यात गृहीत धरलेले नाहीत.

१९) परंतु या ग्रंथाचा काळ यापेक्षा नंतरचा असावा असे निश्चितपणे वाटावे अशा काही घटना आहेत.

२०) महाभारतात हूणांचा उल्लेख आहे. स्कंदगुप्ताने हुणांशी लढुन त्यांचा पराभव इ.स. ४५५ च्या सुमारास केला. परंत तरीही हूणांच आक्रमण इ.स. ५२८ पर्यंत चालू होते. या काळात वा त्यानंतर महाभारत लिहिले असावे हे उघड आहे.

२१) आणखी काही अशा गोष्टी आहेत की ज्यामुळे महाभारताचा काळ त्यानही नंतरच्या असावा असे दिसून येते. महाभारतात म्लेंच्छ वा मुस्लीम असाही उल्लेख आहे. महाभारतातील वनपर्वात १९० व्या अध्यायात २९ व्या श्लोकात लेखक म्हणतो, 'सर्व जग इस्लामी बनेल. यज्ञ, क्रियाकर्म, धार्मिक कृत्ये सर्व बंद होतील.' मुस्लिमांचा हा प्रत्यक्ष उल्लेख आहे. श्लोकात जरी भविष्यात काय घडेल हे सांगितले असले तरी ते एक पुराण असल्याने त्यात घडून गेलेल्या गोष्टीचाच असल्या पाहिजेत हे उघड आहे. वरील श्लोकावरुन महाभारत हे मुस्लीम आक्रमणानंतर लिहिले असले पाहिजे, असा अभिप्राय काही जण व्यक्त करतात.

२२) इतरही काही पुरावे या समजुतीला पाठिंबा देणारे आहेत.

याच अध्यायाच्या ५९ व्या श्लोकात असे म्हटले आहे की, 'वृषलांकडून छळ झाल्यामुळे भीतिग्रस्त झाल्याने आणि संरक्षण करणारे कोणीच नसल्याने ब्राह्मण सर्व पृथ्वीवर दु:खाने आणि वेदनेने विव्हळत व शोक करीत फिरतात.' या श्लोकात वृषल म्हणून ज्यांचा उल्लेख आहे ते बौद्ध धर्मीय असूच शकत नाहीत.

ब्राह्मणांवर अन्याय झाल्याचा कोणताही पुरावा नाही. याउलट असा पुरावा उपलब्ध आहे, की बौद्धांच्या सत्तेचा काळात ब्राह्मणांना उदारतेने वागविले जात होते. वृषल या शब्दाचा अर्थ 'असंस्कृत' असा आहे. त्यामुळे वृशल हा उल्लेख बहुधा मुस्लीम आक्रमकांसाठी केला असावा.

२३) वनपर्वातील याच अध्यायात ६५, ६६ व ६७ या श्लोकांत असे म्हटले आहे की, 'समाज विस्कळीत बनेल. लोक एडुकांची पूजा करतील. ते देवावर बहिष्कार घालतील. शूद्र द्विजांची सेवा करणार नाहीत. सर्व जग एडूकमय होईल. युग समाप्त होईल.

२४) यातील एडूक या शब्दाचा अर्थ काय? काही जणांच्या मते एडूक म्हणजे बौद्ध धर्मीय चैत्य होत. परंतु कोसंबी' यांच्या मते हे चुकीचे आहे. बौद्ध साहित्यात वा वैदिक साहित्यात कोठेही 'एडूक' या शब्दाचा उपयोग चैत्य या अर्थाने केलेला नाही. या उलट महेश भट्ट यांनी अमरकोशाच्या लिहिलेल्या टीकेत एडूक या शब्दाचा अर्थ ज्या भिंतीला लाकडाचा उपयोग करून आधार दिलेला आहे अशी भिंत असा आहे. हा अर्थ लक्षात घेता एडूक म्हणजे मुस्लिमांचा इदगाह असावा असे मत कोसंबी यांनी मांडलेले आहे. इदगाहासमोर मुसलमान प्रार्थना (नमाज) करतात. हा अर्थ जर बरोबर असेल तर महाभारताचा काही भाग मोहम्मद घोरी यांच आक्रमणानंतर लिहिलेला असावा असे सिद्ध होते. मुस्लिमांचे पहिले आक्रमण इब्ने कासीम याच्या सैन्याने इ. स. ७१२ मध्ये केले. त्याने उत्तर भारतातील काही खेडी जिंकली पण त्याने फारसा विनाश केला नाही. त्यांच्या नंतर महम्मद गझनीने भारतावर स्वारी केली. गझनीच्या महम्मदाने देवळे व विहार नष्ट केले व दोन्ही धर्माच्या पुरोहितांची कत्तल केली. परंतु त्याने इदगाह व मशिदी बांधल्या नाहीत. ते काम महम्मद घोरी यांने केले. यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, इ.स. १२०० पर्यंत महाभारताचे लिखाण पूर्ण झाले नव्हते.

## – वेदांत सूत्रे –

यापूर्वी सांगितल्याप्रमाणे वेद वाङ्मयात वेद, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे यांचा समावेश होतो. त्यांच्या विषयानुसार या साहित्याचे दोन प्रकार पडतात –

१) ज्या साहित्यात धार्मिक कार्ये, समारंभ, तांत्रिक विधी या सर्वांना कर्मकांड असे म्हणतात असे साहित्य. २) ईश्वरविषयक माहिती देणारे साहित्य. त्यास ज्ञानकांड असे म्हटलेले आहे. वेद व ब्राह्मणे हे पहिल्या वर्गातील साहित्य आहे, तर आरण्यके व उपनिषदे हे दुसऱ्या प्रकारात मोडतात.

वैदिक साहित्य हे प्रचंड प्रमाणात वाढले आणि ते जंगली गवताप्रमाणे अस्ताव्यस्त स्वरुपात वाढले हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. या गोंधळातून काही पद्धती,

काही सुसंगती निर्माण करणे आवश्यक होते. वेदांतात सुसंगतता निर्माण करण्याच्या गरजेतून 'मीमांसे' चा जन्म झाला. वैदिक साहित्याच्या पवित्र ग्रंथातील सुसंबद्ध अर्थ शोधून काढण्याचा प्रयत्न झाला. वेदातील साहित्यात पद्धतशीरपणा आणि सुसूत्रता आणावयाची होती. त्यांनी स्वतःला दोन विचारशाखांत विभागले. एक शाखेने '**कर्मकांड**'चे तर दुसरीने '**ज्ञानकांड**' चे सुसूत्रीकरण केले. त्यामुळे वैदिक साहित्याच्या दोन शाखा बनल्या – एक पूर्वमीमांसा व दुसरी उत्तरमीमांसा. पूर्वमीमांसेमध्ये वैदिक साहित्यातील पहिला भाग–वेद व ब्राह्मणे यांचा समावेश आहे. त्यामुळेच त्याला पूर्व (आधीची) मीमांसा असे नांव पडले. उत्तरमीमांसेत वैदिक वाङ्मयाचा नंतरचा भाग आरण्यके व उपनिषदे यांचा समावेश आहे आणि म्हणूनच त्याला उत्तर (नंतरची) मीमांसा असे म्हणतात.

मीमांसाशास्त्रांच्या दोन शाखांशी संबंधित साहित्य विपुल आहे. यापैकी दोन सुत्रांचे संग्रह मीमांसाशास्त्रात प्रमुख समजले जातात. यापैकी एका सूत्रसंग्रहाचा लेखक जैमिनी व दुसऱ्याचा बादरायण ज्ञानकांडाबाबत चर्चा करतो. जैमिनी व बादरायणाच्या पूर्वीही इतर लेखकांनी या विषयावर लेखन केले होते यात संशय नाही. परंतु जैमिनी व बादरायण यांची सूत्रे म्हणजे मीमांसाशास्त्राच्या दोन शाखांवरील अधिकृत लेखन समजले जाते.

दोघांचीही सूत्रे मीमांसेबाबत असली तरी जैमिनीच्या सूत्रांना 'मीमांसासुत्रे' असे म्हणतात तर बादरायणाच्या सूत्रांना 'वेदांतसूत्रे' असे म्हणतात वेदांत या शब्दाचा अर्थ वेदांचा अंत म्हणजे शेवट असा होतो किंवा वेदांच्या शेटच्या प्रकरणात सांगितलेला सिद्धांत असा होतो. त्यात उपनिषदांच्या समावेश होतो. उपनिषदे ही वेदांची अंतिम उद्दिष्टे आहेत. बादरायणाची सूत्रे वेदांच्या या भागांचे सुसूत्रीकरण पद्धतशीरपणे करतात, म्हणून त्यांना वेदांत सूत्रे म्हणतात. वेदांच्या अखेरच्या भागात संजयाला वृत्तांत देण्याचा आदेश दिला. वेदांत सूत्रांचा हा उगम आहे. हा बादरायण कोण होता? त्याने ही सूत्रे कशासाठी रचली? त्याने ती कधी रचली? नावाशिवाय बादरायणाची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. ते लेखकाचे नाव खरे आहे की नाही हेही निश्चित नाही. या सूत्राच्या लेखकाबाबत प्रमुख भाष्यकारांतही एकमत नाही. काही जण लेखक बादरायण आहे असे मानतात, तर काही जण असे म्हणतात की व्यास आणि बादरायण ही एकाच व्यक्तीची नावे आहेत. अशा प्रकारे या सूत्रांच्या लेखकाबाबत आश्चर्यकारक परस्परविरोधी मते आढळून येतात. बादरायणाने ही सूत्रे कशासाठी लिहिली?

ब्राह्मणांनी वैदिक साहित्यातील कर्मकांडाचे सुसूत्रीकरण करावे यासाठी ती लिहिली असावीत हे आपण समजू शकतो. ब्राह्मणांना कर्मकांडाचे महत्व फार वाटे. वैदिक साहित्यातील कर्मकांडाच्या सुसूत्रीकरणावर त्यांची उपजीविका व जीवन

अवलंबून होते. परंतु ब्राह्मणांना वैदिक वाङ्मयातील ज्ञानकांडात काहीही रस नव्हता. मग त्याची शास्त्रशुद्ध मांडणी कशासाठी केली? हा प्रश्न आतापर्यंत कोणी उपस्थित केला नाही. परंतु हा प्रश्न महत्वाचा आहे व त्याचे उत्तरही महत्त्वाचेच असले पाहिजे. हा प्रश्न का महत्त्वाचा आहे व त्याचे उत्तर काय आहे याची चर्चा मी नंतर करीन. वेदांत सूत्राबाबत आणखी दोन प्रश्न आहेत. ही सूत्रे (ईश्वरविषयक) आहेत की शुद्ध तत्त्वज्ञानांच्या स्वरुपाची आहेत? की प्रस्थापित ब्रह्मज्ञानविषयक सिद्धांतांची शुद्ध तत्त्वज्ञानांशी सांगड घालण्याचा हा प्रयत्न होता व या प्रकारे त्यांना निरुपद्रवी बनविण्याचा प्रयत्न होता? दुसरा प्रश्न वेदांत सूत्रांवरील भाष्यासंबंधी आहे. वेदांतसूत्रावर पाच भाष्ये पाच ख्यातनाम आचार्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या बौद्धिक क्षमतेच्या कीर्तीमुळे त्यांना आचार्य ही पदवी मिळालेली होती. ही पाच भाष्ये यांची - १) शंकराचार्य (इ.स. ७८८ ते ८२०), २) रामानुजाचार्य, (इ. स. १०१७ ते इ. स- ११३७) ३) निंबारकाचार्य (मत्यू इ. स. ११६३), ४) माधवाचार्य (इ. स. ११९७ ते अंदाजे १२७६) आणि ५) वल्लभाचार्य (इ. स. १४१७). वेदांत सूत्रावरील ही भाष्ये प्रत्यक्ष वेदांतसूत्रापेक्षाअधिक महत्त्वाची मानण्यात येऊ लागली. यांचे वैशिष्ट्ये हे आहे की या पाच आचार्यांनी एकाच वेदांतसूत्रांच्या संकलनाच्या आधावर पाच वेगवेगळ्या विचारपद्धती शोधून काढण्याचा प्रयत्न केला. शंकराचार्यांच्या मते वेदांत सूत्रे एकेश्वरीय व अदवैत तत्त्वज्ञान शिकवितात, तर रामानुजाचार्यांच्या मते विशिष्ट अद्वैतवाद, निंबारकांच्या मते एकात्मिक द्वैतवाद, माधवांच्या मते द्वैतवाद तर वल्लभाचार्यांच्या मते शुद्ध अदवैत. या संज्ञांच्या अर्थाविषयीची चर्चा मी आता करणार नाही. एकाच सूत्राच्या संकलनाचे पाच वेगवेगळे अर्थ लावून त्यावर पाच वेगवेगळया विचारांच्या पद्धती का निर्माण करण्यात आल्या? हा फक्त व्याकरणाशी संबंधित प्रकार आहे की या पाच वेगवेगळया विचारांच्या पद्धती निर्माण करण्यामागे काही कारणे आहेत? या अनेकविध भाष्यांतून आणखी एक प्रश्न निर्माण होतो. वेदांत सूत्रांवर पाच वेगवेगळी भाष्ये असली त्यातून ईश्वर व व्यक्तिनिहाय आत्मा यांचा विचार करण्याच्या पाच वेगवेगळया पद्धती सांगितल्या असल्या तरी खऱ्या अर्थाने त्या दोनच पद्धती आहेत. शंकराचार्यांचा दृष्टिकोन व इतर चार जणांचा दृष्टिकोन. कारण बाकीच्या चार जणांत मतभिन्नता असली तरी त्या चारही जणांच्या दोन मुद्यांवर शंकराचायांशी असणारा विरोध सारखाच आहे - १) ईश्वर व आत्मा एकच असल्याचा मुद्दा. २) जग हे भ्रम आहे हा सिद्धांत. यातून तिसराच एक प्रश्न निर्माण होतो. बादरायणाच्या वेदांत सूत्रातून शंकराचार्यांनी इतका वेगळा सिद्धांत का काढला? सूत्रांच्या चिकित्सक अभ्यासातून हा सिद्धांत काढण्यात आला काय? की काही उद्देश आधी ठरवून त्यासाठी सोयीचा असा (अर्थ) सिद्धांत शंकराचार्यांनी काढला आहे?

या ठिकाणी मी फक्त प्रश्न उपस्थित केले आहेत. येथे त्यांच्यावर मी चर्चा करणार नाही. येथे मला फक्त या भाषांच्या काळासंबंधी चर्चा करावयाची आहे. या भाष्यांचा काळा बुद्धपूर्व काळ आहे की बुद्धोत्तर, हा यावेळी आपल्यापुढे प्रश्न आहे.

वेदांत सुत्रांचा काळ ठरविण्याच्या मार्गात भगवद्गीतेप्रमाणेच अडचण ही आहे, की या सुत्रात अनेक बदल झाले आहेत. काही जाणांच्या[१] मते वेदांत सूत्रांच्या तीन आवृत्त्या झाल्या असाव्यात. त्यामुळे त्यांच्या काळाबाबत निश्चित काही सांगणे शक्य नाही. याबाबत व्यक्त केलेली मते केवळ अंदाजाने व्यक्त केलेली आहेत. वेदांत सूत्रे ही बुद्धाच्या काळानंतर लिहिलेली आहेत यात संशय नाही. कारण सूत्रांत बौद्ध धम्माचा उल्लेख आहे. ती मनूच्यानंतर लिहिलेली नसावीत, कारण मनूने आपल्या स्मृतीत त्याचा उल्लेख केलेला आहे. प्रा. कीथ यांच्या मते वेदांत सूत्रे इ. स. २०० च्या सुमारास लिहिलेली असावीत, तर प्रा. जॅकोबी यांच्यानुसार सूत्रांची रचना इ. स. २०० ते इ. स. ४५० च्या दरम्यान केलेली असावी.

## ६) पुराण

१) या वेळेला उपलब्ध पुराणांची संख्या १८ आहे.

२) सुरुवातीला केवळ एकच पुराण – 'ब्रह्मांड पुराण' अस्तित्वात होता.

३) या अठरा पुराणांच्या निर्मितीमागे 'व्यासांचा संबंध' आहे.

४) या व्यासानेच ब्रह्मांड पुराणातील विषय वेगवेगळे करून प्रत्येक विषयावर स्वतंत्र अशा पुराणांची निर्मिती केली.

५) अशाप्रकारे अठरा पुराणाच्या निर्मितीच्या प्रक्रियेला पुराणांच्या विकासाची द्वितीय अवस्था मानण्यात येते.

६) प्रत्येक पुराणांच्या सुरुवातीचा भाग व्यासद्वारा रचित व प्रकाशित केला गेला. त्याला आदीपुराण म्हणतात.

७) पुराणांचे मुळविषय हे 'व्यासांद्वारा' निर्मित आहेत.

८) या अठरा पुराणांच्या निर्मितीनंतर व्यासांनी ते आपला शिष्य 'रोमहर्षण' याला ऐकविले.

९) रोमहर्षण द्वारा पुराणांची तृतीय आवृत्ती निर्माण केली गेली.

१०) रोमहर्षण यांना सहा शिष्य होते. या सहा पैकी तीन शिष्य काश्यप, सावर्णी व वैशम्पायन यांनी आपले स्वतःचे वेगवेगळे पुराणांचे संस्करण तयार केले.

११) यांनाच पुराणांची चतुर्थ आवृत्ती म्हणण्यात येते.

१२) वरील तीनही संस्करण तिघांच्या नावाने ओळखले जातात.

१३) भविष्य पुराणातील पुराव्यानुसार पुराणात संशोधन राजा विक्रमादित्यांच्या काळात करण्यात आले.

१४) सुरुवातीला पुराणात केवळ पाच विषय होते.

१) सर्ग, २) प्रतिसवर्ग, ३) वंश, ४) मन्वंतर आणि ५) वंशचरित

१) **सर्ग** – याचा अर्थ आहे ब्रह्मांडाची रचना.

२) **प्रतिसर्ग** – याचा अर्थ आहे ब्रह्मांडाचे विलिनीकरा

३) **वंश** – याचा अर्थ आहे जीवनाचा क्रम अर्थात वंशावली

४) **मन्वंतर** – याचा अर्थ वेगवेगळ्या १४ मनूपासून सृष्टीचा विकास झाला, त्यांना मन्वंतर म्हणतात.

५) **वंशचरित याचा अर्थ** – राजामहारांजांच्या अनेक पिढ्यांच्या वंशावळीचे वर्णन.

१५) वरील पाच विषयात व्यतिरिक्त खालील विषयांचा पुराणात समावेश करण्यात आला आहे.

अ) **स्मृति धर्म** – १) वर्णाश्रम धर्म, २) आचार, ३) अहमिका, ४) भाषाभाष्य, ५) विवाह, ६) अशौच, ७) श्राद्ध, ८) द्रव्यशुद्धी, ९) पताका, १०) प्रायश्चित, ११) नरक, १२) कर्म विपाक, १३) युगधर्म.

ब) **व्रत धर्म** – व्रत ठेवणे, पर्व पाळणे.

क) **क्षेत्र धर्म** – तीर्थयात्रा आणि

ड) **दान धर्म** – दान पुण्य करणे.

१६) प्रत्येक पुराण एखाद्या विशिष्ट देवतेशी संबंधित आहे. त्याच दवतांचा आराधना पद्धतीचे वर्णन त्यात सांगितलेले असते. जेणेकरुन ती देवता प्रसन्न होईल. अठरापैकी पाच पुराण विष्णूपुजेसंबंधी जोडलेले आहेत. ते असे –

१) विष्णु, २) भागवत ३) नारद ४) वामन ५) गरुड.

आठ पुराण शिवपुजेसबंधी आहेत ते असे –

१) शिव २) ब्रह्म ३) लिंग ४) वराह ५) स्कंद ६) मत्स्य, ७) कुर्म, ८) ब्रह्मांड

**एक पुराण** – पद्म पुराण ब्राह्मण पूजेवर आधारित आहे.

**एक पुराणा** – सूर्य पूजेवर व

**शेवटचे पुराण** – गणेश पूजेवर आधारित आहे.

१७) देवांनी वेळोवेळी घेतलेले अवतार व त्यांचे वेगवेगळे स्वरुप कोणते आहे, हाच पुराणातील मुख्य विषय आहे. पुराणांच्या म्हणण्यारनुसार ईश्वर एक आहे परंतु त्याचे स्वरुप वेगवेगळे आहेत. अर्थात तो दोन नावांची ओळखल्या जातो. ईश्वर जेव्हा मनुष्याच्या रुपात जन्म घेतो तेव्हा तो चमत्कार अवश्य दाखवितो.

१८) अवतारवादाबद्दल विस्तृत वर्णन विष्णुपुराणात वर्णन करून सांगितलेले आहे. कारण विष्णुनेच वेळोवेळी मानवी किंवा पशूस्वरुपात धारणकरून काही ना काही चमत्कार अवश्य दाखविलेला आहे.

१९) विष्णुने मानव व पशू ज्यात वेळोवेळी घेतलेल्या अवतारांची विस्तारपूर्वक चर्चा या पुराणांत करण्यात आली आहे.

२०) नवनवीन विषय वेळोवेळी पुराणात समाविष्ट करण्यात आल्यामुळे पुराणांचे मुळस्वरुप पूर्णतः बदलून गेले आहेत.

२१) सुरुवातीला पुराणांवर ब्राह्मणेतरांचा (सुतांचा) एकाधिकार होता. या पुराणांची रचना अथवा पठणांशी ब्राह्मणांचा लेशमात्रही संबंध नव्हता.

२२) परंतु एक वेळ अशी आली की, ब्राह्मणोत्तरांच्या (सुतांच्या) हातातून ब्राह्मणांनी हा पुराण वाचण्याचा व्यवसाय हिसकावून घेतला. अशाप्रकारे पुराणांचे रचनाकार बदलण्यात आले. आता ब्राह्मणेतरांच्या ऐवजी ब्राह्मण या पुराणांचे रचनाकर्ते बनले.

२३) ब्राह्मणांच्या हाती पुराणे पडताच ब्राह्मणांनी यात नवनवीन विषय घुसडून पुराणांची नवीन आवृत्ती तयार केली. या ब्राह्मणांद्वारे पुराणांत आमुलाग्र बदल करण्यात आला व संपुर्ण मुळविषय बदलून यात संशोधन करून नवीन विषय घालण्यात आले. जुने विषय बदलून नवीन विषय जोडले गेले व नाव मात्र जुनेच देण्यात आलेत. अशाप्रकारे क्रमवार बदल पुराणात करण्यात आले.

२४) पुराणांचा निर्मितीकाल ठरविणे ही बाब मात्र कठीण आहे. जे जे ब्राह्मण साहित्य ब्राह्मणांनी लिहिले त्यात त्यांचा निर्माणकाल न लिहिण्यात ब्राह्मण जाणीवपूर्वक सावध होते. पुराण सुद्धा याला अपवाद नाही.

२५) पुराणांच्या काळनिर्धारणासंबंधी मान्यताप्राप्त संकल्पनांनाच 'साक्ष' म्हणून आपणास आधार घ्यावयाचे आहे.

२६) इतर ब्राह्मणवादी साहित्य लिखाणांच्या निर्मिती काळावर बरेच संशोधन झालेले आहे. परंतु पुराणांवर मात्र संशोधन झालेले नाही. याबाबतीत विद्वानांनी वैदिक साहित्यावर जेवढे लक्ष दिले आहे तेवढे मात्र या पुराणांवर दिले नाही.

२७) माझ्या माहितीनुसार श्री 'हाजरा' यांनी पुराणांच्या काळनिर्मितीवर कार्य केलेले आहे. त्यांनी दर्शविलेला कार्यकाळ खालीलप्रमाणे आहे.

| पुराण | | स्थापना काळ |
|---|---|---|
| १) मार्कण्डेय पुराण | – | सन २०० ते ६०० च्या काळात |
| २) वायू पुराण | – | सन २०० ते ५०० च्या काळात |
| ३) ब्रह्मांड पुराण | – | सन २०० ते ६०० च्या काळात |

| | | |
|---|---|---|
| ४) विष्णु पुराण | – | सन १०० ते ३५० च्या काळात |
| ५) मत्स्य पुराण | – | सन ३२५ ते ११०० च्या काळात |
| ६) भागवत पुराण | – | सन ५०० ते ६०० च्या काळात |
| ७) कुर्म पुराण | – | सन ५५० ते १००० च्या काळात |
| ८) वामन पूराण | – | सन ७०० ते १००० च्या काळात |
| ९) लिंग पुराण | – | सन ७०० ते १००० च्या काळात |
| १०) वराह पुराण | – | सन ८०० मं १५०० च्या काळात |
| ११) पद्म पुराण | – | सन ६०० ते ९५० च्या काळात |
| १२) बृहन्नारदीय पुराण | – | सन ८७५ ते १००० च्या काळात |
| १३) अग्नि पुराण | – | सन ८०० ते ९०० च्या काळात |
| १४) गरुड पुराण | – | सन ८५० ते १००० च्या काळात |
| १५) ब्रह्म पुराण | – | सन ९०० ते १००० च्या काळात |
| १६) स्कंद पुराण | – | सन ७५० च्या नंतर |
| १७) ब्रह्म वैवर्त पुराण | – | सन ७०० च्या नंतर |
| १८) भविष्य पुराण | – | सन ५०० च्या नंतर. |

वरील सर्वेक्षणांवरुन आपल्या लक्षात येईल की, पुराण साहित्याची रचना बुद्धानंतरच्या काळात झालेली आहे. या सर्वेक्षणावरुन एक महत्त्वपूर्ण सत्य पुढे येते की, या सर्व साहित्याची रचना पुष्यमित्राच्या नेतृत्वात झालेल्या प्रतिक्रांतीच्या नंतर झालेली आहे.

वरील सर्वेक्षणावरुन आणखी एक बाब पुढे येते. ती म्हणजे व्यासांनीच महाभारत लिहिले व्यासानीच गीता लिहिली व व्यासानीच पुराणाचे लिखाण पण केले. गीतेत अठरा अध्याय, महाभारताचे अठरा अध्याय व पुराणांची संख्या देखील अठराच आहे. तर काय ही संख्या केवळ संयोगमात्र आहे? किंवा हि एक सुनियोजित अर्थात योजना बद्ध रित्या बनविलेली किंवा पद्धतशिरपणे छडयंत्र रचून बनविलेली योजना आहे. याचे उत्तर मिळण्यास आपणास प्रतिक्षा करावी लागेल.

◆◆◆

# राजहत्या किंवा प्रतिक्रांतीचा जन्म
# ब्राम्हणवादाचा विजय

## १) बौद्ध धम्माविरुद्ध ब्राह्मणी उठाव, (बंड)

भारताबाबत बोलताना प्रा. ब्लूमफिल्ड यांनी ''वेदांचा धर्म'' या विषयावरील व्याख्यानांची सुरुवात ''भारत ही एकाहून अनेक अर्थांनी धर्माची भूमी आहे.'' याचे स्मरण करून केली आहे. आपल्या स्वतःच्या साधनांच्या साह्याने भारताने अनेकविध धर्म आणि पंथ निर्माण केले आहेत.

दुसऱ्या एका अर्थानेही भारत ही धर्माची भूमी आहे. इतरत्र कोठेही धार्मिक श्रद्धांनी आणि आचारांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रात समावेश केलेला दिसत नाही.

या निवेदनात फार मोठे सत्य आहे. भारत ही धर्माच्या संघर्षाची भूमी आहे असे जर त्यांनी म्हटले असते. तर ते सत्याच्या अधिक समीप ठरले असते. कारण भारताच्या इतिहासाइतका धर्माचाप्रभाव इतर कोणत्या देशातील इतिहासावर दिसून येत नाही. भारताचा इतिहास हा बौद्ध धर्म आणि ब्राह्मणी धर्म यामधील मरणांतिक संघर्षांचा इतिहास आहे. या सत्याची इतकी उपेक्षा झाली आहेकी, कोणीही त्याला सहजगत्या मान्यता देणार नाही. इतकेच नव्हे तर ही गोष्टी सर्वस्वी फेटाळून लावणारे थोडे निघणार नाहीत.

**यासाठी मी या ठिकाणी भारताच्या इतिहासातील काही महत्वाच्या गोष्टी सांगू इच्छितो. कारण जो कोणी भारताचा इतिहास जाणू इच्छितो, त्याला भारताचा इतिहास हा ब्राह्मणधर्म व बौद्ध धर्म यांच्या प्रभुत्वासाठी झालेल्या संघर्षाखेरीज इतर काही नाही हे समजणे आवश्यक आहे.**

भारताच्या इतिहासाची सुरुवात, भारतावर आर्यांचे आक्रमण, त्यांनी भारताला आपले वस्तीस्थान बनवणे आणि आपली संस्कृती तेथे स्थापन करणे येथून होते, असे मानले जाते. आर्यांचे गुण कोणतेही असोत, त्यांची संस्कृती, त्यांचा धर्म; त्यांची समाजव्यवस्था काहीही असो; पण आपणास त्यांच्या राजकीय इतिहासाचे फार कमी ज्ञान आहे हे निश्चित. कार्य हे अनार्यापेक्षा श्रेष्ठ होते असा दावा केला जातो. परंतु आर्यांनी आपल्या राजकीय इतिहासाबाबत बोलण्यासारखे फारसे काही ठेवले नाही हे खरे आहे. भारताचा राजकीय इतिहास नाग नावाच्या अनार्यांच्या उदयापासून सुरु होतो. हे नाग राजे फार शक्तिमान होते. त्यांना आर्य जिंकू शकले नाहीत. आर्यांना त्यांच्याशी शांतता करावी लागली व त्यांना आपल्या समान दर्जाचे मानावे लागले. प्राचीन काळात भारताने जी काही किर्ती आणि गौरव प्राप्त करून

घेतला त्याचे श्रेय या अनार्य नागांनाच द्यावे लागेल. या नागांनीच भारताला जगात महान व गौरवशाली बनविले.

भारताच्या इतिहासातील पहिला टप्पा मगध राज्याच्या ख्रिस्तपूर्व ६४२ मध्ये झालेला उदय हा आहे. मगध राज्याचा संस्थापक शिशुनाग हा होता. हा शिशुनाग अनार्य नाग वंशाचा होता.

या शिशुनाग घराण्याच्या कारकीर्दित छोट्या मगध राज्याचा विस्तार खूप मोठा झाला. या घराण्यातील पाचवा राजा बिंबिसार याच्याकारकीर्दित मगध राज्याचे रुपांतर साम्राज्यात झाले. त्याला 'मगध साम्राज्य' असे नाव प्राप्त झाले. शिशुनाग घराण्याचे राज्य ख्रिस्तपुर्व ४१३ पर्यंत अस्तित्वात होते. या वर्षी शिशुनाग घराण्यातील राजा महानंद यास नंदनावाच्या एका साहसी तरुणाने ठार केले. नंदाने मगध साम्राज्य बळकावले व नंद घराण्याची सत्ता चालू केली. या नंद घराण्याची सत्ता ख्रिस्तपूर्व ३२२ पर्यंत होती. शेवटचा नंद घराण्यातील राजाला चंद्रगुप्ताने पदच्यूत केले व मौर्य घराण्याची सत्ता मगध राज्यावर स्थापन केली. चंद्रगुप्त हा शिशुनाग घराण्यातील शेवटच्या सम्राटाचा नातलगच होता. याचा अर्थ असा होतो की चंद्रगुप्ताने पुन्हा नाग घरण्याचीच सत्ता मगध साम्राज्यावर स्थापन केली.

मौर्य घराण्याने त्यांच्या विजयी मोहिमांनी मगध साम्राज्याचा विस्तार प्रचंड प्रमाणात केला. अशोक सम्राटाच्या काळात हे मगध साम्राज्य इतके विस्तार पावले होते की, मगध साम्राज्याला अशोकाचे साम्राज्य असे मानले जाऊ लागले.

**त्यावेळी प्रचारात असलेल्या धर्मापैकी बौद्ध धम्म असल्याचे ब्राह्मणी धर्माचे स्वरुप टिकून राहिले नाही. अशोकाने बौद्ध धम्माला राजधर्म बनविले. ब्राह्मणी धर्माला हा फार मोठा धक्का होता. अशोकाच्या राज्याचा ब्राह्मणांना राजाचा आश्रय राहिला नाही व त्यांची दुय्यम आणि दुर्लक्षित म्हणून गणना होऊ लागली. खरे तर ते दडपले गेले असेही म्हणता येईल. कारण अशोकाने ब्राह्मणी धर्माचे प्रमुख अंग असलेल्या सर्व प्रकारच्या प्राण्यांना यज्ञात बळी देण्याच्या पद्धतीवर बंदी घातली. ब्राह्मणांनी राजाश्रय तर गमावलाच, पण शिवाय त्यांचा उपजिविकेचा धंदाही बंद झाला. कारण दक्षिणा घेऊन यज्ञाचे पौरोहित्य करणे हा त्यांचा मुळपेशा होता व दक्षिणा म्हणून त्यांना फार मोठी रक्कम मिळत असे. ते त्यांचे सर्वात महत्वाचे उपजिविकेचे साधन होते. मौर्य साम्राज्य अस्तित्वात होते तितकी १४० वर्षे ब्राह्मण हे दडपलेले व पद्दलित वर्ग म्हणून जगले. त्यामुळे बौद्ध शासन विरुद्ध बंड करणे याशिवाय दुसरा कोणताही मार्ग हालअपेष्टा सोसणाऱ्या या ब्राह्मणांना राहिला नाही. पुष्यमित्राने मौर्य घराण्याविरुद्ध बंड केले त्याचे आणखी एक खास कारण होते. (पुष्यमित्राचे सृंग हे गोत्र होते.) सृंग हे सामवेदी ब्राह्मण होते, सृंगांचा**

**प्राणिमात्राच्या आहुतींवर सोमयज्ञावर विश्वास होता. सर्व मौर्य साम्राज्यात पशुंची आहूती देण्यावर बंदी होती. (अशोकाच्या स्मृतिशिलेवर ही बंदी कारलेली होती) त्याविरुद्ध सृंग गोत्रियांचा राग असणे स्वाभाविक होते. त्यामुळे बौद्ध समाज नष्ट करून ब्रह्मणांची अवनती टाळावी हे सामवेदी ब्राह्मण म्हणून पुष्यमित्राचे ध्येय होते यात नवल नाही. बौद्धांच्या राज्यातील ब्राह्मणांच्या होणाऱ्या हालातून ब्राह्मणाना मुक्त करणे, ब्राह्मणी धर्माचे पुनरुज्जीवन करणे हे पुष्यमित्राचे ध्येय होते.**

**पुष्यमित्राने केलेल्या राजहत्येचा उद्देश राजधर्म म्हणून बौद्ध धम्माचे स्थान नष्ट करणे आणि ब्राह्मणांना भारताचे सार्वभौम शास्ते बनवावयाचे हा होता. ब्राह्मणी धर्माच्या मागे राजसत्ता उभी केली तर ब्राह्मणील धर्माचा बौद्ध धर्मावर विजय प्राप्त करता येईल हा पुष्यमित्राचा विचार होता. त्याचे आणखी दोन पुरावे देता येतील.**

पुष्यमित्राचा स्वतःचा आचार (वर्तन) हा पहिला पुरावा आहे. पुष्यमित्राने सत्तेवर येताच अश्वमेध यज्ञ केला. (घोड्याची आहुती देणे) हा वैदिक विधी फक्त सार्वभौम सम्राटाद्वारा करता येत असे. व्हिन्सेंट स्मिथ यांनी म्हटल्याप्रमाणे :

प्राणिमात्राच्या जीवनाचे अतिशयोक्त पावित्र्य हे बौद्ध धम्माचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट होते. आणि त्यामुळे अशोकाच्या वैशिष्टपूर्ण कायद्याने रक्तमय आहुती देणाऱ्या यज्ञावर बंदी घालण्यात आली. अशा प्रकारचे यज्ञात बळी देणे हे काही ब्राह्मण पूजेत अत्यंत महत्वाचे व आवश्यक मानले जाई. सनातनी ब्राह्मणांना अशा आहुती देणे हे आत्मरक्षणासाठी आवश्यक वाटे. पुष्यमित्राने केलेला अश्वमेध यज्ञ ही या बंदीवरील ब्राह्मणी धर्माची पहिली प्रतिक्रिया होती. या यज्ञाचा विकास पुढे पाच शतकांनी समुद्रगुप्ताचा व त्यांच्या वारसांच्या काळात झाला.

पुष्पमित्राने सत्तेवर आल्यावर बौद्धांवर व बौद्ध धम्मावर भयानक अत्याचाराची विषारी मोहिम सुरु केली, हा याचा दुसरा पुरावा आहे.

**पुष्पमित्राच्या काळात बौद्धांचा किती निर्दयपणे छळ करण्यात आला त्याचा पुरावा पुष्पमित्राने बौद्ध भिक्खुंबाबत काढलेल्या एका जाहीर आदेशावरून मिळतो. पुष्यमित्राने प्रत्येक बौद्ध भिक्खुचे शीर आणून देणाऱ्यास १०० सोन्याची नाणी बक्षिस देणारा आदेश काढला होता.**

डॉ. हरिप्रसाद शास्त्री यांनी पुष्यमित्राच्या बौद्धांच्या छळाबाबत म्हटले आहे की, "सनातनी व कर्मठ सृंग साम्राज्याच्या काळात बौद्धांचा जो छळ झाला, त्याचे वर्णन करण्यापेक्षा कल्पनाच करणे योग्य होईल. चिनी अधिकाऱ्यांच्या माहितीप्रमाणे अजूनही बौद्ध पुष्यमित्राच्या नावाचा उच्चार शाप देऊन करतात."

पुष्यमित्राची क्रांती ही फक्त राज्यक्रांतीच असती तर त्याला बौद्धधर्मीयांच्या

छळाची मोहीम काढणे आवश्यक नव्हते. ही छळाची मोहीम गझनीच्या महंमदाने हिंदूविरुद्ध काढलेल्या छळाच्या मोहिमेपेक्षा निराळी नव्हती. पुष्यमित्राचा उद्देश मुख्यतः बौद्धधम्म नष्ट करून ब्राह्मणी धर्माची स्थापना करणे हाच होता याचा हा परिस्थितीजन्य पुरावा आहे.

पुष्यमित्राच्या मौर्याच्या विरुद्ध क्रांतीचे मुळउद्दिष्ट बौद्ध धम्म नष्ट करून त्याच्या जागी ब्राह्मणी धर्म प्रस्थापित करणे हे होते. याचा पुरावा मनुस्मृतीला कायदा म्हणून दर्जा देण्याची घोषणा हा आहे.

मनुस्मृती ही ईश्वरी आहे असे मानण्यात येते. मनुस्मृती स्वयंभू निर्मात्याने मनूला सांगितली आहे. आणि मनूने ती मानवांना सांगितली, असे सांगण्यात येते. ही गोष्ट प्रत्यक्ष मनुस्मृतीतही सांगण्यात आली आहे. कोणीही या दाव्याची सत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला नाही. त्याचा परिणाम भारताच्या इतिहासात मनुस्मृतीचे स्थान, महत्व व गाभा काय त्याबद्दल जाणीव निर्माण करण्यात पूर्ण अपयश आले. मनुस्मृती ही हिंदू समाजातील सर्वात मोठ्या क्रांतीचे प्रतिक आहे. तरीही भारतीय इतिहासकारांनाही यात अपयश आले आहे. मनुस्मृतीने तिच्या लेखनाच्या उगमाबाबत केलेला दावा हा पुर्णपणे खोटा व फसवणूक करणारा आहे आणि या खोट्या दाव्यातून निर्माण झालेल्या धारणा या टिकण्यासारख्या नाहीत.

**भारताच्या प्राचीन इतिहासात मनू या नावाला फार मोठी प्रतिष्ठा आहे. या प्राचीन नावाची प्रतिष्ठा या स्मृतीला लाभावी म्हणून मनूचे नाव त्याला जोडण्यात आले. हा लोकांना फसविण्यासाठी केलेला बनाव आहे, हे संशयातीत आहे. मनुस्मृतीवर प्राचीन काळाच्या रितीप्रमाणे भृगू घराण्याच्या नावाची सही आहे. भृगूने रचलेली संहिता "मनुची धर्मसंहिता" हे या ग्रंथाचे खरे शीर्षक आहे. या संहितेच्या प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी भृगूचे नाव आहे. आणि त्यामुळे आपणाला या संहितेच्या लेखकांच्या घराण्याचे नाव माहित झाले आहे. या ग्रंथात त्याचे स्वतःचे नाव कोठेच सांगण्यात (उल्लेखण्यात) आलेले नाही. परंतु तरीही ते अनेकांना माहित होते. इसवी सनाच्या चौथ्या शतकात नारद स्मृतीच्या लेखकाला हे नाव माहीत होते. आणि त्यांने हे गुप्त नाव प्रकट केले. नारदाच्या माहितीप्रमाणे मनुस्मृतीची लेखक 'सुमति भार्गव' हा आहे. सुमती भार्गव हे दंतकथेतील नाव नाही. ती ऐतिहासिकव्यक्ती असली पाहिजे. कारण मेघतिथि या भाष्यकाराने मनू हे एका व्यक्तिने धारण केलेले नाव आहे, असे म्हटले आहे. याप्रमाणे मनू हे नांव सुमती भार्गव या व्यक्तिने धारण केलेले नाव होते व ही व्यक्तीच मनुस्मृतीची लेखक होती.**

या सुमती भार्गवने ही संहिता कधी तयार केली? या रचनेची निश्चित काळ

सांगणे शक्य नाही. परंतु ज्या काळात ही संहिता लिहिली गेली त्याबद्दल सांगता येईल. ज्यांचा अधिकार निर्विवाद आहे अशा विद्ववानांच्या म्हणण्याप्रमाणे सुमती भार्गवाने ही संहिता खिस्तपूर्व १७० ते १५० या काळात लिहिली असावी. व तिला मनुस्मृती हे नाव जाणीवपूर्वक दिले असावे. पुष्यमित्राने मौर्यांच्या बौद्ध शासनाविरूद्ध ब्राह्मणी क्रांतीची तत्वे ग्रंथित करणाऱ्या मनुस्मृतीला कायद्याचे स्वरूप दिले. ब्राह्मणी व्यवस्थेचे मनुस्मृती हे स्वरूप होते आणि पुष्यमित्राची क्रांती ही वैयक्तिक साहसवादातून केलेली नसून ती ब्राह्मणी विरुद्ध संस्कृतीच्या स्थापनेसाठी केली होती. ही गोष्ट मनुस्मृतीच्या काळात खालील वैशिष्टांवरुन स्पष्ट होते.

पहिली गोष्ट ही की पुष्यमित्राच्या काळात मनुस्मृतीचा नवीन कायद्याची संहिता म्हणून अंमल झाला. मनुस्मृतीच्या पूर्वी मानवधर्मसूत्र नावाची संहिता अस्तित्वात होती. आणि मनुस्मृती त्यावरच आधारलेली आहे, असेही एक मत आहे. परंतु मानवधर्मसूत्रचे अंशही कोठे न मिळाल्याने हे मत अग्राह्य ठरविण्यात आले. मनुस्मृतीपूर्वी आणखी दोन ग्रंथ अस्तित्वात होते. एक मानव अर्थशास्त्र किंवा मानव राज्यशास्त्र किंवा मानव राजधर्म शास्त्र. दुसऱ्या ग्रंथाचे नाव मानव गृह्यसूत्र असे होते. विद्वानांनी त्यांची मनुस्मृतीशी तुलना केलेली आहे. महत्त्वाच्या बाबतीत मनुस्मृती व या ग्रंथात वेगळेपण तर आहेच. पण अनेक ठिकाणी सर्व बाबतीत या दोन ग्रंथातील तरतुदी आणि मनुस्मृतीतील तरतुदी यात परस्परविरोध आहे. यावरुन हे स्पष्ट होते की मनुस्मृतीही नव्या राज्यातील नवी आचारसंहिता आहे.

पुष्यमित्राची नवी राजवट बुद्ध धम्मा विरोधी होती. याचा पुरावा मनुस्मृतीत बौद्ध आणि बौद्ध धम्मा यांच्याविरुद्ध जे उल्लेख आहेत त्यावरुन स्पष्ट होते. मनुस्मृतीतील खालील तरतुदी पाहा :

९.२२५. जे लोक नास्तिक किंवा पाखंडी (बौद्ध) आहेत त्यांना राजाने राज्यातून हाकलून द्यावे.

९.२२६. वेषांतरीत दरोडेखोर राज्यात राहून सतत त्यांच्या गैरकृत्यांमुळे प्रतिष्ठित प्रजाजनांना इजा पोचवितात.

५.८९. जे धर्मकृत्यांची उपेक्षा करतात त्यांचा जन्म निरर्थक होय. जे मिश्र जातीच्या संयोगाने जन्माला येतात आणि पाखंडी मताचे संन्याशी आहेत व ज्यांनी आत्महत्या केली आहे अशांच्या आत्म्यांना पाण्याची आहुती देऊ नये.

५.९०. ज्या स्त्रियांनी पाखंडी (बौद्ध) पंथ स्वीकारला आहे त्यांच्या आत्म्यासाठी पाण्याचे तर्पण करु नये.

४.३०. गृहस्थाने शब्दानेही पाखंड्यांच्या वेदविरोधी तर्किकांचा सन्मान करु नये.

१२.९५. वेदांवर आधारीत नसलेल्या सर्व प्रकारच्या निंदास्पद तत्वज्ञानाच्या पद्धती आणि त्यांच्या सर्व परंपरा यामुळे मृत्युनंतर सद्गती मिळत नाही. कारण त्या

अंधारावर आधारलेल्या असतात.

१२.९६. वेदांशी मतभेद असणारे जे सर्व सिद्धांत निर्माण होतात आणि नष्ट होता, ते नवे असल्यामुळे अर्थशून्य असतात.

हे पाखंडी मतांचे ज्यांना उल्लेख मनू पाखंडी असा करतो, ज्यांना नव्या राजाने राज्यातून हद्दपार करावे. गृहस्थाने त्यांना जीवनात व मृत्यूनंतर सन्मान करू नये मग हे ते पाखंडी कोण होते? हे नव्या काळातील अर्थशून्य तत्वज्ञानाला कोणते? वेदांपासून वेगळ्या आधारावर आधारलेले आणि नष्ट होणाच असे हे तत्वज्ञान कोणते? मनूने वर्णन केलेले पाखंडी हे बुद्धच होते. आणि मनूने ज्या तत्वज्ञानाला अर्थ शुन्य असे संबोधले ते बुद्ध धर्माचे तत्वज्ञान होते. कल्लूक भट या मनूस्मृतीवरील दुसऱ्या भाष्यकाराने मनुस्मृतीने मनुस्मृतीच्या श्लोकात उल्लेखिलेले पाखंडी आणि त्यांचे तत्वज्ञान म्हणजे बुद्ध आणि बुद्धवाद होय असे स्पष्टपणे म्हटले आहे.

माझ्या निवेदनाला तिसरा आधार मनुस्मृतीत ब्राह्मणांचे जे स्थान आहे त्यावरून स्पष्ट होतो. मनुस्मृतीतील खालील तरतुदी पाहा.

## ब्राह्मणांचा दर्जा

१.९३. ब्राह्मण हे ब्रह्माच्या मुखातून निर्माण झाले असल्याने, ते प्रथम जन्माला आले असल्याने, ते वेद म्हणत असल्याने ते सर्व प्राणिमात्रांचे स्वामी आहेत.

१.९६ सृष्टीतील ईश्वरनिर्मित सर्व गोष्टीमध्ये सचेतन प्राणी हा उत्तम. सर्व सचेतनांमध्ये जे बुद्धीवर जगतात असे बुद्धीमान मानव श्रेष्ठ अशा मानवात ब्राह्मण उत्तम असतात.

१. जगात जे जे काही अस्तित्वात आहे, ती ब्राह्मणाची मालमत्ता आहे. कारण ब्राह्मणांची उत्पत्ती ही सर्वश्रेष्ठ आहे. आणि त्या सर्व गोष्टीवर ब्राह्मणांचा अधिकार आहे.

१.१०१. ब्राह्मण फक्त स्वतःचेच अन्न खातो. फक्त स्वतःचेच कपडे वापरतो. फक्त स्वतःचीच भिक्षा घेतो. इतर सर्व मर्त्य मानव ब्राह्मणांच्या कृपेने जगतात.

१.३ आपल्या श्रेष्ठत्वामुळे, निर्मितीच्या श्रेष्ठत्वामुळे, विशिष्ठ प्रतिबंधक नियमांच्या आचारामुळे, विशिष्ट पवित्रतेमुळे, विशिष्ट पवित्र संस्कारांमुळे ब्राह्मण हा सर्व जातींचा स्वामी आहे.

१०.३५. ब्राह्मणांचे वर्णन ''या विश्वाचा निर्माता, शासन करणारा, गुरु आणि सर्व प्राणिमात्रांवर उपकारकर्ता' असे केलेले आहे : ब्राह्मणाला कोणी अयोग्य आणि तीव्र शब्दांनी संबोधू नये.

मनुने ब्राह्मणांना असंतुष्ट करु नये असा इशारा राजांना खालील शब्दात दिला आहे–

९.३१३. राजाने तो अधिकाधिक अडचणीत असला तरी ब्राह्मणांचा राग

ओढवून घेऊ नये. कारण ब्राह्मण रागावले तर त्याच्या सैन्याचा, त्यांच्या वाहनांचा ताबडतोब नाश करु शकतात.

११.३१. ज्या ब्राह्मणाला कायदा कळतो त्याने कोणताही गुन्हा राजाच्या निदर्शनास आणण्याची गरज नाही. त्याच्या स्वतःच्या अधिकारात तो ज्याने त्याला दुखविले असेल त्याला शिक्षा करु शकतो.

११.३२. ब्राह्मणांची स्वतःची शक्ती ही राज्याच्या शक्तीपेक्षा अधिक असते; म्हणून ब्राह्मणाने केवळ स्वतःच्या शक्तीने आपल्या शत्रुचा नाश करावा.

ब्राह्मणांचे हे दैवतीकरण त्यांना राजाच्यापेक्षा उच्च स्थान देणे ही गोष्ट स्वतः राजा ब्राह्मण असल्याखेरीज अशक्य होते. स्वतः राजा ब्राह्मण असल्याशिवाय व मनूने व्यक्त केलेल्या मतांबाबत त्याला सहानुभूती असल्याशिवाय अशक्य होते. पुष्यमित्राने आणि त्याच्या वारसांनी ब्राह्मणांचे हे अतिरिक्त दावे ते स्वतः ब्राह्मण आणि ब्राह्मणी धर्मांच्या स्थापनेत रस घेणारे असल्याखेरीज सहन करण्यात आले नसते. अगदी शक्य आहे की पुष्यमित्रानेच मनुस्मृती तयार करण्याचे आदेश दिले असावेत आणि ब्राह्मणी तत्वज्ञानाचे ग्रंथ म्हणून त्याला स्थान दिले असावे.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यावर पुष्यमित्राच्या क्रांतीचा एकमेव उद्देश बौद्ध धम्माचा नाश करणे आणि ब्राह्मणी धर्माची पुन्हा स्थापना करणे हे संशयातीतपणे सिद्ध होते.

भारताच्या राजकीय इतिहासाचा वरील सारांश या प्रकरणात देण्याची वास्तविक गरज नव्हती. भारताचा इतिहास ज्या पद्धतीने लिहिला गेला आहे त्या बाबतीत मी समाधानी असलो तर वरील सारांश दिलाचं नसता. परंतु मी त्याबाबत समाधानी नाही, कारण भारताच्या इतिहासात मुस्लिम विजयावर अतिरिक्त भर दिलेला आहे. मुस्लिम आक्रमणांच्या लाटांवर लाटा एखाद्या वादळाप्रमाणे कशा आल्या. त्यांनी राज्यकर्त्यांना कसे पदच्युत केले आणि सर्व लोकांवर कसा प्रभाव निर्माण केला, यावर कागदांचे भारेच्या भारे लिहिले गेले आहेत. भारताचा सर्व इतिहास असा लिहिला आहे की, मुस्लिम आक्रमणांची सूची हीच फक्त अभ्यासायोग्य होती हे स्पष्ट होते, त्यापेक्षाही अधिक महत्वाची नसली तरी त्या इतकीच महत्वाची इतर आक्रमणेही होती. हिंदू भारतावर मुस्लिम आक्रमणांनी आक्रमणे केली. त्याचप्रमाणे ब्राह्मणी आक्रमकांनी बौद्ध भारतावरही आक्रमणे केली. हिंदू भारतावरील मुस्लिम आक्रमणे आणि बौद्ध भारतावरील ब्राह्मणी आक्रमणे यात अनेक साम्यस्थळे आहेत. हिंदू भारतावरील मुसलमान आक्रमक आपल्या घराण्याच्या, राज्याच्या महत्वाकांक्षेपायी आपापसात लढले. अरब, तुर्क, मोगंल आणि अफगाणी हे आपापसात स्वतःच्या प्रभुत्वासाठी लढले. हे खरे असले तरी त्यांच्यात एक गोष्ट समान होती. मूर्तिपूजक धर्म नष्ट करण्याचे त्यांचे ध्येय हे समान होते. त्याप्रमाणेच बौद्ध भारतावरील आक्रमण हे आपल्या घराण्याचे राज्य चालावे या महत्वाकांक्षेने

एकमेकांशी भाडले. सृंग, कण्व, आंध्र आदि घराणी प्रभुत्वासाठी आपापसात लढली. परंतु एका बाबतीत हिंदू भारताच्या मुस्लिम आक्रमकांप्रमाणेच त्यांच्या एक उद्देश समान होता आणि तो म्हणजे बौद्धांचा आणि बौद्ध धर्माचा नाश ! इतिहासकारांच्या दृष्टिने हिंदू भारतावरील आक्रमणे ही नमूद करावयास योग्य अशी समजली जाऊ शकतील. कारण ब्राह्मणशाहीची बौद्ध धर्माविरुद्धची आक्रमणे ही मुस्लिम आक्रमणांच्या हिंदू धर्मावरील अत्याचारापेक्षा कमी हिंसक वा जालीम नव्हती. जनतेच्या सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनावर शाश्वत परिणाम करण्याच्या दृष्टिने बुद्ध धर्मीयांवरील ब्राह्मणशाहीची आक्रमणे ही मुस्लिम आक्रमणांपेक्षा इतकी अधिक परिणामकारक होती की, त्यामुळे मुस्लिम आक्रमणे अगदी वरवरची व तात्कालिक स्वरुपाची आढळून येतील.

मुस्लिम आक्रमकांनी हिंदू धर्माचा नाश केला नाही किंवा हिंदू जनतेच्या आध्यात्मिक जीवनाला आधार देणाऱ्या सिद्धांतांना व तत्वांना सुरुंग लावला नाही. परंतु ब्राह्मणी तत्वांच्या आक्रमणांमुळे बौद्ध धर्माने जे जीवनमार्गाचे व धर्माचे सिद्धांत सांगितले आणि शंभर वर्षे जनतेने ज्या तत्वांचा सत्य आणि शाश्वत जीवनमार्ग म्हणून स्वीकार केला त्याचाच नाश केला. उपमा बदलून बोलावयाचे तर मुस्लिम आक्रमकांनी फक्त न्हाणीघरातील पाणी ढवळले व तेही अगदी अल्प काळासाठी. त्यानंतर या ढवळाढवळीला ते कंटाळले आणि त्यांनी पाण्यातील घटकांसह ते पाणी तसेच राहू दिले. हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाला न्हाणीघरातील बाळाची उपमा दिली तर त्यांनी या बाळाला न्हाणीघरातून फेकूण दिले नाही. ब्राह्मणशाहीने मात्र बौद्ध धर्माशी संघर्षात या धर्माला त्यांनी बौद्ध धर्माच्या बाळासह न्हाणी घरातून फेकून दिले. आणि आपले पाणी न्हाणीत ओतले व आले बाळ त्यात ठेवले. ब्राह्मणशाहीने उदात्त बुद्धापासून वाहात आलेले बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाच्या सुवासिक आणि शुद्ध पाण्याची तुलना करता आपले पाणी किती घाण व गलिच्छ आहे याचा विचार केला नाही. ब्राह्मणशाहीने बौद्ध धर्माच्या बाळाशी तुलना करता आपले बाळ किती विद्रूप व भयानक आहे याचा विचार केला नाही. ब्राह्मणशाहीने आपल्या आक्रमणाने बौद्ध धर्माचा नाशही केला. इस्लामने हिंदू धर्माची जागा कधीही घेतली नाही. इस्लामने हिंदू धर्म नष्ट करण्याचे आपले काम कधीच पूर्णपणे केले नाही. ब्राह्मणशाहीने मात्र ते केले. त्यांनी धर्म म्हणून बौद्ध धर्माला बाहेर हाकलले आणि त्याची जागा घेतली.

यावरुन हे स्पष्ट होते की ब्राह्मणशाहीचे बौद्ध धर्मावरील आक्रमण हे मुस्लिमांच्या हिंदू धर्मावरील आक्रमापेक्षा भारताच्या इतिहासाच्या दृष्टिने किती तरी अधिक महत्वाचे आहे. परंतु मौर्यांनी निर्माण केलेल्या साम्राज्यावरील आक्रमणाला इतिहासात फारच थोडी जागा दिली आहे. त्यातही सृंग, कण्व आणि आंध्र हे कोण हाते व त्यांनी मौर्यांनी निर्माण केलेले साम्राज्य का नष्ट केले, या सहज निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे

संपूर्ण दुर्लक्ष केले. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माविरुद्ध विजय मिळविल्यानंतर ब्राह्मणशाहीने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या बदलांचा अभ्यास त्यांनी केलेला नाही.

भारतीय इतिहासाच्या या अंगाचा विचार करण्यातील या अपयशाच्या मागे अस्तित्वात असलेल्या काही चुकीच्या कल्पना आहेत. सर्वसामान्यपणे असे समजले जाते की या भारताच्या संस्कृतीच्या वेगवेगळ्या अवस्था होत्या. त्यांच्यात मूलभूत विरोध कधीच नव्हता असे समजले जाते. दुसरी गैरसमजूत अशी आहे की भारतीय इतिहासात जे संघर्ष झाले, ते सर्व राजकीय आणि राजघराण्यातील संघर्ष होते. त्यांचा सामाजिक व सांस्कृतीक जीवनाशी काहीही संबंध नव्हता. या अगदी चुकीच्या कल्पनांमुळे भारतीय इतिहास हा पूर्णपणे यांत्रिक बनला. तो एका राजघराण्यानंतर दुसरे राजघराणे आणि एका राजानंतर दुसरा राजा शासनसत्तेवर आरुढ होणे या स्वरुपात लिहिला गेला. ही लेखनाची प्रवृत्ती सुधारावयाची असेल तर प्रथम दोन निर्विवाद सत्ये स्वीकारावी व समजून घ्यावी लागतील.

पहिली गोष्ट ही की भारतात कोणतीही एकमेव व एकच एक समान संस्कृती कधीच नव्हती. ऐतिहासिकदृष्ट्या तीन भारत होते. पहिला ब्राह्मणाची भारत, दुसऱ्या बौद्ध धर्मीय भारत व तिसरा हिंदू भारत. या प्रत्येकाची स्वतःची अशी संस्कृती होती. दुसरी गोष्ट अशी की भारतावरील मुस्लिम आक्रमणापूर्वी ब्राह्मणशाहीत व बौद्ध धर्म यात मरेपर्यंत अतिशय तीव्र संघर्ष झाला होता. जो या दोन गोष्टी लक्षात घेणार नाही त्याला भारताचा खरा इतिहास कधी लिहिताच येणार नाही. त्याला या इतिहासात अंतर्भुत असलेला अर्थ व कार्यकारण भाव समजणार नाही. आतापर्यंत भारताचा इतिहास ज्या प्रकारे लिहिला गेला, त्यात सुधारणा करण्याच्या आणि इतिहासाचा अर्थ व उद्दिष्टचे समजून देण्याच्या दृष्टिनेच ब्राह्मणशाहीच्या बौद्ध धर्मावरील आक्रमणाच्या व ब्राह्मणशाहीच्या बौद्ध धर्मावरील राजकीय विजयाच्या या इतिहासाची मला पुनर्रचना करणे भाग पडले.

त्यामुळे पुष्पमित्राची क्रांती ही ब्राह्मणांनी बौद्ध धर्माचा पराभव करण्यासाठी केलेली राजकीय क्रांती होती हे मान्य करावे लागेल.

जिज्ञासु हा प्रश्न सहजच विचारतील की ब्राह्मणवादाने विजयी झाल्यानंतर काय केले?

मी आता या प्रश्नाचे उत्तर देतो. विजयाच्या गर्वाने फुगलेल्या ब्राह्मणवादाच्या दुष्कृत्यांचे मी सात शिर्षकांतर्गत विवेचन करणार आहे.

१) ब्राह्मणांना शासन आणि राजहत्या करण्याचा अधिकार प्रदान केला.
२) ब्राह्मणांना विशेष अधिकार प्राप्त लोकांचा वर्ग बनविले.
३) वर्णाचे रुपांतर जातीत केले.
४) विभिन्न जातींमध्ये संघर्ष आणि समाजविरोधी भावना निर्माण झाली.

५) शूद्र आणि स्त्रीयांना नीच मानले.

६) विषमतेच्या आधारावर वर्णव्यवस्थेचे निर्माण केले आणि

७) प्रथम पारंपारिक आणि परिवर्तनशील असलेल्या सामाजिक व्यवस्थेला कायद्याने कायमचे अपरिवर्तनीय करून ठेवले.

**प्रथम पहिल्या शिर्षकापासून सुरु करु.**

पुष्पमित्राने सुरु केलेल्या प्रतिक्रांतीने सुरुवातीला ब्राह्मणांना नव्या संकटांना समोरे जावे लागले. जनतेने सहजासहजी या प्रतिक्रांतीचा स्विकार केला नाही. जनतेचा विरोध बाण नावाच्या कवीने उत्तमपणे वर्णन केले आहे. या प्रतिकांतीचा उल्लेख करतांना पुष्यमित्राचे वर्णन बाणाने अधम जातीत जन्मलेला असा केला असून त्याच्याद्वारे करण्यात आलेल्या राजहत्येला अनार्य अर्थात आर्य नियमांच्या विरोधी असा केला आहे. पुष्यमित्राच्या काळापर्यंत खालील तीन नियम पूर्णतः अपरिवर्तनीय होते. तत्कालीन आर्य नियमांत स्पष्ट लिहिलेले आहे की,

१) राजा होण्याचा अधिकार केवळ क्षत्रियांनाच आहे.

२) कोणताही ब्राह्मण शत्रांचा व्यवसाय करणार नाही.

३) राजाच्या विरुद्ध विद्रोह करणे पाप आहे.

पुष्पमित्राद्वारे केल्या गेलेल्या कृत्याद्वारे वरिल तीनही नीयमाचे उल्लंघन केले गेले. नव्हे पापच केला गेला आहे. एकतर तो ब्राह्मण होता. ब्राह्मण असून देखील त्याने क्षत्रियाचा पेशा अंगिकारला राजाविरुद्ध या शास्त्राचा वापर केला आणि तो स्वतः राजा बनून बसला.

नियमांविरुद्ध कृत्य केल्यामुळे राज्यातील सर्व जनता पुष्यमित्राच्या विरुद्ध होती. राज्यातील सर्व ब्राह्मणांना पुष्यमित्राद्वारे केल्या गेलेल्या पापाचे समर्थन करावे लागले. याकरिता ब्राह्मणांना तत्कालिन आर्यनियमात बदल करावा लागला. संपूर्ण व्यवस्थेतच फेरफार (बदल) करून ब्राह्मणांनी पुष्यमित्राचे समर्थन केले. ब्राह्मणांद्वारे करण्यात आलेले हे व्यवस्था परिवर्तन आपणास मनुस्मृतीत पहावयास मिळते. या संबंधित श्लोकांचे वर्णन मी खाली करित आहे.

१२. १०० राजाचे सेनापतीपद, राजाचे प्रमुखत्व व सर्वावर साम्राज्य हे ब्राह्मणाला योग्य मानावे.

येथे आपणास एक बदल आढळतो. ब्राह्मणाला सेनापती बनण्याची, शासन करण्याची व सम्राट बनवण्याचीही मुभा त्यामुळे त्यांना मिळाली.

१२. ३१. ब्राह्मणाला कायद्याचे ज्ञान असल्यामुळे त्याने राजाकडे तक्रार करण्याची गरज नाही. जे त्याची हानी करतील त्यांना स्वतःच्या अधिकारात त्याने शिक्षा करावी.

११. ३२. ब्राह्मणाला स्वतःची शक्ती ही त्याच्या स्वतःवरच अवलंबून असते

व त्यामुळे त्याची शक्ती ही राज्याच्या शक्तीपेक्षा अधिक समजावी. करण राजाची शक्ती ही इतर माणसांवर अवलंबून असते. त्यामुळे ब्राह्मणाला आपल्या स्वतःच्या बळावर शिक्षा करता येते.

१२. २६१–२६२ ब्राह्मणाने तिनही वर्णातील जनतेला ठार मारले तरी त्याने ऋग्वेद, यजुर्वेद किंवा सामवेद, व उपनिषदांचे बरोबर पठण केल्यास तो पापमुक्त होतो.

आर्यांच्या कायद्याचा हा दुसरा भाग आहे. यामुळे ब्राह्मणाला केवळ राजालाच ठार मारण्याचा नव्हे तर सत्तेला, दर्जाला हनी पोहोचत असेल तर सर्व माणसांची कत्तल करण्याचा परवाना दिला आहे.

१३. ३४८. ज्या वेळी धर्माने प्रत्येकाला घालून दिलेल्या व्यवसायापासून त्यांना सक्तीने अडथळा आणण्यात येईल, त्यावेळी द्विजाने शस्त्र धारण करावे. आणि वाईट काळात द्विजांवर संकट कोसळले असतानाही त्यांनी शस्त्र धारण करण्यास हरकत नाही.

१०. ३२०. क्षत्रियांना (लष्करी माणसाने किंवा राजाने) जर ब्राह्मणाविरुद्ध हिंसक सशस्त्र हल्ला केला तर ब्राह्मणाला निर्दोष समजावे. कारण मूलतः सैनिक हा ब्राह्मणापासून निर्माण झाला आहे.

आर्य कायद्यात हा तिसरा बदल आहे. कारण यात बंड करण्याचा आणि राजहत्त्या करण्याचा परवाना देण्यात आला आहे. हा नवा कायदा अत्यंत कुशलतेने तयार केला आहे. यात बंडाचा हक्क फक्त वरच्या तीन वर्णांना दिला आहे. त्या वेळी ब्राह्मणाला एकट्यालाही बंडाचा हक्क देण्यात आला आहे. या बंडाचा हक्क देतांना त्याच्या सीमा ठरवून देण्यात आल्या आहेत. मनूने सर्व वर्णांना घालून दिलेल्या व्यवसायांच्या नियमांच्या भंग जर राजाने केला तरच बंडाला परवानगी आहे.

हे कायद्यातील बदल जितके आवश्यक तितकेच क्रांतीकारकही होते. पुष्यमित्राने मौर्य राजाला ठार करुन जी परिस्थिती निर्माण केली होती. त्यातून त्याच्या कृत्यांना कायद्याचा आधार देऊन सर्व सुरळीत करणे हा या बादलाचा उद्देश होता. या कायद्यातील बदलामुळे ब्राह्मण राजहत्त्या कायदेशीरपणे करु शकत होते. ब्राह्मणाला जर स्वतःच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असेल तरच कत्तल व रक्तपात करण्याचाही हक्क होता.

याप्रमाणे ब्राह्मणशाहीने शासन करण्याचे आणि त्यांच्या श्रेष्ठ दर्जाबाबत आणि हक्कांबाबत संशय वा वाद माजू नयेत अशी कायदेशीर व्यवस्था केली. परंतु हे सर्व ब्राह्मण जातीसाठी पुरेसे नव्हते. हे केवळ अभिमान बाळगण्यासाठी पुरेसे असले तरी त्यांचा प्रत्यक्ष फायदा नव्हता. जर ब्राह्मणांना इतर सर्वसामान्य माणसासारखेच हक्क आणि कर्तव्य असतील तर ब्राह्मणांना शासन असण्यास काही खास फायदा नव्हता. ब्राह्मणांना जर ब्राह्मण शासनाची न्यायतः स्थापना करावयाची असेल तर एक वर्ग म्हणून सर्व ब्राह्मणांना काही खास हक्क आणि निर्बंधापासून मुक्तता मिळणे आवश्यक

होते. ब्राह्मणांचा श्रेष्ठ दर्जा त्यांच्यासाठी खास कायदे जर मान्य करण्यात आले नसते तर पुष्यमित्राची क्रांतीही काहीही चांगले करण्यास असमर्थ व असहायक आहे हे सिद्ध होवून उलट ते एक वाईट वादळ ठरले असते. मनूला याची जाणीव होती आणि म्हणून त्यांने ब्राह्मणांसाठी मक्तेदारी निर्माण केली. त्यांना हक्क दिले आणि काही निर्बंधापासून आपल्या संहितेद्वारे मुक्त ठेवले.

**प्रथम मक्तेदारीबद्दल विचार करु.**

१. ८८. ब्राह्मणांना त्याने अध्ययनाचा आणि अद्यापनाचा (वेदांचा) हक्क दिला. तसेच स्वतःच्या आणि इतरांच्या फायद्यांसाठी बळी देण्याचा तसेच दान (भीक) देण्याचा आणि घेण्याच्या हक्क दिला.

१०. १. द्विज असलेल्या तीनही वर्णांना आपली कर्तव्ये पार पाडतांना वेदांचे अध्ययन करण्याची मुभा आहे. परंतु त्यांच्यापैकी फक्त ब्राह्मणच ते शिकवू शकतात. इतर दोन वर्णांना तो अधिकार नाही हा सिद्ध नियम आहे.

१०. २. सर्वांना कायद्यात उपजिविकेचे साधन म्हणून काम सांगितलेले आहे. हे ब्राह्मणांला माहीत असले पाहिजे. त्याने ते इतरांना सांगितले पाहिजे. आणि स्वतःची ही त्याचे आचरण केले पाहिजे.

१०. ३. ब्राह्मणाला त्याच्या श्रेष्ठ स्थानामुळे, त्याचे मुळ श्रेष्ठतम असल्यामुळे तो विशिष्ट निर्बंधाचे नियम पाळत असल्यामुळे आणि त्याला खास पवित्रता असल्यामुळे ब्राह्मण हा सर्व जातीचा (वर्ण) स्वामी आहे.

१०. ७४. जे ब्रहम्याशी ब्रह्माशी एकरुप होण्याच्या साधनाबाबत इच्छुक आहेत. आपली कर्तव्ये करण्यात खंबीर आहेत आणि त्यांनी खाली दिलेल्या सहा कृत्यचि पालन करावे. ही सहा कृत्ये खाली क्रमशः दिली आहेत.

१०. ७५. १) वेदांचे अध्ययन, २) वेदांचे अध्यापन, ३) स्वतःसाठी यज्ञ करणे, ४) दुसऱ्यासाठी यज्ञ करणे, ५) देणग्या देणे आणि ६) देणग्या घेणे ही सहा कृत्ये ब्राह्मणासाठी सांगितली आहेत.

१०. ७६. परंतु या सहा कृत्यापैकी तीन कृत्ये म्हणजे दुसऱ्यासाठी यज्ञ करणे, अध्यापन करणे आणि शुद्ध माणसांकडून देणग्या घेणे ही तीन कृत्ये त्यांच्या उपजीविकेची साधने आहेत.

१०. ७७. ब्राह्मणानंतर क्षत्रियांचा विचार करतांना क्षत्रियांना तीन कृत्ये करण्यास प्रतिबंध आहे. म्हणजे अध्यापन, दुसऱ्यासाठी यज्ञ करणे आणि दान घेणे या गोष्टी क्षत्रियांना निषिद्ध आहेत.

१०. ७८. ही कृत्ये वैश्यांनाही निषिद्ध आहेत हा निश्चित नियम आहे. कारण प्रजापती मनूने ही कृत्ये या दोन वर्णांसाठी सांगितलेली नाहीत.

१०. ७९. शस्त्रांचा वापर करणे हे क्षत्रियांचे उपजीविकेचे साधन आहे. व्यापार करणे, गुरे राखणे, शेती करणे, ही वैश्याची उपजीविकेची साधने आहेत. परंतु त्यांच्या

कर्तव्यात उदारता, वेदांचे अध्ययन आणि यज्ञ करणे या गोष्टींचा समावेश आहे.

मनूने याप्रमाणे तीन बाबतीत ब्राह्मणांची मक्तेदारी ठेवली. वेद शिकवणे, यज्ञ करणे आणि देणग्या स्विकारणे हे हक्क फक्त ब्राह्मणांपुरतेच मर्यादित राहिले.

याबरोबर ब्राह्मणांना खालील बाबतीत निर्बंधमुक्त करण्यात आले. याचे दोन भाग आहेत.

एक करांपासून मुक्तता व दुसरे काही प्रकारच्या शिक्षांपासून मुक्तता:

८.१३३. राजा आजारामुळे मरत असला तरी त्याने ब्राह्मणांवर कर लादू नये. राज्यातील एकही ब्राह्मण भुकेमुळे मरता कामा नये.

८.१२२. शहाण्या माणसाला न्यायदानात अपयश येऊ नये. अन्यायाला प्रतिबंध असावा म्हणून शहाण्या माणसाने खोटी शपथ घेण्याच्या गुन्ह्याबाबत दंड सांगितले आहेत.

८.१२३. न्यायी राजा खोटी शपथ घेतल्याबद्दल कनिष्ठ तीन वर्णांना दंड आणि हद्दपारीची शिक्षा देऊ शकतो. परंतु ब्राह्मणाला मात्र तो फक्त हद्दपार करील.

८.१२४. स्वयंभू ईश्वराचा पुत्र मनू याने तीन कनिष्ठ वर्णांसाठी शिक्षा करण्याच्या दहा जागा निश्चित केल्या आहेत. पण ब्राह्मणाला मात्र देशातून कोणतीही इजा न करता जाऊ द्यावे.

८. ३७९. ब्राह्मणाला देहान्त शिक्षेएवजी फक्त त्याचे डोके भादरण्याची शिक्षा सांगितली आहे. इतर जातींना मात्र देहान्त शासन भोगावे लागेल.

८. ३८०. ब्राह्मणाने जरी सर्व संभवनीय गुन्हे केले असले तरी त्याचा वध करु नये. (राजाने) ब्राह्मणांची सर्व मालमत्ता त्याच्याकडे ठेवून कोणतीही इजा न करता ब्राह्मण गुन्हेगाराला हद्दपार करावे.

याप्रमाणे मनूने ब्राह्मणांना गुन्ह्यांबाबत सर्वसाधारण गुन्हेगारविषयक कायद्यापासून अलिप्त ठेवले आहे. त्याला देहान्त शासनाऐवजी त्याच्या सर्व मालमत्तेसह आणि एकही जखम न होता देश सोडून जाण्याची शिक्षा सांगितली आहे. **त्याला फक्त हद्दपारीची शिक्षा म्हणजे हॉक्सच्या शब्दात अत्यंत घृणास्पद गुन्ह्यांबाबत हवापालट करण्याची शीक्षा सांगितलेली आहे.**

मनुने ब्राह्मणाला काही हक्क दिले आहेत –

**न्यायाधीश ब्राह्मणच असला पाहिजे.**

८.९. राजा जर वैयक्तिकरीत्या खटला चालवीत नसेल तर त्याने व्यासंगी ब्राह्मणाला खटले चालविण्यास सांगावे.

८.१०. या ब्राह्मणाने श्रेष्ठतम न्यायालयात करवसूली अधिकाऱ्यांच्या बरोबर यावे आणि राजापुढे आलेल्या सर्व खटल्यांचा बसून वा उभे राहून पूर्णपणे विचार करावा.

**बाकीचे हक्क आर्थिक आहेत.**

८.३७. ज्या वेळी विद्वान ब्राह्मणाला पूर्वीच्या काळी ठेवलेला खजिना सापडतो,

त्या वेळी तो सर्व खजिना स्वीकारु शकतो. कारण तो सर्व गोष्टींचा स्वामी आहे.

८.३८. ज्या वेळी राजाला जमिनीत लपविलेले धन (खजिना) मिळतो, त्यावेळीं राजाने त्यातील अर्धे धन ब्राह्मणाला द्यावे आणि बाकीचे सरकारी खजिन्यात ठेवावे.

९.३३३. पण ज्या राजाला आपला मृत्यू समीप आला आहे असे वाटते, त्याने दंडापासून जमा झालेली सर्व संपत्ती ब्राह्मणांना द्यावी. आपले राज्य मुलाला द्यावे आणि युद्धात मृत्यू पत्करावा.

९.१८७. मृतांच्या सपिंडापैकी जो सर्वांत जवळचा तीन पिढ्यातील असेल, त्याचा माणसाच्या मालमत्तेवर हक्क असतो. त्यानंतर आध्यात्मिक शिक्षक हा सकुल्य (वारस) समजावा किंवा शिष्याला वारस समजावा.

९.१८८. परंतु यापैकी कोणताही वारस नसेल तर जे वेदान निष्पात आहेत, शुद्ध व आत्मसंयमी आहेत असे ब्राह्मण मालक बनतील व या प्रकारे कायद्याचे उल्लंघन होणार नाही.

९.१८९. राजाने ब्राह्मणांची मालमत्ता कधीही घेऊ नये, हा निश्चित नियम ओ. परंतु इतर जातीतील मृतांचे वारस नसतील तर ती मालमत्ता राजाने ताबडतोब घ्यावी.

मनूने या प्रकारे हे कायदे, हक्क व काही गोष्टीपासून मुक्तता ब्राह्मणांना प्रदान केली आहे. राजा ब्राह्मण असल्याचे ते निदर्शक आहे.

ब्राह्मणशाहीचे पाठीराखे–ब्राह्मणशाहीच्या श्रेष्ठत्वावर व सर्वोत्तम स्वरुपावर त्यांचा इतका गाढा विश्वास होता की, त्यांना या अतिरिक्त हक्कांबाबत काही सबबी देण्याचीही गरज वाटली नाही. मनूने ब्राह्मणांवर लादलेल्या काही निर्बंधाबाबत तक्रार करण्यास ते हयगय करीत नाहीत. मनूने ब्राह्मणांवर काही निर्बंध लादले आहेत, ते खरे आहे. हे करण्याचा उद्देश मनूने ब्राह्मणांपुढे दरिद्री राहण्याचा आणि सेवा करण्याचा आदर्श ठेवला होता. हे दाखविणे हा होता. परंतु या निर्बंधाकडे वोट दाखवून मनूने ब्राह्मणांपुढे दारिद्र्याचा व सेवेचा आदर्श ठेवला होता हे समजणे हे सर्वस्वी चुकीचे आहे. अशा प्रकारचा अर्थ काढण्याला मनुस्मृतीत काहीही आधार नाही.

हे निर्बंध घालण्याचा मनूचा उद्देश समजून घ्यावयास असेल तर दोन गोष्टी ध्यानी घ्याव्या लागतील. पहली गोष्ट मनूने ब्राह्मणांना समाजव्यवस्थेत जे स्थान दिले त्याचा व दुसरी म्हणजे या निर्बंधाच्या स्वरुपाचा विचार करावा लागेल. मनूने समाजव्यवस्थेत ब्राह्मणांना दिलेले स्थान (सर्वश्रेष्ठ) अगदी स्पष्ट शब्दांत ग्रंथित केले आहे. ही गोष्ट महत्त्वाची असल्याने पूर्वी उद्धृत केलेले श्लोक मी पुन्हा देत आहे.

१.९३. ब्राह्मण हा ब्रहयाच्या मुखातून निर्माण झाला असल्याने, प्रथम जन्माला आला असल्याने, तो वेद जाणत असल्याने, तो सर्व चराचर सृष्टीचा स्वामी आहे.

४.२. ब्राह्मणाने अशी उपजीविकेची साधने वापरावीत की ज्यामुळे दुसऱ्याला वेदना (त्रास) होणार नाही वा कमीत कमी वेदना (त्रास) होतील व संकटात नसेल त्यावेळी त्याने हीच उपजीविकेची साधने वापरावीत.

४.३. आपल्या फक्त उपजीविकेसाठी त्याने त्याच्या वर्गासाठी ठरवून दिलेल्या निर्दोष व्यवसायाच्या द्वारा आपल्या शरीराला अधिक कष्ट न देता मालमत्ता जमवावी.

८.३३७. चोरीच्या बाबतीत शुद्राचा गुन्हा आठपट, वैश्याचा सोळापट आणि क्षत्रियाचा बत्तीसपट समजावा.

८.३३८. ब्राह्मणाचा गुन्हा चौसष्टपट समजावा किंवा शंभरपट या चौसष्टपटीचा दुप्पट समजावा.

८.३८३. जर ब्राह्मणाने इतर दोन वर्णांच्या संरक्षित स्त्रीशी संभोग केला तर १ हजार पण दंड करावा. शुद्राच्या संरक्षित स्त्रीशी जर हा गुन्हा केला तर क्षत्रिय व वैशाला एक हजार पण दंड करावा.

८.३८४. क्षत्रियांच्या असंरक्षित स्त्रीशी संभोग केला तर वैश्याला पाचशे पण, हाच गुन्हा क्षत्रियाने केला तर त्याची गाढवाच्या मुताने हजामत करून तिकाच दंडही करावा.

८.३८५. ब्राह्मणाने जर असंरक्षित क्षत्रिय, वैश्य वा शूद्र स्त्रीशी सामगम केला तर त्याला पाचशे पण दंड करावा. परंतु अतिशुद्र स्त्रीशी समागम केला तर त्याला एक हजार  पण दंड करावा.

ब्राह्मणांवरील हे निर्बंध त्याला समाजात जे स्थान मनूने दिले त्याच्या पार्श्वभुमीवर पाहिले, तर या निर्बंधाचा उद्देश ब्राह्मणाला दुःख व्हावे वा त्याचा छळ व्हावा यासाठी नाही हे उघड होते. याउलट ज्या उच्चतम स्थानावर मनूने ब्राह्मणाला बसविले आहे, त्या स्थानापासून त्याचे पतन होऊ नये व तो अब्राह्मणांच्या दृष्टीतून उतरु नये यासाठी हे निर्बंध आहेत हे लक्षात येते.

मनुस्मृतीतील इतर तरतुदीवरुन मनूचा उद्देश ब्राह्मणांना गरीब व निराधार बनवावे हा नव्हता हे स्पष्ट होते. या संदर्भात मनुस्मृतीतील ब्राह्मण संकटात असेल तर त्याने कसे वर्तन करावे? या नियमांना वाचावे.

१०.८०. अनेक व्यवसायातील ब्राह्मणांसाठी योग्य व्यवसाय, वेद शिकविणे, क्षत्रियांसाठी लोकांचे संरक्षण करणे व वैश्यासाठी व्यापार करणे हा आहे.

१०.८१. परंतु वर उल्लेखिलेला व्यवसाय करून जर ब्राह्मणांची उपजीविका होत नसेल तर त्याने क्षत्रियासाठी सांगितलेले व्यवसाय करावे, कारण क्षत्रिय हे दर्जाने त्याच्या खालोखाल आहेत.

१०.८२. या दोन्ही प्रकारच्या व्यवसायापासून जर त्याचे पोषण होऊ शकत नसेल तर क्राय करावे, या प्रश्नाचे उत्तर त्याने वैश्याचा व्यवसाय करावा. त्याने शेती वा गुरे राखण्याचे काम करावे हे आहे.

१०.८३. पण ब्राह्मण व क्षत्रिय यांनी वैश्यांचा व्यवसाय करतांना त्यांनी शेती करण्याचे काळजीपूर्वक टाळावे कारण त्यामुळे अनेक प्राण्यांना हानी पोहोचते व तो व्यवसाय दुसऱ्यावर अवलंबून आहे.

१०.८४. काहीजण असे म्हणतात की शेती व्यवसाय हा सर्वांत उत्तम आहे. परंतु सदाचारी माणसे उपजीविकेचे हे साधन सदोष मानतात. कारण लोखंडाचा फाळ असणारे लाकडी अवजार (नांगर) धरणीला आणि जमिनीत राहणाऱ्या सजीवांना हानी पोहोचवितात.

१०.८५. परंतु जर एखाद्याने अन्य उपजीविकेचे साधन नसल्याने आपल्या कर्तव्याबाबत निर्बंध पाळले नाही, त्याने आणखी संपत्ती वाढविण्यासाठी वैश्य विकतात त्या वस्तू विकाव्यात. फक्त त्यात खालील अपवाद करावेत.

ब्राह्मणांवर जे निर्बंध घातले आहेत ते तो त्याच्यासाठी सांगितलेल्या व्यवसायात त्याची भरभराट होत आहे, तोपर्यंतच लादलेले आहेत. त्याच्यावर संकट आले व त्याचे हाल होऊ लागले की, त्याला कोणताही व्यवसाय करण्याची परवानगी आहे व कोणताही व्यवसाय केला तरी तो आपले ब्राह्मणत्व गमावत नाही व आपण आपत्तीत आहेत की नाही हे ठरविण्याचा हक्क ब्राह्मणाला स्वतःलाच आहे. त्यामुळे भरभराटीत असलेल्या ब्राह्मणालाही इतर व्यवसाय करून आपल्या उत्पन्नात भर घालण्यावर बंधन नाही. फक्त त्याने आपल्या मनाशी आपण आपत्तीत आहोत असे समजून घेतले पाहिजे.

मनुस्मृतीत ब्राह्मणांना भौतिक फायदे मिळवून देणाऱ्या आणखीही इतर तरतुदी आहेत. त्या दक्षिणा आणि दानाच्या स्वरुपात आहेत. धार्मिक समारंभाचे पौरोहित्य केल्याबद्दल मिळणारे शुल्क म्हणजे दक्षिणा. ब्राह्मणशाहीत भरपूर धार्मिक कर्मकांडे आणि समारंभ आहेत. ब्राह्मणाला उत्पन्नाचे हे केवढे मोठे साधन आहे याची कल्पना करणे कठिन नाही. पुरोहिताचे शुल्क बुडण्याची शक्यता नव्हती. कारण दक्षिनेला जे धार्मिक महत्व देण्यात आले होते. त्यामुळे दक्षिणा नियमित मिळू शकत असे. परंतु तरीही मनूने ब्राह्मणांनाही फी वसूल करण्याचा हक्क मिळवून दिला आहे.

११.३८. ब्राह्मण जर श्रीमंत असूनही अम्न्यधेय (प्रजापतीस पवित्र असणारा घोडा) करण्यासाठी दक्षिणा देणार नाही, तर तो ज्याने पवित्र होम केलाच नाही त्याचा बरोबरीचा समजावा.

११. ३९ ज्याची श्रद्धा आहे व ज्याचा आपल्या इंद्रियांवर ताबा आहे अशा माणसाने अनेक सदाचार केले, तरी त्याने यज्ञासाठी ठरवून दिलेल्या दक्षिणेपेक्षा कमी दक्षिणा देऊ नये.

११.४०. जर यज्ञात फार थोडी दक्षिणा दिली तर इंद्रिये (स्पर्श आणि कृती करणारी), सन्मान, स्वर्गसुख, दीर्घायुष्य, मुले, गुरे आदी या सर्वांचा नाश होतो आणि म्हणून त्यांचे उत्पन्न कमी आहे त्याने (श्रौत) यज्ञ करु नये.

आपली दक्षिणा वसूल करण्यासाठी पुरोहिताने काहीही केले तरी तो कायद्याने गुन्हा समजू नये. या मर्यादेपर्यंत मनू ब्राह्मणाच्या हितरक्षणाबाबत गेला आहे.

८.३४९. ब्राह्मणाने स्वतःच्या संरक्षणासाठी, पुरोहिताच्या दक्षिणेसाठी,

स्त्रियांच्या व ब्राह्मणांच्या संरक्षणासाठी जर संघर्ष केला व त्यासाठी जर त्यात कुणाला ठार केले तर ते पाप समजले जात नाहीत.

दानाची तरतूद हेच ब्राह्मणांच्या उत्पन्नाचे मोठे साधन असते. मनूने, राजाने ब्राह्मणांना दान केले पाहिजे असा आदेश दिला आहे.

७.७९. राजाने विविध (श्रौत) यज्ञाच्या वेळी उदारपणे दक्षिणा वाटावी आणि पुण्य संपादनासाठी ब्राह्मणांना संपत्ती आणि सुख द्यावे.

७.८२. जे ब्राह्मण वेदांचे अध्ययन करून गुरुच्या गृहातून परत आले आहेत, अशा ब्राह्मणांचा राजाने सत्कार करावा. या वेळी ब्राह्मणांना जो पैसा दिला जाईल तो राजाचा अविनाशी खजिना होय असे मी जाहीर करतो.

७.८३. चोर किंवा शत्रू तो घेऊ शकणार नाहीत. तो हरवू शकणार नाही आणि म्हणून राजाने हे अविनाशी धन ब्राह्मणांकडे सोपवावे.

९.४. वेदाचे शिक्षण ज्याने घेतले आहे अशा ब्राह्मणांना राजाने यज्ञासाठी योग्य ती सर्व प्रकारची रत्ने आणि देणग्या द्याव्यात.

**मनूने राजाला दिलेले हे आदेश ब्राह्मणांची पोकळ आशा राहिली नाहीत. या आदेशांचा ब्राह्मणांनी पुरेपुर फायदा घेतला हे भूगर्भ शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या राजपत्रांच्या संख्येवरुन स्पष्ट होते. याप्रकारे राजांना ब्राह्मणांनी मुर्ख बनवून धूर्त, आळशी आणि निष्क्रिय ब्राह्मणांना गावेच्या गावे दान देण्यास कसे प्रवृत्त केले, हे एक आश्चर्य आहे. आधुनिक काळात ब्राह्मणांकडे जी संपत्ती आहे त्यातील बहुतांश धार्मिक पण मुर्ख राजांना धर्मू ब्राह्मणांनी फसवून मिळविलेली आहे. मनूने केवळ राजांनाच दानाचे आदेश देऊन त्यांना ब्राह्मणांची शिकार बनविले नाही, तर दानाच्या संदर्भात सर्वसामान्य माणसांनाही लुबाडण्याची संधी त्याने ब्राह्मणांना दिली. मनूने हे तीन प्रकार केले. प्रथमतः ब्राह्मणांना देणग्या वा दान देणे हे माणसाचे पवित्र कर्तव्य आहे असे त्याने सांगितले आणि ब्राह्मणाला दिलेले दान सर्वात उच्च प्रकारचे दान आहे असे नमूद केले.**

७.८५. जो ब्राह्मण नाही त्याला दान दिले तर सर्वसाधारण पुण्य लागते. जो आपल्याला ब्राह्मण म्हणवून घेतो त्याला दान दिले तर त्याच्या दुप्पट पुण्य मिळते. व्यासंगी ब्राह्मणाला दान दिले तर एक लक्षपट पट पुण्य मिळते. ज्याला वेद माहीत आहेत त्याला मिळणाऱ्या पुण्याला अंत नाही.

७.८६. दान घेणाऱ्याच्या खास गुणानुसार आणि दान देणाऱ्याच्या श्रद्धेनुसार त्यांना पुढील जीवनात लहान वा मोठे बक्षीस मिळते.

दुसऱ्या एका ठिकाणी मनूने काही परिस्थितीत ब्राह्मणांना दान देणे हे सक्तीचे आहे असे प्रतिपादिले आहे.

११.१. संतती लाभावी म्हणून जो इच्छा करतो; जो यज्ञ करण्याची इच्छा

करतो; प्रवासी, जो आपली सर्व मालमत्ता देऊन टाकलो; तो आपल्या गुरुसाठी आपल्या पित्यासाठी, आईसाठी वेद-अध्ययन करणारा विद्यार्थी म्हणून किंवा आजारी माणूस म्हणून भीक (दान) मागतो.

११.२. या नऊ प्रकारच्या ब्राह्मणांना स्नातक असे संबोधावे, जे पवित्र कायद्याच्या अंमलबजावणीसाठी दान मागतात, अशा गरीब माणसांना त्यांच्या ज्ञानाच्या प्रमाणात दान द्यावे.

११.३ द्विजामधील सर्वोत्तम अशा या ब्राह्मणांना अन्न आणि बक्षिसे (पैशाची) द्यावीत. ब्राह्मणांशिवाय इतरांना यज्ञाच्या परिसराबाहेर अन्न आणि बक्षिसे द्यावी असा आदेश आहे.

११.६. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार वेदाध्ययन आणि एकटे राहणाऱ्या ब्राह्मणांना संपत्ती द्यावी असे केल्याने त्यांना मृत्यूनंतर स्वर्गसुख मिळेल.

दानाचे नियम हे ब्रह्मणांना सुरक्षितता आणि स्थिर उत्पन्न मिळावे, यासाठी मनूने जी पद्धती स्वीकारली ती अत्यंत चतुरपणाची होती. मनूने दानाला तपस्येशी जोडले. मनूच्या योजनेत अयोग्य कृती हे पाप मानले जाते किंवा ते पाप आणि गुन्हा दोन्ही होऊ शकते. पाप म्हणून त्याची शिक्षा धर्मशास्त्राच्या कायद्यानुसार मिळते. गैरवर्तणुकीला मनूने पातक असे म्हटले आहे. या पातकाची शिक्षा तपस्या ही आहे. मनूच्या योजनेनुसार प्रत्येक पापाच्या निरसनासाठी तपस्या करणे आवश्यक आहे.

११.४४. जो माणूस नेमून दिलेली कामे करीत नाही किंवा दोषास्पद वर्तन करतो किंवा शारीरिक सुखाच्या मागे लागतो त्याने तपस्या केली पाहिजे.

११.४५. अजाणतेपणी झालेल्या पापाबद्दल सर्व ऋषींनी तपस्येची शिक्षा सांगितली आहे. वैदिक वाङ्मयाच्या पुराव्यावरून जाणीवपूर्वक केलेल्या गुन्ह्यासाठीही तपस्येचा उपाय सांगितलेला आहे.

११.४६. अजाणतेपणाने केलेले पाप वेदांचे पठणाने धुऊन निघते. परंतु जी पापे माणसे जाणीवपुर्वक करतात त्यासाठी खास तपस्या सांगितल्या आहेत.

११.५३. याप्रमाणे गुन्ह्यातील जे शिल्लक राहते (तपस्या न केल्यास) त्यामुळे पुढील जन्मात माणसे वेडसर, मुकी, आंधळी, बहिरी किंवा विकृत असलेली बनतात. अशा सर्व माणसांचा सदाचारी लोक तिरस्कार करतात.

११.५४. आणि म्हणून शुद्धिकरण तपस्या करणे हे अत्यंत आवश्यक आहे. कारण ज्यांची पापे धुऊन निघाली नाहीत त्यांनी पुढील जन्म तिरस्कणीय लक्षणांनी युक्त असा होतो.

तपस्येचे अनेक प्रकार मनूने सांगितले आहेत. जे ते जाणून घेण्यास उत्सुक आहेत त्यांनी मनुस्मृतीत ते वाचावेत. महत्वाची नोंद करण्यासारखी गोष्ट ही की या सर्व प्रकारच्या तपस्यांत ब्राह्मणांना भौतिक फायदा मिळेल अशी सोय केली आहे. काही तपस्यांचे स्वरुप ब्राह्मणांना दान देणे एवढेच आहे. इतर तपस्यांसाठी धार्मिक

विधी सांगितलेले आहेत. परंतु धार्मिक कृत्ये करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे आणि धार्मिक कृत्यांनंतर ब्राह्मणाला दक्षिणा द्यावी लागते. याप्रमाणे दानाची पद्धती ही ब्राह्मणांना उपकारक आहे.

यामुळे मनूने ब्राह्मणांच्या समोर नम्रता, दारिद्र्य आणि सेवा यांचा आदर्श ठेवला होता असे म्हणणे हास्यास्पद आहे. ब्राह्मण मनूला या दृष्टीने कधीच समजले नाही. आपणाला विशेष हक्क असणारा वर्ग म्हणून स्थान दिलेले आहे असेच खरोखर त्यांना वाटते. तो केवळ एवढेच समजत नाहीत तर आपल्याला जे हक्क मिळाले आहेत, त्याचा इतर दिशांनीही विस्तार करण्याचा प्रयत्न त्यांने केला आहे. त्याबाबत आपण नंतर चर्चा करु. ब्राह्मणांने हे मत न्याय्यच होते. कारण मनूने ब्राह्मणांना या जगाचे स्वामी म्हणून संबोधिले होते आणि तसे कायम राहतील अशी कायद्याची रचना केली होती.

या प्रकारे ब्राह्मणी सत्ता आणि ब्राह्मणी प्रभुत्व राहावे यासाठी संपूर्णपणे तरतूद केल्यानंतर मनूने आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजात परिवर्तन घडवून आणण्याच्या कामास सुरुवात केली.

वर्गाचे जातीय रुपांतर करण्याचे अत्यंत प्रचंड आणि स्वार्थी कार्य करण्यात ब्राह्मणशाहीच्या विजयानंतर मनू अग्रक्रमाने गुंतला होता. ब्राह्मणशाहीने हे परिवर्तन घडविण्यासाठी काय काय केले याची नोंद सापडलेली नाही. याउलट वर्ण आणि जातीच्या संबंधीच्या विचारात खूप गोंधळ आहे. काही जणांच्या मते वर्ण आणि जात हे एकच आहे. जे वर्ण आणि जात वेगवेगळे आहे असे समजतात, त्यांना त्या वेळी सामाजिक व्यवस्थेत आंतरवर्णीय विवाहांना बंदी आली, त्यावेळी वर्णाचे रुपांतर जातीत झाले असे वाटते. हे चुकीचे आहे आणि या चुकीचे कारण मनुने वर्णांचे जातीय रुपांतर करताना आपले उद्दिष्ट काय आणि उद्दिष्टानुरुप साधने कोणती याचा कोठेही खुलासा केला नाही.

एखादी गोष्ट समजणे म्हणजे आपले स्वरुप दुसऱ्याला समजणे ठरते असे ऑस्कर वाइल्डने म्हटले आहे. मनूला यात सापडावयाचे नव्हते. आणि म्हणून त्याने आपली उद्दिष्टे आणि साधने याबाबत स्तब्धता पाळली आणि त्याबाबत लोकांना तर्क लढविण्यास मोकळे ठेवले. हिंदूच्यासाठी हा विषय अतिशय महत्वाचा आहे. याचा खुलासा करून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. मनूच्या उद्दिष्टांबाबत आणि साधनांबाबत विविध लोकांनी केलेली निरनिराळी मीमांसा गोंधळ निर्माण करते. ब्राह्मणशाहीने वर्णाला समाजाचा पाया असे संबोधून मूळच्या कल्पनेला ब्राह्मणशाहीने कसे चुकीचे आणि विघातक स्वरुप दिले यावर प्रकाश पडावाआणि मनूच्या उद्दिष्टांबाबत गोधंळ समजावा म्हणून असा खुलासा आवश्यक आहे.

मी म्हटल्याप्रमाणे मनूच मार्ग हे मूकपणाचे आणि भूमिगत असल्यासारखे आहेत. आणि त्यामुळे वर्णाचे जातीत रुपांतर कसे झाले याचा कालक्रमानुसार इतिहास

देणे अशक्य आहे. परंतु सुदैवाने हा बदल कसा घडून आला याच्या निदर्शक काही खुणा आपल्याला सापडतात.

हा बदल कसा घडून आला याबाबत चर्चा करण्यापूर्वी वर्ण आणि जात यामधील फरकाबाबत जो गोंधळ आहे तो दूर करणे आवश्यक आहे. वर्ण आणि जात हे कायदेशीरदृष्ट्या समान वाटतात. या दोन्हींत दर्जा आणि व्यवसाय यांचा समावेश आहे. वर्णात आणि जातीत, दोन्हींमध्ये दर्जाआणि व्यवसाय यांच्या कल्पना समाविष्ट आहेत. परंतु वर्ण आणि जात याच्यात एका बाबतीत महत्वाचा फरक आहे. वर्ण हा वंशपरंपरागत नाही. माणसाचा दर्जा आणि व्यवसाय हे वर्णामध्ये वंशपरंपरागत असत नाहीत. परंतु जाती व्यवस्थेत दर्जा आणि व्यवसाय हे वंशपरंपरागत असतात आणि ते पित्याकडून पुत्राकडे येतात.

**ब्राह्मणशाहीने वर्णांचे रुपांतर जातीत केले याचा अर्थ दर्जा व व्यवसाय हे वंशपरंपरागत करण्यात आले असा आहे.**

**हा बदल कसा करण्यात आला. हा बदल घडवून आणण्यासाठी काय केले, यांच्या पाऊलखुणा शिल्लक ठेवल्या नाहीत. परंतु हे कसे केले असावे याचे काही टप्पे इतिहासात आढळून येतात.**

**हा बदल टप्प्याटप्प्याने करण्यात आला. १) पहिल्या टप्प्यावर वर्णांचा म्हणजेच दर्जा व व्यवसायाचा काळ माणसाला ठरवून देण्यात आला. २) त्यानंतर माणसाचा वर्ण व त्याचा व्यवसाय व दर्जा त्याचा आयुष्यापुरता ठरविण्यात आला. ३) त्यानंतरची पायरी माणसाचा वर्ण, दर्जा व व्यवसाय वंशपरांपरागत करणे ही होती. कायद्याच्या भाषेत बोलवयाचे तर सुरूवातीला वर्णाने दिलेले इस्टेट ही काही काळापुरती होती. नंतर ती आयुष्यभर झाली व त्यानंतर इस्टेट वारसांना मिळू लागली. म्हणजेच वर्णांचे रूपांतर जातीत झाले. वर्णांचे रूपांतर या टप्प्यांनी झाले ह्या गोष्टींचा भरपूर पुरावा धार्मिक साहित्यात नोंदलेल्या परंपरात मिळतो. या परंपरा अगदी खऱ्या म्हणून स्वीकारण्यास काही हरकत नाही. या परंपरेप्रमाणे माणसाचा वर्ण ठरविण्याचे काम मनू व सप्तर्षी करीत असत. सर्व जनतेतून मनू जे क्षत्रिय व वैश्य होण्यास लायक आहेत त्यांना निवडीत असे व सप्तर्षी जे ब्राह्मण होण्यास लायक आहेत त्यांना निवडीत असे. मनू आणि सप्तर्षी यांनी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांची निवड केल्यानंतर जे जे शिल्लक राहात, त्यांना शुद्र समजण्यात येई. हे निवडलेले वर्ण एका युगासाठी असत. (युग म्हणजे चार वर्षे) प्रत्येक चार वर्षानंतर नवे अधिकारी या कामासाठी नेमण्यात येत. त्यांना नावे मात्र ऋषी व सप्तर्षी अशीच दिली जात. एकदा जे पूर्वी शुद्र म्हणून शिल्लक राहिले होते त्यापैकी काहींना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य म्हणून निवडण्यात आले होते. त्यांच्यापैकी काही निवडले न गेल्याने शुद्र म्हणुन**

शिल्लक राहिले होते. त्यापैकी काही ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य म्हणून निवड़ण्यात आले होते. त्यांच्यापैकी काही निवडले न गेल्याने शुद्र म्हणुन शिल्लक राहिले. याप्रकारे व्यक्तीचे वर्णाचे वर्ण बदलले गेले. एक प्रकारे व्यक्तीच्या बौद्धीक, शारीरिक क्षमतेनुसार व प्रवृत्तीनुसार केलेल्या निवडीत वर्णांची सरमिसळ व बदल होत असे व त्यांना समाज जीवनाला आवश्यक ते व्यवसाय देण्यात येत. ज्यावेळी वर्णातील ही सरमिसळ होत असे त्याला मन्वंतर असे म्हणत. या शब्दाचा दुसरा अर्थ मनूने केलेले बदल असा होतो. 'मन्वंतर' या शब्दाचा दुसरा अर्थ व्यक्तीला तितक्या काळासाठी वर्ण बहाल करण्यात येई तो काळ असाही होता. मन्वंतर अर्थाच्या दृष्टिने अत्यंत समृद्ध आहे आणि त्यात वर्णपद्धतीचे महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक दोन आहेत. पहिली गोष्ट ही की व्यक्तीचा वर्ण मनू व सप्तर्षी या स्वतंत्र अधिकाऱ्यांचा द्वारा ठरविला जाई. त्याचप्रमाणे वर्ण हा निश्चित काळापुरता असे व त्यानंतर त्यात मनू व सप्तर्षी बदल करीत. पुराणात नमूद केलेल्या प्राचीन परंपरेप्रमाणे हा काळ चार वर्षाचा असे. त्याला युग असे म्हणत. चार वर्षांचे हे युग संपल्यानंतर मन्वंतर होई आणि वर्णांच्या यादीत फेरफार व पुनर्रचना होई. या पुनर्रचनेत काहींचा जुना वर्ण बदले. काहींचा पुर्वीचाच वर्ण कायम राही. काहींना वर्ण नाहीसा होई व काहींना वरचा वर्ण मिळे.

मूळच्या वर्णपद्धतीत प्रौढांना वर्ण ठरविण्याचा विचार होतो तो पूर्वीचा प्रशिक्षणाशी किंवा पूर्वग्रह वा प्रवृत्तीशी आधारलेला नव्हता. एखाद्या मूलाखत घेणाऱ्या मंडळप्रमाणे मनू व सप्तर्षी हे होते. आणि मुलाखतीत त्यांच्याबद्दल जे मत होई त्यांवरुन त्याचा वर्ण ठरविला जाई वर्णांचा हा निर्णय ओबडधोबड व अस्ताव्यस्तपणे घेतला जाई यानंतर ही पद्धत असे संबोधले आहे. शिक्षकाने म्हणजेच आचार्याने काढलेली शाळा म्हणजे गुरूकुल. सर्व मुले या गुरूकुलात शिकण्यासाठी जात. हे शिक्षण बारा वर्षे दिले जाई. गुरूकुलात असणाऱ्या विद्यार्थ्यांना ब्रह्मचारी असे म्हणत. शिक्षणाची बारा वर्षे संपल्यानंतर गुरुकुलाचे आचार्य उपनयन विधी करीत. उपनयन विधी हा अत्यंत महत्त्वाचा समारंभ असे, या उपनयन विधीच्या वेळी आचार्य मुलाला त्याचा वर्ण (निवडीत) देत. आणि त्या वर्णांची कर्तव्ये करण्यासाठी त्याला खुल्या जगात पाठवीत. मनू व सप्तर्षी यांनी वर्ण प्रदान करण्याऐवजी, आचार्यांने निर्णय करण्याची नवी पद्धती अंमलात आली. त्यात जुन्या पद्धतीतील तत्त्व कायम ठेवण्यात आले व त्यात वर्ण ठरविण्यापूर्वी प्रशिक्षण व्यक्तीचा विकास करू शकते आणि वर्णाबाबत निर्णयाची सुरक्षित पद्धत विद्यार्थ्यांचे व्यक्तित्त्व, त्याची क्षमता आणि प्रवृत्ती समजून घेणे हीच आहे. त्यामुळे वर्ण निर्णयाची नवी पद्धतही फार मोठी

**सुधारणा मानावी लागेल. आचार्य गुरूकुल पद्धतीत वर्णाच्या काळापुरता होता. तो आता पूर्ण आयुष्यासाठी प्रदान करण्यात येऊ लागला. परंतु वंशपरांपरागत नव्हता.**

ब्राह्मणशाही या पद्धतीवर नाराज होती, हे उघड आहे. या नाराजीचे कारण स्पष्ट होते. कारण या पद्धतीत आचार्य ब्राह्मणाच्या मुलाला शुद्र वर्णही देण्याचा धोका होता. हे टाळणे ब्राह्मणशाहीला अत्यावश्यक वाटते. त्यांना वंशपरंपरागत हवा होता. वर्ण हा वंशपरंपरागत झाला तरच ब्राह्मणांची मुले शुद्र म्हणून जाहीर देण्याचे टळले असते. हे ध्येय साधण्यासाठी ब्राह्मणशाहीने अत्यंत धारिष्ट्य दाखवून वर्ण वंशपरंपरागत केले.

## ब्राह्मणवाद आणि जातीची निर्मिती.
## वर्णांचे जातीत रूपांतराची प्रक्रिया

ब्राह्मणशाहीचे मुलाचा वर्ण ठरविण्याच्या पद्धतीत तीन मुलभूत बदल केले. पहिली गोष्ट ही की मुलांना प्रशिक्षण देणारी आणि प्रशिक्षणानंतर मुलांचा वर्ण ठरविणारी गुरुकुल पद्धती त्यांनी बंद केली. मनूला गुरूकुल पद्धतीची पूर्ण माहिती होती. तो "गुरूवास" चा उल्लेख करतो. (गुरूच्या हाताखाली गुरूकुलात राहाणे आणि प्रशिक्षण घेणे) परंतु उपनयन संदर्भात तो गुरूचा वा गुरूकुलाचा उल्लेखही करीत नाही. उपनयन विधिच्या संदर्भात त्याने दुरूनही गुरूचा उल्लेख केला नाही. गुरूच्या जागी मनूने मुलाच्या उपनयनाचा विधी करण्याची जबाबदारी त्याच्या पित्यावर पितृगृही टाकली. या विधीत गुरु, वर्णाची पदवी विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार देत असे आणि मग दिलेल्या वर्णाचा कर्तव्ये त्यांना सांगितली जात असत. मनूच्या कायद्यात उपनयनाच्या संस्काराचा अर्थ आणि उद्दिष्ट्ये संपूर्णपणे बदलण्यात आली.

तिसरी गोष्ट अशी की उपनयन आणि प्रशिक्षण यांचा क्रम उलटा करण्यात आला. उपनयन प्रशिक्षणाच्या आधी सुरू झाले. मुलाला गुरूकडे प्रशिक्षणासाठी उपनयनाच्या नंतर, म्हणजे पित्यापासून त्याला वर्ण प्राप्त झाल्यानंतर पाठवावे असा मनूचा आदेश आहे.

**ब्राह्मणशाहीत उपनयन करण्याचा अधिकार गुरूऐवजी पित्याला देण्यात आला हा सर्वात महत्त्वाचा बदल आहे. कारण पित्याला हा अधिकार दिल्या कारणाने पिता आपला स्वतःचा वर्ण मुलाला देऊ लागला. साहजिकच वर्णव्यवस्था वंशपरंपरागत झाली. याप्रमाणे वर्ण ठरविण्याचा अधिकार गुरूकडून काढून घेऊन आणि पित्याला देऊन ब्राह्मणशाहीने वर्णांचे रूपांतर जातीत केले.**

वर्णांचे रूपांतर जातीत होण्याचा प्रक्रियेची ही कथा आहे. वर्णांचे जातीत रूपांतर करण्याच्या या प्रक्रियेची मी पुनर्रचना केली आहे. यापूर्वी दिलेल्या कारणांमुळे

ती कदाचित सर्व तपशिलांसह अचूक नसेल. परंतु वर्णव्यवस्थेचे जातीत रूपांतर करण्याचे जे टप्पे आणि जो मार्ग मी यापूर्वीच्या चर्चेत सुचविला आहे, अशाच प्रकारचा असला पाहिजे याबाबत माझ्या मनात संशय नाही.

**वर्णांचे जातीत रूपांतर करण्याचा ब्राह्मशाहीचा हेतू काय असावा हे समजणे कठीण नाही. ब्राह्मणांना प्राचीन काळापासून जो उच्च दर्जा आणि जे हक्क प्राप्त झाले, ते प्रत्येक ब्राह्मणांना प्राचीन काळापासून जो उच्च दर्जा आणि जे हक्क प्राप्त झाले. ते प्रत्येक ब्राम्हणाला प्राचीन काळापासून जो उच्च दर्जा आणि त्यांच्या वारसांना प्राप्त व्हावे. त्यांच्या गुणाशी वा शैक्षणिक लायकीशी संबंध राहू नये हाच तो उद्देश होता. निराळ्या शब्दांत हा उद्देश सांगायचा तो हा की, आपल्या मुलांना, त्यांच्यातील काहींना जो श्रेष्ठ दर्जा प्रत्येक ब्राह्मणाला मिळावा, मग तो कितीही नीच कवडीमोलाचा असो. हा ब्राह्मणशाहीचा या परिवर्तनामागील उद्देश होता. सर्व ब्राह्मण जातीलाच कोणताही अपवाद न करता हे गौरवास्पद स्थान मिळावे असा प्रयत्न होता.**

ब्राह्मणशाहीचे हे उद्दिष्ट, मनूचे आदेश पाहिले तर स्पष्ट होते. मनूला हे माहीत होते की वर्ण वंशपरंपरागत केला की अगदी अज्ञानी ब्राह्मणालाही, व्यासंगी, विद्वान, ब्राह्मणांच्या बरोबरीने स्थान मिळेल. त्यामुळे अत्यंत विद्वान ब्राह्मणाइतका मान लोक त्याला देणार नाहीत अशी भीती मनूला होती. सर्व ब्राह्मणांना मान मिळावा हाच त्याचा उद्देश होता. मनू हा अज्ञानी ब्राह्मणांच्या संबंधी अगदी चिंतित होता आणि म्हणून त्याने मनुस्मृतीत अज्ञानी आणि नीच ब्राह्मणांचाही अपमान करु नये असा स्पष्ट इशारा दिला.

९.३१७. ब्राह्मण-मग तो विद्वान असो की अज्ञानी, फार शक्तिमान दैवत आहे. ज्याप्रमाणे अवनी संस्कारित (यज्ञासाठी पेटविलेला) असो की साधा असो ते शक्तिमान दैवत असते, त्याचप्रमाणे ब्राह्मणांचे आहे.

९.३१९. ब्राह्मण कितीही कनिष्ठ वा नीच व्यवसाय करीत असो, त्याला न चुकता मान दिला पाहिजे. कारण ती एक दैवी शक्ती आहे.

सर्व ब्राह्मणवर्गाला उदात्त करण्याचा उद्देश असता तर या इशाऱ्याची गरज नव्हती. या ठिकाणी दुर्गुण गुणांना त्यांचा योग्य मान देण्यास ढोंगीपणानेही तयार नाहीत. ब्राह्मण भ्रष्ट असला किंवा अज्ञानी असला तरी त्याची पूजा करण्याचा मनुच्या या उपदेशापेक्षा दुसरे कोणते नैतिक अधःपतन असू शकेल? वर्णाचे जातीत रुपांतर कसे झाले, हे आपण पाहिले. आता या बदलाचे परिणाम काय झाले ते पाहू.

## वर्णबदलाचे परिणाम

या बदलाचे आध्यात्मिक दृष्टिकोनातून इतके वाईट परिणाम झाले की त्यांचा समतोल बुद्धीने विचार करणेच अशक्य आहे. मनूच्या कायद्यानुसार पुरोहित बनलेल्या

ब्राह्मणांची आणि इंग्लंडच्या चर्चच्या क्लर्जी पदाच्या कायद्याची तुलना केली तर याचे परिणाम किती वाईट झाले हे स्पष्ट होईल. इंग्लंडमध्ये इतर नागरिकांप्रमाणेच क्लर्जी (इंग्लंडमधील पुरोहित) यांनाही सर्व फौजदारी कायदे लागू आहेत. परंतु याशिवाय त्याच्यावर चर्चच्या शिस्तीचीही बंधने आहेत. गुन्हेगारी कायद्यानुसार त्याची पात्रता नसतांना जर त्याने क्लर्जी म्हणून (धर्मोपदेश) काम केले; तर त्याला शिक्षा होऊ शकते. त्याचप्रमाणे चर्चच्या शिस्तीच्या कायद्यानुसार नैतिकदृष्ट्या हे कृत्य चुकीचे असल्याने अशा क्लर्जींना (धर्मोपदेशकाला) अपात्र म्हणून ठरविण्यात येते. हा गुन्हा म्हणून समजला जात नसला तरी नैनिकदृष्ट्या गैर समजले जाते. क्लर्जीवरील (धर्मोपदेशकावरील) हे दुहेरी नियंत्रण न्याय्य समजजले जाते. कारण जो क्लर्जी (धर्मोपदेशक) लोकांच्या आध्यात्मिक गरजा पूर्ण करतो, त्याला विद्वता आणि नैनिकतेची गरज असते असे मानण्यात येते. पण ब्राह्मणशाहीमध्ये ब्राह्मणच फक्त पुरोहित (धर्मोपदेशक) बनू शकतो, पण त्याला विद्वत्तेची किंवा नैनिकतेची आवश्यकता नसते. तरीही तो लोकांना आध्यात्मिक बाबतीत एकमेव मार्गदर्शक असतो. अशा प्रकारची मुभा ज्या धर्मात आहे, त्याच्या मुल्याबाबत काही भाष्य करण्याची गरज नाही.

१. धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून वर्णातून जातीत रूपांतर करण्याचा परिणाम हिंदुची प्रवृत्ती अत्यंत विकृत बनण्यात झाला. त्यामुळे गुणांबाबतचा अनादर व फक्त जन्माबाबत अदार निमार्ण झाला आहे.

२. एखादा माणूस जर उच्च कुलात जन्मलेला असेल तर त्याच्यात गुणात अभाव तर त्याच्यापेक्षा अधिक गुणसंपन्न असलेल्या परंतु नीच कुळात जन्म झालेल्या माणसापेक्षा तो श्रेष्ठ समजू लागला व नीच कुळातील उत्तम गुणांचा माणुस त्याच्यापेक्षा कनिष्ठ समजू लागला. ब्राह्मणशाहीत जन्मालाच फक्त विजय मिळाला. मग जन्मविरोधी वर्तन असो की गुणवत्तेपेक्षा विरोधी जन्म असो. गुणांना गुणांच्या द्वारे जिंकणे अशक्य आहे.

३. अप्रगतिकारक समाजाची निर्मिती होण्यास दुसरे कोणतेही इतके प्रभावी साधन नाही. ज्यात गुणांचे हक्क सरंजामी हक्कांच्या वेदीवर बळी दिले जातात.

४. ब्राह्मणशाहीच्या बौद्ध धम्मावरील विजयानंतर ब्राह्मणशाहीने केलेल्या अशा कृत्यांच्या यादीत तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ब्राह्मणांना ब्राह्मणेत्तर जनते पासून विभक्त करणे आणि ब्राह्मणेत्तर जनतेचे निरनिराळे उच्च-नीच सामाजिक स्तर निर्माण करून त्यांना परस्परांपासून दूर ठेवणे हे आहे.

पुष्यमित्राच्या ब्राम्हणी क्रांतीचा उद्देश बौद्ध काळात मागे पडलेल्या चातुर्वर्ण्याच्या प्राचीन सामाजिक व्यवस्थेचा पुनरूद्धार करणे हे होते. परंतु ब्राह्मणशाहीने ज्या वेळी बौद्ध धम्मावर विजय मिळविला, त्यावेळी मूळच्या चातुर्वर्ण्याचा सामाजिक व्यवस्थेचा पुनरूद्धार करणे एवढ्याने त्याचे समाधान झाले नाही. बुद्धपूर्व काळातील चातुर्वर्ण्य पद्धती लवचिक आणि खुली होती. याचे कारण व्रर्णव्यवस्थेचा

विवाहपद्धतीशी संबंध नव्हता. चातुर्वर्ण्याने चार वेगवेगळ्या वर्णांना मान्यता दिली असली तरी आंतरवर्णीय विवाहांना बंदी नव्हती. एका वर्णाचा पुरूष कायदेशीरपणे दुसऱ्या वर्णांच्या स्त्रीशी विवाह करू शकत असे. या मताला सिद्ध करणारी अनेक उदाहरणे आहेत. मी ज्या व्यक्ती प्रख्यात आणि सन्माननीय होत्या, ज्यांना हिंदू धर्मशास्त्रात नाव आणि कीर्ती आहे अशा व्यक्तींची खाली उदाहरणे दिली आहेत.

| अ.नं. | पती | त्याचा वर्ण | पत्नी | तिचा वर्ण |
|---|---|---|---|---|
| १. | शंतनु | क्षत्रिय | गंगा | शूद्र अनामिक |
| २. | शंतनु | क्षत्रिय | मत्स्यगंधा | शूद्र कोळी |
| ३. | पराशर | ब्राम्हण | मत्स्यगंधा | शूद्र कोळी |
| ४. | विश्वमित्र | क्षत्रिय | मेनका | अप्सरा |
| ५. | ययाती | क्षत्रिय | देवयानी | ब्राह्मण |
| ६. | ययाती | क्षत्रिय | शर्मिष्ठा | आसूरी (अनार्य) |
| ७. | जरात्कारू | ब्राह्मण | जरात्कारी | नाग (अनार्य) |

बुद्धपूर्व काळातील चातुर्वर्ण्य पद्धतीत समाजाचे चार विभागात विभाजन झाले. असले, तरी त्यात आंतरवर्णीय विवाहाला बंदी नव्हती, याबद्दल अजूनही कुणाला संशय असेल तर महान ब्राह्मण ऋषी व्यास यांच्या कुटुंबाचा वंशवृक्ष त्यांनी पाहावा :

व्यास वंशवृक्ष

वरूणमित्र + उर्वशी

वशिष्ठ + अक्षरमाला

शक्ती =

पराशर + मत्स्यगंधा

व्यास

ब्राह्मणशाहीने एखाद्या पशुप्रमाणे विविध वर्णांतील या आंतरवर्णीय विवाहावर हल्ला करून बंद केले. मनूने नवा कायदा केला. त्यात खालील तरतुदी होत्या.

१.१२. द्विजांचा पहिला विवाह त्यांच्या समान जातीच्याशीच करावा अशी शिफारस आहे.

२.१३. शुद्र स्त्री हीच शुद्राची पत्नी होऊ शकते.

३.१४. अगदी प्राचीन वाङ्मयातील शुद्र स्त्री ब्राह्मणाची किंवा क्षत्रियाची ते कितीही अडचणीत असले तरी पहिली स्त्री झाल्याचे उदाहरण नाही.

३.१५. ज्या द्विज व्यक्ती घोर चूक करून शुद्र स्त्रीशी विवाह करतील ते त्यांच्या कुटूंबाला आणि मुलाला शुद्र म्हणून अध:पतित करतील.

३.१६. अत्री आणि उताथ्याच्या मुलगा गौतम यांच्या आदेशाप्रमाणे जो शुद्र स्त्रीशी विवाह करतो तो जातीबाहेर टाकला जातो. शौनकाच्या आदेशाप्रमाणे

त्याला मुलगा झाला व भृगुच्या म्हणण्याप्रमाणे शुद्र स्त्रीबरोबर शूद्र स्त्रीपासून मुगला झाला तर तो जातीबाह्य ठरतो.

३.१७. जो ब्राह्मण शुद्र स्त्रीबरोबर शयन करतो तो मृत्यूनंतर नरकात जातो. तिच्यापासून जर त्याला मूल झाले तर त्याचे ब्राह्मणत्व नष्ट होते.

३.१८. मृतात्मे आणि देव यांच्या सन्मानासाठी धर्मकृत्ये करणारा माणूस जर शुद्र पत्नीच्या मदतीने त्याचे स्वागत करीत असेल तर त्याला स्वर्ग मिळणार नाही.

३.१९. जो शुद्र स्त्रीच्या ओठावरील ओलावा पितो, जो तिच्या श्वासोच्छ्वासाने कलंकित होतो, तिच्यापासून ज्याला मुलगा होतो त्याला मुक्ती मिळत नाही.

केवळ आंतरवर्णीय विवाहांना बंदी करून ब्राह्मणशाहीचे समाधान झाले नाही, तर त्यांना सहभोजनावरही बंदी घातली.

मनूने अन्नाबाबत काही निर्बंध घातले आहेत. त्यातील काही आरोग्यविषयक तर काही सामाजिक आहेत. सामाजिक निर्बंधाच्या बाबतीत खालील गोष्टींकडे लक्ष देणे उचित ठरेल.

४.२१८. राजाने दिलेल्या अन्नामुळे पौरुषत्व नष्ट होते, शुद्राने दिलेल्या अन्नामुळे स्वर्गीय तेज नष्ट होते, सोनाराने अन्न दिले तर जीवन नष्ट होते आणि चर्मकाराने अन्न दिले तर चांगले नाव नष्ट होते.

४.२१९. आचार्यांनी अन्न दिले आणि कनिष्ठ कारागिराने अन्न दिले तर मुले नष्ट होतात. धोब्याने अन्न दिले तर शारीरिक शक्ती नष्ट होते.

४.२२१. इतर सर्वांच्या बाबतीत क्रमाने त्यांच्या हाताने अन्न घेतले तर कातडी, हाडे, डोक्यावरील केस नाहीसे होतात.

४.२२२. जर अजाणतेपणी अशा एखाद्या माणसाच्या हाताचे अन्न गिळले तर तीन दिवस उपोषण करावे. परंतु असे अन्न जर जाणीवपूर्वक खाल्ले तर त्याने अशुद्ध वीर्य, माणसाची विष्ठा किंवा मूत्र चाखल्याप्रमाणे अत्यंत कठीण अशी तपस्या करावी.

ब्राह्मणशाहीने एखाद्या हिंस्त्र, पिसाळलेल्या पशूप्रमाणे आंतरवर्णीय विवाह आणि सहभोजन यांच्यावर बंदी घातली असे मी म्हटले, त्याबद्दल ज्यांना संशय असेल त्यांनी मनूची भाषा नीट वाचावी.

मनुने शुद्र स्त्रीबद्दल किती उबग आणारे उद्‌गार काढले आहेत ते पाहा. मनूने शुद्राकडून अन्न खाणे हे वीर्य वा मुत्राइतके अशुद्ध आहे, असे म्हटले आहे. या दोन कायद्यांमुळे जाती-व्यवस्था निर्माण झाली. आंतरवर्णीय विवाहांना आणि सहजीवनाला बंदी या दोन खांबांवर जाती-व्यवस्था उभी आहे. जाती-व्यवस्था आणि तिचे आंतरजातीय विवाह व सहभोजन यांच्यावरील बंदी यांचे संबंध साधन आणि साध्य असे आहेत. दुसऱ्या कोणत्याही साधनांनी जाती निर्मितीचे उद्देश साध्य

झाले नसते. जाती व्यवस्थेची निर्मिती ही साधने वापरण्यामागे ब्राह्मणशाहीचा उद्देश होता. आंतरजातीय विवाह व सहभोजन यावरील बंदी ब्राह्मणशाहीचा उद्देश होता. आंतरजातीय विवाह व सहभोजने यावरील बंदी ब्राह्मणशाहीने त्यासाठी वापरली. परंतु ब्राह्मणशाहीने समाजव्यवस्थेत आणखी बदल केले. हे बदल करण्यामागे ब्राह्मणशाहीचे उद्दिष्टे जर मी सुचविली ती असतील, तर एक गोष्ट स्पष्ट होते की, जाती-व्यवस्था कायम ठेवण्यासाठीही कोणतेही मार्ग, मग ते योग्य असोत की अयोग्य, नैतिक असोत की अनैतिक, स्वीकारण्यास ब्राह्मणशाहीने मागेपुढे पाहिले नाही असा निष्कर्ष निघतो.

मुलीच्या विवाहाबाबत आणि विधवांच्या जीवनाबाबत मनुस्मृतीत जी तरतूदी केली आहे, तिच्याशी याचा संदर्भ आहे.

मुलाच्या विवाहाबाबत मनूने काय आदेश दिले आहेत हे पाहू -

४.४. जो पिता मुलीचे लग्न योग्य वेळी करीत नाही तो कायम चिंतास्पद समजावा.

९.८८. समान जातीच्या सुंदर आणि प्रतिष्ठित मुलाशी पित्याने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे आपल्या कन्येचा विवाह करावा. मग ती वयात आली नसली तरी चालेल.

या नियमाप्रमाणे मुलगी वयात आली नसली, अगदी बालिका असली तरी तिचा विवाह करावा असे मनू सांगतो.

## विधवांबाबत

आता विधवांबाबत मनू काय आदेश देतो ते पाहू.

५.१५७. विधवेने आपल्या इच्छेनुसार स्वेच्छेने शुद्ध फुले, मुळे आणि फळे खाऊन आपले शरीर रोड करावे. परंतु कोणत्याही स्थितीत तिचा पती मृत्यू पावल्यानंतर तिने दुसऱ्या माणसाचे नावही उच्चारु नये.

५.१६१. परंतु विधवेने आपल्याला मूल व्हावे म्हणून पुनर्विवाह करून आपल्या पतीचा अपमान केला, तर ती खाली दिल्याप्रमाणे स्वतःचा अधःपात करते आणि स्वर्गातील पतीच्या स्थानावरील आपला हक्क गमावते.

५.१६२. आपल्या पतीच्या खेरीज इतरांपासून स्त्रीला झालेले मूल हीच तिची संतती समजली जात नाही. त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या स्त्रीपासून झालेले मूल हे त्या जनकाचे मूल असमजले जात नाही. सदाचारी स्त्रीने दुसरा विवाह केल्याचे कोठे लिहिलेले नाही.

स्त्रीवर विधवापण लादणारा हा नियम आहे. या ठिकाणी सतीचा सुद्धा उल्लेख करता येईल. विधवेने आपल्या पतीच्या चित्तेवर उडी घेऊन स्वतःच्या जीवनाचा

अंत करण्याच्या या प्रकाराबाबत मनूने मौन पाळले आहे.

मनू इतकाच ज्याचा अधिकार आहे त्या याज्ञवल्क्याने विधवेने स्वतंत्रपणे वा एकटे राहू नये असे म्हटले आहे.

८६. नवरा मृत्यू पावल्यानंतर स्त्रीने तिचा पिता, माता, बंधू, सासू किंवा मामा यांच्यापासून दूर राहू नये. नाही तर ती निर्देश पात्र होईल.

येथेही याज्ञवल्क्याने विधवेला सती जावे असे सुचविले नाही. परंतु मिताक्षर भाष्याचा लेखक विज्ञानेश्वर यांनी याज्ञवल्क्याच्या श्रुतीबाबत लिहिलेल्या भाष्यात या श्लोकावर भाष्य करताना म्हटले आहे :

विष्णुच्या लिखाणाप्रमाणे व्रतस्थ राहण्याचा पर्याय स्त्रीला दिला आहे. तिने एक तर ब्रह्मचर्य पाळावे किंवा चितेवर अरुढ व्हावे असा हा पर्याय आहे.

विज्ञानेश्वर यांनी, ''पतीबरोबर सती जाण्यात फार मोठे पुण्य आहे.'' असे आपले मत दिले आहे.

यावरुन सतीचा नियम कसा घालण्यात आला हे सहजगत्या आणि स्पष्टपणे समजते. मनूचा नियम विधवेने पुन्हा विवाह करु नये असा होता. पण विज्ञानेश्वराच्या निवेदनावरुन विष्णुस्मृतीच्या काळापासून मनूच्या या आदेशाचे विश्लेषण वेगळ्या प्रकारे होऊ लागले असे दिसते. मनूच्या नियमांच्या नव्या विश्लेषणाप्रमाणे विधवेपुढे दोन पर्याय ठेवले गेले. पहिला, पतीच्या चितेवर जळून जीव द्यावा किंवा दुसरा जर तसे करणार नसेल तर अविवाहित राहावे. परंतु हे विश्लेषण संपूर्ण चुकीचे आणि अगदी अनावश्यक आहे. कारण मनूचे शब्द अगदी स्पष्ट आहेत. परंतु ते कसेही असले तरी हे नवे विश्लेषण स्वीकारण्यात आले हे खरे आहे. विष्णुस्मृतीचा काळ तिसऱ्या व चौथ्या शतकातला आहे. यावरुन सतीचा नियम त्या काळापासून सुरू झाला असावा असा निष्कर्ष काढता येईल.

एक गोष्ट स्पष्ट आहे की हे नियम नवीन होते. मुलीने वयात येण्यापूर्वी विवाह करावा हा मनूचा नियम नवीन आहे. बुद्धपूर्व ब्राह्मणशाहीत मुलीचे विवाह हे ती वयात आल्यावर तर होत असतच. परंतु ती वयाने वाढल्यानंतरच होत असत. याचे अनेक पुरावे आहेत. त्याचप्रमाणे स्त्रीचा पती मृत्यू पावल्यानंतर तिने पुन्हा विवाह करु नये. हाही नवा नियम आहे. बुद्धपूर्व ब्राह्मणशाहीत विधवेच्या पुनर्विवाहाला परवानगी होती. संस्कृत भाषेत पुनर्भू (दुसरा विवाह केलेली स्त्री) असा शब्द आहे. ही वस्तुस्थिती आहे. या शब्दापासून बुद्धपूर्व ब्राह्मणशाहीत पुनर्विवाह हे सर्वसामान्य होते असे दिसून येते. सतीच्या बाबतीत ही प्रथा कशी सुरु झाली याचे उत्तर ती प्राचीन काळापासून होती याचा पुरावा आहे. त्यानंतर ही प्रथा बंद झाली होती. पुष्यमित्राच्या नेतृत्वाखालील ब्राह्मणशाहीने बौद्ध धम्मावरील विजय मिळविल्यानंतर मनूच्याही नंतर ती सुरु झाली असावी. प्रश्न असा निर्माण होतो की, विजयी ब्राह्मणशाहीने हे

बदल का केले? स्त्रियांनी वयात येण्यापूर्वी विवाह करावा, विधवेने पुन्हा लग्न करु नये, मृत पतीच्या चितेवर तिने स्वतःला जाळून घ्यावे हे बदल करून ब्राह्मणशाहीने काय साधले? याबद्दलचा खुलासा होत नाही. सी.व्ही. वैद्य यांनी हा खुलासा केला आहे की, हा नियम करण्याचे कारण मुलींनी बौद्ध धम्माच्या भिक्खुणी होऊ नये, यासाठी हा नियम केला होता. परंतु हा खुलासा माझे समाधान करीत नाही. श्री. वैद्य यांनी मनूचा दुसरा एक नियम विचारात घेतला नाही. विवाहाचे योग्य वय कोणते यासंबंधीचा हा नियम खाली दिल्याप्रमाणे आहे.

९.१४. ३० वर्षाच्या व्यक्तीने त्याला आवडणाऱ्या १२ वर्षाच्या मुलीशी लग्न करावे. किंवा २४ वर्षाच्या व्यक्तीने ८ वर्षाच्या मुलीशी लग्न करावे.

प्रश्न मनूने अल्पवयीन मुलीशी लग्न करण्याचा नियम का केला हा नसून त्याने वधू आणि वरात इतके अंतर असण्याला का मुभा दिली हा आहे.

श्री काणे यांनी सतीबाबत खुलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते यात काहीही नवीन नव्हते. प्राचीन काळात भारतात जगातील इतर भागांप्रमाणे ही प्रथा होती. या खुलाशानेही समाधान होत नाही. ही प्रथा भारताच्या बाहेर असली तरी भारताइतक्या प्रचंड प्रमाणात ही प्रथा पाळली जात नसे. दुसरी गोष्ट अशी की, प्राचीन काळात क्षत्रियांच्यामध्ये ही प्रथा असल्याचा पुरावा सापडतो, पण ती नष्ट झाल्यानंतर पुन्हा सुरु का करण्यात आली? किंवा ती सर्वत्रिक का नाही? काणे यांनी वारसा कायद्याशी सतीच्या प्रथेचा संबंध जोडला आहे तो मला पटण्यासारखा नाही. हिंदुच्या वारश्याचा कायदा बंगालमध्ये अस्तित्वात होता, त्याप्रमाणे स्त्रियांना मालमत्तेचा वारसाहक्क असे. पतीचे नातलग तिला मालमत्तेचा भाग द्यावा लागू नये म्हणून तीला सती जाण्यास मोठ्या प्रमाणात भाग पाडीत असत. हा खुलासा बंगालपुरता ठीक आहे. परंतु भारताच्या इतर भागात सतीची प्रथा कशी सुरु झाली आणि तिची अंमलबजावणी कशी झाली याचा खुलासा त्यामुळे होत नाही.

त्याचप्रमाणे विधवा पुनर्विवाहावरील बंदीचा खुलासा होत नाही. विधवेला अस्तित्वात असलेल्या प्रथेच्या विरुद्ध जाऊन पुनर्विवाहाला बंदी का घालण्यात आली? तिला दुःखी जीवन कंठण्यास का भाग पाडण्यात आले आणि तिला विद्रूप का करण्यात येत होते?

मुलींचा विवाह, तिच्यावर लादलेले वैधव्य आणि सतीप्रथा याबाबत माझा खुलासा वेगळा आहे. त्याला काही मुल्य असो की नसो, मी तो खाली दिला आहे.

जमातीबाहेर लग्नाऐवजी जमातीत लग्न करण्याच्या प्रथेचे प्रभुत्व याचा अर्थ जातीची निर्मिती असा आहे. परंतु हे सोपे काम नाही. समजा एका काल्पनिक गटाला आपले जातीत रुपांतर करावे असे वाटले तर जातीतच विवाह होण्यासाठी त्याला कोणती साधने वापरावी लागतील याचा विचार करु. या गटाला जर जातीच विवाह

करावे असे वाटत असेल तर केवळ बाहेरच्या जातीत आंतरजातीय विवाह करु नये असा औपचारिक नियम करून भागणार नाही. विशेषतः या गटात पूर्वी जातीबाहेर लग्न करण्याचा नियम असेल तर ते कठीण आहे. त्याचबरोबर जे गट परस्परांच्याजवळ राहतात. त्यांच्यात एक दुसऱ्यात समाविष्ट होण्याची वा विलीन होण्याची व एकजिनसी समाज निर्माण करण्याची प्रवृत्ती असते. या प्रवृत्तीला जातीच्या निर्मितीसाठी जर विरोध करावयाचा असेल तर, आपल्या जातीभोवती एक वर्तुळ करून त्याबाहेर विवाह होऊ न देणे आवश्यक ठरते.

परंतु अशाप्रकारे आपल्या जातीच्या वर्तुळाबाहेर विवाह करण्यास प्रतिबंध केल्यामुळे आतूनच असे काही प्रश्न निर्माण होतात की ज्यांना उत्तर सापडत नाही. प्रत्येक सर्वसामान्य गटात पुरुष आणि स्त्री यांचे प्रमाण बहुदा सारखे असते आणि बहुतेक ठिकाणी एकाच वयाच्या स्त्री-पुरुषांची संख्या सारखी असते. परंतु ही समानता प्रत्यक्ष समाजात नेहमी असतेच असे नाही. ज्या गटाला जाती-व्यवस्था निर्माण करावयाची आहे, त्यांच्या दृष्टीने पुरुष आणि स्त्रियांच्या संख्येतील समानता हेच अंतिम ध्येय ठरते. कारण त्याशिवाय जातीतच विवाह करणे शक्य होत नाही. दुसऱ्या शब्दात जातीच्या अंतर्गतच विवाह व्हावेत असे वाटत असेल तर जातीअंतर्गत विवाहाचा हक्क उपलब्ध असावा लागतो. नाही तर जातीच्या वर्तुळाबाहेर जाऊन कुणाशीही विवाह केले जातात. हे वैवाहिक हक्क जाती अंतर्गत देणे आवश्यक असले तर स्त्री-पुरुषांची संख्या सारखी असणे आवश्यक असते. ही स्त्री-पुरुष दोन्ही व्यक्तींची संख्या सारखी कायम ठेवणे जाती अंतर्गत विवाहासाठी अत्यावश्यक असते. ही समानता कायम राहावी लागते. त्यातील समानता बिघडली तर जातीअंतर्गत विवाहाची प्रथा मोडण्याचा धोका असतो. जाती व्यवस्थेतील ही समस्या सोडविण्यासाठी विवाहयोग्य पुरुष आणि स्त्री यांच्यातील विषमता सतत दूर करावी लागते. हा समतोल राखण्यासाठी पती आणि पत्नी बरोबरच मरणे आवश्यक असते. परंतु हे क्वचितच होते. पती हा आधी मेला तर एक अधिक स्त्री शिल्ल राहते. तिला काही करुन दूर करावे लागते. कारण तिने पुन्हा लग्न केले तर गटांतर्गत लग्नाचा नियम भंग पावतो...

त्याप्रमाणे जर पत्नीनंतर पुरुष जिवंत राहिला तर एक पुरुष अधिक होतो. या अधिक पुरुषाबाबत कितीही सहानुभूती असली तरी त्यालाही दूर करावे लागते. कारण नाही तर तो जातीबाहेर लग्न करेल आणि जातीअंतर्गत लग्नाची प्रथा मोडेल. याप्रमाणे जादा पुरुष आणि जादा स्त्री दोघेही जाती-व्यवस्थेला संकटच असते. त्यांची काळजी घ्यावी लागते. कारण त्यांना जातीअंतर्ग वर्तुळात योग्य जोडीदार मिळाला नाही (आणि तसे मिळण्याची शक्यता नसते. कारण विवाहाचे जोडे सारख्या स्त्री-पुरुष संस्थेमुळे पुरेसे असतात.) तर ते जातीच्या मर्यादेबाहेर जाऊन लग्न करतील

आणि जातीत बाहेरच्या माणसाची आयात करतील. आपल्या कल्पनेतील गटात जादा पुरुषाच्या आणि जादा स्त्रीबाबत विचार करु. तिची दोन प्रकारे व्यवस्था लावून जातीअंतर्गत विवाह सुरक्षित ठेवता येतील.

एक–तिने मृत पतीच्या बरोबर स्वत:ला जाळून घेऊन जातीच्या मार्गांतून दूर होणे, परंतु हा स्त्री–पुरुष संख्येतील विषमता नष्ट करण्याचा मार्ग व्यवहार्य नाही. काही बाबतीत तो यशस्वी होईल, काही बाबतीत होणार नाही. परिणामी जादा स्त्रीला नष्ट करण्याचा हा मार्ग सोपा वाटत असला तरी तो प्रत्यक्षात येणे कठीण आहे. परंतु जादा स्त्री (विधवा) जर गटातून नाहीशी झाली तर तिच्या अस्तित्वामुळे दोन धोके निर्माण होतात. एक तर ती जातीबाहेर लग्न करून जातीअंतर्गत लग्नाची प्रथा मोडेल. आणि नाही तर जाती अंतर्गत लग्न करून समाजातील विवाह वयातील स्त्रियांशी स्पर्धा करून त्यांची विवाहाची संधी घालवेल. याप्रमाणे अशी स्त्री ही समाजाला संकटासमान असते. आणि म्हणून तिच्या पतीच्या मृत्युनंतर तिला जाळता येत नसेल तर अन्य काही उपाय शोधला पाहिजे.

यावर दुसरा उपाय आयुष्यभर तिच्यावर वैधव्य लादणे हा आहे. जादा स्त्रीची समस्या सोडविण्याचा तिला जाळणे हा परिणामाच्या दृष्टीने लादलेल्या वैधव्यापेक्षा अधिक प्रभावी मार्ग आहे. विधवेला जाळल्यामुळे तिच्यापासून निर्माण होणारी तिन्ही संकटे टाळतात. ती मरण पावल्या कारणाने तिचे जातीबाहेर वा जातीअंतर्गत विवाह करण्याचा धोका टळतो. परंतु वैधव्य लादणे हे जाळण्यापेक्षा अधिक व्यवहार्य आहे. आणि तौलनिकदृष्ट्या अधिक मानवी असल्याने जाळण्यापेक्षा वा पुनर्विवाहापेक्षा ते अधिक योग्य ठरते. परंतु त्यामुळे गटाच्या नैतिकतेचा धोका निर्माण होतो. व्यक्तीच्या वैधव्यामुळे स्त्रीचे अस्तित्व शिल्लक राहते हे खरे, परंतु कायदेशीर पत्नी होण्याचा तिचा नैसर्गिक हक्क डावलला गेल्याने ती अनैतिक कृत्याकडे वळण्याचा संभव अधिक वाढतो. परंतु हे संकट टाळणे कठीण नाही. ज्यामुळे तिचा मोह अनावर होणार नाही अशा तऱ्हेने तिला विद्रुप करणे हा त्यावर उपाय आहे...

जादा पुरुषचा प्रश्न (विधुराचा) हा जात म्हणून राहणाऱ्या गटाच्या दृष्टीने जादा स्त्रीपेक्षा अधिक महत्वाचा आणि अधिक कठीण आहे. तो गटात प्रभावी असतो आणि स्त्री पुरुषात त्याची प्रतिष्ठा अधिक असते. पुरुषाच्या या स्त्रीपेक्षा पारंपारिक श्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे त्याची इच्छा नेहमीच विचारात घेतली जाते. परंतु स्त्री मात्र असमान प्रतिबंधाच्या धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक सर्व प्रकारच्या प्रतिबंधाला बळी पडते. पुरुष हा या सर्व प्रतिबंधाचा जनक असला तरी तो या

सर्वांपासून मुक्त राहतो. यामुळे जातीतील जादा स्त्रीवर ज्या प्रकारची वर्तणूक लादण्यात येते, त्या प्रकारची बंधने टाकले जात नाहीत...

स्त्रीप्रमाणे पुरुषाला पत्नीच्या बरोबर जाळणे दोन तऱ्हेने धोक्याचे असते. एक तर तो पुरुष आहे या एकाच कारणामुळे ते शक्य होत नाही आणि दुसरे म्हणजे एक धडधाकट पुरुश गेल्यामुळे जातीचे नुकसान होते. मग फक्त दोनच पर्याय शिल्लक राहतात की ज्याचा उपयोग सोयीस्करपणे करता येतो. मी सोयीस्करपणे म्हटले याचे कारण पुरुष हा गटाचा आधार असतो...

पुरुष हा गटाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी जाती अंतर्गत विवाह त्यापेक्षा अधिक महत्वाचे आहेत आणि त्यामुळे या दोन्ही समस्यांतून मार्ग काढताना दोन्ही उद्दिष्टे साध्य करावी लागतात. या परिस्थितीत त्याच्यावर विधवेप्रमाणे सर्व जीवन विधुर म्हणून काढण्याची सक्ती करणे वा त्याचे मन वळविणे हा एक मार्ग आहे. हा मार्ग फारसा कठीण नाही. कारण सक्ती नसली तरी काही लोक स्वतःवर ब्रह्मचर्य लादून घेतात किंवा अनेक वेळा संसारसुखाचा त्याग करून संन्यस्त जीवन कंठतात. परंतु मानवी स्वभाव लक्षात घेतला तर हे उत्तर प्रत्यक्षात येणे कठिण आहे. याउलट पुरुष जर गटातील घडामोडी सामील होणार असला तर या गटाच्या नैतिकतेला बहुदा धोका ठरतो. निराळ्या दृष्टीकोनातून पाहिले तर पुरुष ब्रह्मचर्य राखण्यात जरी यशस्वी झाला तरी ते समाजाच्या भौतिक प्रगतीच्या दृष्टीने फायद्याचे नसते. त्याने जर खरोखरच ब्रह्मचर्य पाळले आणि संसारसुखाचा त्याग केला तर तो जातीतील विवाह प्रथेच्या दृष्टीने किंवा जातीतील नैतिकतेच्या दृष्टीने संकट ठरणार नाही हे खरे आहे, परंतु संवादाच्या दृष्टीने तपस्वी ब्राह्मचारी राहणे आणि जाळणे हे जातीच्या भौतिक प्रगतीच्या दृष्टीने सारखेच आहे. सामाजिक जीवन समृद्धपणे जगण्यांच्या दृष्टीने जातीची संख्या ही विशिष्ट मर्यादित असावीच लागते. परंतु याची इच्छा करणे आणि ब्रह्मचर्य पाळण्यास लावणे ही गोष्ट रक्तस्त्राव करून क्षय बरा करण्यासारखी आहे...

जादा पुरुषावर ब्रह्मचर्य लादणे हे व्यावहारिकदृष्ट्या आणि तात्विकदृष्ट्या अपयशी ठरते. त्याने गृहस्थ म्हणून राहणे आवश्यक असते. परंतु त्याला जातीतच पत्नी मिळवून देणे ही एक समस्या असते. वरवर पाहता ते शक्य नसते. कारण पुरुष आणि स्त्री एका पुरुषास एक स्त्री या प्रमाणात असावे लागतात. कुणालाही दुसऱ्या लग्नाची संधी देणे शक्य नसते. कारण प्रत्येक समाजात जात ही खरी बंदिस्त असली तरी साधारणतः विवाहयोग्य पुरुषांना पुरेशा स्त्रिया उपलब्ध असतात. त्यामुळे जादा पुरुषाला पत्नी उपलब्ध करून द्यायची. तर ज्यांनी अजून विवाहाचे वय गाठले नाही अशा मुलींशी त्यांचा विवाह लावून त्याला गटात बंदिस्त करता येते. जादा पुरुषाच्या संदर्भात हेच सर्वात उत्तम उत्तर असून शकते. असे केले तर तो जातीत राहतो. जातीची संख्या तो बाहेर गेल्याने कमी होत नाही. त्याचप्रमाणे जातीअंतर्गत नीती आणि प्रथा

या दोन्हींच्या दृष्टीने ते योग्य ठरते...

**जातीतील स्त्री–पुरुषांच्या संख्येतील विषमता चार मार्गांनी टाळता येतो : १) स्त्रीला मृत पतीबरोबर जाळणे. २) स्त्रीवर सक्तीचे वैधव्य लादणे. ३) विधुरावर ब्रह्मचर्य लादणे, ४) त्याचा विवाह योग्य वयापेक्षा कमी वयाच्या मुलीशी लावणे. बालविवाह लावणे...**

मी वर म्हटल्याप्रमाणे विधवेला जाळणे किंवा विधुरावर विधुर राहण्याची सक्ती करणे या दोन्ही गोष्टी जातीतील जातीअंतर्गत विवाह प्रथा कायम राखण्याच्या दृष्टीने संशयास्पद उपयुक्तता असलेल्या आहेत. ही सर्व साधणे आहेत. परंतु साधने ही कोणते तरी साध्य साधण्याच्या दृष्टीने उपयोगात आणली जातात. मग या साधनाचे अंतिम उद्दिष्ट काय? या साधनामुळे जातीअंतर्गत किंवा गटांतर्गत विवाहाची निर्मिती आणि सातत्य कायम राहते. जात आणि जमातीअंतर्गत विवाह या दोन्ही गोष्टी एकच आहे, हे आतापर्यंत केलेल्या चिकित्सेमुळे आणि जातीच्या व्याख्येमुळे सिद्ध होते. याप्रमाणे या साधनांचे अस्तित्व म्हणजे जात आणि जातीत या साधनांचा अंतर्भाव असतो...

जाती–व्यवस्थेची सर्वसाधारण यंत्रणा या प्रकाराची असते असे माझे मत आहे. हिंदु समाजातील जातीचा आता आपण विचार करु. आणि त्यातील त्या यंत्रणेची पाहणी करु, जातीचा भूतकाळात शोध घेण्याच्या मार्गात अनेक अडचणी नाहीत असे मी म्हणून शकत नाही. जात ही भारतातील फार प्राचीन व्यवस्था आहे. विशेषतः लिखित आणि अचूक इतिहासाच्या नोंदीच्या अभावामुळे हे अधिक खरे ठरते. कारण हिंदुच्या दृष्टीने जग ही माया आहे आणि त्यामुळे इतिहास लिहिणे हा मूर्खपणा आहे. परंतु असे असले तरी संस्था जिवंत असतात आणि प्रदीर्घ काळ त्यांची नोंद झाली नाही तरी रितीभातीचे आणि नैतिकतेचे अवशेष त्यांची कथा सांगतात. हे जर खरे असेल तर हिंदुनी जादा पुरुष आणि जादा स्त्री यांचा प्रश्न कशा प्रकारे सोडविला याचा अभ्यास केला तर या प्रयत्नाला यश आल्याशिवाय राहणार नाही...

हिंदु समाज व्यवस्थेतील एकंदर कार्यपद्धती ही गुंतागुंतीची असली तरी वरवर पाहणाऱ्यालाही तीत रीतीभाती आढळून येतात...

१) सती–पतीच्या चितेवर पत्नीने जाळूण घेणे.

२) सक्तीचे वैधव्य – विधवेला पुर्नविवाह करु न देणे.

३) बालविवाह.

या बरोबरच संन्याशाचा गौरव. विधुराने संन्यास घ्यावा अशी प्रेरणा देण्याचा प्रयत्न हाही एक मार्ग आहे. पण तो पुरुषाच्या मानसिक अवस्थेवर अवलंबून आहे...

माझ्या माहितीप्रमाणे या रीतींचे मुळकाय याचे शास्त्रीय उत्तर अजून कोणी दिले नाही. या प्रथांना मान का होता यासंबंधी खूप तत्वज्ञान सांगितले गेले आहे. (सि.एफ.ए. के. कुमार स्वामी ''सती : पौर्वात्य स्त्रीचे संरक्षक'' ब्रिटिश

सोशिऑलॉजिकल रिव्ह्यु व्लॉल्युम - VI १९१३) कारण पती आणि पत्नी यांच्यातील शरीर यांच्या आत्मा याच्या अभंग ऐक्याचे प्रतीक आहे. उमेने सांगितल्याप्रमाणे तो पत्नीत्वाचा आदर्श आहे. ती म्हणते, ''पतीबाबत भक्ती हा स्त्रीचा उद्‌गार काढते, ''तू जर समाधानी नसशील तर मला स्वर्गाचीही इच्छा नाही.'' सक्तीच्या वैधव्याला प्रतिष्ठा कशी मिळाली हे मला माहीत नाही किंवा सक्तीच्या वैधव्याचा कुणी गौरव केला याची नोंद नाही. परंतु तरीही या प्रथेला असंख्य लोक चिकटून आहेत. डॉ. केतकरांनी बालविवाहाची माहिती अशी सांगितली आहे. ते म्हणतात, ''निष्ठावान पुरुष वा स्त्री यांनी जिच्याबरोबर व ज्याच्याबरोबर त्यांचा संयोग होतो, त्याखेरीज इतर पुरुषावर प्रेम करु नये. ही शुद्धता केवळ विवाहानंतरची नाही तर विवाहापूर्वीची आहे. कारण चारित्र्याचा आणि पावित्र्याचा तो खरा आदर्श आहे. ज्याच्याशी विवाह होतो त्या पुरुषावाचून इतर माणसाबाबत प्रेम वाटणाऱ्या कोणत्याही कुमारिकेला शुद्ध म्हणता येणार नाही. कोणत्या पुरुषाशी विवाह होणार हे तिला माहित नसल्याने तिने विवाहापूर्वी कोणत्याही पुरुषावर प्रेम करता कामा नये. तिने तसे केले तर ते पाप आहे. त्यामुळे तिच्यात वैषयिक जाणीव निर्माण होण्यापूर्वीच तिने कोणावर प्रेम केले पाहिजे हे तिला कळले पाहिजे म्हणून बालविवाह केला पाहिजे.

हे उच्च उदात्त भाषेतील चतुर तत्त्वज्ञान या प्रश्नांचा गौरव का करावा हे सांगते, परंतु त्याची अंमलबजावणी का होत होती हे सांगत नाही. माझ्या मते या प्रथांची अंमलबजावणी होत होती. म्हणूनच त्यांचा गौरव केला गेला. एखादी गोष्ट घडणे हे महत्वांचे असते आणि मग त्या कृतीची न्याय्यता सांगणारे तत्त्वज्ञान त्याच्याभोवती निर्माण होते.

अठराव्या शतकातील व्यक्तीवादाच्या उगमाशी ज्याचा परिचय आहे त्याला माझे विधान पटेल. याबरोबर या प्रथांचे उदात्तीकरण केले गेले, याचे कारण या प्रथांचे उदात्तीकरण करण्याची या प्रथांना गरज होती. या प्रथांची गरज काय होती या प्रश्नाचे उत्तर जातीच्या रचनेसाठी या प्रथा आवश्यक होत्या आणि या प्रथा लोकप्रिय करण्यासाठी त्यांच्या समर्थनार्थ तत्त्वज्ञानही आवश्यक होते. याप्रथा इतक्या घृणास्पद आणि सर्वसाधारण माणसाला धक्का देणाऱ्या होत्या की, त्यांच्यावर औषधी गोळ्यावर असते तसे गोड आवरण चढविणे आवश्यक होते. वास्तवात या प्रथा साधनांच्या स्वरुपात होत्या. परंतु ध्येय म्हणून त्यांना समाजात ठेवण्यात आले. त्यामुळे या प्रथांच्या परिणामाबाबत आपण आंधळे राहू नये (अज्ञानी राहू नये) या साधनांना आदर्श म्हणून समाजापुढे ठेवणे, त्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक होते असे आपण म्हणू. साधनांना साध्य म्हणून पुढे ठेवल्याने त्याचे खरे स्वरुप लपले जाते. याखेरीज इतर काही नुकसान होत नाही. वस्तुतः साधन म्हणूनही त्यांचे खरे स्वरुप नष्ट होत नाही. सर्व मांजरांना कुत्रा म्हणावे असा आपण कायदा करु शकतो,

परंतु त्यामुळे त्यांचे स्वभाव वा स्वरुप बदलत नाही. मांजरांचे कुत्रे होत नाही. याप्रमाणे साधनांना साध्य म्हटल्याने त्याचे स्वरुप पालटत नाही. सक्तीचे वैधव्य आणि बालविवाह या प्रथा मूलतः जादा पुरुष आणि जादा स्त्री यांची समस्या सोडविण्यासाठी व जातीअंतर्गत विवाह होण्यासाठी साधने म्हणून वापरली गेली. हे मी मांडलेले मत योग्य आहे. जातीअंतर्गत विवाहाशिवाय जात टिकत नाही आणि या प्रथांशिवाय जातीअंतर्गत विवाह यशस्वी होत नाहीत.

माझ्या मताप्रमाणे बालविवाह, सक्तीचे वैधव्य आणि सती या ब्राह्मणशाहीने आंतरजातीय विवाहावर बंदी घालून निर्माण केलेल्या प्रथा जाती–व्यवस्थेचा आधार म्हणून अंमलात आणल्या गेल्या. आंतरजातीय विवाह थांबविणे कठिण होते. प्रेमासाठी गरज म्हणून जातीबाहेर विवाह करून जातीच्या बाहेर लोक जाण्याचा संभव होता. ते टाळण्यासाठी ब्राह्मणशाहीने सर्व साधने वापरुन निरनिराळ्या जातीतील आंतरजातीय विवाह टाळायचे होते व त्यासाठी सर्व साधनांचा वापर केला हे संशयातीत आहे. ब्राह्मणशाहीच्या या इच्छेचे दुसरे उदाहरण मनूने जातीबाह्य करण्यासंबंधी जे नियम केले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

मनू म्हणतो की ज्याला जातीने वाळीत टाकले आहे त्याला जातीबाह्य समजावे. मनूच्या मताप्रमाणे जातीबाहेर असलेला माणूस हा प्रत्यक्ष मेलेला आहे असे समजून त्याच्याशी वागावे. अशा माणसाची उत्तरक्रिया करावी असे सांगून जातीबाह्य माणसाच्या उत्तरक्रियेची पद्धती त्याने सांगितलेली आहे :

११.१८३. जातीबाह्य केलेल्या माणसाच्या सपिंडानी आणि समानोदकांनी तो मृत असल्याप्रमाणे त्याला पाण्याचे अर्घ्य गावबाहेर अशुभ दिवशी संध्याकाळी त्याचे नातलग, पुरोहित आणि शिक्षकासमोर द्यावे.

११.१८४. स्त्री गुलामाने त्याच्या नावाने पाण्याचे भरलेले भांडे पायाने सांडावे. माणूस मेल्यानंतर तसे करतात. यानंतर त्याचे संपिंड आणि समानोदक एक दिवस आणि एक रात्र सुतक पाळतील.

मात्र मनूने जातीबाहेर असणाऱ्यांना प्रायश्चित देऊन पुन्हा जातीत परतण्यास मुभा दिली आहे. हे खालील नियमांवरुन स्पष्ट होईल.

११.१८७. त्याने प्रायश्चित घेतल्यानंतर ते पवित्र तीर्थस्थानी त्याच्याबरोबर स्नान करतील आणि पाण्याने भरलेले नवे पात्र फेकुण देतील.

११. १८८. तो पाण्याने भरलेले भांडे पाण्यात टाकील. घरात प्रवेश करील आणि पूर्वीप्रमाणे आपल्या नातलगाबाबत आपले कर्तव्य करील.

११.१८९. जातीबाह्य असलेल्या स्त्रीच्या बाबतीतही ते हाच नियम पाळतील, पण कपडे, अन्न व पाणी त्यांना देण्यात येईल आणि ते कुटूंब जिथे राहत असेल त्यांच्याजवळ राहतील परंतु जातीबाह्य माणसाला जर पश्चाताप झाला नसेल

तर त्याला मनूने शिक्षा सांगितली आहे. मनू त्यांना कुटूंबाच्या घरी राहण्यास प्रतिबंध करतो. मनू म्हणतो –

११.१८९. त्यांना (कुटुंबातील जातीबाह्य सदस्यांना) कपडे, अन्न, पाणी व पेय देण्यात येईल व ते कुटुंबाच्या घराच्या शेजारी राहतील.

३.९२. गृहस्थाने कुत्रे, जातीबाह्य, चांडाळ, पापाची शिक्षा म्हणून रोगगस्त असलेले, कावळे, जीवजंतू, यांच्यासाठी जमिनीवर हलक्या हाताने अन्न ठेवावे.

जातीबाह्य माणसाबरोबर सामाजिक संबंध ठेवणे हे पाप असल्याचे मनू सांगतो. तो स्नातकांना इशारा देतो...

४.२९. जातीबाह्य माणसाबरोबर राहू नका.

४.२१३. जातीबाह्य माणसाने दिलेले अन्न खाऊ नका.

गृहस्थासाठी मनू सांगतो...

३.१५१. गृहस्थाने त्यांना श्राद्धाला बोलावू नये.

३.१५७. जो माणूस आपल्या आईवडिलांना विसरतो. पुरेशा कारणाशिवाय शिक्षकाला विसरतो, जो वेदांच्या वा विवाहाच्या द्वारा जातीबाह्यांशी मैत्री करतो, त्याच्यावर जातीबाह्य संबंध ठेवल्याच्या गुन्ह्याबदल सामाजिक बहिष्कार टाकावा.

११.१८१. जो जातीबाह्य माणसाबरोबर एक वर्ष संबंध ठेवतो त्याला स्वतःला जातीबाहेर टाकावे. यज्ञात, वेदपठणात वा इतर संबंध जातीबाह्यांशी ठेवल्यामुळे माणूस आपल्या जातीला मुकतोच. परंतु त्याने जातीबाह्य माणसाबरोबर एकाच वाहनातून, एकाच आसनावर व एकाच ठिकाणी अन्न घेतल्यानेही तो दोषी ठरतो.

११.१८२. जो जातीबाह्य माणसांशी संबंध ठेवतो त्याने प्रायश्चित म्हणून दोषमुक्त होण्यासाठी पापी माणसाला सांगितलेले प्रायश्चित घ्यावे. जातीबाहेर टाकलेला जो माणूस जातींची पर्वा करणार नाही. आणि जातीबाह्य राहणे पत्करेल, त्याचे पुढील जन्मात काय होईल ते मनूने सांगितले आहे.

७.६०. ज्याने जातीबाह्य माणसाशी संबंध ठेवला असा माणूस पुढील जनमी ब्रम्हराक्षस होईल.

मनू जातीबाह्य माणसांना एवढ्यावर सोडण्यास तयार नव्हत्या. त्याने त्यांच्याविरूद्ध आणखी काही शिक्षा सांगितल्या, त्या अत्यंत तीव्र स्वरूपाच्या होत्या. जातीबाहेर टाकलेल्या माणसासाठी मनूने खालील शिक्षा सांगितलेल्या आहेत.

३.१५०. जे ब्राह्मण जातीबाह्य असतील, नास्तिक असतील ते ईश्वराला आणि मृतांत्म्यांना आहूती देण्यास अपात्र आहेत.

९.२०१. जातीबाह्य माणसाला वारस म्हणून संपत्तीचा वारसा मिळत नाही.

११.१८५. माणसाला जातीबाहेर टाकल्यानंतर (जातीबाह्यतेच्या माणसाचे संस्कार केल्यानंतर) त्याच्याशी कोणी संवाद करू नये. त्याच्याबरोबर बसू नये. त्याला

वारसाचा हिस्सा देऊ नये व माणसामाणसाशी असलेले संबंध त्याच्याशी ठेऊ नये.

११.१८६. जर जातीबाह्य टाकलेल्या सर्वात वडील तोच असेल तर वडील भावाचे त्याचे हक्क स्थगित करण्यात येतील. तसेच वडील मुलगा म्हणून मिळणारा जादा वाटा त्याला मिळणार नाही. त्याच्याऐवजी त्याचा धाकटा भाऊ, तो जर जातीतील सर्व नियम नीट पाळीत असेल तर त्यांच्या वडील भावाचा वाटा मिळू शकेल.

जातीबाह्य माणसाबाबत मनूचा कायदा हा असा आहे. त्याच्याबाबत शिक्षा ह्या अत्यंत कठोर आहेत हे स्पष्ट आहे. त्याला सर्व सामाजिक संबंधापासून तोडण्यात येते. सर्व प्रकारच्या सार्वजनिक समारंभातून त्याला वगळण्यात येते. कोणत्याही अधिकारास तो पात्र नसतो, तसेच त्याला मालमत्तेचा वारसाही मिळत नाही. या सर्व शिक्षामुळे जातीबाह्य माणूस हा मेल्यासारखा असतो. खरे तर मनू त्याला मेलेलाच समजतो.

आणि मृतात्म्यांना ज्या आहुती देतो त्या त्याच्या नावाने दिल्या जातात. जातीबाह्य माणसांशी जो संबंध ठेवता त्यालाही मनूने अशाच प्रकारची एकाकीपणाची आणि अपमानास्पद वागणूक सांगितली आहे. या शिक्षा केवळ जातीबाह्य पुरूषापुरत्या मर्यादित नाहीत. जातीबाह्य माणसापुरत्याच नाहीत किंवा त्या केवळ पुरूषापुरत्या मर्यादित नाहीत. जातीबाह्य व्यक्ती विरोधी कायदा हा स्त्री आणि पुरूषांना सारखाच आहे. इतकेच नव्हे तर त्यांची संततीही या शिक्षेला पात्र ठरते.

जातीबाह्य माणसाची जी मुले त्याला जातीबाहेर टाकण्यापूर्वी जन्माला आलेली असतात ती त्यांचा पिता मेला आहे असे समजून संपत्तीचे वारस बनतात. जातीबाहेर टाकल्यानंतर जर ती जन्मली असतील तर त्यांनाही शिक्षा लागू होते आणि तेही वारसाचा हक्क गमावतात. ती मुले जातीबाह्य समजली जातात.

मनुचे जातीबाह्य व्यक्तीबाबतचे हे कायदे न्याय आणि मानवतेला धरून नाहीत. काही जणांना असे वाटले की यामध्ये कुठे काही विसंगत नाही. कारण इतर धर्माच्या आचारसंहितेत ही नास्तिक आणि स्वधर्म त्याग करणाऱ्या माणसाविरूद्ध असेच कायदे आहेत. दुर्दैवाने ही गोष्ट खरी आहे. बौद्ध धम्म सोडला तर बाकी सर्व धर्मात त्याच्या आचारसंहितेशी चिकटून न राहणाऱ्याच्या संदर्भात वारसाच्या कायद्याच्या दुरूपयोग केलेला, आहे. खिश्चन धर्मातून ज्यूडाइझम स्वीकारलेले किंवा नास्तिकवाद वा इतर कोणत्याही धर्म स्वीकारण्याला सम्राट कॉन्स्टन्टाइन, सम्राट थिओलेसिएस आणि व्हॅलेटिनियस यांनी मृत्यूची शिक्षा सांगितली, जर अशा माणसांनी इतरांनाही विकृत बनविले तर त्यासाठीही हीच शिक्षा होती. इतर युरोपीय देशांतही खिश्चन धर्माची सक्ती करण्यासाठी याच प्रकारच्या शिक्षा अमंलात आणल्या.

अशा प्रकारच्या जातीबाह्य व्यक्तींबाबतच्या कायदा हा अनावश्यक आहे.

पहिली गोष्ट ही की, जातीबाह्यता ही ब्राह्मणशाहीची निर्मिती आहे. जाती–व्यवस्थेचाच तो एक, आवश्यक भाग आहे. ब्राह्मणशाहीने एकदा जाती–व्यवस्था राबविण्याचे ठरविल्यानंतर जातीबाह्यतेचा कायदा आवश्यक बनला. कारण जातीबाहेर जाणाऱ्यांना शिक्षा केली तरच जाती–व्यवस्था टिकून राहू शकते. दुसरी गोष्ट अशी की ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मातील स्वधर्म सोडणाऱ्याविरुद्धचा कायदा आणि ब्राह्मणशाहीतील जातीविषयक कायदा यात फरक आहे. ख्रिचन आणि मुस्लिम धमातील अपात्रतेचा कायदा हा ज्यांच्यात धार्मिक श्रद्धेचा अभाव आहे किंवा जे चुकीच्या धर्माचा प्रसार करतात त्यांच्यापुरता मर्यादित आहे. ब्राह्मणी अपात्रतेच्या कायद्याचा श्रद्धेशी वा श्रद्धेच्या अभावांशा काही संबंध नाही. त्याचा संबंध सामाजिक संघटनेच्या एका भागाच्या जातीच्या पावित्र्याशी आहे. जातीबाहेर पडणाऱ्याच्या बाबतीत या शिक्षा आहेत. हा फार महत्वाचा फरक आहे. ब्राह्मणी जातीबाह्य व्यक्तीबाबतचा कायदा आणि इतर धर्मातील धर्म त्याग करणाऱ्याबाबतचा कायदा याची तुलना केली तर ब्राह्मणशाहीत ईश्वरावरील श्रद्धा ही आवश्यक समजली जात नाही. सदाचाराने किंवा प्रेषितावर श्रद्धा ठेवल्याने मुक्ती मिळते ही कल्पनाही ब्राह्मणशाहीत आवश्यक मानली जात नाही. मात्र वेदाच्या पवित्रतेवरील विश्वास ही फक्त एकच श्रद्धा ब्राह्मणशाहीत आवश्यक समजली जाते. जाती–व्यवस्थेचा भंग हाच शिक्षापत्र ठरतो. इतर गोष्टींचा विचार केला तर त्याबाबत आक्षेप नाही.

**समाजाच्या एकात्मतेच्या या शक्तीबाबत जे अजाणते नाहीत त्यांना हे कबूल करावे लागेल की, ब्राह्मणशाहीने आंतरजातीय विवाह व भोजन यांना प्रतिबंध करून समाजाचे संपूर्ण विघटन केले आहे. ही सामाजिक ऐक्याची मृत्युघंटा आहे. एकत्रित कृतीला त्याने परिणामकारक प्रतिबंध झाला. ब्राह्मणशाहीने ब्राह्मणाविरुद्ध अब्राह्मण्यांनी एकत्रित कृती करून ब्राह्मणांचे वर्णस्व झुगारुन देऊ नये, यासाठी कसे प्रयत्न केले** ते मी यानंतर सांगणार आहे. यासाठीच ब्राह्मणशाहीने भारतीय समाजाचे या प्रकारे विघटन केले. परंतु विष देणाऱ्याच्या मूळच्या उद्दिष्टांची मर्यादा विष देणाऱ्याच्या तितकीच मर्यादित राहत नाही. जाती–व्यवस्थेबाबत नेमके हेच झाले आहे. ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणाविरुद्ध बंड करु नये या इच्छेने ब्राह्मणशाहीने त्यांना अपंग केले. परंतु त्यांनी राष्ट्र म्हणून परराष्ट्राविरुद्ध लढताना अपंग राहावे असा ब्राह्मणशाहीचा उद्देश नव्हता. परंतु जातीच्या विषामुळे ज्याप्रमाणे ब्राह्मणांच्या विरुद्ध कृतीस ब्राह्मणेत्तर अपंग झाले, त्याप्रमाणे ते परकियांच्या विरुद्ध अपंगच राहिले. वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की, जाती–व्यवस्थेमुळे राष्ट्रवादाच्या वाढीत फार मोठा अडथळा निर्माण झाला.

इतरांनी काही म्हटले तरी जाती–व्यवस्थेत काही वाईट आहे असे हिंदू म्हणणार नाहीत आणि एका दृष्टीने ते बरोबर आहे. एका कुटुंबातील सदस्यात प्रेम, एकी आणि

परस्परांना मदत करण्याची भावना असते. चोरातही परस्पर आदरांची भावना असते. आपल्या सदस्यांमध्ये दरोडेखोरांचेही समान समान हितसबंध असतात. दरोडे खोरांच्या होळीत बुधभावाची भावना असते. तसेच त्यांच्या उद्दिष्टांवर त्यांची तीव्र निष्ठा असते. मग ते इतर टोळ्यांच्या कितीही विरुद्ध असोत. याच तऱ्हेने आपण असेही म्हणू शकू की समाजात जी गौरवास्पद वैशिष्ट्ये असतात ती सर्व जातीमध्येही असतात.

जातीतील या गौरवास्पद वैशिष्ट्यांबाबत हिंदुनी खुशाल समाधान मानावे आणि जातीत काही बरे वाईट नाही असे समजावे. परंतु असे करतांना ते विसरतात की सामाजिक संघटनेचे जात हे एक आदर्श स्वरुप आहे, या सिद्धांताला पाठिंबा द्यावयाचा असेल तर प्रत्येक जात हा स्वतंत्र समाज आहे. राष्ट्राप्रमाणेच जात हेही एक स्वतंत्र साध्य आहे असे मानावे लागेल. परंतु जात हा हिंदू समाजाचा एक भाग आहे. आणि हिंदू समाजाच्या अंतर्गत जात आहे, हा विचार केला तर हा सिद्धांत कोसळल्याशिवाय राहात नाही.

वरील विचारानूसारही जाती-व्यवस्थेत काही वाईट आहे हे हिंदू मान्य करणार नाहीत. हिंदू धर्मावर जाती-व्यवस्था ही वाईट आहे असा आरोप करा, तो लचेग उत्तर देईल, "युरोपातील वर्णपद्धतीचे काय?" एका मर्यादेपर्यंत हे उत्तर चोख आहे. जगात कोठेही तत्त्वज्ञानी माणसाने सांगितलेला आदर्श समाज ज्यात आहे, परस्परांबद्दल सहानुभूती आहे, सार्वजनिक हिताबाबत निष्ठा आहे आणि समाजाच्या सर्वसाधारण भल्याची भावना आहे, असा समाज अस्तित्वात नाही. हिंदू जर असे म्हणाले की प्रत्येक समाजात परस्परांपासून वेगळी अशी कुटूंबे आणि वर्ग आहेत; परस्परांबद्दल संशय, जे बाहेर आहेत त्यांच्याबद्दल मत्सर, दरोडेखोरांचे जत्थे आणि टोळ्या, संकुचित गट, कामगार संघटना, कर्मचाऱ्यांचे संघ, कारागिरांचे संघ, व्यापाराचे संघ, राजकीय पक्ष हे सर्व समाजात आहेत. यापैकी काही जण समाजहितासाठी, काही जण लूट करण्यासाठी आणि काही जण लोकांची सेवा करण्याची इच्छा दाखवून त्यांचे शोषण करण्यासाठी एकत्र येतात.

वास्तवात सर्व ठिकाणी भूतकाळातील वा सांप्रत त्या समाजात एकसंघ समजाऐवजी विविध परस्पराविरुद्ध उद्दिष्टांसाठी बनलेल्या छोट्या-छोट्या गटांचा समाज बनलेला असतो. खरंच या युक्तीवादांच्या मागे हिंदू जाती-व्यवस्था आणि हिंदुशिवाय इतर वर्ग पद्धती हे समाज आहेत असे दाखवू शकत नाहीत. या विषयाबाबत जणू यापलिकडे सांगण्यासारखे काही नाही असे तो म्हणू शकत नाही. कारण हिंदुना या गोष्टीची दखल घेतली पाहिजे की प्रत्येक समाजात गट असले तरी काही गट हे असामाजिक असतात तर काही समाजातील गट हे समाजाविरोधी असतात. याबाबत जॉन डूई यांनी या फरकाच्या केलेल्या विवरणा इतकेच चांगले दुसरे विवरण नाही. त्यांच्या मताप्रमाणे हे गट परस्परांशी संबंद्ध आहेत की एकाकी आहेत यावर अवलंबून

आहे. जर त्यांच्यात परस्पर संवादी संबंध असतील तर ते केवळ असामाजिक ठरतील, परंतु ते परस्परांपासून पूर्णपणे विभक्त ठरतील. जर त्यांच्यात परस्परांना प्रतिसाद देण्याची भावना नसेल तर ते समाजाविरोधी ठरतील. याबाबत प्रा. डूई यांचे शब्दात –

"एकाकी आणि परस्परांशी संपूर्णपणे फटकून वागणाऱ्या टोळ्या वा गटात समाजविरोधी प्रवृत्ती निर्माण होते. ज्या ज्या ठिकाणी एका गटात स्वतःचा असा हितसंबंध असतो व त्यामुळे तो स्वतःला आपल्यापुरते बंदिस्त करतो व इतर गटांशी संबंध ठेवीत नाही. जो त्याच्याजवळ आहे त्याची फक्त साथ करतो. स्वतःच स्वतःची पुनर्रचना वा प्रगती व्यापक संबंधातून निर्माण करीत नाही, अशा गटात ही समाजविरोधी भावना निर्माण होते. अशा प्रकारची सर्वांपासून फटकून राहणारी राष्ट्रे असू शकतात, तसेच आपला इतर व्यापक जगाशी संबंध नाही अशा प्रकारे स्वतःत गुरफटत गेलेली कुटूंबेही असतात. घर आणि समाज यांच्यापासून माणसाला तोडणाऱ्या शाळा, श्रीमंत आणि गरीब, अशिक्षित आणि असुरक्षित अशी विभागणीही असते. सारांश अशा विभक्तपणाच्या भावनेतून एक प्रकारचा ताठरपणा आणि जीवनाची पोलादी चौकट निर्माण होते व असा गट स्थितीशील आणि स्वार्थी बनतो."

एखाद्या समाजात गट आहेत की तो समाज एकसंघ आहे असा प्रश्न विचारात घेण्याची गरज नाही, तर समाजातील विविध गटांत किती प्रमाणात सहकार्य आहे, परस्परांशी संवाद आहे, क्रिया–प्रतिक्रिया आहेत या प्रश्नांचे उत्तर शोधावे लागते. अशा गटात किती प्रमाणात विविध हितसंबंधाबाबत गटागटांत सहभाग असतो, त्यांच्यात किती प्रमाणात मुक्त देवाणघेवाण असते हे प्रश्न महत्वाचे असतात. कोणत्याही समाजात गट आहेत म्हणून त्याचा धिक्कार करणे योग्य नाही. जर समाजातील गट पूर्णपणे विभक्त, परस्परांशी फटकून वागणारे आणि स्वतःच्याच जीवनात गुरफटलेले असतील तर त्यांचा धिक्कार केला पाहिजे. कारण अशा एकाकी गटातूनच समाजविरोधी भावना निर्माण होते. आणि परस्पर सहकार्यातून ध्येय साधणे अशक्य बनते.

ब्राह्मणशाहीने वर्गाचे हे संपूर्णपणे विभक्तीकरण केले. त्यांनी आंतरजातीय विवाहांना आणि सहभोजनांना चार वर्गात बंदी करून ते साध्य केले. या प्रकरणाच्या सुरुवातीच्या भागात याबाबत चर्चा केली आहे. परंतु या निवेदनात एक गोष्ट राहून गेली आहे. मी असे म्हटले आहे की, वर्गपद्धतीत विवाहाचा काही संबंध नव्हता. निरनिराळ्या वर्णातील स्त्री–पुरुष एकमेकांशी विवाह करु शकतात आणि आंतरवर्ण विवाहाच्या आड कायदा येत नसे. असे विवाह सामाजिक नीतिमत्तेच्या विरोधी समजले जात नसत. सवर्ण विवाहाची त्या वेळी गरज भासत नसे आणि समाजही असे विवाह व्हावेत असे प्रतिपादीत असे. सर्व प्रकारचे विविध वर्णांतील विवाह कायदेशीर मानले जात असत. वर उच्च वर्णातील आहे की वधू नीच वर्णातील आहे अशा प्रकारचे

प्रश्न निर्माण केले जात नसत. प्रा. काणे यांनी म्हटल्याप्रमाणे अनुलोम आणि प्रतिलोम विवाहात भेद केला जात नसे. इतकेच नव्हे तर त्या काळात अनुलोम आणि प्रतिलोम हे शब्दच अस्तित्त्वात नव्हते. हे सवभेद ब्राह्मणशाहीने निर्माण केले. ब्राह्मणशाहीने प्रतिलोम विवाहांना (उच्च वर्णातील स्त्री आणि कनिष्ठ वर्णातील पुरुष यांचा विवाह) बंदी केली. वर्णावर्णातील संबंध संपविण्याच्या दिशेने ते पहिले पाऊल होते. आणि त्यातून परस्परांशी फटकून वागणे आणि समाजविरोधी प्रवृत्ती यांचा जन्म झाला. परंतु प्रतिलोम विवाहाचे (आंतरवर्णीय विवाहाचे) दरवाजे बंद झाले तरी अनुलोम विवाहाचे दरवाजे बंद झाले नाहीत. **अनुलोम विवाह म्हणजे उच्च वर्णाचा पुरुष आणि कनिष्ठ वर्णाची स्त्री यांच्यातील विवाह.** याचा उल्लेख मी उतरत्या श्रेणीच्या जाती-व्यवस्थेच्या चर्चेत केला आहे. अनुलोम पद्धतीच्या विवाहांना परवागनी दिल्यामुळे वर्णावर्णात संपूर्ण विभक्तीकरण झाले नाही, पण तिथेही ब्राह्मणशाहीने घृणास्पद युक्ती काढली. ही युक्ती किती घृणास्पद होती हे पाहण्यासाठी मुलांच्या दर्जा ठरविण्याबाबतचे नियम काय होते हे पाहणे आवश्यक आहे. अगदी प्राचीन काळापासून मुलांचा दर्जा ठरवितांना त्याला पित्याचा वर्ण दिला जाई. अगदी प्राचीन काळापासून मुलांचा दर्जा ठरवितांना त्याला पितयाचा वर्ण दिला जाई. आईचा वर्ण महत्वाचा समजला जात नसे. खालील उदाहरणे ही गोष्ट स्पष्ट करतात.

| पित्याचे नांव | पित्याचा वर्ण | आईचे नांव | आईचा वर्ण | मुलाचे नांव | मुलाचा वर्ण |
|---|---|---|---|---|---|
| शंतनू | क्षत्रिय | गंगा | शूद्र (अनामिका) | भीष्म | क्षत्रिय |
| शंतनू | क्षत्रिय | मत्स्यगंधा | शूद्र (कोळी) | विचित्रविर्य | क्षत्रिय |
| पाराशर | ब्राह्मण | मत्स्यगंधा | शूद्र | कृष्णद्वैपायन | ब्राह्मण |
| विश्वमित्र | क्षत्रिय | शर्मिष्ठा | असुरी | द्रृत्य | क्षत्रिय |
| जरत्कारु | ब्राह्मण | जरत्कारी | नाग (अनार्य) | असिता | ब्राह्मण |

या नियमाला पितृसवर्ण्य असे म्हणत. या पितृसवर्ण्य नियमाचा परिणाम अनुलाम-प्रतिलोम विवाह पद्धतीवर काय झाला हे पाहणे योग्य होईल. प्रतिलोम विवाहावर याचा झालेला परिणाम असा की, उच्च वर्णाच्या स्त्रीची मुले त्यामुळे कनिष्ठ वर्णाच्या पातळीवर ओढली गेली. अनुलोम विवाहावर याचा अगदी विरुद्ध परिणाम झाला. या विवाहात कनिष्ठ वर्णाच्या आईची मुले त्यांच्या पित्याच्या वरच्या वर्णाच्या पातळीवर आली.

मनूने प्रतिलोम विवाह थांबविले आणि त्यामुळे उच्च जातीच्या मातेची मुले पित्याच्या कनिष्ठ वर्णाच्या पातळीवर येण्याचे बंद झाले. हे कितीही दुःखदायक असले तरी जोपर्यंत अनुलोम विवाहपद्धती व पितृसवर्ण्य पद्धती कायम होती. तोपर्यंत फार काही बिघडले नाही. अनुलोम विवाहाने वर्णावर्णातील संबंध कायम राहिले. आणि

पितृसवर्ण्य नियमामुळे उच्च वर्णात सामील होण्याचे थांबले नाही. ब्राह्मणशाहीला वर्णावर्णातील संबंधाची ही दारे उघडली ठेवायची नव्हती. ती बंद व्हावीत असा त्यांनी प्रयत्न केला, परंतु हे त्यांनी अत्यंत दुष्कीर्ती होईल अशा पद्धतीने केले. याबाबत अनुलोम विवाह पद्धती बंद करणे हा सरळ मार्ग होता. परंतु ब्राह्मणशाहीने ते केले नाही. त्यांनी अनुलोम विवाह पद्धती कायम ठेवली. परंतु मुलांचा दर्जा ठरविण्याचे नियम बदलले. त्यांनी पितृसवर्ण्य नियमांच्या जागी मातृसवर्ण्य पद्धती सुरु केली. आणि त्यानुसा आईचा वर्ण मुलाला देण्याचा नियम केला. या बदलामुळे जाती-जातीतील आपापसातील संबंध संपले. आणि केवळ कनिष्ठ वर्णाच्या मातेपासून मुले झाली. या कारणाने या मुलांची जबाबदारी टाळणे वरिष्ठ वर्णांना शक्य झाले. त्यामुळे अनुलोम विवाह हा केवळ वैषयिक संबंध राहिला. कनिष्ठ वर्णाचा हा अपमान आणि एक प्रकारे हेटाळणी होती. याउलट यामुळे वरच्या वर्णातील लोकांना कनिष्ठ वर्णातील स्त्रियांशी कायदेशीरपणे व्याभिचार करणे शक्य झाले. त्याचमुळे सामाजिकदृष्ट्या वर्णावर्णातील संबंध नष्ट होऊन वर्णाचे पूर्ण विभक्तीकरण झाले आणि तो हिंदु धर्माला शाप ठरला.

हे सर्व असूनही सनातनी हिंदू हे जाती-व्यवस्था ही आदर्श पद्धती समजजात. परंतु सनातनी हिंदुनाच कशाला नावे ठेवावी, समजणारे विद्वान राजकीय पुढारी आणि इतिहासकार जाती-व्यवस्था ही राष्ट्रीयतेच्या आड येते या आक्षेपाचा अत्यंत जोरदारपणे इन्कार करतात. **भारत हे एक राष्ट्र आहे तसे ते समजतात. आणि भारतीय राष्ट्र याऐवजी भारताची जनता असे कोणी म्हटले तर त्यांना राग येतो. त्यांची ही भावना समजण्यासारखी आहे. बहुतांश राजकारणी आणि इतिहासकार हे ब्राह्मण आहेत. आणि त्यामुळे आपल्या पूर्वजांनी केलेली दुष्कृत्ये आणि त्यांनी पाडलेल्या वाईट प्रथा उघड्यावर आणण्याचे धैर्य त्यांच्यात नाही. कुणालाही विचारा, "भारत हे राष्ट्र आहे का?"** आणि ते एकाच सुरात "होय" असे म्हणतील. असे म्हणण्याची कारणे विचारा. ते सांगतील एक तर भौगोलिकदृष्ट्या या देश एकात्म असल्याने भारत हे राष्ट्र आहे आणि दूसरी गोष्ट सांस्कृतिकदृष्ट्या या राष्ट्रात मुलभूत एकात्मता आहे. हे सर्व वादासाठी मान्य केले तरीही या सर्व संदर्भावरुन भारत हे एक राष्ट्र आहे असा निष्कर्ष काढणे म्हणजे भ्रमाला उत्तेजन देण्यासारखे आहे. कारण राष्ट्र म्हणजे काय? कारण राष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिकदृष्ट्या कितीही एकात्म असलेला प्रदेश नव्हे. राष्ट्र म्हणजे केवळ समान भाषा, समान धर्म, समान वंश यातून निर्माण झालेल्या समान संस्कृतीचे लोक नव्हते. दुसऱ्या जागी यापूर्वी मी जे लिहून ठेवले आहे त्याचा पुनरुच्चार करायचा तर, राष्ट्रीयता ही एक आत्मनिष्ठ मानसिकता आहे. ही एक अशी भावना आहे की ज्यात सर्वांच्या मध्ये सामुहिक एकतेची भावना असते आणि त्यामुळे आपण सर्व आप्तसंबंधी

आहोत असे त्यांना वाटते. ही राष्ट्रीय भावना दुहेरी स्वरुपाची असते. एका बाजूला यात बंधुत्वाची, आपलेपणाची भावना असते व दुसरीकडे जे आपले नाहीत त्यांच्याबाबत बंधुत्वाच्या भावनेचा विरोध आढळून येतो. आपल्या स्वतःच्या गटात राहण्याची इच्छा आणि दुसऱ्या गटात न जाण्याची इच्छा त्यात असते. आणि जे आपल्या गटाच्या बाहेर आहेत त्यांच्याशी संबंध न बाळगण्याची इच्छाही त्यात असते. राष्ट्रीयत्वाचा आणि राष्ट्रीय भावनेचा गाभा आहे. स्वतःच्या गटातील लोकातच राहण्याची इच्छा ही एक मानसिक, आत्मकेंद्रीत अवस्था आहे. या भावनेचा भूगोलाशी, संस्कृतीशी, आर्थिक प्रश्नांची वा सामाजिक संघर्षाशी काही संबंध नसतो. भौगोलिक एकात्मता असूनही या भावनेचा अभाव असू शकतो आणि भौगोलिक एकात्मता नसतांनाही ही भावना अत्यंत प्रबळ असू शकते. सांस्कृतिक एकता असूनही या भावनेचा अभाव असू शकतो आणि आर्थिक व वर्गीय संघर्ष असूनही आपण या गटाचे आहोत, या राष्ट्राचे आहोत ही भावना प्रखर होऊ शकते. मुख्य मुद्दा असा की, राष्ट्रीयता हा केवळ भुगोल, संस्कृती यांच्याशीच संबंध असलेला प्रश्न नाही.

वैदिक पद्धतीच्या उतरत्या काळात शुद्र आणि स्त्रियां यांना अत्यंत कनिष्ठ स्थान प्राप्त झाले होते. बौद्ध धम्माच्या वाढत्या लाटेत या दोघांच्या दर्जात फार मोठा बदल झाला. **थोडक्यात सांगावयाचे तर बुद्ध राजवटीत शूद्रांना मालमत्ता करण्याचा, अध्ययन करण्याचा हक्क प्राप्त झाला आणि ते राजेही होऊ शकत.** इतकेच नव्हे तर वैदिक राजवटीत जे ब्राह्मणांचे सामाजिक स्थान होते. तेही प्राप्त करण्याचा त्याला हक्क मिळाला. वैदिक राजवटीत ब्राह्मणाचा जो दर्जा होता तोच दर्जा बौद्ध धम्मात भिक्खूचा होता. दोन्ही धर्मव्यवस्थेत आपापल्या धर्मात त्यांचे स्थान आणि दर्जा एकाच पातळीवर मिळाला होता. परंतु शुद्राला वैदिक काळात ब्राह्मण होण्याची कधीच आशा नव्हती, परंतु भिक्खू होऊन तो ब्राह्मणाचे स्थान आणि दर्जा मिळवू शकत होता. वैदिक व्यवस्थेत ब्राह्मण बनण्याची दारे शूद्राला बंद होती. परंतु बौद्ध धम्मात त्यांनी भिक्खू बनून ब्राह्मणाच्या तोडीचे होता येऊ लागले. याच प्रकारचा बदल स्त्रियांच्या बाबतीतही झाला. बौद्ध राजवटीत स्त्री मुक्त झाली. विवाहाने ती गुलाम बनणे बंद झाले. कारण बुद्ध धम्मातील नियमाप्रमाणे विवाह हा एक करार होता. बौद्ध राजवटीत स्त्रीही मालमत्ता मिळू शकत होती, ती शिक्षण घेऊ शकत होती आणि सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट ही की, बौद्धव्यवस्थेत भिक्खुणी बनून तिला ब्राह्मणाचे स्थान आणि दर्जा मिळू शकत होता. शूद्र आणि स्त्रियांचा दर्जा वाढविण्याबाबत बौद्ध धम्मात सिद्धांत इतका परिणामकारक झाला की बौद्ध धम्माचे शत्रू या धर्माला शूद्रांचा धर्म असे म्हणू लागले.

हे सर्व ब्राह्मणांना न पचण्यासारखे, न रुजण्यासारखे होते. बौद्ध धम्माच्या शिकवणीतून शूद्र आणि स्त्रिया यांच्यात किती क्रांतीकारक परिवर्तन झाले आणि

ब्राह्मणांना ही गोष्ट किती प्रक्षोभक वाटली याची साक्ष ब्राह्मणशाहीच्या विजयानंतर त्यांनी शूद्र आणि स्त्रियांना मिळालेल्या उच्च स्थानावरुन त्यांना खाली खेचण्यासाठी किती विध्वसंक प्रवृत्ती दाखविली यावरुन स्पष्ट होते.

६.१ द्विज स्नातक गृहास्थाच्या कर्तव्याप्रमाणे जो राहिलेला आहे. ज्यांनी खंबीर निश्चयाने आपली इंद्रियें ताब्यात ठेवली आहेत व जंगलात राहून खालील नियम पाळले आहेत–

६.३३ माणसाया नैसर्गिक आयुष्याचा तिसरा भाग जंगलात काढल्यानंतर त्याने आयुष्याचा चौथा भाग संन्याशी म्हणून काढावा व जगातील सर्व गोष्टींबाबत आसक्ती सोडावी.

कायद्यातही मनूने क्रमशः असमानता ग्रंथित केली आहे. दोनच उदाहरणे द्यावयाची तर बेअदबीचा कायदा व हल्ला करण्याबाबत कायदा पाहू.

३.२६७. क्षत्रियाने जर ब्राह्मणाची बदनामी केली तर १०० पण दंड करावा. वैश्याने बदनामी केली तर १५० पण. याच अपराधाबद्दल शूद्राला देहदंड सांगितला आहे.

८.२६८. ब्राह्मणाने जर क्षत्रियाचा अपमान केला तर त्याला ५० पण दंड करावा. वैश्याची बदनामी केली तर त्याला २५ पण दंड करावा. जे उच्चारु नये असे भाषण केल्याबद्दल १२ पण. याच्या जोडीला जर बदनामी केली असेल तर दुप्पट दंड वसूल करावा.

८.२७६. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनी परस्परांना शिवीगाळ केली तर विवेकी राजाने ब्राह्मणाला सर्वात कमी तर क्षत्रियाला मध्यम दंड करावा.

७.२७७. वैश्य आणि शुद्र यांना त्यांच्या जातीनुसार याचप्रमाणे दंड करावा. परतु शुद्राची जीभ कापावी असा निर्णय आहे.

७.२७९. शरीराच्या कोणत्याही इंद्रीयाच्या साह्याने जर कनिष्ठ जातीच्या माणसाचे उच्च त्रिवर्णीयांना इजा केली तर त्याचे इंद्रिय कापून टाकावे अशी मनूची शिकवण आहे.

८.२८०. जो आपला हात उगारेल वा काठी उगारेल त्याचा हात कापून टाकावा. जो रागात लाथ मारील त्याचा पाय कापावा.

प्रत्येक ठिकाणी उतरत्या क्रमाने असमानतेचे तत्व समाजात इतके खोलवर रुजवण्यात आले आहे की, मनूने ते तत्व लावण्यात हयगय केली, तेथे मनूच्या वंशजांनी हे तत्व लागू करण्याची काळजी घेतल्याचे दिसते. उदाहरणार्थ, मनूने गुलामीच्या आदेशांना इतर क्षेत्रांप्रमाणे उच्च-निचतेनुसार असमानतेचे तत्व लागू होते की नाही हे सांगण्यास मनू विसरला होता.

हे क्रमशः उच्च-निचतेचे, असमानतेचे तत्त्व गुलामीला लागू नाही अशी कुणाची समजूत होईल आणि ब्राह्मणही शूद्राचा गुलाम होऊ शकतो असे कुणाला

वाटेल या भीतीने याज्ञवल्क्य याने या बाबतीत शंकानिरसन केले. त्याने स्पष्टपणे सांगितले आहे की-

१५.१८३. गुलामी ही वर्णाच्या उतरत्या धर्माप्रमाणे असते, चढत्या क्रमाने असत नाही.

विज्ञानेश्वरांनी याज्ञवल्क्यावरील आपल्या भाष्यात उदाहरण देऊन या असमानतेच्या तत्त्वावर शिक्कामार्फत केलेला आहे. तो म्हणतो,

"ब्राह्मण आणि इतर वर्ण यांच्यामध्ये गुलामी ही उतरत्या क्रमाने असते. उदाहरणार्थ, क्षत्रिय आणि इतर वर्णियांना ब्राह्मण गुलाम करू शकतो. क्षत्रिय हे वैश्य व शूद्रांना गुलाम करू शकतात. याप्रमाणे गुलामाची पद्धत उतरत्या क्रमाने लागू होते."

समानता आणि असमानतेच्या भाषेत बोलावयाचे तर याचा अर्थ ब्राह्मण हा सर्वात उच्च वर्णाचा म्हणून त्याला कोणीही गुलाम करू शकत नाही. परंतु तो इतर कोणत्याही वर्णियाला गुलाम करू शकतो. शूद्र हा सर्वात नीच वर्णाचा. कारण शूद्राशिवाय तो कोणालाही गुलाम करू शकत नाही. क्षत्रिय आणि वैश्याचा क्रमही याप्रमाणे एकाखाली एक असे लागतात. क्षत्रिय हा ब्राह्मणापेक्षा कनिष्ठ वर्णाचा व तो ब्राह्मणाचा गुलाम होऊ शकतो. परंतु तो वैश्यापेक्षा व शूद्रापेक्षा श्रेष्ठ व तो या दोघांनाही गुलाम बनवू शकतो. वैश्यांना आणि शूद्रांना क्षत्रियास गुलाम म्हणून ठेवण्याचा हक्क नाही. वैश्याला ब्राह्मण आणि क्षत्रिय गुलाम करू शकतात. परंतु तो ब्राह्मण वा क्षत्रियाला गुलाम करू शकत नाही. परंतु निदान आपण शूद्राच्या तरी वरचे आहोत असा अभिमान धरता येतो. परंतु शूद्र हा वैश्याचा गुलाम होऊ शकतो, पण वैश्याचा गुलाम होऊ शकतो, पण वैश्याला गुलाम करू शकत नाही.

या प्रकारचे उच्च-निचतेचे तत्वज्ञान ब्राह्मणशाहीने लोकांच्या हाडामासात भिनविलेले आहे. याच्याइतके समाजात पक्षघात करणारे व असमानता निमार्ण करणारे दुसरे काही असू शकणार नाही.

या उच्च-निचतेचे परिणाम स्पष्टपणे दिसत नसले तरी त्यामुळेच हिंदू समाज पंगू बनला आहे, यात संशय नाही. समाजव्यवस्थेचे अभ्यासक समानता आणि असमानता यातील फारकाचाच विचार करतात, परंतु याशिवाय क्रमशः असमानतेचे, अंगभूत तिच्या विनाशाची बीजे असतात. फार काळ टिकत नाही. साध्या शुद्ध असमानतेत दोन गोष्टी होतात. **१) त्यामुळे सर्वसाधारण असंतोष निर्माण होतो व त्यातून क्रांतीची बीजे पेरली जातात. २) शिवाय असमानतेचे जे बळी असतात, ते समान शत्रूविरुद्ध समान गाऱ्हाण्यासाठी लढण्यास एकत्र येतात. परंतु उतरत्या क्रमाच्या असमानतेत या दोन्ही गोष्टी शक्य नसतात.**

क्रमशः असमानतेमुळे सर्वसाधारण असंतोष निर्माण होत नाही व त्यामुळे त्यातून क्रांतीची प्रेरणा मिळत नाही. दुसरी गोष्ट अशी की क्रमशः असमानतेत

जातीव्यवस्थेचे फायदे आणि तोटे हे प्रत्येकाचे वेगवेगळे असतात. त्यामुळे सर्व वर्णांनी आपल्या शत्रुविरुद्ध एक होण्याचा प्रश्नच येत नाही. ही विषमता आणखी पक्की करण्यासाठी आपल्या कनिष्ठ वर्णातील कोणत्याही स्त्रीशी विवाह करण्याचा हक्क आहे ही स्पष्ट असमानता होय. परंतु क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्याबरोबर एकत्र येत नाही. याची कारणे दोन आहेत. एक तर त्याला माहीत आहे की ब्राह्मणाला ज्याप्रमाणे तिन्ही वर्णातील स्त्रियांवर विवाह करण्याचा हक्क आहे त्याचाही हक्क आहे त्याची तक्रार त्याच्या खालच्या दोन वर्णाइतकी तीव्र नाही. शिवाय तो जर सर्वांबरोबर क्रांतीत सामील झाला तर त्याच्याखाली आहेत तेही त्याच्याबरोबर येतील. तेही क्षत्रियाच्या स्त्रीबरोबर विवाहाचा हक्क मागतील. कोणतेही असमानतेचे क्षेत्र घेतले तरी त्याविरूद्ध याच मानसिकतेमुळे सर्व एकत्र येणे अशक्य बनते.

**ब्राह्मणशाही विरूद्ध व त्यातील असमानते विरूद्ध क्रांती होऊ शकली नाही याचे कारण क्रमशः पायरी–पायरी असमानतेचे तत्त्व आहे, हे निःसंशय आहे, लुटीच्या पद्धतीला मान्यता मिळावी म्हणून लूटीचा काही भाग वाटण्यासारखे हे आहे. असमानता कायम राखण्यासाठी आणि त्याचे फायदे उतरवण्यासाठी शोधून काढलेली ही अत्यंत नीच अशी धूर्तपणाची योजना आहे. असमानतेच्या पद्धतीला पाठिंबा मिळविण्याचा केलेले हे असमानतेचे वाटत आहे.**

आता ब्राह्मणशाहीच्या नाट्यातील अखेरचा पडदा उघडणे बाकी आहे. ब्राह्मणशाहीने वैदिक काळापासून चातुवर्ण्य ही आपल्या आर्य पूर्वजांनी निर्माण केलेली अभूतपूर्ण अशी गोष्ट आहे असे हिंदू मानतात. परंतु त्यात अभूतपूर्व असे काहीही नाही. त्यात कोणतेही नाविन्य नाही. सर्व प्राचीन जगात तो प्रयोग करून तो अपयशी झाला आहे. इजिप्शियन संस्कृतीत तो होता. प्राचीन पर्शियन जातीतही तो प्रयोग झाला आहे. प्लेटो या पद्धतीने इतका भारावला गेला की त्याने ‘‘आदर्श पद्धतीची समाज रचना’’ असे त्याचे वर्णन केले आहे. चातुवर्णाचे ध्येयच सदोष आहे. माणसांना ठराविक वर्णाच्या चौकटीत एकत्र ठेवणे हे व माणसाबाबत व मानवी शक्तीबाबत अगदी वरवरचा संकुचित दृष्टीकोन बाळगण्याचे लक्षण आहे. प्राचीन आर्य प्लुटो यांना मानवी व्यक्तीमत्वातील वैशिष्ट्याची पुरेशी जाणीव नव्हती. त्यांना व्यक्तीतील असमानतेची प्रत्येक व्यक्ती हा एक स्वतःपुरता वर्णच असतो त्याची जाणीव नव्हती. माणसामाणसाच्या कर्तृत्वातील व कार्यातील, प्रवृत्तीतील वैविध्याची आणि त्यांच्या दृष्टिने माणसाच्या विविध प्रवृत्तीनुसार आणि कार्यशक्तीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे पुरेसे होते, हे मुळातच चुकीचे आहे. आधुनिक विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की माणसांना एकाच, एक विशिष्ट क्षेत्राच्या चौकटीत कोंबणे हे व्यक्तीवर व समाजावरही अन्याय करणारे आहे. वर्ण आणि व्यवसायाची विशिष्टपणे विभागणी करणे हे व्यक्ती

व समाज दोघांच्याही प्रगतीच्या दृष्टिने हानिकारक असते हे सिद्ध केले आहे.

**प्राचीन हिंदू व प्लेटो यांनी आणखी एक चूक केली आहे. जीवजंतूप्रमाणे माणसातही एकाच अवयवाचे व गुणांचे दोन प्रकार असू शकतात. यात बहुदा काही सत्य असावे. पहिल्यांदा (माणसात) ते फक्त मानसिक असते तर जीवजंतूत ते शारीरिक व मानसिक असते. माणसात मानसिकदृष्ट्या ते असते असे गृहीत धरले तरी त्यामुळे माणसे जन्म:तच काही विशिष्ट कामे करण्यास तयार असतात. तर काही दुसरी कामे करण्यास योग्य असतात. तर काही केवळ हुकूम सोडण्यासाठी जन्माला येतात तर काही फक्त आज्ञा पाळण्यासाठी व गुलाम होण्यासाठीच जन्मतात अशी विभागणी योग्य नाही. काही माणसाकडे विशिष्ट गुण जन्मत:च असतात तर काहीकडे ते नसतात अशी विभागणी योग्य नाही. चुकीची आहे. याउलट खरी गोष्ट ही आहे की सर्व गोष्टी, सर्व माणसात असतातच काही जणांत त्यापेक्षा एखादी प्रवृत्ती बलवान असते तर तीच तेवढीच उघडपणे दिसते. त्यामुळे हे सत्य नाकारे जाऊ शकत नाही. हे सत्य इतके प्रस्थापित झाले आहे की, एकाच माणसात एका वेळी एखादी प्रवृत्ती बलवान दिसते तर दुसऱ्या वेळी दुसरी प्रवृत्ती किंवा पहिल्याच्या अगदी विरुद्ध प्रवृत्ती बलवान बनलेली दिसून येते, नित्शेच्या माणसे आणि गुलामाच्या परस्परविरोधाबाबत, मतांबद्दल बोलताना प्रा. बर्गस म्हणतात–**

**"याची स्पष्ट प्रचिती (असल्याची) आपणास क्रांतीच्या वेळी येते. अगदी साधे नागरिक, गरीब व आज्ञाधारक वागणारे नागरिक एका क्रांतिकारक दिवशी माणसांचे नेतृव करताना दिसतात."**

**मुसोलिनी आणि हिटलर यांची उदाहरणे आर्यांच्या व प्लेटोच्या सिद्धांताचे खोटेपणाच सिद्ध करतात.**

चातुर्वण्याची ही वैदिक पद्धती ही मळातच आदर्श पद्धती नव्हती आणि ब्राह्मणाशाहीने त्यात केलेल्या बदलामुळे ती अधिक वाईट झाली हे मी यापूर्वी दाखवून दिलेच आहे. या बदलापैकी प्रत्येक बदल हा खोडसाळपणाचा होता हे वादातील आहे. बौद्धाची भिक्खू संस्था व वैदिक ब्राह्मण व्यवस्था ही एकाच उद्देशाने निर्माण झाली. ते समाजातील उत्तम लोक होते व समाजाला मार्गदर्शन करून त्यांना योग्य मार्गाला नेणे हे त्यांचे कर्तव्य होते. दोघांनाही करावयाचे कर्तव्य एकच असले तरी ब्राह्मणापेक्षा ते कर्तव्य करण्यास भिक्खू अधिक पात्र होते. कारण जी गोष्ट त्यांच्यापूर्वी त्याने व कोणी केली नव्हती ती गोष्ट बुद्धाने केली. बुद्धाला याची जाणीव होती की आता बुद्धीमान माणसाला जर खरोखरच समाजाचे नेतृत्व व विश्वासू मार्गदर्शन करावयाचे असेल तर तो बौद्धिकदृष्ट्या स्वतंत्र आणि पुढारलेला असला पाहिजे हे

फार महत्वाचे आहे. त्याला जर बौद्धिकदृष्ट्या स्वतंत्र राहावयाचे असेल तर त्याची खाजगी मालमत्ता असता कामा नये. उत्तम बुद्धिमान माणसाच्या मागे जर खाजगी मालमत्तेची काळजी असेल तर तो समाजाला विश्वासपूर्वक योग्य मार्गदर्शन करू शकणार नाही आणि म्हणून बुद्धाने भिक्खूंसाठी आचारसंहिता ठरवून देतांना त्यांना खासगी मालमत्ता बाळगण्यास प्रतिबंध केला. वैदिक ब्राह्मणांच्या बाबतीत असा कोणताही प्रतिबंध नव्हता. ब्राह्मण मालमत्ता धारण करु शकत असे. या फरकामुळे बौद्ध भिक्खू हा बुद्धिमान वर्ग बनला, तर ब्राह्मण फक्त शिक्षितच वर्ग राहिला. **बुद्धिमान वर्ग आणि शिक्षित वर्ग यात फार फरक आहे. बौद्धिक वर्गाला कोणत्याही वर्गाशी वा हितसंबंधाशी संबंधाच्या मर्यादा नसतात. शिक्षित वर्गाने शिक्षण घेतलेले असले तरी तो बुद्धिमंताच्या वर्गात मोडत नाही. कारण त्याच्या बुद्धीच्या कक्षा आणि नव्या ध्येयवादाबाबत तो ज्या वर्गाचा असेल त्या वर्गाबाबत सहानुभूतीच्या त्याच्या वर्गहिताच्या मर्यादा पडतात.**

त्यामुळे सुरुवातीपासूनच ब्राह्मणवर्ग हा शिक्षित पण स्वार्थी राहिला. जुन्या वैदिक पद्धतीत पुढे जे बदल करण्यात आले, त्यामुळे वैदिक वर्ग व्यवस्थेला अनिष्ट स्वरुप आले. ब्राह्मणांना दिलेला शासन हक्क व इतर खास हक्क आणि प्रतिबंधापासून मुक्तता यामुळे ब्राह्मण अधिक स्वार्थी बनले आणि त्यांच्या मनात आपल्याच शिक्षणाचा उपयोग समाजातील प्रगतीसाठी करण्याऐवजी वा आपले ज्ञान वाढविण्याच्या प्रयत्नाऐवजी आपल्या समाजाचा व स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली.

ब्राह्मणांची सर्व शक्ती आणि त्यांचे शिक्षण हे समाजांच्या भल्यासाठी खर्च होण्याऐवजी स्वतःच्या खास हक्कांचे संरक्षण करण्यासाठी खर्च होऊ लागले. हिंदू लेखकांनी हिंदू संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन संस्कृती आहे अशी प्रौढी मिरवली आहे. ज्ञानाची अशी कोणतीही शाखा नाही की ज्याची सुरुवात त्यांच्या पूर्वजांनी केली नाही. "पॉझिटिव्ह बॅक ग्राऊंड ऑफ हिंदू सोशिओलॉजी" यासारखे प्रा. विनयकुमार सरकार यांचे पुस्तक घ्या किंवा डॉ. ब्रजेंद्रनाथ शील यांनी लिहीलेले "पोझिटिव्ह सायन्सेस ऑफ एन्शट हिंदूज" हे पुस्तक घ्या. त्यात हिंदुच्या विविध विषयावरील ज्ञानक्षेत्रातील कामगिरीबाबत इतकी प्रचंड अधिकारीक माहिती असते की, माणसाला अचंबा वाटावा. त्यांच्या ग्रंथावरुन असे वाटते की, प्राचीन भारतीयांना खगोलशास्त्र, ज्योतिष, शरीरशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, वैद्यकी, खाण, विज्ञान, भौतिकशास्त्र आदी सर्व शास्त्रांतील माहिती होती. सामान्य जनांना तर त्यांची वैयक्तिक माहिती होती असे वाटते. हे सर्व कदाचित खरेदी असू शकेल. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की सर्व शास्त्रे प्राचीन भारतीयांनी कशी शोधली? ज्या या सर्व शास्त्रांचा, ज्ञानाचा त्यांनी प्रारंभ केला, त्यात पुढे प्रगती करण्याचे त्यांनी का थांबविले? वा त्यांची प्रगती का थांबली? शास्त्रातील या प्रगतीला

अचानक पडलेला खंड जास्त आश्चर्यकारक तसाच शोचनीय आहे. विज्ञानाच्या दुनियेत प्राथमिक अवस्थेतील माणसाच्या तुलनेत भारत पहिला असता तर तो आधुनिक राष्ट्रात अखेरचा का आहे? ज्या लोकांनी शास्त्रीय ज्ञानातील प्रगतीला सुरुवात केली ते अचानक कसे थांबले? त्यांनी आपले कार्य मध्येच अर्ध्यावर कसे थांबवले? या प्रश्नाचा विचार करून त्यांचे उत्तर दिले पाहिजे. फक्त प्राचीन भारतीयांना काय माहित होते हे सांगण्यात तात्पर्य नाही.

**याचे फक्त एकच उत्तर आहे आणि ते अगदी साधे आहे. प्राचीन भारतात ब्राह्मण हा एकच शिक्षित वर्ग होता. हा वर्ग स्वतःला इतर सर्वांपेक्षा श्रेष्ठ समजत असे. बुद्धाने ब्राह्मणांचे हे वर्चस्व नाकारले व त्यांच्याशी संघर्ष केला. ब्राह्मण सुशिक्षितासारखे वागले. बुद्धीमान माणसे अशा स्थितीत जसे वागतात तसे वागले नाहीत. त्यांनी बाकीचे सर्व कार्य थांबविले व फक्त आपल्या श्रेष्ठत्वाचे संरक्षण करण्यात त्यांनी सर्व शक्ती खर्च केली. शास्त्रीय विषयावरील पुस्तके लिहिण्याऐवजी त्यांनी स्मृती लिहिल्या. भारतातील शास्त्रीय प्रगती का थांबली याचे हे उत्तर आहे. बुद्धाच्या सामाजिक समतेच्या सिद्धांताचा पराभव करण्यासाठी स्मृती लिहिणे त्यांना अधिक महत्वाचे वाटले.**

ब्राह्मणांनी किती स्मृती लिहिल्या? स्मृती साहित्यातील एक अग्रगण्य अधिकारी अभ्यासक श्री. काणे यांनी १२८ स्मृतिंची नोंद केली आहे. हे सर्व कशासाठी?

स्मृतींना कायद्याचे ग्रंथ मानतात, पण वास्तवात त्यांचे स्थान ज्या विषयी आहे ते खरे तर ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाबाबतच व त्यांच्या फक्त अधिकारावरचे सैद्धांतिक लिखाण आहे ब्राह्मणशाहीचे समर्थन हे शास्त्रीय प्रगतिपेक्षा त्यांनी अधिक महत्त्वाचे मानले. ब्राह्मणशाहीने केवळ आपल्या हक्कांचे संरक्षण केले नाही तर; कोणत्याही सुसंस्कृत माणसाला शंका वाटावी अशा तऱ्हेने त्यात ते सतत वाढ करीत गेले. मनूने दिलेल्या हक्काची व्याप्ती वाढेल अशाप्रकारे त्यांनी मनुस्मृतीतील आदेशांचा अर्थ लावला.

मनूने ब्राह्मणांना दान घेण्याचा मार्ग खुला केला होता. हे दान नेहमी धनाच्या वा गुरांच्या रुपाने दिले जाई. परंतु पुढे दानांची व्याप्ती वाढविण्यात आली व त्यात स्त्रीचा समावेश करण्यात आला. दान दिलेल्या स्त्रीला ब्राह्मण आपली रखेली म्हणून ठेवू लागला व तिला पैसे देऊन आपली सुटका करून घेऊ लागला.

मनूने ब्राह्मणांना भूदेव. पृथ्वीचे मालक म्हणून संबोधिले. ब्राह्मणांनी या शब्दांची व्याप्ती वाढवून इतर वर्णांच्या स्त्रियांशी कामक्रीडा करण्याचा हक्क ब्राह्मणांना आहे असा त्याचा अर्थ लावला. अगदी राण्याही या नियमाला अपवाद राहिल्या नाहीत.

लुडेव्हिको दि वारथेमा हा भारतात प्रवासी म्हणून इ. स. १५०२ मध्ये आला. त्याने कालिकतच्या ब्राह्मणांची खालील गोष्ट नोंदविलेली आहे.

''हे ब्राह्मण कोण आहेत हे समजून घेणे योग्य व मनोरंजक आहे. ते धर्मातील प्रमुख आहेत. आमच्याकडील पुजाऱ्यांच्यासारखे त्यांचे स्थान आहे. ज्या वेळी राजा विवाह करतो, त्यावेळी तो अत्यंत सन्मानप्राप्त व अगदी योग्य ब्राह्मण शोधून त्याच्याकडे आपल्या नवविवाहित पत्नीला पहिल्या रात्री झोपण्यास पाठवून तिचे कौमार्य खुडून टाकण्यासाठी त्याची योजना करतो.''

हॅमिल्टन नावाचा दुसरा लेखक लिहितो, ''झॅमोरिनने विवाह केला तर त्याने आपल्या पत्नीने जोपर्यंत नंबोरीशी (नंबूद्री ब्राह्मणांशी) किंवा धर्माच्या मुख्य पुरोहिताशी संभोग केला नाही, तोपर्यंत तिला पतीशी संभोग करता येत नाही. आणि यावर जर इच्छा झाली तर तो पुरोहित सतत तीन रात्री तिचा उपयोग घेऊ शकतो. कारण तिच्या कौमार्याचे पहिले फळ तिने पवित्र आहुती म्हणून ती ज्या देवाची पूजा करते त्याला दिले पाहिजे.''

मुंबई प्रांतात वैष्णव पंथातील पुरोहित स्त्रीच्या कौमार्याचा पहिला उपभोग घेण्याचा हक्क सांगतात. यातून १८८९ मध्ये महाराजा अब्रू नुकसानीचा प्रश्न निर्माण झाला. वैष्णव पंथाच्या मुख्य पुरोहिताने मुंबई उच्च न्यायालयात कर्सनदास मुलजी यांच्यावर खटला भरला होता. यावरून या वेळेपर्यंत आपल्या पंथातील नवविवाहित पत्नीचा प्रथम उपभोग घेणाऱ्या पुरोहिताचा हक्क अंमलात होता हे सिद्ध होते.

ही पहिली रात्र संभोग करण्याचा हक्क सर्वसाधारण माणसांना, विशेषतः कनिष्ठ वर्गांना लागू झाल्यानंतर ब्राह्मण त्या हक्काचा विस्तार करण्यास कचरत नाहीत. विशेषतः मलबारमध्ये हे झालेले आहे. तेथे मनूने ब्राह्मणांना भूदेव (पृथ्वीचे मालक) म्हणून संबोधले व या शब्दाची व्याप्ती वाढवून ब्राह्मणांनी इतर वर्गाच्या स्त्रिया भोगण्याच्या हक्क ब्राह्मणाला आहे असा त्याचा अर्थ लावला हे विशेषतः मलबारमध्ये झाले. तेथे...

''ब्राह्मण जात मुलायम पद्धतीची अंमलबजावणी करतात. त्यानुसर मूल हे पित्याच्या कुटुंबाचा भाग असते. ते आपल्या जातीत नियमितपणे विवाह करतात. त्या विवाहाला कायद्याची व धर्माची मान्यता असते. परंतु ब्राम्हण हे कनिष्ठ ज्ञातीच्या स्त्रियांशी संबंध ठेवतात.'' परंतु एवढ्यानेच भागत नाही. लेखक पुढे काय लिहितो ते पाहा.

''अशा संबंधातील दोन्ही व्यक्ती त्या कुटूंबाचा घटक बनत नाहीत. अशा संभोगातून निर्माण झालेली संतीत ही आईच्या कुटूंबातील समजली जाते आणि त्या संततीस कायद्यानुसार आपल्या पित्याच्या मालमत्तेत हक्क व पित्याचा पोषणाचा हक्क मिळत नाही.''

या प्रथेच्या उगमाबाबत गॅझेटियरचा लेखक म्हणतो कनिष्ठ पातळीवरचे क्षत्रिय वा सत्ताधिश, कनिष्ठ जातीच्या विवाहित स्त्रियांच्या पहिला रात्रीच्या उपभोगाचे अधिकारी ब्राह्मण असतात. मध्ययुगातील 'ऑर्डर द सिम्मेडरी' सारखाच हा हक्क आहे.

युरोपात मध्य युगात याला ''पहिली रात्र उपभोगण्याचा हक्क'' असे म्हणत. त्याप्रमाणे पहिल्या फळावरील हक्क एवढ्यापुरतेच हे मर्यादित होणे असे म्हणणे म्हणजे आहे त्यापेक्षा कमी सांगणे ठरेल. त्याची मर्यादा यापेक्षा जास्त आहे. कनिष्ठ जातीच्या स्त्रियांचा उपभोग वेश्याप्रमाणे करण्याचा ब्राह्मणांचा हक्क असा याचा अर्थ आहे. ब्राह्मणांच्या कामेच्छा पूर्ण करण्याची वा त्याच्या वैवाहिक जबाबदारीपासून त्यांना मुक्त ठेवण्याची ही कृती आहे.

सर्वसामान्यांविरुद्ध अशा प्रकारचे हक्क स्वतःला अध्यात्मिक गुरु म्हणवून घेणाऱ्या ब्राह्मणांनी मिळविले होते. पोपच्या राज्यावर आरुढ होणाऱ्या आध्यात्मिक गुरुमध्ये बोर्गेस पोप हे सर्वात अधिक व्याभिचारी समजले जात. परंतु ते भारतातील ब्राह्मणापेक्षा अधिक व्याभिचारी होते की काय अशी शंका आहे.

बुद्धाने ज्याप्रकारच्या बुद्धिमान वर्गाची संकल्पना केली, तशी इतरत्र कोठेही असेल असे वाटत नाही. हा शुद्ध बुद्धिमान वर्ग सर्वसाधारण हितासाठी प्रयत्न करणारा, कोणत्याही वर्गाच्या हिताचा विचार त्याच्या मनात नसावयाचा. बौद्धिक स्वातंत्र्याच्या भ्रामकतेमुळे पडणारी मर्यादांची कल्पना अगदी अलीकडच्या काळापर्यंत सर्वसाधारण माणसांना नव्हती. इतर देशात अशा बुद्धिमान वर्गाची जागा प्रत्येक पातळीवरील नागरिकांच्या सुशिक्षित वर्गाने भरून काढली होती. समाजाच्या विविध पातळीवरील सुशिक्षित वर्गाच्या विविध दृष्टीकोनामुळे निश्चित मर्यादाशील होत असले तरी त्याच सुरक्षितता होती. अशा विविध प्रकारच्या दृष्टीकोनामुळे समाजातील एकाच वर्गातील एकाच सुशिक्षित वर्गाकडून चुकीचे मार्गदर्शन व चुकीचा दृष्टीकोन मिळण्याचा धोका नव्हता. असा एकच वर्ग जर सुशिक्षित असेल तर तो आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या वर्गाच्या हितासाठी करून घेणे स्वाभाविक असते.

शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारुन, क्षत्रियांना लष्करी कामाकडे वळवून व वैश्यांना व्यापार आदी करण्याचा आदेश देऊन, मनूने शिक्षण हे फक्त ब्राह्मणांसाठी राखून ठेवले, ब्राह्मण हाच वर्ग यामुळे सुशिक्षित बनला व त्याचा फायदा घेऊन समाजाला चुकीच्या दिशेने नेण्याची व गैर मार्गदर्शन करण्याची संधी ब्राह्मणाला मिळाली.

मुळवर्णव्यवस्थेचे हे विकृतीकरण जर सामाजिक आचारापर्यंत मर्यादित राहिले असते तर कदाचित सत्य हे वेगळे असते. परंतु ब्राह्मणशाहीला ते तितके मर्यादित नको होते. त्यांना या बदलापेक्षा व विकृत केलेल्या चातुवर्ण्य पद्धतीला कायमचे

स्वरूप द्यावयाचे होते. ब्राह्मणशाहीने ही नवी चातुवर्ण पद्धती हा वैयक्तिक वा कौटुंबिक आचाराचा कायदा बनवला. याबाबत कोणताच संशय असण्याचे कारण नाही. मनूने कनिष्ठ जातीतील लोकांना उच्च जातींचा दर्जा स्वतःला देणे वा उच्च जातीचा म्हणून समाजात वावरणे हा गुन्हा ठरविला.

१०.९६. कनिष्ठ जातीच्या माणसाने लोभामुळे जर उच्च जातीचा व्यवसाय करून जगण्याचे ठरविले तर राजाने त्याची सर्व मालमत्ता जप्त करून त्याला हद्दपार करावे.

११.५६. आपण उच्च वर्गात जन्माला आलो अशी खोटी बतावणी करणे, राजाला गुन्ह्यासंबंधी माहिती देणे आणि आपल्या गुरुवर खोटे आरोप करणे हे सर्व ब्राह्मणाची हत्या करण्यासारखे आहे.

येथे दोन गुन्हे आहेत. एक सर्वसाधारण बतावणी करणे. (१०.९६) आणि शुद्राने आपण उच्च जातीचे आहोत अशी बतावणी करणे. (१०.५६) यातील शिक्षा किती तीव्र स्वरुपाच्या आहेत ते पाहा. पहिल्या गुन्ह्याला शिक्षा मालमत्तेची जप्ती आणि हद्दपारी ही आहे आणि दुसऱ्या गुन्ह्याला ब्राह्मणाची हत्या करण्याला जी आहे ती शिक्षा आहे.

आधुनिक काळात दुसऱ्याची बतावणी करणे हा गुन्हा अपरिचित नाही. भारतीय फौजदारी कायद्यात ४१९ कलमात या गुन्ह्याचा उल्लेख आहे. दुसऱ्याची बतावणी करून फसविणे या गुन्ह्याला काय शिक्षा आहे? त्यासाठी दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा दिली तर तीन वर्ष कारावास किंवा दोन्ही. ब्रिटिश सरकारने आपल्या जातीच्या कायद्याला इतकी क्षुल्लक शिक्षा ठेवली याबाबत मनू आपल्या कबरीत अस्वस्थ झाला असेल.

मनूने नंतर राजाला या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश दिला. प्रथमतः त्याने राजाने पवित्र कर्तव्य म्हणून याची अंमलबजावणी करावी असे सांगितले.

७.१७२. जाती-जातीत गोंधळ निर्माण करण्यास प्रतिबंध केल्याने राजाची शक्ती वाढते व त्याची जगात व मृत्यूनंतर भरभराट होते.

वर्णाच्या गोंधळासंबंधात आपण सांगितलेल्या कायद्याची अंमलबजावणी कदाचित राजाच्या मनाला मानवणार नाही आणि तो त्याची अंमलबजावणी टाळेल अशी मनूला भीती होती. यासाठी मनूने राजाने कायद्याची अंमलबजावणी कशी करावी यासंबंधी आदेश दिला.

७.१७७. राजाने कायद्याची अंमलबजावणी करताना आपल्या आवडी वा नावडीचा विचार करु नये. त्याने यमाप्रमाणे वागावे.

म्हणजेच मरणोत्तर न्याय करणाऱ्या यमाप्रमाणे त्याने निःपक्षपाती असावे. परंतु केवळ एक पवित्र कर्तव्य या दृष्टीने ही बाब राजावर सोपवावी अशी मनूची इच्छा

नव्हती. तर ही गोष्ट राजाने आपली जबाबदारी व कर्तव्य म्हणून केली पाहिजे असे मनूला वाटत होते. या दृष्टीने त्याने म्हटले आहे–

७.१४०. राजाने वैश्याला व्यापार करण्यास आणि सावकारी करण्यास आणि शेती करण्यास किंवा गुरु बाळगण्यास आदेश द्यावा आणि शूद्राला द्विजांची सेवा करण्याची आज्ञा करावी.

मनू पुन्हा या विषयाकडे वळून म्हणतो –

८.४१८. राजाने काळजीपूर्वक वैश्यावर व शुद्रावर त्यांच्यावर सोपविलेली कर्तव्ये करण्याची सक्ती करावी. कारण या दोन जाती जर आपल्या कर्तव्यापासून विचलित झाल्या तर साऱ्या जगात गोंधळ होईल.

राजाने जर हे आपले कर्तव्य केले नाही तर काय होईल? मनूच्या दृष्टीने चातुर्वर्ण्याचा कायदा हा इतका सर्वांत महत्वाचा कायदा आहे की, मनू या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्ये करण्यास राजाने हयगय करु नये यासाठी अत्यंत कठोर आहे. मनूने धैर्याने असा आदेश दिला आहे की, हा नवा कायदा जो राजा पाळणार नाही त्या राजाला पदच्यूत करावे असा नवा कायदा त्याने केला. ब्राह्मणशाहीला आणि मनूला या चातुर्वर्ण्याचा कायदा किती प्रिय होता याची यावरुन कल्पना होईल.

मी यापूर्वी म्हटले आहे की वैदिक पद्धतीतील चातुर्वर्ण्य, जाती–व्यवस्थेपेक्षा बरे होते, परंतु तरीही हे एका एकसंध समाज निर्माण करण्याच्या सामाजिक आदर्शच्या दृष्टीने अनुकूल नव्हते. चातुर्वर्ण्याच्या सिद्धांतानेच चार वर्णांना जन्म दिला हे चार वर्ग परस्परांबद्दल स्नेह बाळगणारे नव्हते. ते सतत भांडत असत आणि त्यांची भांडणे इतकी कटू असत की त्यांना वर्गयुद्ध असेच नाव द्यावे लागेल. इतके असूनही जुन्या चातुर्वर्ण्यात दोन चांगल्या गोष्टी होत्या. त्या ब्राह्मणशाहीने स्वार्थाने काढून टाकल्या. पहिली गोष्ट ही की, वर्णा–वर्णात संपूर्ण वेगवेगळेपणा नव्हता. आंतरवर्णीय विवाह आणि सहभोजन हे दोन या सर्वांना एकत्र बांधणारे महत्वाचे घटक होते. समाजाचा पायाच उखडून टाकणारे समाजाविरोधी संबंध वर्णा–वर्णात निर्माण होण्यास त्यात वाव नव्हता. क्षत्रिय ब्राह्मणाविरुद्ध लढले, ब्राह्मण क्षत्रियाविरुद्ध क्षत्रियाच्या बाजूने लढणारे ब्राह्मण कमी नव्हते.

**दुसरी गोष्ट अशी की, जुने चातुर्वर्ण्य ही एक परंपरा होती. तो समाजाचा आदर्श होता. परंतु तो शासनाचा कायदा नव्हता. ब्राह्मणशाहीने वर्णांना एकमेंकापासून पूर्णपणे विभक्त केले आणि त्यांच्यात परस्परविरोधाची बीजे पेरली. तिसरी गोष्ट जी केवळ परंपरा होती, तिला ब्राह्मणशाहीने कायदा बनविले. तिला कायद्याचे स्वरुप देऊन ब्राह्मणशाहीने ही विकृती कायम बनविली. वैदिक चातुर्वण जर वाईट असते तर काळाच्या**

ओघात आणि परिस्थितीने ते नष्ट झाले असते. त्याला कायद्याचे स्वरुप देऊन ब्राह्मणशाहीने ते शाश्वत बनविले. हिंदू समाजाच्या बाबतीत ब्राह्मणशाहीने केलेला हा सर्वात मोठा अपराध आहे.

या प्रश्नाचा विचार करतांना एक गोष्ट आपण विसरु शकत नाही की चातुर्वर्ण्याचा कायदा म्हणजेच क्रमशः उच्च-निचतेची पद्धती कायम म्हणून राज्यावर लादत असतांना या पद्धतीची सक्ती ब्राह्मणावर आणि क्षत्रियावर राजाने करावी अशी तरतूद त्यात नाही. हा कायदा फक्त वैश्यावर आणि शूद्रावर लादण्याची शक्ती आहे. ब्राह्मणशाहीला हा चातुर्वर्ण्याचा कायदा लागू करण्याबाबत तीव्रता असली तरी या सुटीमध्ये फार चमत्कारीक परिस्थिती आली. चातुर्वर्ण्याला कायद्याचे स्वरुप देण्याचा प्रयत्न त्यामुळे अर्धवट झाला. त्याला अर्धा कायदा आणि अर्धी परंपरा असे स्वरुप आहे. वैश्य आणि शूद्र यासाठी तो कायदा होता तर ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यासाठी परंपरा होती.

या वेगळेपणाची कारणे शोधली पाहिजेत. चातुर्वर्ण्याला कायद्याचे स्वरुप देण्याबाबत ब्राह्मणशाही प्रामाणिक होती काय? चारी वर्ण याबाबत कायद्याने मानले जावेत असे त्यांना वाटत होत काय? ब्राह्मणशाहीने ज्या अर्थी ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना या कायद्याच्या अंकित ठेवले नाही, त्या अर्थी या बाबतीत ब्राह्मणशाही प्रामाणिक होती असे म्हणता येणार नाही. त्यांना जर चातुर्वर्ण्याची पद्धत आदर्श वाटत होती तर त्यांनी ती सर्वांना बंधनकारक केली असती.

परंतु या निंदनीय प्रयत्नात अप्रमाणिकपणापेक्षा आणखी काही आहे. या कायद्याच्या बेड्यापासून ब्राह्मणांना का मुक्त ठेवण्यात आले हे समजण्यासारखे आहे. मनूने त्यांना भूदेव म्हटले आहे आणि देव हा कायद्याच्या बाहेर असला पाहिजे. परंतु ब्राह्मणाप्रमाणेच क्षत्रियांना या कायद्यापासून का दूर ठेवण्यात आले? त्यांना माहीत होते की, क्षत्रिय ब्राह्मणाच्या पुढे वाकणार नाही. म्हणून त्याने पुढे क्षत्रिय जर उद्दाम बनले आणि बंड करण्याचा विचार करु लागले तर त्यांना ब्राह्मण कसे शिक्षा करु शकतील याचा इशाराही दिला आहे.

११.३२०. क्षत्रिय जर ब्राह्मणावर वरचष्मा गाजवू लागले तर ब्राह्मण त्यांना यथायोग्य प्रतिबंध करु शकतात. कारण क्षत्रिय हे ब्राह्मणापासून निर्माण झाले आहेत.

९.३२१. पाण्यापासून अग्नी निर्माण झाली. ब्राह्मणापासून क्षत्रिय निर्माण झाला. दगडापासून सोने निर्माण झाले आणि ज्याच्यापासून ते निर्माण झो त्याच्यावर या तिन्ही बाबतीत जे उत्पन्न झाले त्यांचे काही चालत नाही.

यावरुन एखाद्याला वाटेल की मनूने क्षत्रियावर या कायद्याची सक्ती केली नाही. याचे कारण ब्राह्मण स्वतःच्या ताकदीवर राजाच्या मदतीशिवाय क्षत्रियांशी सामना करू शकतात व ते स्वतःच्या ताकदावर क्षत्रियावर बंधने टाकून वेळ आली

तर परिणामाला न भीता क्षत्रियांशी सामना करू शकतात हा विश्वास क्षत्रियावर या कायद्याची बंधने न घालण्यामागे असावा. परंतु मनूच्या मनात हे सर्व नसावे. कारण सुडाची, धमकीची भाषा वापरल्यानंतर मनू लगेच खालच्या सुरात क्षत्रियांशी सहकार्याकरीता आणि ब्राह्मणांच्या बरोबर समान आघाडीच्या निर्मितीकरीता आवाहन करतो. ज्या श्लोकात क्षत्रियांना धमकी देण्यात आली आहे, त्याच्याच खालच्या श्लोकात मनू क्षत्रियांना आवाहन करतो.

९.३२३. परंतु ज्या राजाला आपला शेवट जवळ आला आहे असे वाटते. त्याने ब्राह्मणांना केलेल्या दंडाच्या रकमेतून निर्माण झालेली सर्व संपत्ती आणि त्याने राज्य मुलाच्या स्वाधीन करावे आणि नंतर रणागणांवर मृत्यू स्वीकारावा.

दमदाटीनंतर समझोत्याची भाषा ही मोठी विचित्र आहे. क्षत्रियांच्या बाबतीत मनूची ही परस्परविरोधी विचित्र वागणूक का? याचा खुलासा काय आहे? ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या सहकार्याचा उद्देश काय? ही आघाडी कोणाविरुद्ध आहे, याचा मनू खुलासा करीत नाही. या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊन हे कोडे सोडविण्यासाठी एक हजार वर्षाचा सर्व इतिहास धुंडाळावा लागेल.

या कोड्याचे उत्तर ज्या इतिहासाने दिले, तो इतिहास ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील वर्गयुद्धाचा इतिहास आहे. सनातनी हिंदूंना कार्ल मार्क्सचा वर्गयुद्धाचा सिद्धांत ऐकून अंगावर शहारे येतात, पण त्यांनी आपल्या पूर्वजांचा इतिहास वाचला तर त्यांना नक्कीच धक्का बसेल. कारण आपल्या सिद्धांताला पाठिंबा मिळावा म्हणून कार्ल मार्क्सच्या इतिहासाचा शोध चालला होता. त्याला प्राचीन हिंदुच्या या इतिहासात पुरावा मिळतो. खरे पाहता ब्राह्मण आणि क्षत्रिय राजे यांच्याच नोंदी प्राचीन हिंदुच्या वाङ्मयात सापडतात. ब्राह्मण आणि क्षत्रिय राजे यांच्यातील संघर्षाची नोंद इतिहासात आहे. त्यापैकी पहिला नोंदविलेला संघर्ष राजा वेण, दुसरा पुरूरवाशी, तिसरा नहूशाशी, चौथा निमीशी आणि पाचवा सुमुखाशी संघर्ष आहे. यानंतर भृगू वंशातील ब्राह्मणाची क्षत्रियांनी सरसहा कत्तल केल्याचा उल्लेख आहे. हि कत्तले कृतविर्याच्या वंशजांनी केली. त्यानंतर ब्राह्मणाच्या वतीने परशुरामाने सर्व क्षत्रियांची कत्तल कृतविर्याच्या वंशजांनी केली. त्यानंतर ब्राह्मणाच्या वतीने परशुरामाने सर्व क्षत्रियांची कत्तल केल्यानी नोंद आहे. त्यांच्यातील या संघर्षाची कारणे अनेक आहेत.. त्यावरून ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील संबंध किती कटू आणि तणावपूर्ण होते याची कल्पना येते. क्षत्रियांना ब्राह्मण बनण्याचा अधिकार आहे काय? या प्रश्नावर संघर्ष झाला. कोणी कुणाला पहिल्यांदा वंदन करावे आणि कुणी कुणाला प्रथम वाट द्यावी यावरहीं संघर्ष झाले. ही सर्व युद्धे अधिकार, दर्जा आणि प्रतिष्ठा या प्रश्नावर झाली.

या युद्धाच्या परिणामाची कल्पना ब्राह्मणांना निश्चितपणे होती. त्यांच्या उद्दाम

वल्गाना सोडल्या तर त्यांना याची कल्पना होती की क्षत्रियांना पूर्णपणे नष्ट करणे त्यांना शक्य नव्हते. क्षत्रियांचा संपूर्ण निःपात करणारी युद्धे झाली तरीही ब्राह्मणांना उपद्रव्य देण्याइतका संख्येने क्षत्रिय शिल्लक राहिलेच. ब्राह्मणांनी सांगितलेल्या आणि मनुच्या काळातील क्षत्रिय हे मूळचे क्षत्रिय नाहीत. परशूरामाने क्षत्रियांचा संपूर्ण निःपात केल्यानंतर त्यांच्या पत्नीशी समागम केल्यानंतर त्यांच्या ब्राह्मणांनी वरील क्षत्रियांची जात निर्माण केली असे आहे ही कथा मुळातच कपोलकल्पित आहे. ब्राह्मणशाहीने धमक्या देऊन बदनामी करण्याचे साधन आपल्या स्वार्थसाठी नेहमीच निर्लज्जपणे वापरले आहे. ब्राह्मणशाहीचा क्षत्रियांशी संघर्ष हा सुरूवातीसच मूर्ख आणि उन्मत यामधील झगडा होता. अर्थातच ब्राह्मण हे चार्तुवर्ण्याच्या रक्षणासाठी क्षत्रियांची ब्राह्मण हे चातुर्वर्ण्याने क्षत्रियांना दिलेला आणि ब्राह्मणांना नाकारलेली शस्त्रे चातुर्वर्ण्याने पुरविलेली आहेत. अशा सिद्धांताना साहाय्याने ब्राह्मण क्षत्रियांशी क्षत्रियावर विजय मिळविण्यात किती काळ लढू शकणार? ब्राह्मणांना हे सत्य समजून आले. हे सत्य टॅलिरॅण्ड यांनी नेपोलियनला सांगितले की, ''बंदूक देणे सोपे आहे, पण या बंदुकीवर बसणे कठीण आहे.'' क्षत्रियाकडे शस्त्रे असल्याकारणाने आणि ब्राह्मणाकडे ती नसल्या कारणाने क्षत्रियांशी युद्ध म्हणजे विनाशाला आमंत्रण ही गोष्ट ब्राह्मणाच्या लक्षात आली. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामधील युद्धाच्या हा प्रत्यक्ष परिणाम होता. याप्रमाणे या युद्धाचा आणखी एक परिणाम होता की, जो ब्राह्मणाच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. ब्राह्मण आणि क्षत्रिय एकमेंकाशी युद्ध करीत असताना, वैश्य आणि शूद्रांना नियंत्रणात ठेवण्यास कोणी शिल्लक उरले नाही. ते जवळ जवळ ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या पातळीवर सामाजिक दृष्ट्या येऊन पोहचण्याच्या मार्गांवर होते. ब्राह्मणाच्या दृष्टीने क्षत्रियांना दडपूण टाकणे हे जवळजवळ अशक्य होते आणि ही युद्धे चालू राहिली तर क्षत्रिय आणि वैश्य हेही त्यांच्यात बरोबरीने येण्याचा खराखुरा धोका होता. ब्राह्मणांनी आपले क्षत्रियांशी युद्ध चालू ठेवणे आणि वैश्य व शुद्रही आपल्या बरोबरीने येण्याचा धोका पत्करावा की क्षत्रियांशी युद्ध थांबवून त्यांच्याशी मैत्री करावी आणि दोघांनी मिळून वैश्य आणि शूद्रांचे वाढते संकट दडपून टाकावे हा प्रश्न ब्राह्मणासमोर होता. ब्राह्मणांनी क्षत्रियांशी युद्धात थकल्यानंतर हा दुसरा पर्याय स्वीकारला. त्यांनी क्षत्रियांशी मैत्री करण्याचे ठरविले आणि दोघांनी मिळून वैश्य आणि शूद्रांना गुलाम करावे आणि त्यांची पिळवणूक करावी असे ठरविले. हे नवीन ध्येय शतपथ ब्राह्मणाच्या निर्मितीनंतर ब्राह्मणांनी स्वीकारले असावे. शतपथ ब्राह्मणाच्या काळातच हे नवीन ध्येय उच्चारले गेले. ज्या भाषेत हे नवे ध्येय व्यक्त झाले आणि ज्यांच्यावर त्याचा अंमल झाला ते पाहिल्यानंतर हे व्यक्त झालेले विचार मुळस्वरुपात येथे द्यावेत अशी माझी इच्छा आहे. शतपथाचे लेखक म्हणतात–

“त्यानंतर ते आहवानीयकडे पशूंना परत नेतात. बकरा प्रथम जातो त्यानंतर गाढव आणि त्यानंतर घोडा– आता आहवानीयकडून दूर जाताना घोडा प्रथम, गाढव नंतर व त्यानंतर बकरा जाते. बकारण घोडा हा शस्त्राचे (खानदानीचे) निदर्शक आहे. गाढव वैश्य आणि शूद्राचे निदर्शक आहे. बकरा हे ब्राह्मणाचे आणि अव्हानियापासून दूर जाता घोडा पहिला होता आणि म्हणून क्षत्रियांना प्रथम व त्याच्यामागे तीन वर्ण येतात. ज्या अर्थी गाढव हे जाताना आणि परत येताना दोन्ही वेळी प्रथम नव्हते, त्या अर्थी ब्राह्मण आणि क्षत्रिय हे दोघेही वैश्य आणि शूद्राच्या मागे कधीही जाणार नाहीत. वाईट आणि चांगले यामध्ये गोंधळ होऊ नये म्हणून याप्रमाणे ते चालते. आणि वैश्य आणि शूद्र यांना याप्रकारे ठेवण्यात येईल की हे दोघेही पुरोहित आणि क्षत्रिय यांच्यामागे राहतील आणि त्यांचे कनिष्ठ व दास म्हणून राहतील.”

मनूच्या क्षत्रियाविषयीच्या गोंधळात टाकणाऱ्या आदेशांचे कोडे या खुलाशाने सुटते. क्षत्रियांच्या बाबतीत ब्राह्मणांची प्रवृत्ती त्याला जखमी करण्याची इच्छा, पण चढाई करण्याची भीती. हुकूमात ठेवण्याची इच्छा, परंतु मैत्री करणे अधिक पसंत अशा प्रकारची आहे. सर्व युद्धातून आणि त्यातून झालेल्या तडजोडीतून मनूच्या हे लक्षात आले की, क्षत्रियावर सक्ती करण्याचा हव्यास धरण्यापासून काही उपयोग नाही. त्यांना ब्राह्मणांच्या प्रभुत्वाखाली ठेवणे अशक्य आहे. बिस्मार्कप्रमाणे मनूच्याही समान कारणासाठी एकत्र येणे, समान आघाडी बनविणे हेच शक्य आहे. वैश्य आणि शूद्राच्या विरुद्ध या दोघांनी आघाडी उघडली पाहिजे आणि हेच मनूने केले. या सर्वात वाईट गोष्ट ही की, हे धर्माच्या नावावर करण्यात आले. ज्यांनी ब्राह्मणशाहीच्या प्रवृत्तीचा आणि आत्म्याचा अभ्यास केला, त्यांना यात धक्का बसण्यासारखे काही नाही. ब्राह्मणाशाहीने आपले स्वार्थी राजकारण लपविण्यासाठी धर्माचा बुरखा पांघरलेला आहे.

◆◆◆

# हिन्दू समाजाचे आचार विचार

हिंदूचे आचार विचार आणि धार्मिक सिद्धांन्त स्मृतीवर आधारित आहेत. या स्मृतीची गणना हिंदूच्या पवित्र धार्मिक साहित्यात केली जाते. जर आपणास हिंदूचे नैतिक आणि धर्मविषयक विचर माहित करून घ्यावयाचे झाल्यास, या स्मृतींचे अध्ययन करणे आवश्यक आहे. अश्या स्मृतींची संख्यादेखील कमी नाही. साधारणतः स्मृतींची संख्या १०८ मानन्यात येते. स्मृतींची ही मोठी संख्या मात्र आपणास अडचण ठरु शकणार नाही. जरी या स्मृती वेगवेगळ्या आल्या तरी त्या एकमेकांपासून मूलतः भिन्न नाहीत. या सर्वांमध्ये इतकी समानता आढळून येते की यांचे वाचन करतांना बहुतेक वाचकांना कंटाळा आल्याशिवाय राहत नाही. या सर्वांचे मुळमात्र एकच आहे. तो आहे ''मनुस्मृती'' जी ''मानव धर्मशास्त्र'' या नावाने देखील ओळखली जाते. सर्व स्मृतींची पूनरावृत्ती मनूस्मृतीपासूनच गेली आहे. सर्व स्मृतींचे मुळमनस्मृती यात असल्याकारणाने हिंदूंचे नैतिक आचार विचार आणि धार्मिक संकल्पना जाणून घेण्यासाठी मनुस्मृतीचे अध्ययन करणे आवश्यक आहे. मनुस्मृती ही कायद्याची संहिता आहे. हीच गोष्ट इतर स्मृतीना देखील लागू आहे हे नीतीशास्त्रही नाही किंवा धार्मिक ग्रंथदेखील नाही. नियमांच्या कुठल्याही संहितेला नीतिविषयक आणि धार्मिक शिकवणूकीची ग्रंथ समजणे म्हणजे नितीशास्त्र, धर्म आणि कायदा यात गफलत निर्माण करणे होय.

धर्माला कायद्यापासून वेगळे करणे हे आधुनिक समाजाचे कृत्य आहे. प्राचीन काळात कायदा आणि धर्म एकच होते. हे प्रो. मॅक्समुल्लर आणि सर हेन्री मेन्स यांनी पटवून दिलेले आहे. प्राचीन काळात दैवी शक्तीच्या रुपात धर्म हा जीवनाच्या प्रत्येक अंगाशी आणि सामाजिक संस्थाशी जोडलेला असे. सर हेन्री मेन्सच्या मते, धर्म ही एक अलौकिक सत्ता असून तीचा उद्देश प्रमुख संस्था, राज्य, जाती आणि परिवान इत्यादींची पवित्रता कायम ठेवून परस्परांना जोडणे हे असे.

धर्माला कायद्याच्या स्थनापासून वेगळे करणे कित्येक शतके संभव न झाल्यामुळे धर्माचे स्थान अढळ राहिले. पुढील काळात मात्र हे शक्य झाले. परंतु आता देखील याची चिन्हे आजतागायत दिसत असल्यामुळे मानव इतिहासाच्या सुरुवातीला धर्मांचे केवढे मोठे प्राबल्य होते हे दिसून येते.

आधुनिक युगात धर्म आणि नैतिकतेमध्ये भेद केला गेला. धर्म आणि नैतिकतेचा एकमेकांशी इतका जवळचा घनिष्ठ संबंध आहे की त्यांना वेगळे करणे जवळपास अशक्य प्राय आहे. सदाचार आणि नैतिकता हे व्यवहाराचे विषय आहे. प्रो. जॅक्सनने जोर देवून सांगितले आहे की नैतिकता ही लोकांना माहितच पाहिजे

असे नाही तर लोकांनी चांगले राहावे हा नैतिकतेचा मुळहेतू आहे. एवढेच नव्हे तर जे योग्य आहे त्याला वैज्ञानिकता आधार देवून जीवनात अनुकरण करण्या योग्य बनवावे.

जोपर्यंत या नैतिकतेत सदाचाराच्या पालनांला एखाद्या प्रेरक शक्तीची जोड असत नाहीत तोपर्यंत सदाचार निष्क्रिय ठरतो. म्हणून सदाचाराची प्रेरक शक्ती ही धर्मात निहित असते. धर्म हीच खरीखूरी शक्ती असते.

प्रो. जैक्सच्या मते "यातून आपणास प्रेरणा मिळते. या प्रेरणेमुळेच आपण जीवन जगण्यास प्रवृत्त होतो. जीवनात येणाऱ्या मोठमोठ्या बाधा देखील आपणास या प्रेरणामुळेच पार करु शकतो. या प्रेरणा दिसावयास साधारण जरी असल्या तरी याद्वारे नैतिक सदाचाराच्या मार्गावर मनुष्य सदैव मार्गक्रमण करित जातो. कधी ही प्रेरणा निषेज्ञांच्या स्वरुपात असते तर ती कधी पवित्र नियमांच्या स्वरुपात असते. यांचे अनुसरन लोक श्रद्धेने करतात. परंतु ही सगळी वेगवेगळी रुपे आहेत. ज्याद्वारे धर्मरुपी प्रेरक शक्तीद्वारा सदाचारांच्या नियमांच्या पालनांची भावना लोकांमध्ये वसत असते. धर्म ही उर्जा आहे. जी सदाचाराच्या चक्राला नियंत्रित करीत असते.

सदाचार आणि नैतिकता जर कर्तव्य असतील तर निसंसदेह मनुस्मृती हा नितीशास्त्राच ग्रंथ आहे. जो कुणी मनुस्मृती वाचण्याचे कष्ट होईल त्याला हे निश्चितच आढळून येईल की या ग्रंथामध्ये मुख्य विषय जर कुठला असेल तर तो कर्तव्याबाबत आहे.

"मनू" हा सर्वप्रथम असा व्यक्ती होता ज्याने या कर्तव्यांना आणि नियमांना व्यवस्थित व संहिताबद्ध केले. हे नियम पालन करणे हिंदूना बंधनकारक करण्यात आले. मनू हा वर्णाश्रम धर्म आणि साधारण धर्म यात भेद करतो. वर्णाश्रम धर्मामध्ये समाविष्ट कर्म हे जीवनाच्या विशिष्ट अवस्थांशी संबंधीत आहेत. यातील निर्णय हे त्या जातीपूरते किंवा वर्णापुरते मर्यादित आहेत तर साधारण नियम हे मनुष्य असल्या कारणाने आचरण करावयाचे आहेत. या संपूर्ण ग्रंथात कर्तव्याशिवाय काहीही सांगितलेले नाही.

अश्याप्रकारे मनूस्मृती ही कायद्याची संहिता आहे कारण यामध्ये धर्म आणि सदाचाराला जोडण्यात आलेले आहे. हा आचरशास्त्राचा ग्रंथ आहे कारण की यात मनुष्याच्या कर्तव्याचा समावेश केला गेला आहे. मनुस्मृती हा धर्मग्रंथ आहे कारण की यात हिंदूच्या धर्मरुपी जीवनाच्या आत्मा असलेल्या जातीचे वर्णन केले गेले आहे. या नियमाचे उल्लंघन केले गेल्यास दंडाचे प्रावधान असल्याने मनूस्मृती ही कायद्याची संहिता आहे. या सर्व बाबी लक्षात घेतल्यास ही संहिता आहे. या सर्व बाबी लक्षात घेतल्यास हिंदूच्या आचार विचारांच्या आदर्शना आणि त्यांच्या धार्मिक संकल्पना माहित करावयाचे असल्यास मनुस्मृतींचा सहारा घेणे आवश्यक ठरते. मनुस्मृतीला धर्मग्रंथ मानणे हे फारच विसंगत वाटते कारण हे आहे की हिन्दू धर्म हाच

मूळी भ्रामक आहे. अनेक लेखकांनी याची व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केली आहे.

सर डी. इबटसन हिन्दू धर्माच्या व्याख्या पुढीलप्रमाणे करतो.

''ब्राह्मणांद्वारे पौरोहित्य संपन्न केला गेलेला वंशानुगत धर्म ज्यात जातींचा समावेश होतो. जाती ही भारतात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तींना धर्माच्या स्वरुपात जीवनाच्या विविध अंगाशी जोडलेली असते जे ख्रीश्चन, इस्लाम आणि बौद्ध लोकांपासून वेगळेपणा दर्शवित असते. हा धर्म सिख आणि जैन धर्मापासून देखील वेगळा आहे.''

सर जे. ए. बेन्सनुसार लोकांची एक प्रचंड संख्या जी न बौद्ध आहे न सिख आहे, न इस्लाम न पारसी कि न हिंदू वा ख्रिश्चन आहे.

**सर एडवड गैट नुसार –**

मत मतांतराचा एक असा समुच्चम ज्यात एकेश्वरवाद बहुदेववाद, सर्वेश्वरवाद, महादेव, शीव, विष्णु, दुर्गा, लक्ष्मी आणि वृक्ष, दगड तसेच नदया इत्यादीच्या पुजनाचा समावेश होतो. यात लोक वरिल वस्तुंना बळी देवून संपुष्ट करतात. धर्माच्या नावावर हे लोक जप जाप्य करतात.

हिंदू धर्माच्या धार्मिक स्वरुपाबद्दल सर अल्फ्रेड लायल म्हणतो, ''हिन्दू धर्म हा खोट्या अंधश्रद्धा आचार–विचार उपासना पद्धती रुढी, परंपरा आणि पौराणिक कथांचा समावेश असलेल्या गुंतागुंतचा समुच्चय आहे यांना ब्राह्मणांची मान्यता असून याचा प्रचार देखील ब्राह्मण करतात.

श्री सेन नुसार एखादा व्यक्ती तेव्हाच हिंदू म्हणून गणला जातो जेव्हा तो एखाद्या जातीत जन्म घेतो. प्रत्येक हिन्दू हा जातीवर विश्वास करतो आणि गर्व करतो.

**प्रो. मॅक्युमुल्लर नुसार –**

आधुनिक हिन्दू धर्म हा जातीवर आधारित आहे. एखाद्या पाषाणावर तो आधारित असून ज्याला कुणीही हलवू शकत नाही.

यांचे तात्पर्य हे आहे की जर मनूस्मृतीने जातीच्या सिद्धांन्तांना निर्धारित केले आणि हिन्दू धर्माच्या मूळाशी जाती आहेत तेव्हा मनुस्मृतीला धर्मग्रंथ म्हणून स्विकारणे आवश्यक ठरते.

३.११० ब्राह्मणांच्या घरी येणारा क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र, परिचित, मित्र आणि गुरु ''अतिथि'' अर्थात पाहूणे म्हणविले जाणार नाही.

३.१११ जर क्षत्रिय ब्राह्मणाच्या घरी पाहुणा म्हणून गेला तर प्रथम ब्राह्मण भोजन करेल तदनंतर क्षत्रिय भोजन करेल.

३.११२ ब्राह्मणांच्या घरी वैश्य किंवा शूद्र पाहूणा बनून आल्यास त्यांना नोकरासमान वागवावे.

एका वर्णाची स्थिती दुसऱ्या वर्णाच्या तुलनेत कशी असेल याबाबत समितकरण मनूने मांडलेले आहे ते तर फारच रोचक आहेत.

२.१३५ विद्यार्थी ब्राह्मणांना मग तो दहा वर्षाचा जरी असेल आणि क्षत्रिय हा जर शंभर वर्षाचा असला तरी पिता आणि पुत्र समजावा. यातही युवक ब्राह्मणाला वडिलासमान आवर द्यावा.

२.१३९ जर एखादा असा प्रसंग उद्भवला की राजकुमार आणि ब्राह्मण स्नातक एकसाथ स्वगृही परत येत असतील तर राजकुमाराच्या तुलनेत ब्राह्मण स्नातकाला अधिक सन्मान द्यावा.

३.१०० पृथ्वीवर जे काही आहे ते सर्व ब्राह्मणांचे आहे. अर्थात ब्राह्मणांचा जन्म उच्च कुळात झाला असल्याकारणाने तो पृथ्वीवरील सर्व वस्तुंचा स्वामी आहे.

३.३१७ ब्राह्मण हा जरी मुर्ख असो किंवा विद्वान दोन्ही रुपात तो श्रेष्ठ आहे. देवतातुल्य असल्याकारणाने ब्राह्मण हा कायदा आणि राजापेक्षाही श्रेष्ठ आहे.

७.३७ राजाने विद्वान ब्राह्मणाची दररोज सेवा करावी. वेद माहित असलेल्या वृद्ध ब्राह्मणाची सुद्धा राजाने रोज सेवा करावी.

७.३८ वृद्ध ब्राह्मणाची राजाने रोज सेवा करावी.

११.३५ ब्राह्मण हे गुरु आणि संपूर्ण जगाचे रक्षक आहेत. मनू सहितेत विभिन्न वेद माहिती असलेल्या जातीद्वारे करावयाच्या व्यवसायाचा देखील उल्लेख आहे.

१.८८ स्वयंभू मनूने ब्राह्मणांचे कर्तव्य म्हणून वेदाध्ययन, वेदांची शिक्षा देणे, यज्ञ करणे, दान दणे आणि दान घेणे इत्यादी आहेत.

१.८९ दान देणे, प्रजेचे रक्षण, यज्ञ करणे, वेदाध्ययन इत्यादी क्षत्रियांची कर्तव्ये आहेत.

१.९० पशुपालन, व्यापार करणे, दान दाणे, यज्ञ करणे, शेती करणे, इत्यादी वैश्यांची कर्तव्ये आहेत.

१.९१ शूद्रांनी आनंदीत राहून केवळ तीनही वर्णाची मनोभावे सेवा करावी.

१०.७५ वेदांचे अध्ययन, अध्यापन, यज्ञ करणे, इतरांना यज्ञ करण्यात मदत करणे, ब्राह्मण गरिब असेल तर इतरांकडून दान स्विकारणे ही सहा कर्तव्ये ब्राह्मणांची आहेत.

१०.७६ ब्राह्मणांकरिता निर्धारित सहा कर्तव्यातील तीन कर्तव्ये त्याच्या जीविकेकरिता आहेत. ती क्षत्रियांना लागू होऊ शकत नाहीत. अर्थात वेदांचे अध्यापन (शिकविणे), यज्ञ करणे आणि दान स्विकारणे.

१०.७८ वरिल तीन कर्तेव्ये ही वैश्यांना देखील लागू वर्जित (मनाही) आहेत. कारण की परमपिता ब्रह्माने ही कर्तव्ये क्षत्रिय आणि वैश्य वर्णाला लागू केलेली नाहीत.

१०.७९ जीविकेकरिता शस्त्र धारण करणे हा क्षत्रियाच्या व्यवसाय आहे तर व्यापार, पशू पालन आणि कृषी हा वैश्यांचा व्यवसाय आहे. परंतु पुढील हाच जन्म प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर क्षत्रियांनी व वैश्यांनी दान देणे, अध्ययन आणि यज्ञ करणे इत्यादी कर्तव्ये करावीत.

मनू श्रेणी आणि व्यवसाय निश्चित केल्यानंतर काही वर्गांना मनूने विषेशाधिकार बहाल केले आहेत तर काहीना दंडाचे प्रावधान केले आहे.

जेथपर्यंत विशेषाधिकाराचा प्रश्न आहे. विवाहा संबंधित विशेषाधिकारांचा प्रथम विचार करु.

३.१२ द्विज वर्गातील लोकांनी त्यांच्या वर्गातील स्त्रीशी प्रथम विवाह करावा. दुसऱ्यांदा लग्न करावयाचे असल्यास आपल्यापेक्षा खालच्या वर्गातील स्त्रीशी विवाह करावा.

३.१२ शूद्र स्त्री केवळ शूद्राचीच पत्नी बनू शकेल. त्याचप्रमाणे वैश्य स्त्री वैश्याची, क्षत्रिय स्त्री क्षत्रियाची तर शूद्र स्त्री शुद्राशी आणि ब्राह्मण स्त्री ब्राह्मणाची पत्नी बनेल.

अश्याप्रकारे व्यवसायात देखील काही विशेषाधिकार देण्यात आले आहेत. एखाद्या वर्णावर संकट आल्यास वेळप्रसंगी तो काय करिल याचेही वर्णन मनूने केलेले आहे.

१०.८१ जर ब्राह्मण आपल्या निर्धारित वर्णानुसार व्यवसाय करु शकत नसेल तर त्याने क्षत्रियाचा व्यवसाय करावा. कारण की क्षत्रिय हा त्याचा नंतरचा वर्ण आहे.

१०.८५ जर असा ब्राह्मण क्षत्रियाचा व्यवसाय देखील करण्यास असमर्थ असेल तर त्याने वैश्याचा व्यवसाय करावा.

१०.१०२ संकटामध्ये सापडल्यावर ब्राह्मण कोणत्याही व्यक्ती द्वारा दान ग्रहण करु शकतो. कारण की याबाबत कुठलाही शुद्धता अशुद्धतेचा नियम नाही.

१०.१०३ इतरांना वेदाध्ययन करविणे, यज्ञ करविणे आणि त्याद्वारे दान स्विकारणे संकटात सापडलेल्या ब्राह्मणांना वर्जित नाहीत कारण की तो मूलतः पवित्र आहे.

याच नियमांची तुलना जर इतर वर्णातील लोकांशी करून पाहिली तर। मनू म्हणतो,

१०.९६ खालच्या वर्गातील मनुष्य जर लोभीवृत्तीने वरच्या वर्गाचे अनुसरुन करु लागला अथवा जीविका कमावू लागला तर राजाने त्याची सर्व संपत्ती जप्त करून त्याला तत्काल निष्कासित करावे.

१०.९८ जो इतराचा धर्म स्विकारतो तो स्वधर्मापासून वंचित होतो.

१०.१२१ जर एखादा शूद्र जीविकोपार्जन करु इच्छिल्यास त्याने प्रथम ब्राह्मणांची सेवा करावी. नंतर क्षत्रियाची सेवा करावी व क्षत्रियही न मिळाल्यास वैश्याची सेवा करावी.

१०.१२३ ब्राह्मणांची सेवा करणे हेच शूद्राचे प्रथम कर्तव्य आहे. असे न केल्यास शूद्राचे कर्म निष्फळ ठरतात.

१०.१२५ शेवटी शिल्लक राहिलेले अन्न शूद्राला द्यावे. वापरलेली वस्तू देखिल शूद्राला द्यावीत.

१०.१२८ इतर वर्णाची नींदा न करता शूद्र स्वतःची कर्म करित असेल तर तो स्वर्गलोकात प्रसंशित होतो.

१०.१२९ जर संपत्तीचा शूद्राला कितीही उपयोग असला तरी कोणत्याही शूद्राने संपत्तीचा संग्रह करु नये. कारण धनसंग्रहाने असा शूद्र माजतो व त्यामुळे ब्राह्मणांना त्रास संभवतो.

१०.१३० वरिल सगळी कर्तव्य त्या त्या वर्णांनी निर्धारित केल्याप्रमाणे अनुसरावित असे केल्यास त्यांना श्रेष्ठ जन्म प्राप्त होईल.

यातील काही विशेषाधिकार तर सामाजिक नसून आर्थिक होते –

८.३५ एखाद्याची संपत्ती जर स्वतःची असेल तर राजाने त्यातील ६ वा भाग घ्यावा.

८.३६ परंतु ती संपत्ती जर त्याची नसेल त्यातील काही भाग दंड म्हणून वसूल करावा.

८.३८. जमिनीत गाडलेली संपत्ती जर राज्यातील कुणाही व्यक्तीला सापडल्यास त्यातील अर्धा भाग राजाने दानस्वरुपात ब्राह्मणाना वाटावा व अर्धा भाग स्वतःकडे ठेवावा.

७.१३३ एखाद्या राजा मरत जरी असेल तर त्याने वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांकडून कर घेवू नये किंवा त्याच्या राज्यात राहणाऱ्या ब्राह्मणांना इजा देखिल पोहोचवू नये.

७.१३४ ज्या राजाच्या राज्यात ब्राह्मण भुकेने व्याकुळ राहतो. त्या राज्यात लवकरच अकाल पडतो.

९.१८८ व्यक्ती मृत झाल्यानंतर वेदांचे पठन केलेल्या ब्राह्मणांनाच पींडदान करावे. ब्राह्मणच अश्या मृत व्यक्तीचे कायदेशीर उत्तराधिकारी होतात.

**१०.१८९ ब्राह्मणांची संपत्ती राजाने कधीही घेवू नये. हा एक निश्चित नियम आहे. मर्यादा आणि परंतु इतरांची संपत्ती मात्र राजा तो व्यक्ती मृत्य झाल्यावर हिंसकावून घेऊ शकतो.**

१०.३ जातीगत उच्चतेमुळे, ज्ञानार्जन करण्याच्या अधिकारामुळे, यज्ञोपवित धारण केल्यामुळे ब्राह्मण हा तीनही वर्णाचा स्वामी आहे.

९.३१७ ब्राह्मण हा मुर्ख असो वा विद्वान दोनही रुपात श्रेष्ठ आहे.

९.९१९ जरी ब्राह्मण निंदनीय कर्म करित असेल तरी तो पूजनीय समजावा

कारण की तो श्रेष्ठ देवता आहे.

७.३५ राजाचे प्रयोजन चारही वर्णा द्वारे निर्धारित वर्णाद्वारे कर्म निर्धारित करणाऱ्यांवर देखरेख करणे आहे.

७.३७ सकाळी उठल्या बरोबर राजाने ब्राह्मणांची सेवा करावी व ब्राह्मणांचा म्हणण्यानुसारच पुढील कार्ये करावीत.

७.३८ वेदाध्ययन करणाऱ्या वरिष्ठ ब्राह्मणाची राजाने सेवा करावी.

९.३१८ एखाद्या घोर संकटात सापडल्यावरही राजाने ब्राह्मणांना राग आणू देवू नये.

यज्ञोपवित धारण करणे हा ब्राह्मणांचा महत्वाचा संस्कार आहे.

ब्राह्मणाच्या मुलाला आठव्या वर्षी, क्षत्रियाच्या मूलाला अकराव्या वर्षी तर वैश्याच्या मुलाला बाराव्या वर्षी यज्ञोपवित धारण करण्याचा संस्कार करावा.

२.१६९ द्विज म्हणविल्या जाणाऱ्या व्यक्तीचे तीन जन्म होतात. पहिला जन्म आईच्या गर्भातून. दुसरा जन्म यज्ञोपवित धारण केल्याने तर तिसरा जन्म यज्ञ कर्म केल्याने होत असतो. मनूने हे संस्कार शूद्र आणि स्त्रीयांना नाकारलेले आहेत.

मनूने इतरांच्या शिक्षणासंबंधी काहीही उल्लेख करित नाही. त्याला इतरांच्या शिक्षणासंबंधी काहीही घेणे देणे नाही. जनतेच्या सार्वत्रिक शिक्षणासंबंधी तो राज्याकरिता कोणतेही नियम सांगत नाही. तो केवळ वेदांच्या अध्ययनांबाबतच चिंतीत राहतो.

**त्यांच्या मते–**

ब्राह्मणांच्या परवानगी शिवाय कोणीही वेदाध्ययन करु शकत नाही. कुणीही स्वतःच्या मर्जीप्रमाणे वेदाध्ययन करू शकत नाही. जो कुणी असे करेल त्याच्यावर चोरीचा आरोप ठेवण्यात यावा.

२.११६ आचार्याच्या परवानगी शिवाय जो कुणीही वेदाध्ययन करेल तो शास्त्रांची चोरी करण्याचा अपराधी राहिल आणि तो नरकात जाईल.

९.१८ स्त्रियांना वेदाध्ययन करण्याचा अधिकार नाही. स्त्रियांद्वारे वेदाध्ययन हे एक पाप ठरते.

४.९९ शूद्राच्या सानिध्यात ब्राह्मणाने वेदाध्ययन मुळीच करु नये.

अयोग्य व्यक्तीद्वारा यज्ञ कार्य करणे अथवा वेदाध्ययन करणे अयोग्य आहे.

कायदेशीर कारवाईच्या वेळेस संबंधित पक्षाच्या स्थितीची व्याख्या मनूने केलेली आहे जी फौजदारी केससेशी संबंधित आहेत.

८.२६७ जो क्षत्रिय कोणत्याही ब्राह्मणाची मानहानी करेल तर त्याला शंभर पण, वैशाला दिडशे पण आणि याच अपराधाला शूद्राला फटके मारण्याची शिक्षा द्यावी.

८.२७० जर एखाद्या शूद्राने ब्राह्मणाला शीवी दिली तर त्याची जिभ काटावी कारण की तो ब्राह्मणाच्या खालच्या अंगाद्वारे उत्पन्न झालेला आहे.

८.२७१ जर तो ब्राह्मणाच्या नावाचे तिरस्कार पूर्वक उच्चारण करीत असेल तर त्याच्या तोंडात दहा उंगल लांब लोखंडाची सळाख घालावी.

८.२७२ जर एखादा शूद्र व्यक्ती ब्राह्मणाचा अभिमान पूर्वक त्याच्या कर्तव्याबद्दल जाणीव करून देत असला तर राजाने त्याचया तोंडात आणि कानात उकळते तेल ओतावे.

**शिव्या देणाच्या अपराधाबद्दल मनू म्हणतो –**

८.२७६ जर ब्राह्मण आणि क्षत्रिय एमेकांना शिव्या देत असतील तर राजाद्वारे ब्राह्मणांना कमीत कमी व क्षत्रियाला जास्त दंड द्यावा.

८.७७७ याच प्रकारचा दंड वैश्य आणि शूद्रांना देखील देण्यात यावा.

**मारपीट केल्याच्या अपराधाबद्दल मनू म्हणतो –**

८.२७९ खालच्या वर्गातील व्यक्ती जर वरच्या वर्णातील व्यक्तीला मारपीट करु लागला तर ज्या अंगाचा त्याने उपयोग केला ते अंग छाटून टाकावे.

८.२८० जर श्रदू व्यक्तीने हाताने मारले तर हात छाटावा व पायाने मारले तर पाय कापून टाकावे.

**खोट्या अभिमानाबद्दल मनू म्हणतो –**

८.२८१ जर खालच्या वर्गातील व्यक्ती वरच्या वर्गातील व्यक्तीच्या आसनावर बसला तर त्याच्या पाठीवर तापविलेले लोखंड ठेवावे किंवा त्यांचे नितंब कापावे.

८.२८२ जर एखादा शूद्र गर्वाने उच्च वर्णीयावर थुंकला तर त्याचे दोन्ही ओठ कापावे. लघवी केल्यास त्यांचे लिंग कापावे. घाण वारा सोडल्यास त्याची गुदा कापावी.

८.३५९ जर एखादा शूद्र वर्गाच्या व्यक्तीने उच्च वर्गातील स्त्रीशी व्याभिचार केला तर त्याला प्राणदंड द्यावा.

८.३६६ उच्च वर्गातील स्त्रीशी कनिष्ठ वर्णातील पुरुषाने प्रेम जरी केले तर त्याला शारिरीक दंड दयावा.

८.३७४ एखाद्या शुद्राने उच्च वर्णातील स्त्रीशी व्याभीचार केल्यास त्याचे लिंग कापावे. आणि त्याची सारी संपत्ती जप्त करावी.

८.३७७ जर एखाद्या वैश्य किंवा क्षत्रियांने उच्च वर्गातील स्त्रीशी व्याभिचार केला तर त्याला जीवंत जाळावे.

८.३८३ हेच कृत्य जर एखाद्या ब्राह्मणाने शूद्र स्त्रीशी केल्यास त्याला केवळ आर्थिक दंड द्यावा.

मनूचचे हे नियम शाश्वत आहेत. म्हणून यामध्ये कुठल्याही प्रकारचे परिवर्तन होवू शकत नाही. मनुच्या समोर जर मुख्य प्रश्न कुठला असेल तर याला लागू कसे करावे.

८.४१० राजाने वैश्याद्वारे व्यापार, कृषी किंवा पशूपालन होते आहे कि नाही ते पाहावे तसेच शूद्राद्वारे इतर तीनही वर्णाची सेवाचाकरी होत आहे की नाही हे सुद्धा पाहावे.

जर एखादा राजा आपले कर्तव्य करित नसेल तर तो एक अपराध आहे आणि त्याला सुद्धा दंडाचे प्रावधान आहे.

**अपराधाबद्दल राजाने दंडास्वरुपात धन ब्राह्मणांना प्रदान करावे.**

८.३४८. ब्राह्मणांच्या धर्मपालनात विघ्न निर्माण करणाऱ्या विरुद्ध ब्राह्मण शस्त्र धारण करु शकतो. किंबहुना ब्राह्मणांवर संकट निर्माण झाल्यास तो सुद्धा शस्त्र धारण करु शकतो.

विद्रोह करण्याचा अधिकार शूद्र वर्गाला सोडून इतर तीन वर्गाना देण्यात आला आहे. हे बहुधा संभवनीय आहे. की या अधिाराचा कायदा हा तीनही वर्णांना होता. परंतु समाज जर राजाने हि व्यवस्था समाप्त करण्याचाप्रयत्न केला व क्षत्रिय वर्गाने त्याला सहाय्य केले तर? अश्या परिस्थितीत राजाला दंड देण्याचा अधिकार ब्राह्मणांना देण्यात आला आहे.

९.३२० जर एखादा क्षत्रिय ब्राह्मणांच्या विरुद्ध शस्त्रधारण करति असेल तर ब्राह्मण त्याला स्वतः दंड देईल. कारण की मूलतः क्षत्रिय हे ब्राह्मणांपासूनच निर्माण झालेले आहेत.

मनू हा चातुवर्ण्य व्यवस्थेचा प्रबध समर्थक आहे म्हणूनच त्याने वरिल मौलिक परिवर्तने घडवून आणली. ब्राह्मणांद्वारे शस्त्र धारण करण्याचा आग्रह, हे असेल एक मूलभूत परिवर्तन आहे.

मनूपूर्व हा नियम अस्तित्वातच नव्हता. किंबहुना ब्राह्मणांद्वारे शस्त्र धारण करण्यास सक्त मनाई होती.

१.१०.२९.६ ब्राह्मणाला एखाद्या शस्त्राची तपासणी जरी करावयाची असेल तर तो त्या शस्त्राला हात लावू शकत नाही.

**मनूचा उत्तराधिकारी बौद्धायन म्हणतो –**

२.२४१८ गोरक्षणार्थ किंवा वर्णरक्षणार्थ ब्राह्मण स्वतःच्या हातात शस्त्र धारण करु शकतो. कारण की असे करणे शास्त्रसंमत आहे.

◆◆◆

# भगवतगीतेवर निबंध–प्रतिक्रांतीचे धार्मिक समर्थन
# "कृष्ण आणि त्याची गीता"

प्राचीन भारतीय साहित्यात गीतेचे कोणते स्थान आहे? ख्रिश्चन धर्माचा बायबल हा जसा धर्मग्रंथ आहे. तसाच तो हिंदू धर्माचा धर्मग्रंथ आहे काय? हिंदू या ग्रंथाला धर्मग्रंथ मानतात. जर 'गीता' हा धर्मग्रंथ आहे तर तो काय शिकवण देतो? कोणत्या सिद्धांतांचे 'गीता' प्रतिपादन करते. याविषयावर विद्वानात मतभेद आहेत. हे मतभेद पाहता वाचकास आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीत.

**बोटलिंग्क लिहितो** – गीतेमध्ये उच्च व सुंदर भाव आहेत. पण सोबतच काही विरोधात्मक बाबीसुद्धा गीतेमध्ये आढळतात, ठिकठिकाणी पुनरावृत्ती, अतिशयोक्ती, विसंगती आणि अर्थहीन उदाहरणे आपणास गीतेमध्ये पाहावयास मिळतात.

**होपकिन्स म्हणतो** – गीता ही महत्वपूर्णता व महत्त्वहीनता, तर्कपूर्णता व तर्कहीनता, यामुळे हिंदू साहित्यात एक विलक्षण कृती मानली जाते. आदिम तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतांची गीता म्हणजे विचित्र समुच्चय (भेसळ) आहे.

**पुढे हॉपकिन्स म्हणतो** – एखाद्या काव्यकृतीच्या दृष्टीकोनातून पाहता गीता ही कमजोर रचना आहे. एकाच गोष्टीला वारवार सांगण्यात आले आहे. शब्द आणि अर्थाच्या विसंगतीची शेकडो उदाहरणे आहेत. सगळ्या बाबी पाहता गीता हे अद्‌भूत काव्य आहे, हे निरिक्षणाअंती आश्चर्यकारक वाटते."

**होटजनमैन म्हणतो** – भगवत्‌गीता ही सर्वेश्वरवादी काव्याचा वैष्णव ग्रंथ आहे.

**गोर्बे – म्हणतो** – "कृष्ण नावाचा देवता मानवरुप धारण करून श्रोत्यांना उपदेश देतो व हे सागतो की, प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे पालन केलेच पाहिजे. गीतेत सर्वेश्वरवाद व ईश्वरवाद एक दुसऱ्यात मिळविण्यात आलेले आहे.

**श्री तेलंग यांच्या मते** – "गीतेमध्ये अशी अनेक स्थळे आहेत ज्यांचा एकदुसऱ्याशी योग्य जुळत नाही. याबद्दल कुणीही प्रयत्न देखील केलेला नाही. गीतेमध्ये जी काही विसंगती पाहावयास मिळते. त्याबद्दल गीतेच्या रचनाकाराला माहिती होती. सत्यगोष्टीबद्दल केवळ अनुमान काढण्यात आलेले आहे. अनेक अर्ध सत्य बाबींना इतरत्र परुन ठेवलेले आहे. परंतु या इतस्तः विखुरलेल्या अर्धसत्यांना एकत्र करण्याचा कुणीही प्रयत्न देखील केलेला नाही.

आधुनिक अश्या विचारवंताचे हे विचार आहेत -

जुन्या रुढीवादी पंडितांच्या विचारात गीतेबाबत बरीच तफावत दिसून येते.

(१) एक मत हे सुद्धा आहे की भगवतगीता हा कुठल्याही विशेष धार्मिक संप्रदायाचा ग्रंथ नसून मोक्ष प्राप्तीच समान (एकाच) मार्गाचे प्रतिपादन करतो तो मार्ग आहे -

१) कर्म मार्ग; २) भक्ति मार्ग आणि ३) ज्ञान मार्ग या तीनही मार्गाद्वारे मोक्षप्राप्तीची हमी गीतेद्वारा देण्यात येते. आपल्या मनाच्या समर्थनाथ ही रुढीवादी मंडळी खालील अध्यायाचा पुरावा म्हणून उल्लेख करतात.

**या ग्रंथातील एकूण १८ अध्याया पैकी -**

१) १ ते ६ मध्ये ज्ञानमार्ग -

२) ७ ते १२ मध्ये कर्म मार्ग - आणि

३) १३ ते १८ मध्ये भक्त मार्गाचा उपदेश करण्यात आला आहे.

रुढीवाद्यांच्या मते वरिल तीनही मार्ग मोक्ष प्राप्ती करीता आवश्यक आहेत असे गीता प्रतिपादित करते.

रुढीवादी लेखकांच्या श्रेणीमध्ये शंकराचार्य आणि टिळकांचा समावेश होऊन देखील या दोघांची मते परंपरेपेक्षा वेगळी आहेत.

**शंकराचार्याच्या मते** गीतेमध्ये ज्ञानमार्गाचा उपदेश करण्यात आलेला आहे. आणि मोक्षप्राप्त करित ज्ञानमार्ग हा एकच योगय असा मार्ग आहे. गीतेमध्ये अनेक विसंगती आहे ही बाबच टिळक मानावयास तयार नाही. उलट ते या गोष्टीचे खंडन करतात.

मोखप्राप्तीचे तीनही मार्ग योग्य आहेत या रुढीवादी पंडितांच्या मतलादेखील मानण्यास टिळक तयार नाहीत. शंकराचार्याच्या मताप्रमाणे टिळकांचे देखील मत हे की गीता ही एका निश्चित मार्गाची शिकवण देते. टिळकांच्या मते गीता ही ज्ञानमार्गाचा उपदेश देते.

गीतेमध्ये जे काही सांगण्यात आलेले आहे. त्याबद्दल विदवानात इतके मतभेद कां आहेत, याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटते. परंतु कुणीही विचारु शकेल की विदवानात इतके मतभेद कां आहेत. माझ्या मते या सर्व विद्वानांनी गीतेमध्ये अश्या गोष्टीचा शोध लावण्याचा प्रयत्न केले जे खोटे आहे, भ्रामक आहे. हे विद्वान लोक कुराणामध्ये, बायबलमध्ये आणि धर्मपदामध्ये जो धार्मिक उपदेश सांगण्यात आलेला आहे. अश्या धार्मिक उपदेशाचा शोधाशोध गीतेमध्ये करतात.

**माझ्या माहितीप्रमाणे असा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. ईश्वरवाणी नसल्यामुळे गीतेमध्ये कोणताही धार्मिक संदेश नाही आणि असा संदेश शोधणे**

हे देखील व्यर्थ आहे. निसंदेह कुणीही प्रश्न करील की गीता ही जर इश्वरवाणी नाही तर आहे तरी काय? याला माझे उत्तर हे आहे की भगवतगीता हा धर्मग्रंथ ही नाही अथवा तत्वज्ञानाचा ग्रंथ देखील नाही. जर कुणी व्यक्ती भगवतगीतेला धर्मग्रंथ किंवा तत्वज्ञानाचा ग्रंथ म्हणवून घेत असेल तर स्वतःचीच फसगत करून घेत आहे. वस्तुतः गीता हा धर्मग्रंथही नाही किंवा तत्वज्ञानाचा ग्रंथदेखील नाही. या ग्रंथामध्ये प्रतिक्रांतीच्या दार्शनिक तत्वज्ञानाचे धार्मिक आधारावर समर्थन करण्यात आलेले आहे.

सर्वप्रथम गीतेमध्ये कुठली बाब पहायला मिळत असेल तर ती म्हणजे युद्धाचे समर्थन होय. युद्धाचे तत्त्वज्ञानाच्या आधारावर, समर्थन दोन तर्क देऊन करण्यात आला आहे. प्रथम हा की, जग हे नश्वर आहे व मनुष्य मृत्यूधर्मी आहे. वस्तुचा अंत होणे निश्चित आहे. बुद्धिमान व्यक्तीच्या दृष्टीकोनात ही बाब निरर्थक आहे की, मृत्यु स्वाभाविकपणे होतो की, युद्धात हिंसेद्वारे. जे स्वाभाविक असेल, जे नष्ट होणारे आहे त्याबद्दल रडण्यात काय हाशिल. मृत्यू अनविार्य आहे. आत्मा अमर असतो आत्मा केव्हाही मरत नसतो. इतकेच नव्हे तर याला वायू नष्ट करु शकत नाही. अग्नि याला जाळू शकत नाही. शस्त्र याला कापू शकत नाही. म्हणून हे मानणे निरर्थक आहे की, व्यक्ती मेल्यानंतर शरीराचे काय होते? ज्याप्रमाणे एखादा व्यक्ति नविन वस्त्र धारण करतो, त्याचप्रमाणे आत्मासुद्धा नवीन शरीर धारण करते. म्हणून स्वाभाविकरित्या मरणे किंवा युद्धात मरणे यात कुठलाही फरक नाही.

आणखी एका सिद्धातांचे प्रतिपादन भगवतगीते मध्ये करण्यात आले आहे आणि ते म्हणजे चालुवर्ण्याचे तात्वीक समर्थन. निसंदेह गीतेमध्ये सांगितले आहे की, चातुवर्ण्याची निर्मिती ही ईश्वराद्वारे करण्यात आलेली आहे आणि म्हणूनच चातुवर्ण्य हे पवित्र आहे. केवळ पवित्र आहे म्हणूनच ती इश्वरवाणी आहे हे नसून किंबहुना याला तत्वज्ञानाच्या आधारावर समर्थन केले गेले आहे. चातुवर्ण हे माणसाच्या स्वाभाविक व जन्मजात गुणांवर आधारित ईश्वराद्वारे निर्माण करण्यात आले आहे.

भगवतगीतेचा तिसरा सिद्धांत हा कर्मयोगाला धर्माचे तात्त्विक आधारावर समर्थन देण्याबाबतचा आहे. गीतेनुसार कर्म मार्ग म्हणजे मोक्षप्राप्ती करिता यज्ञ याग करणे होय. गीतेमध्ये कर्मयोगाचे प्रतिपादन केले गेले आणि कर्मयोगातून अनावश्यकरित्या बाहेर पडणाऱ्या बाबींचे निराकरण केले गेले आहे. ह्या बाबी कुशलतेने लपविण्यात आल्या आहेत किंवा विकृत तरी केल्या गेल्या आहेत. पहिली बाब आहे अंधश्रद्धा. खरा कर्मयोग हा कर्मकांड करणे होय. आणि यामध्ये कुठलेही चुकीचे आचरण नाही. हाच कर्मयोग म्हणजेच अंधश्रद्धा गीतेद्वारा प्रतिपादण्यात आली आहे.

गीतेतील दुसरा दोष म्हणजे या कर्मकांडामागे स्वार्थ साधणे हा होय. हा स्वार्थ लपविण्याकरिता भगवतगीतेमध्ये अनासक्तीयोग अर्थात कर्मफलाची इच्छा न

करता कर्म करीत राहणे या सिद्धांताचे समर्थन होय. या आधारावर कर्मकांड करणे कधीही वाइट होवू शकत नाही. अश्याच प्रकारे इतर बाबींचा शोधाशोध करणे देखील आवश्यक आहे. ज्यांचा समावेश पूर्वी गीतेमध्ये नव्हता व त्यानंतर त्यांचे प्रतिक्रांतीचे अधिकारिक पुस्तक ज्याला प्रतिक्रांतीचे बायबल म्हणतो त्या जमिनीकृत पूर्व मिमांसेचे, प्रतिपादन, गीतेमध्ये करण्यात आलेले आहे. धार्मिक आधारावर समर्थन करून गीतेमध्ये घूसडून देण्यात आलेला आहेत.

हा एक शोध प्रबंधाचा विषय आहे. याठिकाणी मात्र प्राचीन भारतीय साहित्यात गीतेचे स्थान कोणते होते ते निश्चित करणे एवढेच आहे. म्हणूनच मी मुख्य सिद्धांताची निवड केलेली आहे. मी केलेल्या व्याख्येतून दोन प्रश्न निर्माण होतात.

१) भगवतगीतेमध्ये ज्या सिद्धान्ताचे धार्मिक आधारावर समर्थन केले गेले आहे ते कुणाचे आहोत?

भगवतगीतेमध्ये या सिद्धांताची समर्थन करण्याची गरज यांना कां भासली?

पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करु. गीतेमध्ये ज्या सिद्धांताचे समर्थन केले गेले आहेत ते प्रतिक्रांतीचे सिद्धांत आहेत. आणि हे सिद्धान्त पतिक्रांतीचे अधिकारित पुस्तक जैमिनीकृत पूर्वीमिमांसामध्ये वर्णित आहेत. या तकाला स्विकार करण्यामागे कोणताही संकोच नसावा. अडचण जर कुठली असेल कर्मयोग या शब्दाचा चुकीचा अर्थ स्विकारण्याची आहे. भगवतगीतेचे बहुतेक भाष्यकार कर्मयोग या शब्दाचा अर्थ 'कार्य' आणि 'ज्ञानयोग' शब्दाचा अनुवाद ''ज्ञान'' असा करतात. आणि भगवतगीतेमध्ये सामान्यपणे ज्ञान आणि कर्माच्या फरकांसबंधी विवेचन केले आहे असाच समज करून घेतात, हा समज फारच चुकीचा आहे. भगवतगीतेचा उद्देश कर्म आणि ज्ञान सांगणे असा चुकीचा लावण्यात आला आहे. भगवत गीतेचा उद्देश कर्म आणि ज्ञान यासंबंधित तात्विक चर्चा करणे हा नाही. वास्तविक पाहता गीतेचा संबंध सामान्य विषय नसून 'विशेष विषय' हा आहे.

गीतेमध्ये सांगितलेला कर्मयोग अथवा कर्माचा संबंध जैमिनीने सांगितलेल्या कर्मकांडाशी आहे. आणि ज्ञान योग किंवा ज्ञानाचा संबंध त्या विदवानांशी आहे जे बादरायणने ब्रह्मसुत्रांत दिलेले आहे. गीतेमधील कर्माचा अर्थ कर्म किंवा अकर्म, निवृत्तीवाद किंवा प्रवृत्ती वाद याच्याशी नाहीतर. सामान्यपणे गीतेतील कर्माचा अर्थ धार्मिक अनुष्ठान किंवा त्याच्या पालनाशी संबंधित आहे. जो कुणी गीता वाचेल त्याला हे निश्चित कळून येईल. एखाद्या शुद्र गोष्टीच्या वादविवादामध्ये गुंतलेल्या वर्गाच्या स्तराला वर उचलण्याच्या संदर्भात प्राचाराचे साहित्य म्हणून गीता लिहिली गेली आहे. आभास मात्र असा करण्यात आला की हा ग्रंथ एखाद्या विशेष तत्वज्ञानावर आणि त्याच्या अर्थावर सविस्तरपणे लिहिलेला आहे. आणि म्हणूनच कर्म आणि ज्ञान या शब्दाच्या अर्थाचा विस्तार करण्यात आला आणि याच्या सामान्य स्वरूपात

स्विकारण्यात आला. देशभक्त भारतीयांनी याचा दोष टिळकांना दिला पाहिजे. या शब्दांचा चुकीचा अर्थ लावल्याने परिणाम असा घडून आला की लोक भ्रमित झाले.

परिणामतः भगवतगीता हा एक स्वतंत्र आणि स्वतः एक पूर्ण ग्रंथ आहे. असा विश्वास लोकांनी करून घेतला. परंतु या ग्रंथामध्ये कर्म आणि ज्ञानाचा काडीइतका ही संबंध नाही.

परंतु एखाद्या व्यक्तीने कर्मयोगाचा भगवतगीतेतील अर्थ स्विकारायचा म्हटल्यास गीतेमध्ये कर्मयोगाचा आशय जैमिनीद्वारा प्रतिपादीत कर्मकांडाशी आहे. याच कर्मकांडांना गीतेद्वारे पुनर्जीवित आणि प्रतिष्ठापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आता आपण दुसऱ्या प्रश्नांबाबत विचार करू या. भगवतगीतेमध्ये प्रतिक्रांतिच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन कां करण्यात आले आहे? माझ्या विचाराने याचे उत्तर सरळ आहे. हे बौद्ध धम्माच्या जबरदस्त प्रभावापासून ब्राह्मणवादाचे रक्षण करण्यासाठीच भगवतगीतेची रचना करण्यात आली. बुद्धाने अहिंसेचा उपदेश दिला. केवळ उपदेशच दिली नाही तर ब्राह्मणांना सोडून बहुसंख्य समजाने अहिंसेचा जीवनशैलीच्या स्वरूपात स्वीकार केला. हिंसेबद्दल तत्कालीन समाजात घृणा निर्माण झाली होती. बुद्धाने चार्तुवर्ण्याचा सिरूद्ध उपदेश दिला. बुद्धाने चातुवर्ण्याचे खंडन तीव्र शब्दात केले आहे. बुद्धाच्या शिकवणीने चातुवर्ण्याचा डोलाराच उद्धवस्त झाला. चातुवर्ण्य उलटसुलट रचलेले होते. बुद्धाने लोकांना समजावून सांगितले की चातुवर्ण्याच्या आड ब्राह्मणांचे स्वार्थ दडलेले आहे. बुद्धाच्या अश्या शिकवणीमुळे चार्तुवण्याचा डोलाराच उद्धवस्त झाला.

बुद्धाच्या या क्रांतीकारी तत्त्वज्ञानाला ब्राह्मणवाद्याचे काय उत्तर होते? हेच की वेद हे अपौरूषेय (ईश्वरनिर्मित) असून त्यांच्याबद्दल कुठलीही शंका घेता येत नाही.

बौद्धकाल हा भारतील सर्वात प्रबुद्ध व विवेकवादी काळ होता. अशा काळात ब्राह्मणवाद दुराग्रह, कर्मकांड, अविवेक व खोट्या धारणावर आधारीत असल्यामुळे त्यांच्या मुळावरच आघात बसला. अहिंसेला बहुजन समाजाने स्विकारल्यानंतर ब्राह्मणवाद्यांची हिंसा व चातुवर्ण्याचा सिद्धांत स्विकारण्याची बहुजन समाजाला काय गरज? बौद्ध धम्माच्या वाढत्या प्रभावाने जैमिनीचे प्रतिक्रियावादी सिद्धांत मोडकळीस आलेले होते आणि याला धार्मिक तत्वांच्या आधारावर समर्थन हवे होते. असे समर्थन भगवतगीतेद्वारा केले गेले. क्षत्रियांचे कर्तव्य फक्त हत्या करणे या तत्वाचे भगवतगीते द्वारा धार्मिक आधारावर समर्थन एक मुर्खतापूर्ण गोष्ट आहे. या अधारावर हत्या करणे हे हत्या करणेच नव्हे असे प्रतिपादण आहे. कारण की शरीर नष्ट होते आत्मा नष्ट होत नाही या तत्वाचि या आधारावर हत्येचे समर्थन कर्माच्या बचावाशी संबंधित आहे.

आज जर कृष्णाला हत्येच्या संदर्भात बचावपक्षाचा वकिल म्हणून न्यायालयात उभे राहण्याचा प्रसंग आला असता तर त्याला पागलखान्यात ठेवावे लागले असते. हत्येप्रमाणेच गीतेद्वारा चातुवर्ण्याचे समर्थन करणे देखील तीतकेच विसंगत आहे. कृष्ण चातुवर्ण्याचे समर्थन सांख्यतत्वांच्या आधारावर करतो. सांख्य तत्वानुसार तीनच गुण असतात मग चातुवर्ण्याचे समर्थन करायचे तरी कसे? भगवतगीतेचे चातुवर्ण्याचे समर्थन करण्याचा जो मुर्खतापूर्व प्रयत्न करण्यात आलेला तो फारच नीच असा आहे. यावर एक क्षणभरमात्र विचार करण्याची गरज नाही. भगवतगीतेची ही भूमिका क्रांतीकारकांना कितीही धाडसाची वाटली तरी यामध्ये कुठलीही शंका नाही की भगवतगीतेने प्रतिक्रांती पुर्नजीवन प्रदानकेले आणि जर आज जी काही प्रतिक्रांती आपणास पाहावयास मिळते त्याचे मुळभगवतगीते द्वारा या तत्वाचे समर्थन धार्मिक आधारावर करण्यात आलेले आहे हे होय. गीताही कुठल्याही प्रकारे वेद आणि शास्त्राच्या विरोधी नाही उलट या दोघांचेही समर्थन गीता करते. अश्याप्रकारे भगवतगीता आणि जैमिनीचे पूर्वमिमांसा यामध्ये कसल्याही प्रकारचे अंतर नाही अंतर जर कुठले असेल तर भगवतगीता ही जोर देवून दृढतेने प्रतिक्रांतीचे समर्थन करते तर जैमिनीचे पूर्व-मिमांसा तीतकासा जोर प्रतिक्रांतीवर देत नाही. भगवतीगीता वैशिष्ट्युपूर्ण यासाठी आहे कारण की प्रतिक्रांतीला धर्मतत्वांचा स्थायी आधार प्राप्त करून देते. जो यापूर्वी कधीही प्राप्त नव्हता. धर्मतत्वांचा आधार गीतेने घेतला नसता तर प्रतिक्रांती अस्तित्वातच नसती. चातुवर्ण्याचा प्रसार आणि त्याला चिरस्थायीत्व प्राप्त करून देणे हाच भगवतगीतेचा मुख्य विषय आहे. वास्तविक पाहता भगवत गीतेमध्ये चातुवर्ण्याचे समर्थन एक वेडेपणाचे व मुर्खपणाचे कार्य आहे. हा वेडेपणा व मुर्खपणा प्रतिक्रांति वाद्यांनी धार्मिक आधारावर केला आहे.

भगवतीतेचा अध्याय १८, श्लोक ४१ ते ४८ मध्ये कृष्णाने म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्णावर आधारित कर्तव्याप्रमाणे कर्म केले पाहिजे. असे जर त्याने केले नाही तर त्याला मोक्ष प्राप्त होणार नाही. अर्थात शूद्राला मोक्षलाभ पाहिजे असेल तर त्याने उच्च वर्णाच्या व्यक्तीची सेवा केलीच पाहिजे.

१) थोडक्यात शूद्र हा कितीही महान भक्त असला व त्याने शूद्राचे कर्तव्य केले नाही कर्तव्याचे उल्लंघन केले अर्थात त्याने उच्च वर्गाची सेवा करून जीवनीर्वाह केला नाही तर त्याला मोक्ष प्रापत होऊ शकत नाही.

२) जैमिनीच्या सिद्धांताला नवीन आधारावर समर्थन प्राप्त करून देणे कमीत कमी त्या तत्वांना धर्मतत्वांचा आधार प्राप्त करून देणे जे जैमिनीच्या नंतर लिहिण्यात आले.

३) माझे तीसरे अनुमान आहे की बौद्ध धम्माच्या क्रांतीकारी आणि बुद्धीवादी विचारांच्या समर्थन प्राप्त करून दृढ केले. अधिकांश भारतीय विदवानाचे मत आहे

की गीताही अतिप्राचीन काळातील रचना आहे. परंतु अत्यंत सखोल अशी चाकशी केली असता याची साक्ष्य पटते की गीतेची रचना जैमिनीचे पूर्व मीमांसा आणि बादरायणाच्या ब्रह्मसुत्रानंतरच झालेली आहे.

गीता आणि बौद्ध धम्म दोन्ही एकाच वेळी झालेल्या क्रांतीची अभिव्यक्ती आहेत. ज्यावेळेला बौद्ध धम्माचा प्रभाव ब्राह्मण धर्मावर खूपच वाढला आणि बौद्ध क्रांतीने तत्कालीन समाज व्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन घडवून आणले त्यावेळी गीता प्रारंभीक अवस्थेत होती. म्हणूनच गीतेतील सिद्धांताला धार्मिक तत्वांच्या आधाराची गरज भासू लागली. गीतेमध्ये जे जे अंग दुर्बल असतील त्या अंगाना बल देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सैद्धान्तिकपणे विद्वानात हीच धारणा आहे की, बौद्ध धम्म हा प्राचीन ब्राह्मणीधर्माचेच एक रूप आहे. भगवतगीतेवर बौद्धधम्माचा कुठल्याही प्रकारचा प्रभाव आहे हे मानण्यासच मुळी ही मंडळी तयार नाही. हा दृष्टीकोन टिळक आणि राधाकृष्णन यांचा आहे.

जेव्हा जेव्हा बौद्ध धम्मातील सिद्धांतांना गीतेमध्ये समर्थन केलेले आढळते तेव्हा तेव्हा हे विद्वान या गोष्टीला नकार देतात की बौद्ध धम्म आणि गीतेमध्ये बरेचसे साम्य आहे.

गीता आणि बौद्ध धम्माचे तुलनात्मक अध्ययन ज्याने केले आहे त्याला तर फारच धक्का पोहोचल्याशिवाय राहात नाही कारण की गीतेमध्ये सांख्य तत्वज्ञानच सांगण्यात आले आहे तेव्हा हे स्पष्टच आहे की गीता ही बौद्ध विचारांनी भरलेली आहे.

ही समानता केवळ विचारांचीच नाही तर भाषेची देखील आहे. काही उदाहरणे देवून हे स्पष्ट करता येवू शकते.

भगवतगीतेमध्ये ब्रह्म निर्वाणावर विवेचन केले आहे. एखादा व्यक्ती ब्रह्मण निर्वाण पदाला केव्हा पोहचतो? याबद्दल गीतेत सांगितलेले आहे.

१) श्रद्धा (स्वतःवर विश्वास)
२) व्यवसाय (दृढ विश्वास)
३) स्मृति (ध्येयप्राप्ती)
४) समाधी (एकाग्रता) आणि
५) प्रज्ञा (अंतदृष्टी किंवा ज्ञान)

**आता गीतेमध्ये हा निर्वाण सिद्धांत कुठून (कोणाकडून) आला? निश्चितच हा सिद्धांत उपनिषदांमधून आलेला नाही. कारण की उपनिषदांमध्ये 'निर्वाण' शब्दाचा उल्लेख नाही.**

**गीतेतील ही ब्रह्म निर्वाणाची संपूर्ण विचारसरणी महापरिनिर्वाण**

सुत्तामध्ये सांगितलेली आहे. आता सांगा, काय हा विचार गीतेने चोरलेला नाही? ही विचारसरणी बौद्ध धम्मापासून चोरुन ती लपविण्याचाच प्रयत्न गीतेने केला आहे.

दुसरे एका उदाहरणानुसार अध्यय ७ श्लोक १३ ते २० नुसार कृष्णाच्या म्हणण्याप्रमाणे खरा भक्त कोण आहे? तर जो १) मैत्री, २) करुणा (दया), ३) मुदिता व ४) उपेक्षा या चार तत्त्वांचे पालन करतो तो.

आता भवतीगीतेमध्ये खऱ्या भक्ताचे हे गुण कोठुन (कुणाकडून) घेतले आहेत? हे गुण सुद्धा बौद्ध धम्मातून उधार घेतलेले आहे. ज्यांना याची खात्री करावयाची असेल त्यांनी बौद्ध धम्माचे ''महापदान सुत्त'' व 'तेविज्ज सुत्त'' पहावे.

सारांश स्वरुपात आपण हे सिद्ध करून म्हणू शकतो की, बौद्ध धम्माच्या सुत्रावरच गीतेची रचना करण्यात आली. जेवढी समानता बौद्ध धम्म आणि गीतेमध्ये आढळते तेवढी इतरत्र कुठेही आढळत नाही. विद्वानांनी बौद्ध धम्माचे हे ऋण मान्य केले पाहिजे. परंतु टिळक व राधाकृष्णन यांनी ही बाबा टाळून बुद्धी कौशल्याची चलाखी केलेली आहे.

भगवतगीतेची अवस्था ही ऋण घेणाऱ्या याचकाची असून बौद्ध धम्माची स्थिती ही दान देणाऱ्या दानदात्याची आहे.

पिढ्यानपिढ्या ब्राह्मणांनी बौद्ध धम्माप्रती तिरस्काराची भावना स्वीकारल्यामुळे लोकांचा भ्रामक कल्पनांवर विश्वास बसलेला आहे. परंतु इतिहास मात्र सत्य शाूधन सांगतो की, भगवतगीतेला जे काही महत्त्व आहे ते केवळ बौद्ध धम्माच्या सिद्धांतामुळे.

◆◆◆

# ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय

हिंदूच्या धर्मग्रंथात ब्राह्मणाविरूद्ध क्षत्रिय यांच्यामध्ये संघर्षाची वर्णन अनेक ठिकाणी मिळतात. स्वतःच्या वर्गाच्या हिताचे रक्षण करण्याकरीता यामध्ये अनेकदा रक्तपात देखील घडून आलेला आहे. सर्वप्रथम उल्लेख 'वेण' राजाचा येतो.

वेन हा यज्ञकर्माच्या विरूद्ध होता. वेणापासून ब्राह्मणांना यज्ञकर्मात बाधा येत होती तेव्हा मारीचा या ऋषीच्या नेतृत्वात सर्व मोठमोठ्या ऋषींनी त्याला पकडून रगडले. त्यातून निषिथ याची उत्पत्ती झाली. हाच निषाद वंशाचा प्रवर्तक होता. याच निषादांपासून ढिवर लोकांची उत्पत्ती झाली.

दुसरे उदाहरण पुरूरवा याचे आहे. हा एक क्षत्रिय राजा होता. हा इतकाचा पुत्र आणि वैवस्वत याचा नातू होता.

यांचा संघर्ष नहुष आणि ब्राह्मणांमध्ये घडून आला जो काहीसा गंभीर असा होता. नहुष पुरूरवाचा नातू होता. महाभारतात याचा उल्लेख दोन ठिकाणी आहे. एक वन पर्वात आणि दुसरा उद्योग पर्वात.

चौथे उदाहरण निमि राजाचे आहे. निमि हा इश्वाकू च्या पुत्रांपैकी एक होता. ब्राह्मणांसोबत झालेल्या नीमिचे वर्णन विष्णुपूराणात पहावयास मिळते.

पांचवे उदाहरण वशिष्ट आणि विश्वमित्र यांच्यामधील आहे. वशिष्ट हा ब्राह्मण पुरोहित होता आणि विश्वमित्र एक क्षत्रिय होते. विश्वमित्रांची इच्छा ब्रहामर्षी बनण्याची होती. या संघर्षाचे वर्णन रामायणामध्ये आढळते. विश्वमित्र आणि वशिष्ट यातील संघर्ष सुदासच्या काळापासून चालत आलेला होता. सुदास हा इश्वाकु वंशातील होता. वशिष्ट हे सुदासाचे कुलपुरोहित होते. काही कारणास्तव सुदास याने विश्वमित्राला आपला कुलपुरोहीत नियुक्त केले. यावरून विश्वमित्र आणि वशिष्ट यांच्यामध्ये संघर्ष घडून आला आणि हा संघर्ष दीर्घकाळापर्यंत सुरु राहिला.

एक अन्य उदाहरण अम्बरिष नावाच्या अयोध्येच्या राजाचे आहे. एक अन्य घटना त्रिशंकू राजाचा पूत्र हरिश्चंद्र याची आहे.

या कथेची वर्णन विष्णुपुराणात आणि मार्कन्डेय पुराणात वाचावयास मिळते. जगदग्नी याचा पुत्र परशुराम याचा व क्षत्रियांचा सुप्रसिद्ध संघर्ष आपणांस महाभारतात वाचावयास मिळतो.

या परशुरामाचे २१ वेळा पृथ्वी क्षत्रियांविहिन केली. या क्षत्रियांच्या विधवा स्त्रियांपासून वर्तमान क्षत्रिय उत्पन्न झाले असे शास्त्रात वर्णित करण्यात आले.

मनू हा क्षत्रिय व ब्राह्मणांमध्ये समेट घडवून आणण्यास उत्सुक होता. एवढा मरणांतक संघर्ष घडून आल्यावर देखील हे सगळे रहस्यमय वाटते. ब्राह्मणांची अचानक अधोगति, का झाली? क्षत्रियांना जिंकण्यासाठी 'ब्राह्मणांचा असफल प्रयत्न कां घडला? या रहस्याचे कारण काय असावे?'

◆◆◆

# शूद्र आणि प्रतिक्रांती

मनुस्मृतीचे अध्ययन केल्यास शूद्रांच्या स्थितीविषयी मनूच्या नियमात अत्यंत आश्चर्यकारक माहिती मिळते. हिंदू समाजाचा सर्वात मोठ्या संख्येने अधिक असलेल्या भागविषयी हिंदुच्या मनोवृत्तीचे निर्धारण त्यावेळेला आणि वेळोवेळी या नियमांनी केले आहे. या नियमांना खाली दिलेले आहे. ज्यावरुन वाचकांना शूद्रांच्या स्थितीविषयी पूर्ण माहिती मिळेल.

४.६१ मनु हा ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य गृहस्थांना आदेश देतो की, ज्या देशाचा शासक शूद्र असेल त्या देशात त्यांनी राहू नये. शूद्र हा सन्मानित व्यक्ती होऊ शकत नाही. याबाबतीत मनू म्हणतो-

११.२४ ब्राह्मण कधीही यज्ञकार्यासारख्या धार्मिक कार्याला शूद्राकडे धन मागणार नाही.

शूद्रावर सर्व प्रकारच्या विवाहांना बंदी घालण्यात आली. तिनही उच्च वर्णाच्या स्त्रियांशी विवाह करण्यास शूद्रांना मनाई मरण्यात आली. वरिष्ठ वर्गाच्या स्त्रियांशी शूद्रांनी कोणताही संबंध ठेवू नये असा मनुद्वारे शूद्रांना आदेश देण्यात आला आणि शूद्राने जर तिच्याशी व्याभिचार केला तर त्याला मृत्यूदंडाच्या शिक्षेचे प्रावधान करण्यात आले.

८.३७४ शूद्राने उच्च वर्णाच्या संरक्षित अथवा असंरक्षित स्त्रीशी संभोग केला तर त्याला खालीलप्रमाणे शिक्षा द्यावी. स्त्री जर असंरक्षित असेल तर गुन्हा करणाऱ्याच्या अवयव कापून टाकवा आणि ती जर संरक्षित असेल तर त्याला ठार करुन त्याची मालमत्ता जप्त करावी.

८.२० जर एखादा ब्राह्मण जन्माने केवळ ब्राह्मण असेल व त्याने वेदांचे अध्ययन केले असेल वा नसेल तरीही राजाला अशा ब्राह्मणाला न्यायाधीश बनविण्याचा अधिकार आहे परंतु शूद्र कितीही विद्वान असला तरी त्याला तो अधिकार देऊ नये.

८.२१ शूद्राद्वारे न्यायदान करण्यात येणारे राज्य अधोगतीला पोहोचते.

८.२७२ शूद्राने जर उद्यामपणे ब्राह्मणाला धर्मोपदेश देण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या तोंडात व कानात उकळते तेल टाकावे.

**शूद्राद्वारे ज्ञानार्जन करण्यासंबंधी मनू म्हणतो-**

३.१५६ जो, शूद्र शिष्यांना शिक्षण देतो व ज्या शूद्रांचा तो शिक्षक होतो तो, शूद्रांचा शिक्षक या संबंधाने अयोग्य ठरविला जातो.

४.९९ त्याने (ब्राह्मणाने) शूद्राच्या उपस्थितीत कधीही वेदपाठ करू नये.

शूद्राने वेदाध्ययन केल्यावर दंडाचे नियम तर मनूच्या नंतरच्या स्मृतिकारांनी अधिकच कठोर असे बनविले. उदाहरणार्थ कालायनने असे सांगितले आहे की, शूद्राने जर वेद ऐकले तर किंवा वेदातील एखाद्या शब्दाचा उच्चार जरी केला तर राजा त्याच्या जिभेचे दोन तुकडे करील आणि त्याच्या कानात उकळलेले शिसे टाकील.

शूद्रांने मालमत्ता बाळगण्यासंबंधी मनूचे नियम खालीलप्रमाणे -

१०.१२९ धनसंपती जमविण्यास शूद्र समर्थ असले तरी देखील त्याने ती जमवू नये कारण धनसंपत्ति जमविल्यावर असा शूद्र अहंकारी बनतो.

८.४१७ जर एखादा ब्राह्मण आपली जीविकोपार्जन करण्यास असमर्थ असेल तर निसंकोच तो शूद्राची संपत्ती हिसकावून घेऊ शकतो.

शूद्र केवळ एकच व्यवसाय करू शकतो. मनूच्या आठ अपरिवर्तनीय नियमांमध्ये हा सुद्धा अपरिवर्तनीय नियम आहे. याबाबतीत मनू म्हणतो.

१.९१ ब्राह्माने शूद्रांकरीता एकच व्यवसाय ठरवून दिला आहे. तो म्हणजे विनम्रतापूर्वक तीनही वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यांची सेवा करणे होय.

१०.१२१ एखादा शूद्र जर ब्राह्मणाची सेवा करून जगण्यास असमर्थ असेल तर त्याने क्षत्रियाची सेवा करावी नाही तर वैश्याची सेवा करून जगावे.

१०.१२२ ब्राह्मणांची सेवा केल्याने शूद्राच्या सर्व प्रकारच्या इच्छा पूर्ण होतात. या जीवनात व पुढच्या जीवनात शूद्राला ब्राह्मणाची सेवा केल्याने स्वर्गलाभ होईल.

१०.१२३ ब्राह्मणांची सेवा करणे हाच शूद्रासाठी सर्वोत्तम व्यवसाय आहे, असे ठरविण्यात आले आहे. कारण याव्यतिरिक्त तो जो काही करतो ते सगळे व्यर्थ (निष्फळ) ठरते.

शूद्रांकडून सेवा कर्म करण्यासाठी कुठल्याही कराराची आवश्यकता नाही, असे मनूला वाटते तर शूद्राकडून बलपूर्वक सेवा करून घेण्यात यावे असे मनूने नियमात खालीलप्रमाणे सांगितले आहे.

८.४१३ प्रत्येक ब्राह्मण शूद्राकडून सेवा करून घेण्यासाठी बळजबरी करु शकतो. जरी तो ब्राह्मणाचा गुलाम असो वा नसो. कारण शूद्रांचे जीवन हे ब्राह्मणांच्या सेवेकरीताच बनलेले आहे. ब्राह्मणाने शूद्रांना त्याची योग्यता, त्याने केलेली सेवा आणि शुद्रांच्या परिवारातील संख्या पाहून पोषण मोबदला द्यावा.

१०.१२५ शूद्रांनी वाचलेले अन्न व घरातील शिल्लक राहिलेले जुने पुराने सामान द्यावे. मनूच्या मतानुसार शूद्राने इतरांशी बोलतांना आणि व्यवहार करतांना गुलामाप्रमाणे विनम्रपणे राहिले पाहिजे.

८.२७० शूद्राने जर ब्राह्मणजातीचा व नावाचा उच्चार तिरस्काराने केला तर त्यची जीभ कापावी. कारण तो जन्मानेच नीच कूळात जन्मलेला आहे.

८.२७१ शूद्राने जर ब्राह्मण जातीचा अथवा नावाचा तिरस्काराने उच्चार केला तर दहा उंगल लांबीची लोखंडी सळाख तापवून लाल करून त्याच्या तोंडात घालावी.

शूद्रांचा हलका दर्जा त्याच्या नावातून सुद्धा प्रकट व्हायला पाहिजे. निरनिराळ्या वर्णातील लोकांची नावे कशी असावीत याबद्दल मनू म्हणतो -

२.३१ ब्राह्मणाने नाव मंगलसूचक, क्षत्रियाचे नाव शक्तिसूचक वैश्याचे नांव धनसूचक तर शूद्राचे नांव दासभाव सूचक असावे.

मनूच्या पूर्वी शूद्रांची स्थिती काय होती? शूद्रांचे वर्णन मनू बाहेरुन आलेल्या परकीय अनार्याप्रमाणे करतो. कुठल्याही प्रकारचे सामाजिक आणि धार्मिक अधिकार शूद्रांना प्राप्त होऊ नयेत. अशी धारणा मुद्दाम लोकांच्या मनात भरविली गेली की, शूद्र हे अनार्य होते. परंतु या बाबतीत कुठलीही शंका नाही की, प्राचीन आर्य साहित्यात यासंबंधी कुठलाही पुरावा आढळत नाही.

आर्याच्या धार्मिक साहित्याचा अभ्यास केल्यावर त्यात विविध जाती समुदायाचा उल्लेख आढळतो. सर्वप्रथम आर्यांचा उल्लेख सापडतो. आर्यामध्ये चार वर्ण होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. या व्यतिरिक्त आर्यापेक्षा वेगळ्या अशा १) असूर २) सूर अथवा देव ३) यक्ष ४) गंधर्व ५) किन्नर ६) चारण, अश्विनी आणि निशाद इत्यादी नावाचा उल्लेख सापडतो.

निषाद हे वनातील रहिवाशी असून आदिम व असंस्कृत होते. गंधर्व, यक्ष, किन्नर, चारण आणि आश्विनी हे व्यवसायिक वर्ग होते. असूर हे सामान्य नाव असून विशिष्ट जनसमुदायांना दिलेले नाव आहे, या जनसमुदायांना विभिन्न नावाने ओळखले जायचे. जसे दैत्य, दानव, कलंज, कलेय, कालिन, नाग, निवात, कवच, पुलोम, पिशाच, आणि राक्षस, ही सर्व एकाच जनसमुदायाची विभिन्न नावे आहेत.

आपणास दोन समुदायातील प्रमुख देवाची नावे माहिती आहेत. उदा. ब्रह्मा, विष्णु, रूद्र, सूर्य, इंद्र, वरुण आणि सोम इत्यादि. सायणाचार्यांच्या भ्रामक लिखाणामुळे बुद्धीमान माणसांना देखील वरील नावाबद्दल भ्रम पडलेला आहे. लोकांचा यावर विश्वास बसला आहे की, असूर हे मानवसमूहातील नव्हते. तर हे असूर लोक रात्र झाल्यावर आर्यांना त्रास देणारे भूत पिशाच्च होते. सूर आणि देवांना मात्र नैसर्गिक शक्तीचे प्रतिक म्हणून समजले गेले. आर्यात अशी धारणा आहे की ते गोऱ्या रंगाचे, सरळ नाकाचे व गौर वर्णाचे असून त्यांना याबद्दल अभिमान होता. दस्यू (अनार्य) लोकांबद्दल ही धारणा आहे की, ते येथील आदी निवासी होते. त्यांच्या रंग काळा आणि नाक चपटे होते. आर्यांनी भारतावर आक्रमण करून अनार्य लोकांना पराजित केले व त्यांना आपले दास बनविले. दास या अर्थाने पराजितांना दस्यू हे नाव दिले गेले.

'दस्यू' हा शब्द दास या शब्दापासून बनलेला असून तो गुलाम या अर्थाने वापरला जातो. या सर्व धारणा चुकीच्या आहेत. असूर आणि सूर, दोघेही आर्य समुदायातील समान लोक होते. दोघांचा ही पिता 'काश्यप' होता. काश्यप याच्या पासून जन्मलेल्या 'दिती' पासून जे उत्पन्न झाले ते दैत्य व आदितीपासून उत्पन्न झाले ते देव अथवा सूर या नावे प्रसिद्धीला आले. या दोघांमध्ये पृथ्वीवर अधिपत्य स्थापित करण्यासाठी तुंबळे युद्ध झालीत. अशाप्रकारची पौराणिक कथा आहे. निसंशय पौराणिक कथा देखील एक अतिहासच आहे. ज्याला विकृत करून ब्राह्मणांद्वारे सांगण्यात आले आहे.

आर्य कोणत्याही एका प्रजातीचे नाव नाही. तो काही लोकांचा समूह आहे. आर्य संसकृती या नावची एक विशिष्ट संस्कृती होती. ज्यामध्ये आर्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. जो व्यक्ती आर्यात सामील होण्याची इच्छा ठेवीत असे. त्याला आर्य संस्कृती स्वीकारावी लागत असे. आर्यांमध्ये काळ्या रंगाचे, चपट्या नाकाचे असे कोणत्याही प्रकारचे लोक नव्हते. जे आर्याहून स्वरुपात भिन्न होते.

वरील धारणा 'वर्ण' आणि 'अनास' या शब्दाचा चुकीचा अर्थ लावला गेल्यामुळे तयार झालेली आहे.

'वर्ण' शा शब्दाचा अर्थ रंग आणि 'अनास' या शब्दाचा अर्थ 'नाक नसलेला' असा करण्यात आला. हे दोघेही अर्थ चुकीचे आहेत. जाती या अर्थाने वर्ण आणि अन + आस = मुख किंवा आकृतिरहित या अर्थाने अनास असा अर्थ लावला तर आर्य हे रंगाप्रती पूर्वग्रही होते याला कोणताही आधार सापडत नाही. वर्णासंबंधी प्रचलित धारणा ही चुकीच्या कल्पनांवर आधारलेली आहे.

दस्यू हे वेगळ्या प्रजातीचे नसून आर्य समुदायातील लोक होते. आर्यापेक्षा भिन्न संस्कृतीशी यांचा संबंध होता. आर्यच्या विरोधात्मक धोरणांशी यांचा संबंध असल्यामुळे आर्यांनी यांना वेगळे नांव दिले. म्हणून दास हे वेगळ्या प्रजातीचे नाव होते हे सिद्ध करणे कठीण आहे. असे समजणे देखील चुकीचे आहे की आर्य आक्रमणकारी लोकांनी शूद्रांवर विजय प्राप्त केला.

प्रथम गोष्ट ही की या गोष्टीचा कोणताही पुरावा आढळत नाही की आर्यांनी भारताबाहेरुन आक्रमण केले व त्यांनी येथील लोकांनी गुलाम बनविले.

याबाबतीत अनेक पुरावे देता येतील की आर्य हे भारतातील मुळनिवासी होते. याबाबीचे कुठलेही प्रमाण नाही की, आर्य आणि दस्यूंमध्ये युद्ध झाले. वस्तुतः दस्यूंचा कुठलाही संबंध नाही.

दुसरी महत्वाची गोष्ट ही की, या गोष्टीवर विश्वास ठेवणेही शक्य नाही की आर्य लोक हे शक्तीशाली असून त्यांनी अनार्यांना बळाच्या जोरावर अंकित केले. अशी कल्पना देखील करणे मुर्खपणाचे आहे की, कमजोर अशा आर्य लोकांनी

शूद्रांवर विजय प्राप्त केले. दास व आर्य हे एकाच प्रजातीचे लोक असून सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न होते. दस्यू म्हणजे अनार्य या अर्थाने 'आर्यापेक्षा वेगळी संस्कृती मानणारे लाक' असा होतो. यांनी आर्यांना विरोध केला. शूद्र हे आर्यांतीलच लोक असून आर्यांच्या जीवनपद्धतीवर यांचा विश्वास होता. कौटिल्याच्या काळापर्यंत शूद्रांना आर्य मानण्याची परंपरा भारतात कायम होती.

शूद्र हे आर्य समुदायातील, जन्म-जात, अभिन्न आणि सन्मानित सदस्य होते. या गोष्टीचा उल्लेख यजुर्वेदातील एका श्लोकात आढळतो.

राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी शुद्रांनी देखील ब्राह्मण, वैश्य आणि क्षत्रियाप्रमाणे आमंत्रित केले जात असे. या गोष्टीचा पुरावा महाभारतातील पांडवाचे जेष्ठ बंधू युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाच्या वर्णनाच्या वेळी सिद्ध होते. नीलकंठ नामक प्राचीन विद्वानानुसार एका राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी चार प्रमुख मंत्री ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांनी राजाचा अभिषेक केला यानंतर प्रत्येक वर्णातील प्रमुख तसेच लहान जातीतील प्रमुखांनी सुद्धा पवित्र जलाने राजाचा अभिषेक केला. यानंतर द्विजांनी राजाचा नावाचा जयघोष केला.

वैदिक युगाच्या नंतर आणि मनुपूर्व काळात जनप्रतिनिधिंचा एक वर्ग होता- त्यांना 'रत्नी' असे म्हणत असत. राज्याच्या राज्याभिषेकाच्या वेळी हे विशेष भूमिका करित असत. यांना रत्नी यासाठी म्हणत कारण की यांच्याकडे 'रत्न' असे, जे सत्तेचे प्रतिक असत. राजाला तेव्हाच सत्ता प्राप्त होत असे जेव्हा हे रत्नीगण स्वतः जवळील रत्न राजाला बाहाल करित असत. राजत्व प्रापत झाल्यानंतर राजा प्रत्येक 'रत्नीच्या' घरी जात असे आणि त्याला 'उपहार' (भेट) प्रदान करित असे. महत्वाची गोष्ट ही की शूद्र हा देखील एक रत्नी असे.

प्राचीन काळात शूद्र दोन महत्वपूर्ण राजकिय संस्थामध्ये अहमभूमिका निभावित असत ज्यांना जनपद आणि पौर म्हणत असत. या संस्थाचे अधिकारी शूद्र असल्यामुळे ब्राह्मणांना देखील शूद्रांना मान देणे भाग पडत असे.

हे सत्य निर्विवाद आहे की प्राचीन आर्य समाजात शूद्रांनी उच्च राजकीय प्रतिष्ठा प्राप्त होती. ते राज्याचे मंत्रीसुद्धा बनू शकत. याचे प्रमाण आपणास महाभारतात मिळते.

महाभारतकार ३७ मंत्र्याची एक सूची देतो ज्यामध्ये चार मंत्री ब्राह्मण, आठ मंत्री क्षत्रिय, एकवीस मंत्री वैश्य आणि तीन मंत्री शूद्र होते आणि एक मंत्री 'सूत' होता.

शूद्र केवळ मंत्रीच बनू शकत असे नाही तर राजेसुद्धा बनू शकत. एखादा शूद्र राजा बनू शकतो किंवा नाही याबद्दल मनूची धारणा शूद्रा विषयी ऋग्वेदामध्ये उल्लेखीत कथेच्या अगदी विपरित आहे.

वेदामध्ये वर्णित 'सुदास' हा राजा दिवोदास याचा पुत्र असून तो शूद्र होता, हे वाचून कित्येकांना आश्चर्य वाटेल. या काळातील ब्राह्मण वशिष्ट आणि क्षत्रिय विश्वामित्र यांच्यामध्ये राजपुरोहित बनण्यावरून चाललेला वाद प्रसिद्धच आहे.

या वादावरुन हे सिद्ध होते की ब्राह्मण अथवा शूद्र क्षत्रिय एका शूद्र राज्याच्या आधीन कार्य करण्यास कुठलाही कमीपणा मानत नसत उलट राजाची कृपा प्राप्त करण्यासाठी त्यांच्यामध्ये प्रतिस्पर्धा चालत असे किंबहुना शूद्रांकडे वैदिक कर्म करण्यास ब्राह्मण सदैव तत्पर असत.

यानंतरचे देखील राजे हे शूद्र झालेले नाही असे देखील नाही. परंतु याउलट मनुच्या पूर्वी शूद्र राज्यांची दोन साम्राज्ये होती.

नंदांना जे शूद्र होते इ. पूर्व ४१३ ते ४२२ पर्यंत राज्य केले. यानंतर मौर्यांनी इ. पूर्व ३२२ ते १८३ पर्यंत शासन केले हे सुद्धा शूद्रच होते.

ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील अनेक मंत्रांची रचना कवी 'एलूष' नावाच्या शूद्र ऋषीने केली आहे. पूर्व मीमांसा, कात्यायन श्रौत सूत्र आणि शतपथ ब्राह्मण यामध्ये शूद्रांच्या योग्यतेबद्दल भरपूर पुरावे मिळतात. सुप्रसिद्ध अश्विनीकुमार हा सुद्धा शूद्रच होता.

ऋषिगणांद्वारा नीच समजल्या जाणाऱ्या लोकांतील काही सुज्ञ, धनवान आणि बलशाही लोकांना शुद्ध करण्याच्या संस्काराला 'व्रात्यस्तोम' म्हणत याचे वर्णन 'पंचवीस' ब्राह्मणामध्ये केला गेला आहे.

व्रात्य लोकांना गृहस्थी जीवनात संस्कारीत करण्याकरीता वरील संस्कार करण्यात येत असत. आर्य संस्कृतीत संस्कारित झाल्यानंतरच अशा लोकांना गृहस्थी जीवनाची अनुमती ऋषीद्वारा देण्यात येत असे. संस्कारानंतरच या लोकांची सर्वसंपत्ती ब्राह्मणांना दान म्हणून वाटण्यास येत असे.

संस्कारित लोक ब्राह्मणांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करु शकत. ते चारही वेद वाचू शकत.

अशाप्रकारे आर्य लोक आपल्या संस्कृतीमध्ये इतरांना वरील व्रात्यस्तोम संस्काराद्वारे परिवर्तित करून आर्य संस्कृतीचा फैलाव करीत.

असूर आर्यांच्या यज्ञसंस्कृती आणि चातुवर्णच्या विरोधी होते. त्यांना देखील आर्य संस्कृतीत हजारोंच्या संख्येने परिवर्तीत करण्यात येत असे. हिरण्यकश्यपचा मुलगा प्रल्हाद याला अशाच प्रकारे आर्यसंस्कृतीत परिवर्तीत करण्यात आले हाते. परंतु शुद्र विरोधी दृष्टीकोन का स्विकारण्यात आला? त्यांना बहिष्कृत कां करण्यात आले?

◆◆◆

# स्त्री आणि प्रतिक्रांती

ज्या प्रमाणात मनू शूद्रांबद्दल नीच विचारधारणा प्रस्तुत करतो . तीच नीच विचारधारणा स्त्रीवर्गाबद्दल सुद्धा प्रस्तुत करतो. स्त्रीवर्गाबद्दल हीन विचार ठेवतांना मनू म्हणतो –

२.२१३ पुरूषांना मोहित करणे हा स्त्रियांचा मुळस्वभाव आहे आणि म्हणून बुद्धिमान माणसे स्त्रियांच्या सहवासात राहू शकत नाही.

२.२१४ कारण या जगात स्त्रिया केवळ मुर्खानांच वाईट मार्गाला लावत नाही तर विद्वान माणसालाही वासनेचा आणि क्रोधाचा गुलाम बनवितात.

२.२१५ पुरूषाने आई बहिण किंवा मुलगी यांच्याबरोबर एकांतात बसू नये. कारण इंद्रिये ही शक्तीमान असतात आणि ती विद्वान माणसांनाही आपल्या प्रभुत्वाखाली आणतात.

९.१४ स्त्रियांना सौंर्याची पर्वा नसते किंवा त्यांचे वयाकडेही लक्ष नसते. तो पुरूष असला म्हणजे त्यांना पुरेसे आहे. त्या स्वतःला सुंदर माणसांच्या आणि कुरूप माणसांच्या हवाली करतात.

९.१५ स्त्रिया पुरूषांच्या आसक्तीमुळे, त्यांच्या चंचल स्वभावामुळे आणि नैसर्गिक हृदयशुन्यतेमुळे त्यांचे कितीही काळजीपूर्वक संरक्षण केले तरी त्या आपल्या पतीशी बेइमान होतात.

९.१६ स्त्रियांना निर्माझ करतांना ईश्वराने त्यांची ही जी प्रवृत्ती बनविली आहे. ती लक्षात घेऊन प्रत्येक माणसाने अगदी कडकपणे त्यांच्यावर पहारा ठेवला पाहिजे.

९.१७ स्त्रियांना निर्माण करतांना ईश्वराने त्यांना शयनाची आसक्ती, आसनाची आसक्ती, दागिन्याची आसक्ती, अशुद्ध इच्छा, राग, अप्रामाणिकपणा मत्सर आणि गैरवर्तवणूक हे गुण बहाल केले आहेत.

स्त्रियांबाबत मनूने केलेले कायदे हे अपरिवर्तनीय आहेत. मनुच्या मतानुसार स्त्रियांना कुठल्याही परिस्थितीत स्वतंत्रता असू नये. त्यांच्या मते –

९.२ कुटुंबातील पुरूषांनी स्त्रियांना रात्रंदिवस आपल्या नजरेखाली ठेवावे. स्त्रिया ह्या विषयासक्त (चंचल) असल्यामुहे त्यांना आपल्या नियंत्रात ठेवावे.

९.३ पित्याने तिचे बालपात रक्षण करावे. पतीने तारुण्यात रक्षण करावे, वृद्धापकाळात तीने मुलांनी रक्षण करावे. स्त्री ही केव्हावी स्वतंत्र राहण्यास योग्य नाही.

९.५ विशेषकरून स्त्रियांचे त्यांच्या गैरप्रवृत्तीच्या विरूद्ध रक्षण करावे. मग

त्या कितीही शुल्लक असोत. कारण त्यांच्यावर लक्ष ठेवले नाही तर त्या दोन्ही कुटुंबाना दुःखात पाडतात.

९.६ सर्व जातीचे उत्तम कर्म म्हणून अगदी दुबर्ल पतीनेही पत्नी रक्षण केले पाहीजे.

५.१४७ मुलीने, तरूण स्त्रीने किंवा अगदी वृद्ध स्त्रीने स्वतःच्या घरातही स्वतंत्रपणे काही करू नये.

५.१४८ बालपणात स्त्री पित्याच्या ताब्यात असावी. तिला स्वातंत्र्य कधीही देऊ नये.

५.१४९ तिने स्वतःला पित्यापासून, पतीपासून किंवा पुत्रापासून वेगळे ठेवू नये. जर ती तशी वेगळी राहिली तर तिने स्वतःचे आणि तिच्या पतीचे 'कुटुंब तिरस्करणीय बनेल. स्त्रियाला घटस्फोटाचा हक्क असू नये.

९.४५ पति हा स्त्रीशी पुर्णपणे एकरूप असतो. त्यामुळे स्त्रीने एकदा लग्न केल्यानंतर त्याच्यापासुन तिला वेगळे होता येत नाही.

बहूतांश हिंदू मनू द्वारा समर्थित विवाह विच्छेदाच्या नियमाला आदर्श मानतात. मनूने विवाहाला एखाद्या संस्काराप्रमाणे मानलेले आहे आणि म्हणूनच विवहापासून विच्छेद घेता नाही. अशी आपली अविवेकी समजूत अधिकांश हिंदू करून घेतात. परंतू ही बाब सत्यापासून शेकडो मैल दूर आहे. विवाह-विच्छेदाचा मनूचा उद्देश अजिबाद वेगळा होता. हि बाब एका पूरूषाला स्त्रीशी जोडणारी नसून स्त्रीला पूषाशी जोडणारी आहे. एवढेच नव्हे तर यात पुरूष स्वतंत्र असून तो केव्हाही आपल्या पत्नीचा त्यगा करू शकतो. पुरुष हा केवळ स्वतःच्या पत्नीच्या त्यागच करु शकत नाही तर तीला विकू सुद्धा शकतो. तो पत्नीला स्वतंत्र न होण्याकरिता नियम सुद्धा घालून देतो.

**यासंबंधी मनू म्हणतो.**

९.४.६ विकल्याने किंवा सोडून दिल्यावरही स्त्री ही स्वतःच्या पतीपासून दूर होवू शकत नाही. याचा अर्थ हा आहे की केवळ विकूण दिल्यावर किंवा सोडून दिल्यावरही ज्या व्यक्तिने तीचा स्विकार केला आ किंवा विकत घेतला आहे त्याची कायदेशीर पत्नी होवू शकत नाही. जर ही बाब असंगत नाही तर मग कुठलीही बाब असंगत नाही. परंतु स्वतःच्या नियमाच्या परिणामास्वरुप होणाऱ्या न्याय-अन्यायाबद्दल मनू चिंतीत नव्हता तो स्त्रीला त्या अधिकारापासून वंचित करू इच्छित होता जो तीला बौद्ध शासनांतर्गत मिळत होता. मनूला माहित होते की स्त्रीला मिळणाऱ्या स्वातत्र्याच्या उपयोग ती शूद्रांसोबत लग्न करून देखील करु शकेल. परिणामतः वर्ण व्यवस्था नष्ट होऊन जाईल.

स्त्रीला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे मनू हा क्रोधित व चींतेत पडला आणि तीला या स्वातंत्र्यापासून वंचित केले.

मालमत्तेबद्दल पत्नीचे स्थान एखाद्या गुलामाच्या स्तरापर्यंत मनुने आणून सोडले.

९. ४१६. पत्नी, पूत्र आणि दास या तीघांकडेही कोणत्याही प्रकारची संपत्ती ठेवू नये. स्त्रीद्वारे कमावलेली संपत्ती तीची होत नसून ती ज्याची पत्नी किंवा दास आहे त्याची होईल.

जर एखादी स्त्री विधवा झाली तर तीला जीवन निर्वाहा बद्दल धन दिले जाऊ शकते, भूसंपत्ती देखील निर्वाहाबद्दल दिली जाऊ शकते, परंतू हि संपत्ती कायमस्वरुपी स्वतःकडे मालमत्ता म्हणून ठेवण्याचा अधिकार मात्र स्त्रीला मनूद्वार नाकारण्यात आला आहे.

मनू द्वारा निर्मित नियमानुसार स्त्रीला शारिरीक दंड सुद्धा दिला जाऊ शकतो आणि पत्नी स्वतःच्या पत्नीला मारु किंवा पिटू शकतो.

८.२९९ स्त्रीने जर अपराध केला तर पती तीला रस्सीने बांधून बांबूने (छडीने) आणि पत्नी स्वतःच्या पत्नीला मारू किंवा पिटू शकतो.

८.२९९ स्त्रीने जर अपराध केला तर पती तीला रस्ससीने बांधून बांबूने (छडीने) मारु शकतो.

यापेक्षा वेगळ्या परिस्थितीत मनू स्त्रीयांचे स्थान शूद्रांच्या बरोबरीनेच मानतो.

वेदांचे अध्ययन करण्यापासून ज्याप्रमाणे शूद्राला वंचित करण्यात आले आहे त्यशाप्रमाणे स्त्रीला देखील नाकारण्यात आले आहे.

मनू म्हातो –

२.७७ स्त्रीयांवर सगळे संस्कार केले जावे परंतु ते वेदमंत्राशिवाय केले जावेत.

९.१८ स्त्रिला शिक्षणाचा अधिकार नाही. म्हणूनच वेदमंत्राशीवाय तीचे संस्कार केले जातात. वेद वाचण्याचा स्त्रीला कुठल्याही अधिकार नसल्यामुळेच तीला धम्माचे ज्ञान नसते. पापांपासून मुक्ती मिळविण्याकरिता वेदपठण करणे आवश्यक आहे. स्त्रीयांना वेद वाचण्याचा अधिकार नसल्याकारणाने त्या असत्याप्रमाणे अपवित्र ठरतात.

ब्राह्मणीधम्मानुसार यज्ञ करणे हेच धम्माचे सार आहे. तरी सुद्धा मनूने स्त्रीयांना यज्ञ करण्याची अनुमती दिलेली नाही.

मनू आदेश देतो –

११.३६ स्त्री वेदमंत्राच्या उच्चारासह यज्ञ करू शकत नाही.

११.३७ जर ती असे करिल तर ती नरकात जाईल.

स्त्रीयांनी यज्ञकर्म करु नये म्हणून त्या ब्राह्मणांची मदत करु शकत नाही. किंवा सेवा देखील करु शकत नाही किंवा मदत देखील घेवू शकत नाही.

४.२०५ स्त्रीद्वारा देण्यात आलेल्या अन्नाला यज्ञ करणारा ब्राह्मण ग्रहण करणार नाही.

४.२०६ स्त्रीद्वारा हजर यज्ञकर्म केले गेले तर ते अशूभ ठरुन अपवित्र असते. देवता त्याचा स्विकार करित नाही. म्हणूनच त्यात भाग घेऊ नये.

स्त्रीने कुठलेही बौद्धिक कार्य करु नये. तीने स्वतःच्या इच्छेने काहीही करु नये. स्वतंत्र विचार दील डोक्यात आणता कामा नये. बौद्ध धम्म देखील ती स्वकारु शकत नाही. जर तीने बौद्ध धर्मांचे पालन केले तर मेल्यावर जे संस्कार करण्यात येतात ते तीच्यावर करण्यात येणार नाहीत.

जीवनाचे आदर्श म्हणून मनूने स्त्रीयांकरिता घालून दिलेल्या आदर्शाकडे सुद्धा लक्ष द्या.

मनू म्हणतो –

५.१५. स्त्रीने आजीवन पतीच्या आज्ञेत राहावे व त्याचे पालन करावे. पति मेल्यावर ती श्राद्धदेखील करु शकत नाही.

५.१५४ पती कितीही दूराचारी असला किंवा अन्य स्त्रीसोबत राहत असला किंवा दुर्गनी आणि व्यसनी असला तरी देवतेसमान मानून त्याचीच पूजा करावी.

५.१५५ पती शिवाय स्त्रीने कोणतेही व्रत किंवा उपवास करु नये. पतीच्या आज्ञेत जर स९ी राहिली तरच ती स्वर्गात देखील सन्मानित होईल.

आता मनूद्वारा निर्मित त्या आदर्शाकडे लक्ष द्या जे स्त्रीयांकरीता स्थापित करण्यात आले आहेत.

५.१५० स्त्रीने नेहमीच प्रसन्न राहावे. घरकार्यात चतुर असावे. घरातील भांडी स्वच्छ ठेवावी आणि खर्च करण्याबाबत मितव्ययी असावे.

५.१५३ पत्नी म्हणून स्विकारलेल्या स्त्रीचा पतीला हाच तीचा सर्वकाळ अधिकारी असतो. मग तीला मुले होवोत अवि न होवोत.

आता मनूपर्व काळात स्त्रीयांची जी स्थिती होती तीकडे लक्ष द्या अथर्व वेदांत स्पष्टपणे लिहिले आहे की स्त्रीयांना देखील उपनयनाचा अधिकार आहे.

ब्रह्मचर्य अवस्था समाप्त केल्यानंतर स्त्रीही विवाह योग्य होत असते.

– श्रौत सूत्रांमध्ये हे स्पष्टपणे लिहिले आहे की स्त्री देखील वेदमंत्राचे उच्चारण करु शकतो आणि वेदामंत्रातील शिक्षण देखील दिले जात असे.

– पाणिनीच्या अस्टाध्यायी मध्ये याचा उल्लेख सापडतो. प्राचीन काळात स्त्रीया गुरुकुलात देखील जात असत आणि वेदांच्या विशिष्ठ शाखेचा अभ्यास देखील करीत.

- एवढेच नव्हे तर त्या मिमांसेत देखील प्रवीण असत.

- पतंजलीच्या महाभाष्यात लिहिले आहे कि,

स्त्रीयांना शिक्षक देखील होता येत असे आणि त्या लहान मुलांना वेद देखिल शिकवित असत.

- धम्म; अध्यात्म आणि तत्वमिमांसेतील कठिणातील कठीण विषयावर स्त्रीयांचे पुरुषाबरोबर वादविवाद होत असत.

या वादविवादाची अनेक उदाहरणे देता येतील.

- जनक आणि सुलभ, याज्ञवल्य आणि गार्गी, याज्ञवल्य आणि मैत्रैयी तसेच शंकराचार्य आणि विाधरी यांच्यामध्ये चाललेल्या वादविवादामधून सिद्ध होते की मनुपुर्व स्त्रीया शिक्षण आणि मानाच्या उच्च पातळीपर्यंत पोहोचलेल्या होत्या.

मनुपूर्व स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान होते. हे कुणीही नाकारु शकत नाही. प्राचीन काळात राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी ज्या स्त्रीयांची महत्त्वाची भूमिका असे त्यात राणीच देखील समावेश होता. राजा इतरांप्रमाणेच राणीलादेखील वर प्रदान करीत असे. एवढेच नव्हे तर खालच्या जातीतील आपल्या इतर राण्यांना देखील राजा सन्मानित करीत असे. राज्याभिषेकानंतर राजा हा आपल्या राज्यातील मंत्र्याच्या राण्यांना देखील अभिवादन करित असे.

कौटिल्याचा काळात स्त्री ही १२ वर्षाची व पुरुष हा १६ वर्षाचा असतांना वयस्क मानला जात असे. बौद्धायनाच्या गुहयसुत्रामध्ये लिहिले आहे की यानंतरच स्त्रीया विवाह योग्य होतात.

मनुच्या नियमाच्या विरुद्ध कोटिल्याचा काळात स्त्रीचा जर पति सोबत वैरभाव अथवा घृणाभाव किंवा तीचा पती दुषचरित्र असेल तर त्या स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार होता. एवढेच नव्हे तर विधवा अथवा एखाद्या स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा हक्क सुद्धा होता. मनूपूर्व काळात पती मेल्यावर संपत्तिचा अधिकार सुद्धा स्त्रियांना प्राप्त होता.

हे वाचून तर आपणास आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही की मनूपूर्व काळात पतिच्या छळ अथवा जाचापासून, हमानहानीपासून सुटका करून घेण्यासाठी न्यायालयात सुद्धा जाण्याचा अधिकार स्त्रीवर्गाला प्राप्त होता.

अर्थात मनुपूर्व काळात स्त्री ही स्वतंत्र होती आणि पुरुषांच्या बरोबरीने समान होती. परंतु मनूने तिची अधोगति केली.

◆◆◆